काव्य
७१४८

# श्री शिवविजय.

अथवा

## छत्रपती शिवाजी महाराज यांचे ओंवीबद्ध चरित्र.

दक्षिणा प्राईझ कमीटीनें पसंत करून बक्षिस दिलेला ग्रंथ.

# श्री शिवविजय

अथवा

## छत्रपती शिवाजी महाराज यांचें

### ओवीबद्ध सुरस चरित्र.

REFBK-0000546

ग्रंथकार

कै० अंताजी रामचंद्र हर्डीकर

आवृत्ती २ री

किंमत १॥ रुपया.

हें पुस्तक केशव अंताजी हर्डीकर यांनीं
महाड येथें मराठा प्रेस मध्यें छापून प्रसिद्ध केलें
सन १९०९.
( सर्व हक्क स्वाधीन ठेवले आहेत. )

# प्रस्तावना

*निवृत्ततर्षैरुपगीयमानात् भवौषधात् श्रोत्रमनोभिरामात् ॥
क उत्तमश्लोकगुणानुवादात् पुमान् विरज्येत विना पशुघ्नात् ॥

( श्रीमद्भागवत. )

उपकारकर्त्यांची प्रत्युपकृतीनीं फेड करणें हें मनुष्यमात्राचें कर्तव्य आहे. तथापि ज्यास्थळीं तसें कारितां येणें अशक्य असेल त्या ठिकाणी उपकृतीचें श्रद्धापूर्वक स्मरण करणें हें तरी प्रत्येकास अवश्य आहे. असें जर आहे तर आह्मां आर्यांच्या अर्वाच्यकालीन आस्तित्वास जो कार ूत झाला, यवन तापानें तप्त झालेल्या आर्यभूमीस आपल्या पराक्रम जलसिंचनामें जो शीतळविता झाला, लुप्तप्राय झालेल्या भारतीय शौर्य, धैर्य, स्वाभिमानादि गुणांस ज्यानें उज्ज्वलित केलें, आह्मां-मध्यें तेज, बल, धैर्य, वीर्य, पराक्रम, इत्याद्यनेक गुणांचें वास्तव्य आहे असें ज्यानें दिगंतीं गाजविलें व धर्मच्छल नाहींसा करून सद्धर्माचें साम्राज्य ज्यानें स्थापिलें, आणि फार दिवसांपासून नष्ट झालेली हिंदूची वर्धिष्णु राज्यसत्ता ज्यानें महाराष्ट्रांत स्थापून धन्यत्व संपादन केलें; ज्याच्या आभावीं आजला अखिल भरतखंड म्लेंच्छमय होऊन ेलें असतें, पुराणविद्यांचा व वेदशास्त्रादि प्राच्य ग्रंथांचा लोप होऊन, वैदिकधर्म बहुधा नामशेष मात्र राहिला असता; त्या राजाधिराज शिवछत्रपतीचे उपकार आपण किती बरें स्मरले पाहिजेत ? तर्कशास्त्राच्या कसोटीवर कांहींही ठरो, पण ज्याच्या प्रतापाचे परिणाम रामकृष्णादिकांच्या पराक्रमांचे जे परिणाम झाले, तसेच सुफलित व हितावह झाले आहेत; त्या श्रीमत् शिवरायाला रामकृष्णादि-

---

+ ( भावार्थ— आशेपासून निवृत्त झालेल्या जनांससुद्धां जे गायन करण्यास योग्य आहेत, संसाररूप रोगास जे औषध आहेत, कर्ण, व मन यांस जे संतुष्ट करितात, असे जे उत्तम श्लोकाचे गुणानुवाद त्यांपासून आत्मघातकी मनुष्यांशिवाय कोणते पुरुष परावृत्त होतील !

काप्रमाणेंच पूज्य न मानणें हें अत्यंत अविचाराचें काम आहे, असें कोणता सुविचारी मनुष्य ह्मणणार नाहीं ? उपकारास प्रत्युपकार यास्थळीं सर्वथैव शक्य, याकरितां आमच्या महाभाग नृपतीचें चित्र चरित्रवर्णन करणें हें अत्यंत उचित, कर्तव्य, मोदप्रद, लाभप्रद व उन्नतिप्रद आहे. अशी माझी दृढ समजूत आहे.

आमचे मयूरपंडितादिक महाराष्ट्र कविवर्य छत्रपतीच्या गुणगणसुधारसाचीं पात्रें आमच्याकरितां भरून ठेवते,तर आह्मी त्यांच्या चिरसेवनानें आकंठ तृप्त झालों असतों; पण दुर्विधीनें तो योग आह्मांस लाधला नाहीं. भाविकाळांत महाराष्ट्रीय सद्गुणांचा लोप होऊन तदुद्धारार्थ पूर्वकालीन गुणांचें स्मरण देण्याचा प्रसंग आपल्या संततीवर येणार आहे, असें भविष्य न समजल्या-मुळें पंतांसारख्या कविवर्यांनीं आपली वाग्देवी रामकृष्णादिकांच्या चरित्र वर्णनापासून परावृत्त करून छत्रपती सारख्यांच्या गुणौघांकडे वळविली नाहीं हें कालानुरूपच झालें. पण आह्मीं मात्र इच्छित विषयाचे संबंधानें सत्काव्यांस आंचवलों. नशीब आमचें !

वरील विचारांचे प्रादुर्भावानें शिवचरित्र वर्णनाचा आविर्भाव माझ्या मनांत झाला व आबालवृद्ध महाराष्ट्रीयांस प्रिय असलेल्या हरिविजय रामविजयादि पुराणपद्धतीवर रचना करावी असा माझा मनोदय झाला. माझ्या ह्या ग्रंथांत रसाविर्भाव कितपत होणार आहे हें माझें मला पक्कें माहित आहे, आणि ह्मणूनच अशा प्रकारचा दुसरा ग्रंथ महाराष्ट्रभाषेंत असता तर मी ह्या खटपटींत मुळींच पडलों नसतों पण तसा ग्रंथ नाहीं व पुराणपद्धती-वर रचलेला ग्रंथ आमच्या महाराष्ट्र मंडळीपुढें असावा, असें वाटल्यावरून यथाशक्ति हा प्रयत्न केला आहे. उपलब्ध इतिहास ग्रंथांवरून कथानाय-काचें महत्व वाचकांचे मनावर ठसत नाहीं, तें ठसावें, नायक महाराजांवर महाराष्ट्रियांचें प्रेम दृढ व्हावें, त्याच्या चरित्रीं त्यांचें मन रमावें, भारत रामायणादि ग्रंथांत वर्णिल्यासारिखे पराक्रम आमच्या महाराष्ट्रियांकडून गे-ल्या २०० वर्षांत घडले आहेत. सबब ते यथाकाळीं पुढेंही घडणें असं-

भवनीय नाहीं, हें तत्व त्यांचे मनांत बिंबावें, स्वदेशाभिमान उत्पन्न व्हावा, आळस, औदासिन्य, अमार्गवर्तन, हीं सोडण्याकडे त्यांची मनःप्रवृत्ती व्हावी व महाराजांची आणि आपल्या देशभाषेची आपल्या हातून कांहीं तरी सेवा घडावी; या हेतूनें हा ग्रंथ लिहिला आहे. हे हेतू कितपत सिद्धीस जातील याचें अनुमान करण्यास ग्रंथकर्त्यास कांहींच आधार नाहीं, हें उघड आहे.

आतां ग्रंथांतील रचनाविशेषाबद्दल थोडेंसें लिहिलें पाहिजे. पुराणपद्धतीवर रचना कर्तव्य असल्यामुळें हरएक ठिकाणीं वर्णनांत कमीजास्ती भाग येणें साहजिकच आहे. तथापि कथानकांत निराधार गोष्टी बिलकूल लिहिल्या नाहींत. ग्रंथांतरीं ज्या गोष्टीस आधार आहे, त्या गोष्टी कोणास काल्पनिक वाटतील त्यास माझा इलाज नाहीं. त्यांतील सत्यासत्याची पारख करण्याचें माझें काम नाहीं व मला तितकें सामर्थ्यही नाहीं तसेंच महाराजांच्या सर्व चारित्रकथा यांत आल्या आहेत, असेंही नाहीं. विस्तारभयास्तव पुष्कळ भाग गाळावे लागले आहेत, तथापि महत्वाचे सर्व वृत्तांत यांत आले आहेत; अशी माझी समजूत आहे. क्वचित् कथाकांत बदल, कोठें कालमानानें मागेंपुढें झालेले, वगैरे दोष आढळतील; पण हा केवळ इतिहास ग्रंथ नाहीं. याकारितां ते क्षम्य होतील असें मला वाटतें. ग्रंथाची भाषा ठेववेल तितकी साधी, सरळ व सुबोध ठेविली आहे. ग्रंथांत जेथें श्रीरामदासस्वामींचे उपदेशाचा प्रसंग आला आहे, तेथें तेथें त्यांचे ग्रंथांतून अवतरणें दिलीं आहेत. हीं कोठें कोठें इतकीं लांब लांब आहेत कीं, तशीं घेणें बाजवी नाहीं असेंही कांहीं मित्रांनीं सुचविलें आहे; व यामुळें ग्रंथकाराची अशक्तता दिसते, असेंही कोणाचें ह्मणणें आहे; पण मला तसेंच करणें प्रशस्त वाटलें ज्यानें दोन तीन हजार ओंव्या कशा बशा लिहिल्या त्याला आणखीं शें दोनशें कशा तरी घालतां आल्या असत्या; पण प्रसंगानुरूप समर्थांची मधुर वाणी सिद्ध असतां आपलेंच घोडें पुढें ढकलणें मला योग्य वाटलें नाहीं समर्थांचीं वाग्रत्नें ही सार्वजानिक मालमत्ता आहे.

ती हवी त्यानें लुटण्याचा आह्मां महाराष्ट्रीयांस पूर्ण अधिकार आहे. यास्तव माझ्या मनाला रुचलीं, तीं वचनें मीं बेलाशक उचलून घेतलीं ह्मणून व तीं त्यांचींच आहेत असें प्रसिद्धपणें सांगितल्यावर चौर्य कर्माचा आरोप मजवर लागू होणार नाहीं, अशी माझी समजूत आहे. तर्कन्यायादि प्राच्य पाश्चात्य शास्त्रांच्या सतताध्ययनानें, व परिशीलनानें अस्मानांत भरारी मारण्याचें ज्यांस सामर्थ्य आलें असेल त्यांस प्रस्तुत ग्रंथ निकामी वाटेल. पण विद्या-मार्गांत नुकतेच शिरत असलेले, आमचे महाराष्ट्रीय बालगोपाल, प्रखर विद्येचा विशेष संस्कार न झालेले सुशील वृद्ध, तरुण, व लेखन वाचन कलाभिज्ञ महाराष्ट्र स्त्रीजन, यांचे आदरास हा ग्रंथ पात्र व्हावा; त्यानां तो वाचनीय वाटावा, व त्यांचे मनावर इच्छित सुपरिणाम व्हावेत, असा ग्रंथ कर्त्याचा अजमास आहे. तो कितपत खरा होतो, याचा अनुभव पुढें येण्याचा आहे.

शेवटीं ग्रंथकर्त्याचे मनांत जी एक आशा आहे व जिचे संबंधानें त्याचें मनोराज्य सतत चालत असतें व जी

'॥ उत्पद्यंते विलीयंते दरिद्राणां मनोरथाः ।
बालवैधव्यदग्धानां कुलस्त्रीणां कुचाविव ॥'

या न्यायानें निर्फळच होण्याची आहे व जिच्यामुळेंच प्रस्तुत ग्रंथाचा प्रादुर्भाव झाला, तिचा येथें उल्लेख केल्यावांचून त्याच्यानें राहवत नाहीं. सबब तो उल्लेख येथें करितों.

आपल्या या भरतभूमींत रामकृष्णादि स्मरणीय व अवतारांचीं अनेक मंदिरें बांधलेलीं असून लाखों रुपये खर्चानें त्यांचे उत्साह वर्षास होत आहेत. मग त्यांचेच तोडीचा जो आमचा महात्मा कथानायक, ज्याच्या पराक्रमाचे सुपरिणाम अद्याप स्थित आहेत, ज्यानें लाविलेल्या राज्यरूप वृक्षाच्या शाखा दूर दूर प्रसरलेल्या अद्यापि सजीव असून, त्यांच्या शीतल छायेचें महत्सौख्य लोक अद्याप अनुभवीत आहेत. त्याचें एखादें टुमदार मंदिर नसावें व त्याचे ज्ञानानें वर्षातून एखादा दिवस सणासारिखा पा-

ळिला न जावा, व त्याचा राष्ट्रीय महोत्साह आनंदानें न व्हावा हें परम शोचनीय आहे. महाराष्ट्रीयांनीं मनांत आणिल्यास छत्रपतींचें स्मारक मंदिर व वार्षिकोत्साह करण्याचे ठिकाणाचा मान रायगडास देणें योग्य आहे. तथापि त्या दुर्गाची सांप्रतची स्थीति मनांत आणिली तर तसें होणें अशक्य आहे. यास्तव शिवरायाच्या इतिहाससंबंधानें रायगडाखालोखाल ज्या गांवाचा मान आहे, ज्या ठिकाणीं त्या धन्य पुरुषाची वारंवार वस्ती असे, व जो त्याच्या प्रियतम रायगिरीच्या अगदीं लगत आहे व ज्या ठिकाणीं त्याला सद्गुरु दर्शनाचा लोभ उत्पन्न झाला, व जो प्रस्तुत ग्रंथकर्त्याची जन्मभूमी आहे. अशा ' **महाड** ' नामक गांवीं त्याचा वार्षिक उत्साह सुरू व्हावा, व साधल्यास त्याचें मंदीर सिद्ध होऊन ' **श्रीशिवसंस्थान** ' नांवानें त्या मंदिराचा उदय व्हावा; असा ग्रंथकर्त्याचा फार हेतू आहे. तो पुरा होणें न होणें हें आमच्या महाराष्ट्रीयांचे सुबुद्धीवर अवलंबून असल्यामुळें आमचे महाराष्ट्रबांधव याचा विचार करतील अशी आशा आहे.

हा ग्रंथ तयार करण्याचे कामीं माझे मित्र रा. रा. अंताजी चिंतामण दामले मुख्याध्यापक, विद्यालय महाड यांनीं मला फार साह्य दिलें याबद्दल मी त्याचा फार आभारी आहें.

मुक्काम महाड<br>
मिती श्रावण शुद्ध ११ शके १८१२ } **अंताजी रामचंद्र हरडीकर.**

श्री

# दुसरी आवृत्ति.

सदर अपूर्व ग्रंथाची पहिली आवृत्ती निघाल्यानंतर कांहीं दिवसांनीं ग्रंथकर्त्यास कैलासवास झाल्यामुळें व दुसऱ्या कित्येक अडचणीमुळें दुसरी आवृत्ती काढण्याचा सुयोग लवकर आला नाही, तो ईशकृपेनें आज येत आहे श्रीमत् छत्रपती शिवाजी महाराजांचे ठिकाणीं पूज्यभाव उत्पन्न होऊन महाराष्ट्रांत ठिकठिकाणी त्यांचे प्रतिवार्षिक उत्सव होऊं लागले व त्यांचे समाधीचे जीर्णोद्धारार्थ मोठा फंड जमा होऊन रायगडावर महोत्सव होऊं लागला आहे. या गोष्टींमुळें ग्रंथकर्त्याच्या आत्म्यास बरेंच समाधान होईल यांत शंका नाही.

सामान्य जन समूहास सदर ग्रंथ घेण्यास किमतीच्या मानानें सुलभ पडावें व वापरण्यास सोईचें व्हावें एवढ्यासाठीं बारीक टाईपांत व बुक साचांत ही दुसरी आवृत्ती काढली आहे. क्वचित् ठिकाणीं शुद्धाशुद्धाचा व किरकोळ फेरबदल केला आहे.

सदर आवृत्ती छापण्याचे कामीं रा० बाळकृष्ण रावजी पालवणकर व त्यांचे बंधु यांचे फार आभार झाले आहेत.

# अध्याय १ ला.

॥ श्रीगणेशायनमः । श्रीसरस्वत्यैनमः । श्रीगुरुभ्योनमः ॥

जय परब्रह्म परात्पर । अदृश्य अवाच्य निर्विकार ।
निर्गुण निरामय निराकार । ग्रंथारंभीं नमूं तया ॥ १ ॥
कारणावीण कार्य नसे । ही जगतस्थिति कार्य दिसे ।
ईतें कारण कोण असे । हें मानवा अतर्क्य! ॥ २ ॥
कोणी एककर्ता ह्मणती । कोणी बहुविध देव बोलती ।
कोणी ह्मणती उत्क्रांती । कारण आहे जगासी ॥ ३ ॥
बहुतीं बहुत केल्या कल्पना । परी त्या अवघ्या वृथा जल्पना ।
अल्पबुद्धी मानव मना । पार याचा न लागे ॥ ४ ॥
यास्तव नामरूप नुच्चारितां । आधीं वंदितों जगत्कर्ता ।
तोच होवो बुद्धिदाता । ग्रंथरचना करावया ॥ ५ ॥
आतां वंदूं गजवदन । वक्रतुंड मूषकवाहन ।
कृपा करो विघ्ननाशन । ग्रंथ संपूर्ण हा होवो ॥ ६ ॥
नमूं ब्रह्मकुमारी सरस्वती । जी विद्येची अधिष्ठात्री ।
तत्कृपेवीण माझी मती । कैसा करील ग्रंथ हा ॥ ७ ॥
नमूं कैलासपती शंकर । नमूं वैकुंठवासी गदाधर ।
विश्वस्रष्टा सावित्रीवर । ग्रंथारंभीं नमूं तया ॥ ८ ॥
कुलस्वामी कालभैरव । मातृदेव- पितृदेव ।
यांचे चरणीं धरून भाव । ग्रंथारंभीं वंदूं तया ॥ ९ ॥
नमूं त्रिगुणात्मक दत्तमूर्ती । नमूं इंद्र चंद्र गभस्ती ।
तेहेतीस कोटी देवांप्रती । ग्रंथारंभीं नमस्कारूं ॥ १० ॥

जंई सृष्ट्युत्पत्ती झाली । मानवज्ञाती जन्मा आली ।
तंई नाना रूपें भासलीं । ईश्वराचीं मानवां ॥ ११ ॥
अंधकारापासून सुटतां । मानवें नमिला देव सविता ।
वृष्टियोगें धान्य मिळतां । मेघराजा वंदिला ॥ १२ ॥
ज्याज्यापासून सुखोत्पत्ती । ते ते देव मनुज भावें पूजिती ।
तेहेतीस कोटी ऐशारीती । मनुजें देव वंदिले ॥ १३ ॥
वाढे जगाचा अनुभव । चढला ज्ञानाचा प्रभाव ।
ज्ञानी ह्मणे एक देव । कर्ता पाळिता संहारिता ॥ १४ ॥
असो जे सज्जनीं वर्णिले । ते ते देव नमस्कारिले ।
आतां पाहिजेत नमिले । साधु संत कविवर ॥ १५ ॥
नमूं आदि कवि वाल्मिक । नमूं व्यास आणि तत्सुत शुक ।
नमूं नारद आल्हादजनक । कीर्तनरंग जयाचा ॥ १६ ॥
बौद्धीं स्वधर्म बुडविला । त्यासाठीं अवतीर्ण झाला ।
त्या शंकराचार्य जगत्गुरूला । ग्रंथारंभीं नमस्कारूं ॥ १७ ॥
नमूं कविकुलगुरू कालिदास । नमस्कार करूं भवभूतीस ।
बाण बिल्हणादि संस्कृत कवींस । एकदांचि नमस्कारूं ॥ १८ ॥
महाराष्ट्र वाणीचा वाल्मीक सहज । आतां नमूं तो मुकुंदराज ।
तैसा ज्ञानदेव कविराज । ग्रंथारंभीं नमस्कारूं ॥ १९ ॥
नामदेव तुकाराम कविवर । एकनाथ वामन पंडित मयूर ।
श्रीधर रघुनाथ मुक्तेश्वर । महाराष्ट्रकवि वंदूं हे ॥ २० ॥
संस्कृत भाषाब्धि मंथून । अपार कष्टें सार काढून ।
प्राकृत जनां केलें अर्पण । ते हे कवीश्वर वंदिले ॥ २१ ॥
धरून भूमंडळीं अवतार । ज्यांहीं केला जगदुद्धार ।
त्या समर्थ रामदासां नमस्कार । ग्रंथारंभीं करितसे ॥ २२ ॥

आतां श्रोतयां संबोधून । करूं ग्रंथारंभ आपण ।
श्रोते ह्मणती काय कारण । ग्रंथ कासया होतसे ॥ २३ ॥
मागां थोर थोर कवि झाले । त्यांहीं सन्मान्य ग्रंथ केले ।
भक्तिभावें ओथंबले । करूं पारायणें तयांचीं ॥ २४ ॥
विवेकसिंधू ज्ञानेश्वरी । हरिविजयादि ग्रंथ श्रीधरी ।
दासबोधादि नानापरी । ग्रंथ असती वाचावया ॥ २५ ॥
जो वाचितां आनंदे मन । भक्तिभाव उपजे पूर्ण ।
अंतरीं उपजे समाधान । ऐसे ग्रंथ आहेत ॥ २६ ॥
ग्रंथकर्ता दिसे अल्पमती । कासया धरितो हाव चित्तीं ।
कैसी होईल रसोत्पत्ती । यया ग्रंथामाझारीं ॥ २७ ॥
ग्रंथ नसतां सुरस । मोद न वाटे श्रोतयांस ।
कथनें श्रवणें व्यर्थ त्रास । श्रोते वक्ते पावती ॥ २८ ॥
कथा पौराणिक थोर थोर । टाकून नूतन वर्णणार ।
ग्रंथ होईल निःसार । व्यर्थ शीण श्रवणाचा ॥ २९ ॥
टाकून श्रीरामविक्रम । सोडून पांडवपराक्रम ।
नूतन गोष्टींत विश्राम । श्रोते कैसे पावती ॥ ३० ॥
वक्ता बोले कर जोडून । आहे शंका यथार्थ पूर्ण ।
परी तुमचें समाधान । करावया इच्छितों ॥ ३१ ॥
जया कारणें प्रवर्तलों । ग्रंथ रचावया लागलों ।
तुह्मां श्रोतयांसन्निध आलों । तीं कारणें सांगेन मी ॥ ३२ ॥
पवित्र देश आर्यावर्त । पूर्वापार जगद्विख्यात ।
जन्म पावलों त्या देशांत । ईशइच्छेंकरूनी ॥ ३३ ॥
आर्यमातेनें केलें लालन । निघून गेलें बाळपण ।
प्राप्त जाहलें यौवन । कांहीं काळ कंठिलें ॥ ३४ ॥

सत्पुरुषांचा अनुग्रह । कांहीं घडला हितावह ।
इतिहासांचा समूह । कांहीं कांहीं विलोकिला ॥ ३५ ॥
आर्यमातेची मूर्ती । पूर्वकाळीं कैशी होती ।
प्रस्तुत कैशी दिसे स्थिति । मनीं येऊं लागलें ॥ ३६ ॥
लागला तोचि निजध्यास । तळमळ लागली चित्तास ।
दुजें नाठवे रात्रंदिवस । आर्यमाते वांचुनी ॥ ३७ ॥
हा ! हा ! स्वधर्म बुडाला । लुप्त झाल्या विद्या कला ।
लक्ष्मीनें ठाव सोडिला । द्वीपांतरा चालली ॥ ३८ ॥
आर्यमाता दुःखें रडे । कानीं येती हंबरडे ।
तें ऐकतां हृदय धडधडे । नेत्रीं अश्रू लोटती ॥ ३९ ॥
आपण आलों जीचे उदरीं । तीतें साह्य द्यावें कांहीं तरी ।
ऐसें येई अंतरीं । वारंवार माझिया ॥ ४० ॥
नाहीं शौर्य ना संपत्ती । नाहीं विद्या नाहीं मती ।
मग साह्य कोण्यारीती । हीनभाग्यें करावें ॥ ४१ ॥
ऐसा लागला घोर । कांहीं न सुचे विचार ।
रात्रंदिन चिंता थोर । चित्तालागीं लागली ॥ ४२ ॥
ऐसे कांहीं दिन क्रमिले । पुढें काय नवल वर्तलें ।
श्रोतीं पाहिजे परिसिलें । अवधान देउनी ॥ ४३ ॥
उष्णकाळीं एके दिनीं । नित्य कृत्यें अवघीं सारुनी ।
पहुडलों असतां शयनीं । निद्रा नये सत्वरीं ॥ ४४ ॥
आर्यमातेची मूर्ती । उभी राहिली नेत्रांपुढती ।
हंबरडे कानीं दुमदुमती । चित्ता तळमळ सुटतसे ॥ ४५ ॥
काय करावें कोठें जावें । कोणालागीं शरण रिघावें ।
मातेचें उतराई व्हावें । काय कार्य करूनी ॥ ४६ ॥

ऐशा चिंताभरें लोळतां । डोळा लागला अवचितां ।
तों स्वप्न देखिलें तत्वतां । परम अद्भुत वाटलें ॥ ४७ ॥
जयाची अगें हिममय । ऐसा देखिला हिमालय ।
पवित्र भागीरथीचें तोय । वाहतां दृष्टीं देखिलें ॥ ४८ ॥
आक्रमितां पर्वतशिखर । लागलें हिमनगाचें पाठार ।
तेथें मृडानी सहित पार्वतीवर । संचार करिता देखिला ॥ ४९ ॥
परम दैदीप्यमान शंकरमूर्ती । तेजें दशादिशा उजळती ।
पाहूनियां अपार द्युती । परमाश्चर्य वाटलें ॥ ५० ॥
अष्टभावें होऊनि पूर्ण । केलें साष्टांग वंदन ।
तंव तो महाराज पार्वतीरमण । कृपादृष्टीं विलोकी ॥ ५१ ॥
ह्मणे हें उत्तम स्थान । पावलास सुकृतें करून ।
मग मीं करद्वय जोडून । पुढें उभा ठाकलों ॥ ५२ ॥
कंठ झाला सद्गदित । न बोलवे कांहीं मात ।
तें जाणून षडाननतात । काय बोलता जाहला ॥ ५३ ॥
ह्मणे ना भीं आर्य बालका । मम अभयें होई बोलका ।
तुवां उद्देश योजिला जो कां । कथन करी सात्क्षेपें ॥ ५४ ॥
ते परिसून गंभीर बोल । क्षणेक राहिलों निश्चळ ।
पुन्हां वंदून कंठनीळ । विनयें बोलता जाहलों ॥ ५५ ॥
जय भक्तकामकल्पद्रुमा । जय अघनाशना अमितविक्रमा ।
किती वर्णूं तव महिमा । ब्रह्मादिकां अगम्य ॥ ५६ ॥
तव इच्छेनें जन्मा आलों । आर्यावर्ती जन्म पावलों ।
परी मातृदुःखें पोळलों । उपाय कांहीं सांगावा ॥ ५७ ॥
सद्धर्म लक्ष्मी पराक्रम । यांहीं त्यजिलें आमुचें धाम ।
तूं पुरविता भक्तकाम । ह्मणूनि शरण पातलों ॥ ५८ ॥

करावी आर्यमातेची सेवा । ऐसें चित्तीं वाटे देवा ।
परी मनोदय सिद्धी जावा । कोण्या प्रकारें कळेना ॥ ५९ ॥
संकटीं पडलें चित्त साचें । काय करावें न सुचे ।
व्हावें समाधान दासाचें । ऐशी सेवा सांगिजे ॥ ६० ॥
आर्यमातेकारण । जरी घडलें देहपतन ।
तरी मी धन्य मानीन । आपणातें भगवंता ॥ ६१ ॥
जोडोनियां उभय हस्त । प्रभो मी झालों शरणागत ।
तूं कृपाळू भगवंत । मार्ग मातें दाखवी ॥ ६२ ॥
मग बोले कैलासपती । प्राणी जैशीं कर्मे करिती ।
तैशींच फळें पावती । मृत्युलोकामाझारी ॥ ६३ ॥
सुखामागें येई दुःख । दुःखाअंतीं पुन्हा सुख ।
ऐशीं एकामागें एक । सुखदुःखें धांवती ॥ ६४ ॥
आर्यावर्तें सौख्य भोगिलें । आतां विपरीत काळें ग्रासिलें ।
याही स्थितींत पाहिजे राहिलें । कांहीं काळ बालका ॥ ६५ ॥
व्यर्थ चिंता करूं नका । भलत्या भरीं भरूं नका ।
काळ येईल पूर्वी सारिखा । सौख्यदाता तुह्मांतें ॥ ६६ ॥
हल्लीं जे जे यत्न कराल । ते ते फुकट जातील ।
मग शेवटीं पस्तावाल । निराश चित्तीं होउनी ॥ ६७ ॥
आर्यमातेची करावी सेवा । ऐसा मनीं असेल हेवा ।
तरी सांगेन तो धरावा । मार्ग तुवां बालका ॥ ६८ ॥
पूर्वी यवनीं धर्म बुडविला । गोब्राह्मणां त्रास दिधला ।
मग मी अवतार धरिला । धर्मोन्नति कारणें ॥ ६९ ॥
धरून मानव देहाप्रती । मी झालों शिवछत्रपती ।
अंगें भोगून नाना विपत्ति । गोब्राह्मण प्रतिपाळिले ॥ ७० ॥

तें माझें अवतार चरित । परम मंगल रसभरित ।
तुवां वर्णावें समस्त । चित्तीं भाव धरूनी ॥ ७१ ॥
या चरित्रवर्णनें करून । होशील पवित्रांतःकरण ।
आर्यपुत्रां समाधान । तव ग्रंथें होईल ॥ ७२ ॥
मी बोलिलों भगवंता । ग्रंथ रचावया पाहिजे विद्वत्ता ।
मज मतिमंदा कार्य सांगता । कैसें सिद्ध होईल ॥ ७३ ॥
नाहीं इतिहास अभ्यासिला । नाहीं कवित्वशक्ति मजला ।
कैसें आरंभू ग्रंथाला । पार्वतीरमणा जगत्पते ॥ ७४ ॥
मग बोलिला अपर्णापती । तुज होईल कवित्वस्फूर्ती ।
शंका न धरावी चित्तीं । ग्रंथारंभ करावया ॥ ७५ ॥
वाग्देवी साह्य करील । तव हस्तें चरित्र लिहवील ।
ग्रंथ रसाळ होईल । मम वरदानेंकरूनी ॥ ७६ ॥
पूर्ण होतां ग्रंथरचना । दाखवी समस्त आर्यजनां ।
तयां लाभ होतील नाना । ग्रंथ वाचितां सप्रेमें ॥ ७७ ॥
पूर्वजांची परिसतां ख्याती । तच्चरित्रीं जडेल प्रीती ।
पूर्वज पराक्रम चित्तीं । घोळूं लागतील सहजची ॥ ७८ ॥
शिवभूपें कैसें केलें । कैसें स्वदेहा कष्टविलें ।
गोब्राह्मण प्रतिपाळिले । कैशा परी सर्वदा ॥ ७९ ॥
कैसें स्वराज्य थाटिलें । कैसे म्लेंच्छ पराभविले ।
जीवित्व तुच्छ मानिलें । कैसें स्वधर्माकारणें ॥ ८० ॥
कैसें केलें रणकंदन । कैशा युक्तिप्रयुक्ति योजून ।
सुखी ठेविले स्वजन । कैशापरी सर्वदा ॥ ८१ ॥
शिवभूपाचें चित्र चरित्र । शुभदायक परम पवित्र ।
हें परिसतां आर्यपुत्र । आनंदयुक्त होतील ॥ ८२ ॥

मनीं बाणेल देशाभिमान । ठसतील चित्तीं पूर्वजगुण ।
वाटेल करावें अनुकरण । पूर्वजांचें प्रीतीनें ॥ ८३ ॥
देशकल्याणा हांव धरावी । तरी कैशी वृत्ति असावी ।
शरीरसुखा लाथ द्यावी । कैशापरी कळेल ॥८४॥
शौर्य स्वाभिमानादि गुण । इहीं युक्त होते स्वजन ।
मग कां यथाकालीं अजून । नुपजतील ते या देशीं ॥ ८५ ॥
जनचित्तीं ऐसे विचार । ठसतील हें वाचून चरित्र ।
तेणें मार्ग होईल सुखकर । पुढचिया काळींचा ॥ ८६ ॥
प्रस्तुत तुह्मी काय करावें । विपरीत काळा चित्तीं धरावें ।
वावगे यत्न सोडून द्यावे । नित्य स्वधर्म रक्षावा ॥ ८७ ॥
जनीं ऐक्य करावें । महा पुरुषाचें चरित्र गावें ।
आपुलेंपण न टाकावें । प्राण गेल्या कधींही ॥ ८८ ॥
भगवंत कृपा करील । थोड्या दिनीं काळ फिरेल ।
पूर्वदिवस दाखवील । सन्मार्गानें चालल्या ॥ ८९ ॥
प्रभुमुखींची ऐशी वाणी । परमानंदें ऐकिली कानीं ।
तों कांपों लागली मेदिनी । नादें अंबर दणाणिलें ॥ ९० ॥
प्रळय काळींची मेघगर्जना । तैसे ध्वनी उठती नाना ।
न दिसे कांहीं मम नयना । तया स्थानाभीतरी ॥ ९१ ॥
नीलकंठ, अपर्णा, उदक । न दिसे यांतून कांहीं एक ।
जिकडे तिकडे भयानक । दिसों लागलें तेधवां ॥ ९२ ॥
तेणें अपार भय वाटत । इतक्यांत झालों मी जागृत ।
स्वप्न येऊन मनांत । परम विस्मित जाहलों ॥ ९३ ॥
क्षणेक होऊन स्थिर । मग केला मना विचार ।
प्रसन्न होऊन उमावर । स्वप्नीं दर्शन दीधलें ॥ ९४ ॥

सांगीतली असे सेवा । तिचा आतां उद्योग करावा ।
मग चित्तीं महादेवा । वंदूनिया सरसावलों ॥ ९५ ॥
तुह्मी श्रोते संत सज्जन । ह्मणून केलें आमंत्रण ।
ग्रंथ वदविता पार्वतीरमण । ह्मणून श्रवण करावें ॥ ९६ ॥
असेल श्रोतयां उल्हास । तरी हुरूप येईल वक्त्यास ।
भरेल ग्रंथीं उत्तम रस । तरीच श्रोते सज्जन हो ॥ ९७ ॥
श्रोते जरी कां आळसती । तरी वक्त्याची खुंटेल गती ।
कैशी वाटेल तया प्रीती । ग्रंथ वदावयाकारणें ॥ ९८ ॥
आहे चरित्र अभिनव । त्यांतील नायकमहत्वास्तव ।
चित्तीं धरून प्रेमभाव । ग्रंथ श्रवण करावा ॥ ९९ ॥
वंदनीयांस वंदून । केली प्रस्तावना मागुन ।
आतां लागेल अनुसंधान । पुढील अध्यायापासुनी ॥ १०० ॥
कैशी होती देशस्थिती । कैशी प्राप्त झाली विपत्ती ।
हें येईल आतां पुढती । सावधान परिसावें ॥ १०१ ॥
श्रीशिवविजय ग्रंथ । शिवावतारचरित्र अद्भुत ।
वर्णन करी भावें अनंत । प्रथमाध्याय गोड हा ॥ १०२ ॥

इति श्रीशिवविजयग्रंथे प्रस्तावनानिरूपणं नाम प्रथमोध्यायः

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

# अध्याय २ रा.

॥ श्रीगणेशायनमः ॥

करूनि परमेश्वरचिंतन । भक्तिभाव चित्तीं धरून ।
आतां चालवूं अनुसंधान । प्रेमळ श्रोतयां कारणें ॥ १ ॥
जगदीशें पृथ्वी सृजिली । नाना द्वीपें निर्मियेलीं ।
त्यांत ही आपुली माउली । आर्यमाता विराजे ॥ २ ॥
हा आर्यावर्त देश । उत्तम वस्तूंचा निवास ।
सृष्टिसौंदर्याचा कळस । जाहला असे या देशीं ॥ ३ ॥
श्रेष्ठ नग हिमगिरी । शोभे उत्तर सीमेवरी ।
तैसे सह्याद्रि विंध्याद्रि । देशामाजी शोभती ॥ ४ ॥
गंगा यमुना सिंधुनद । कृष्णा गोदा नर्मदा प्रसिद्ध ।
तापी आणि बहुविध । सरिता वाहती या देशीं ॥ ५ ॥
नाना तीर्थें नाना काननें । नाना सरोवरें नाना उपवनें ।
नाना परींचीं रम्य स्थानें । स्थळीं स्थळीं विराजती ॥ ६ ॥
परोपरींचीं धान्यें पिकती । सुंदर सुंदर फुलें फुलती ।
वृक्ष लतादि नाना जाती । यांहीं देश शोभतो ॥ ७ ॥
श्वापद वर्ग असंख्यात । हंस मयूरादि पक्षी समस्त ।
इहींकरून आर्यावर्त । शोभा देतसे सर्वदा ॥ ८ ॥
पृथ्वीमध्यें ज्या वस्तू असती । त्या त्या आर्यदेशीं होती ।
सृष्ट पदार्थ सर्व निपजती । ईश कृपेनें या देशीं ॥ ९ ॥
या भरतखंडामाझारीं । होते क्षत्रिय राज्याधिकारी ।
ज्यांचा प्रताप उर्वीवरी । गाजतसे सर्वदा ॥ १० ॥

धर्म नीतीनें राज्य करिती । गो ब्राह्मणां प्रतिपाळिती ।
प्रजा पुत्रवत् मानिती । धर्म रक्षिती निजबळें ॥ ११ ॥
मांधाता, हरिश्चंद्र जनक। नलराजा पुण्यश्लोक।
ऐसे राजे अनेक । पूर्व युगीं जाहले ॥ १२ ॥
जैं होतसे धर्मग्लानी । तैं लक्ष्मीपती अवतार घेउनी ।
सनातन धर्म स्थापुनी । अद्भुत चरित्रें दावीतसे ॥ १३ ॥
रामकृष्णादि अवतार । धरून लीला दाविल्या अपार ।
केला जगतीचा उद्धार । लीला मात्रें करूनी ॥ १४ ॥
द्वापरयुग संपत आलें । तदा भारतीय युद्ध झालें ।
अनेक क्षत्रिय राजे निमाले । तया युद्धामाझारीं ॥ १५ ॥
क्षत्रियांचीं कुळें अचाट । होते महावीर उद्भट ।
त्यांहीं स्वर्गलोकींची वाट । रणांगणीं धरियेली ॥ १६ ॥
बहुत क्षत्रिय धारातीर्थीं । पतन पावले मिळवून कीर्ती ।
अष्टादश दिन युद्धाअंतीं । थोडे अवशिष्ट राहिले ॥ १७ ॥
अश्वत्थाम्याचा रुद्र कृपाण । अवशिष्टांचें उडवी चंदन ।
एवं भारतीय युद्ध दारुण । क्षत्रियांतक जाहलें ॥ १८ ॥
युद्धीं पडल्या राजावळी । क्षत्रिय कुळें खालावलीं ।
वीरश्रीसी ओहटी लागली । तंई पासुनी या देशीं ॥ १९ ॥
कलिराजाचें युग लागलें । पांडव हिमाचळीं गेले ।
मागें परिक्षितीनें राज्य केलें । हस्तिनापुरा माझारीं ॥ २० ॥
त्याचेंही कर्म ओढवलें । तक्षकदंशें मरण आलें ।
जन्मेजय राजा ते वेळे । सिंहासनीं आरुढला ॥ २१ ॥
त्या मागें शतानिक । तयानंतर सहस्रानीक ।
तदुपरी अश्वमेधक । असीमकृष्ण त्यावरी ॥ २२ ॥

निमीचक्र, चक्ररथ, कविरथ । वृष्टिमान् सुषेण सुनीथ ।
नृचक्षु सुखीनल परिप्लव विख्यात । अनुक्रमें राजे जाहले ॥२३॥
सुनय मेधावी नृपंजय । दूर्व, तिमी, बृहद्रथराय ।
सुदास शतानिक सोमक राय । दर्दुमन, वहिनर दंडपाणी ॥२४॥
निमी आणि लक्ष्मीदेव । इतुके युधिष्ठिरवंशीय राव ।
शेवटील पावे पराभव । वीरसेना हातुनी ॥ २५ ॥
वीरसेन नामें प्रधान । त्यानें लक्ष्मीदेवास वधून ।
राज्य बळकाविलें आपण । पांडववंशापासुनी ॥ २६ ॥
कली होत चालला प्रबळ । क्षत्रिय मोडत गेले सकळ ।
बुडाले राजवंश निर्मळ । फूट पडली ठायीं ठायीं ॥ २७ ॥
गेले पूर्वींचे पराक्रम । ग्लानि पावत चालला धर्म ।
होऊं लागलें पापकर्म । आर्यावर्तामाझारीं ॥ २८ ॥
रजपूतांचीं शूर कुळें । त्यांचीं निरनिराळीं मंडळें ।
ठायीं ठायीं स्वीयबळें । राज्यशकट हांकिती ॥ २९ ॥
ऐसा लोटला बहु काळ । पुढें आली अनिष्ट वेळ ।
तयींची देशास्थिति सकळ । वर्णन केली पाहिजे ॥ ३० ॥
सिंध देशीं रजपूत वीर । राज्य करिती समरधीर ।
जयांची सेना अपार । क्षणें शत्रू जिंकीतसे ॥ ३१ ॥
कनोजराज महा वीर । राज्य करी मध्य देशावर ।
तयाचे मांडलिक अपार । ठायीं ठायीं राज्य करिती ॥३२॥
कोठें कोठें बौद्ध नृपती । उत्तर प्रांतीं राज्यें करिती ।
दक्षिणेस अनेक भूपती । राज्यें करिती स्वबलानें ॥ ३३ ॥
चेर चोल पांड्य नामक । दक्षिणेंत हीं कुलें प्रमुख ।
लहान लहान हीं अनेक । राजमडळें तैं होतीं ॥ ३४ ॥

शुद्ध वैदिक धर्मांत । झाला बौद्धधर्म मिश्रित ।
नाना मतें नाना पंथ । चालत होते त्या काळीं ॥ ३५ ॥
ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र । हे मूळचे वर्ण चार ।
यांत होऊनि संकर । अनेक जाती निघाल्या ॥ ३६ ॥
तथापि देश सधन । सुखी होते सकल जन ।
स्वस्वकार्यीं रत होऊन । सदा सर्वदा राहती ॥ ३७ ॥
संकट वेळ समीप आली । कैशीं विघ्नें ओढवलीं ।
परम दुःखें श्रवण केलीं । पाहिजेत तीं आतां ॥ ३८ ॥
आर्यावर्ताचे पश्चिमेस । आहे आरबस्थान देश ।
तेथें महंमद नामें पुरुष । अति विख्यात जाहला ॥ ३९ ॥
तेणें नूतन धर्म स्थापिला । स्वपराक्रमें तो विस्तारिला ।
दिवसेंदिवस वृद्धि पावला । धर्म तयाचा जगांत ॥ ४० ॥
हातीं घेऊन तरवार । उड्या घेती महंमदी वीर ।
करूनियां बलात्कार । आपुला धर्म वाढविती ॥ ४१ ॥
ते मुसलमान नाम पावले । महाशूर क्रूर निघाले ।
धर्म प्रसारार्थ घालिती घाले । अन्य देशावरी ते ॥ ४२ ॥
महा निर्दय दुराचारी । दैत्यांशें आले उर्वीवरी ।
त्यांनीं लगट केली भारी । आर्यावर्त जिंकावया ॥ ४३ ॥
प्रथम सिंध देशावरी । यवन लोक करिती स्वारी ।
परंतु तयां रजपूत वीरीं । पराभवुनी सोडिले ॥ ४४ ॥
सबक्तगीन नामा यवन । त्यानें ससैन्य स्वारी करून ।
जयपाळ राजा पराभवून । राज्य हरिलें तयाचें ॥ ४५ ॥
म्लेंच्छ योद्धे नाना जाती । येऊं लागले आर्यावर्तीं ।
बलात्कारें नेती संपत्ती । आर्यां त्रास देउनी ॥ ४६ ॥

गिझनीचा महंमूद । धरी स्वाऱ्यांचा छंद ।
विजयमदें होऊन धुंद । पापकर्मे करीतसे ॥ ४७ ॥
सोमनाथाची मूर्ती फोडिली । तेथील अपार संपत्ति लुटिली ।
प्रजा सर्व घाबरी केली । क्रूरकर्में तयानें ॥ ४८ ॥
पुढें घोरी शहाबुद्दीन । आला वेगें चालून ।
माजलें एकच रणकंदन । तया वेळीं या देशीं ॥ ४९ ॥
पृथ्वीराजा महावीर । आणि यवन योद्धे अपार ।
यांचें युद्ध घोरांदर । वारंवार जहलें ॥ ५० ॥
पृथ्वीराज पावला पतन । झालें म्लेंच्छ राज्य स्थापन ।
दिवसादिवस प्रबल यवन । होत चालले या देशीं ॥ ५१ ॥
मोंगल खिलजी तगलख । तार्तारादि यवन अनेक ।
ऐसे एकामागें एक । स्वाऱ्या करिती या देशीं ॥ ५२ ॥
दिल्लीपुरीं मोंगल । बादशहा जाहले प्रबळ ।
पराभूत पृथ्वीपाळ । झाले समस्त येथींचे ॥ ५३ ॥
विजापुरीं आदिलशाही । गोंवळकोंड्यास कुतुबशाही ।
अहंमदनगरीं निजामशाही । बुरीदशाही बेदरीं ॥ ५४ ॥
इमादशाही वऱ्हाड देशीं । ऐशीं पांच राज्यें दक्षिणेशीं ।
स्थापून आर्य प्रजेशीं । म्लेंच्छीं अपार गांजिलें ॥ ५५ ॥
देश यवनीं आक्रमिला । महा अनर्थ ओढवला ।
आर्यावर्त दुःख पावला । नाना प्रकारें तेधवा ॥ ५६ ॥
कंस मुष्टिक चाणूर । यांचीं जैशीं कर्मे घोर ।
तैसेंच हे यवन क्रूर । कर्मे करूं लागले ॥ ५७ ॥
एकें देवालयें भंगिलीं । एकें पवित्र मूर्ति फोडिली ।
एकें गोमाता वधिली । ऐसें होऊं लागलें ॥ ५८ ॥

ब्राह्मण पाहतां नयनीं । थुंकती तयांच्या वदनीं ।
त्यांचें यज्ञोपवीत तोडोनी । ताडण करिती स्वहस्तें ॥५९॥
वैदिक धर्मे कोणी वर्ततां । प्राण घेती त्याचा तत्वतां ।
" त्राही त्राही भगवंता " । ऐसें आर्यां जाहलें ॥ ६० ॥
लुटिती नाना संपत्ती । बलात्कारें स्त्रिया नेती ।
स्त्रीपुरुषां भ्रष्टविती । मरणभय दाउनी ॥ ६१ ॥
दीन दुबळे शेतें करिती । त्यांचें धान्य म्लेंच्छ नेती ।
मनरंजनार्थ मनुष्यें मारिती । यवन राजे दुरात्मे ॥ ६२ ॥
राजकन्या हरून नेती । बलात्कारें तयां भोगिती ।
तीर्थे क्षेत्रें विध्वंसिती । परम दुष्ट यवन ते ॥ ६३ ॥
पाहतां तुलसी वृंदावन । तत्काळ टाकिती उपटून ।
धर्म कार्यी करिती विघ्न । बळें मत्त होउनी ॥ ६४ ॥
पुराण कीर्तन चालतां । तेथें जाऊनि अवचिता ।
हांकून लाविती समस्तां । विटंबून तयांतें ॥ ६५ ॥
उपटोनियां देवमूर्ती । देवालयांच्या मशिदी करिती ।
पवित्र स्थानें विध्वंसिती । परम पीडिती सत जनां ॥ ६६ ॥
क्षेत्रें असती सर्वत्र । परी तयांत परम पवित्र ।
अति विख्यात काशि क्षेत्र । आर्यावर्ती विराजे ॥ ६७ ॥
त्या पवित्र क्षेत्रामाझारीं । यवनीं घोर कर्मे केलीं भारीं ।
विध्वंसिली पुण्यपुरी । मदोन्मत्त होउनी ॥ ६८ ॥
कित्येक ब्राह्मणीं ते वेळे । धर्मासाठीं प्राण दिधले ।
कित्येक पतिव्रतांचे मेळे । शिरले वन्हीमाझारीं ॥ ६९ ॥
रजपूत कुळें खालावलीं । म्लेंच्छ जनांची चढती झाली ।
राजसत्ता बहुतेक गेली । म्लेंच्छहस्तीं तेधवां ॥ ७० ॥

पूर्वापार संपन्न देश । पडत चालले तेव्हां ओस ।
प्रजा पावूं लागली त्रास । यवन दुरात्म्यापासुनी ॥७१॥
धरित्रीची सेवा घडेना । पृथ्वीमाता पीक देईना ।
पर्जन्य पूर्ववत् पडेना । संकटें नाना उद्भवती ॥ ७२ ॥
दुष्काळ पडों लागले । प्रजेतें अन्न न मिळे ।
दुःख दुर्भिक्ष उदेलें । हाहाकार प्रवर्तला ॥ ७३ ॥
न होई साधूंचें रक्षण । दुष्कृत्यें घडती दारुण ।
झाली धर्मग्लानि महान । तया वेळीं या देशीं ॥ ७४ ॥
पाप वाढलें अपार । जाहला आर्यमातेसी भार ।
सहन करवेना क्षणभर । धरा कांपों लागली ॥ ७५ ॥
" जंई होईल धर्मग्लानी । तंई मी अवतार घेउनी ।
सकळ दुष्टांस शिक्षा करूनी । धर्म स्थापना करीन "॥७६॥
भगवद्गीतेंत ऐशापरी । बोलिलासे मधुकैटभारी ।
तैसाच अनुभव उर्वीवरी । वेळोवेळीं आलासे ॥ ७७ ॥
मत्स्यरूपें वेद काढिले । कच्छ होऊन धरेस रक्षिलें ।
वराहरूपें निर्दलन केलें । हिरण्याक्ष असुराचें ॥ ७८ ॥
नृसिंहरूपें अवतार घेऊन । घेतला हिरण्यकशपूचा प्राण ।
देवकार्यार्थ होऊन वामन । बळी घातला पाताळीं ॥७९॥
बहुत क्षत्रिय जगीं मातले । परशुराम होऊन त्यांस दंडिलें ।
रावणादि असुर मर्दिले । रामावतार घेउनी ॥ ८० ॥
धरून अष्टम कृष्णावतार । कंस चाणूरादि वधून असुर ।
उतरिला प्रभूनें धराभार । अपूर्व चरित्र दाउनी ॥ ८१ ॥
हरि हर देव एक असती । लीलामात्रें भूभार हरिती ।
चित्र चरित्र जनां दाविती । नाना अवतार घेउनी ॥८२॥

धर्मोच्छेद म्लेंच्छीं मांडिला । अवतारसमय प्राप्त झाला ।
प्रभू वांचून धरित्रीला । कोण सौख्य देईल ॥ ८३ ॥
आतां होईल शिवावतार । भंग पावतील यवन वीर ।
सद्धर्म प्रकाश पृथ्वीवर । उजळणार पुनरपि ॥ ८४ ॥
धूर्जटी अवतरून पृथ्वीवर । निजबळें हरील धराभार ।
हतवीर्य करून म्लेंच्छ समग्र। धर्म संस्थापना करील ॥८५॥
शिसोदें कुल रजपुत । दक्षिणेंत होतें वास करित ।
प्रभू येणार तया कुलांत । मानवदेही होउनी ॥ ८६ ॥
कलियुगाचा पूर्ण प्रभाव । यास्तव दावील मानवभाव ।
सज्जनांचे ताप सर्व । लया नेईल प्रतापें ॥ ८७ ॥
मालोजी भोंसले पुण्यवंत । होते परम अपर्णाभक्त ।
यास्तव त्यांचे पवित्र कुलांत । अवतार होणार प्रभूचा ॥८८॥
प्रेमें परिसा कथा पुढील । अजन्मा जन्मा येईल ।
अवतारचरित्र दाखवील । अवनीवरी पवित्र ॥ ८९ ॥
पुढिले अध्यायीं कथा सुरस । अवतार धरील जगन्निवास ।
धन्य करील जगतीस । अपार लीला दाउनी ॥ ९० ॥
श्रीशिवविजय ग्रंथ । शिवावतार चरित्र अद्भुत ।
वर्णन करी भावें अनंत । द्वितीयाध्याय गोड हा ॥ ९१ ॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

# अध्याय ३ रा.

॥ श्रीगणेशायनमः ॥

पूर्वाध्यायीं निरूपण । प्राप्त झालें अवतारकारण ।
आतां पुढती अनुसंधान । सादर चित्तें परिसावें ॥ १ ॥
दक्षिण देशामाझारीं । दौलताबाद नामें नगरी ।
तया नगरा शेजारीं । वेरूळ नामें ग्राम असे ॥ २ ॥
भोंसले कुळ नामांकित । तया ग्रामीं होतें नांदत ।
पुण्य पुरुष जातिवंत । सुखवस्तू राहती ॥ ३ ॥
पाटीलकीचीं वतनें । दिधलीं होतीं तयां यवनें ।
चालविती सत्वस्थ वृत्तीनें । धर्मन्याय रक्षुनी ॥ ४ ॥
बाबाजी भोंसले विख्यात । होते तया शुद्ध कुळांत ।
तयां होते दोन सुत । विठोजी आणि मालोजी ॥ ५ ॥
त्यांत मालोजी सुलक्षण । दिसे बाळपणापासून ।
वाटे होईल भाग्यवान । उत्तम गुणांवरूनी ॥ ६ ॥
जगपाळराव फलटणकर । होते देशमुख तोलदार ।
तयांची भगिनी सुंदर । दीपाबाई नाम तिचें ॥ ७ ॥
ती मालोजीची कांता । परम सत्गुणी पतिव्रता ।
पुत्र नाहीं ऐशी चिंता । सर्वकाळ करीतसे ॥ ८ ॥
शहा सरीफ नामें अविंध । होता अहंमदनगरीं प्रसिद्ध ।
तपसामर्थ्यें आहे सिद्ध । ऐशी कीर्ति तयाची ॥ ९ ॥
तयें प्रसन्न होऊनी । कथिलें मालोजी लागुनी ।
तुज पुत्र होईल गुणी । मम वरदानप्रभावें ॥ १० ॥

मालोजीचा हेत पुरला । दीपाबाईस गर्भ राहिला ।
नव मासांतीं पुत्र झाला । परम सुंदर सुलक्षणी ॥ ११ ॥
माता पितर आनंदले । प्रेमें पुत्रमुख विलोकिलें ।
शहाजी ऐसें नाम ठेविलें । दान धर्म बहु केला ॥ १२ ॥
मालोजीस द्वितिय सुत झाला । हर्ष वाटे उभयतांला ।
सरीफजी ऐसें तयाला । नाम ठेविलें भक्तींनें ॥ १३ ॥
अहंमदनगरींचा सरदार । लुखजी जाधव प्रसिद्ध फार ।
परम प्रतापी चतुर । जहागीरदारी करीतसे ॥ १४ ॥
जाधवराव उत्तम रीती । मालोजीवरी कृपा करिती ।
राजकार्यी होई गती । मालोजीची त्या योगें ॥ १५ ॥
जाधवांचा लोभ विशेष । तेणें मालोजी येत उदयास ।
करीतसे राजसेवेस । एकनिष्ठेंकरूनी ॥ १६ ॥
मालोजीचा प्रथम सुत । जया शहाजी नांव शोभत ।
शुक्लेंदुवत् वृद्धि पावत । हर्षवीत सकळातें ॥ १७ ॥
जाहला कांहींसा थोर । दिसों लागला परम सुंदर ।
बोलका सुलक्षण चतुर । शोभायमान दिसतसे ॥ १८ ॥
मुख दिसे प्रफुल्लित । नेत्रांमाजी पाणी खेळत ।
अंगलोट मनोरम दिसत । शहाजीचा त्या वयीं ॥ १९ ॥
पुढें आली भाग्य वेळा । मालोजीतें विचार सुचला ।
संगें न्यावें शहाजीला । जाधवरावा भेटवावें ॥ २० ॥
उत्तम दिवस पाहून । शहाजीस शृंगार केला पूर्ण ।
तयास संगें घेऊन । मालोजीराव निघाले ॥ २१ ॥
जाधवांच्या रम्य सदनीं । जाते झाले तेच क्षणीं ।
जाधवराव सुखासनीं । तया समयीं देखिले ॥ २२ ॥

आप्त सोयऱ्यांचा मेळा । होता तेव्हां तेथें बैसला ।
तयांमध्यें शोभला । जाधवराव त्या काळीं ॥ २३ ॥
जाधवांची कन्या सुगुणी । अल्पवयी लावण्यखाणी ।
तियेशी अंकीं घेउनी । जाधवराव बैसले ॥ २४ ॥
कुरळ केश माथां हालती । शोभती कोंवळ्या दंतपंक्ती ।
गौर वर्ण अंगकांती । जाधवकन्या विराजे ॥ २५ ॥
मालोजी येऊन बैसले । शहाजीसी पुढें केलें ।
येरें विनयें वंदिलें । जाधवराया तेधवां ॥ २६ ॥
शहाजीचें रूप आगळें । सर्वांचे नेत्र आकर्षिले ।
टकमक पाहों लागले । तयाकडे सर्वही ॥ २७ ॥
माथां मंदील बांधिला । दुगोली अंगावरी शेला ।
कंबरेस जंबिया लटकाविला । कर्णीं चौकडा विराजे ॥२८॥
आधींच बांधा गोंडस । त्याहीवरी शृंगार विशेष ।
समाधान वाटलें सर्वांस । रूप त्याचें देखुनी ॥ २९ ॥
जाधवासन्निध उभा असतां । पित्याचे अंकीं जाधवसुता ।
ऐसा अपूर्व योग येतां । जन पाहती दोघांकडे ॥ ३० ॥
सर्वांचे मनीं एक विचार । ह्मणती दोघेंही परम सुंदर ।
ब्रह्मदेवें ययां वधुवर । नेमिलीं कीं कळेना ॥ ३१ ॥
जाधवराव उल्हासून । घेई सुतेचें चुंबन ।
ह्मणे हा मालोजीनंदन । नोवरा आवडे तुज काय?॥३२॥
मुलगी किंचित हास्य करी । बोलेना कांहींच उत्तरीं ।
जाधवरावाचे अंतरीं । वात्सल्यबुद्धी उचंबळे ॥ ३३ ॥
आप्त सोयऱ्यांस संबोधून । जाधवराव बोले वचन ।
दोघें दिसती सौंदर्यपूर्ण । जोडा कैसा शोभतो ॥ ३४ ॥

अवघे माना डोलविती । परम योग्य जोडा ह्मणती ।
बाळपणीं हीं दोघें शोभती । रतिमन्मथा सारखीं ॥ ३५ ॥
इतुकिया अवसरीं । दोन्ही मुलें अल्लड खरीं ।
हर्षे एकमेकांवरी । गुलाल उधळूं लागलीं ॥ ३६ ॥
मंडळीस हसूं लोटलें । मालोजीराव उभे ठाकले ।
ह्मणती पाहिजे परिसिलें । मद्वचन सर्वांनीं ॥ ३७ ॥
जाधवराव आजपासून । आमुचे व्याही झाले नूतन ।
तुह्मीं आप्त सोयरे स्वजन । साक्षी असा या कार्या ॥३८॥
उत्तमोत्तम सर्व बोलती । जाधवराव स्तब्ध राहती ।
मग गेले स्वगृहाप्रती । सर्वही जन तेथींचे ॥ ३९ ॥
दुसरे दिवशीं भोजनास । जाधव पाचारी मालोजीस ।
येरू वदे मम पुत्रास । कन्या आपुली देईजे ॥ ४० ॥
लग्नकार्य खचित करून । मग करूं एकत्र भोजन ।
जाधवरावास अपमान । त्याच्या वचनें वाटला ॥ ४१ ॥
उपरी जाधव स्त्रियेला । वृत्तांत सारा समजला ।
कीं मालोजी स्वकन्येला । पुत्राकारणें मागतो ॥ ४२ ॥
ह्मणे आह्मी जहागीरदार । बहु श्रीमंत असों थोर ।
हा तरी आमुचा आश्रित चाकर । अवमानितो आह्मासीं ॥ ४३ ॥
मालोजी भणंग भिकारी । करी आमुची बरोबरी ।
लज्जा वाटे ना अंतरीं । कैशी तया कळेना ॥ ४४ ॥
हें कळतां मालोजीला । वाग्बाणें अंतरीं खोंचला ।
प्रतिज्ञा करीत ते वेळा । हीच कन्या साधीन ॥ ४५ ॥
मनीं धरून पुढील कार्या । मालोजी करीत तपश्चर्या ।
प्रसन्न झाली शंभूभार्या । परम भक्ती देखून ॥ ४६ ॥

पृथ्विगत अपार धन । देई भवानी दावून ।
मालोजी झाला संपन्न । तदा द्रव्यप्राप्तीनें ॥ ४७ ॥
मग तो अपार धन । वेंची सत्कार्याकारण ।
दान धर्म अतिथीपूजन । करीतसे भक्तीनें ॥ ४८ ॥
वापी कूप तडाग । बांधीतसे जागोजाग ।
धर्मकृत्यांचे नाना योग । वारंवार साधीतसे ॥ ४९ ॥
शंभूमहादेव नामें क्षेत्र । शंकराचें स्थान पवित्र ।
तेथें मास येतां चैत्र । यात्रा मोठी भरतसे ॥ ५० ॥
परी पाण्याचा दुष्काळ । होती यात्रेकरूंचे हाल ।
उदकावीण तळमळ । जन करिती सर्वही ॥ ५१ ॥
मालोजीनें तये स्थानीं । अपरंपार द्रव्य वेंचुनी ।
विस्तीर्ण तडाग बांधुनी.। सुखी केले सर्व जन ॥ ५२ ॥
मुबलग लागलें पाणी । मालोजीराव हर्षला मनीं ।
मग बहुत दानधर्म करूनी । कीर्ती आपुली वाढवी ॥५३॥
भोजन घालूनि ब्राह्मणां । दिधली बहुत दक्षणा ।
प्रसन्न झाला कैलासराणा । मालोजीवरी तेधवां ॥ ५४ ॥
मालोजी असतां निद्रित । स्वप्नीं शंकर दर्शन देत ।
ह्मणे भला भला पुण्यवंत । तुष्ट केलें मजलागीं ॥ ५५ ॥
मी जाहलों तुज प्रसन्न । तुझिया वंशीं अवतरेन ।
महाराष्ट्र राज्य स्थापीन । धर्मस्थापनेकारणें ॥ ५६ ॥
पराभवूनि यवनेश । घेईन संपूर्ण दक्षिण देश ।
उद्धरीन तव वंश । लीलामात्रें करूनी ॥ ५७ ॥
ऐसें देऊन वरप्रदान । देव पावला अंतर्धान ।
येरू जागृत होऊन । परमाश्चर्य करीतसे ॥ ५८ ॥

अगाध पुण्यकर्मे केलीं । तेणें कीर्ती उदंड झाली ।
लक्ष्मी ही नांदों लागली । मालोजीच्या सदनांत ॥ ५९ ॥
बादशहा जाहला प्रसन्न । दिधलें राजा अभिधान ।
शिवनेर आणि चाकण । दुर्ग दोन दीधले ॥ ६० ॥
सुपें आणि पुणें प्रांत । शहा जहागीर करूनि देत ।
मालोजीचें वाढलें प्रस्थ । जाहला विख्यात अतिशयें ॥ ६१ ॥
जाधवांची बरोबरी । आतां मालोजी करी ।
कीर्ति श्री नांदतां घरीं । कोण न्यून मानील ॥ ६२ ॥
मालोजी वैभवा चढला । शहाजी बाळ गुणी निघाला ।
आतां वाटे जाधवस्त्रियेला । हाच जामात मिळावा ॥ ६३ ॥
पहिली स्थिती विसरली । स्वपतीच्या पाठीं लागली ।
त्यालाही गोष्ट आवडली । शहाजी जामात करावा ॥ ६४ ॥
मालोजीपाशीं गोष्ट काढिली । त्यानें हर्षे मान्यता दिली ।
जाधवकन्या नेमस्त केली । शहाजीलागीं तेधवां ॥ ६५ ॥
अत्युत्साहें विवाह झाला । हर्ष वाटला अवघ्यांला ।
पाहूनिया जामातृमुखाला । जाधवस्त्री संतोषली ॥ ६६ ॥
वधुवरें शृंगारविलीं । सुंदर अश्वीं बैसविलीं ।
मंगल वाद्यें वाजों लागलीं । मंडपद्वारीं तेधवां ॥ ६७ ॥
पुढें मंगल वाद्यें वाजती । मागें वधुवरें मिरवती ।
मालोजीचे सदनाप्रती । ऐशियेपरी पातले ॥ ६८ ॥
वधूचें जिजाबाई नांव । ठेवूनि केला अत्युत्सव ।
ऐसेपरी मालोजीराव । कृतकार्य जाहले ॥ ६९ ॥
शहाजी झाला थोर । राजकारणी परम चतुर ।
मसलती आणि बहु शूर । राजकार्य करीतसे ॥ ७० ॥

तयेवेळीं दक्षिणेंत । यवन होते राज्य करीत ।
तयांची स्थिती समस्त । पूर्वाध्यायीं वर्णिली ॥ ७१ ॥
जिजाबाई आणि शहाजीराव । एकत्र असतां सुखेनैव ।
नित्य पूजिती महादेव । परम भावें करूनी ॥ ७२ ॥
जिजाई जाहली तरुण । शहाजीची प्रीती पूर्ण ।
यथाकाळीं गर्भधारण । तियेलागीं जाहलें ॥ ७३ ॥
नव मासें होतां प्रसूत । जाहला तिये लागीं सुत ।
संभाजी ऐसें नांव ठेवित । शहाजीराव तयातें ॥ ७४ ॥
कांहीं काळ लोटला । संभाजी खेळूं लागला ।
जिजाईउदरीं जाहला । द्वितीयगर्भसंभव ॥ ७५ ॥
जो कां स्वभक्तकैवारी । तो देवराय त्रिपुरासुरारी ।
येणार जिजाईचे उदरीं । पूर्वसंचितेंकरूनी ॥ ७६ ॥
द्वितीय गर्भ संभवे उदरीं । तई दीप्ती चढे शरीरीं ।
शहाजी परम आश्चर्य करी । कांतीं पाहुनी तियेची ॥ ७७ ॥
जिजाईच्या चित्तांत । नानापरी कल्पना येत ।
एकदां सलज्ज सांगत । कांता जवळी जिजाई ॥ ७८ ॥
ह्मणे ऐसें काय होतें । आपण राज्य करावें वाटतें ।
झुंजावें यवनासांगातें । ऐसें चित्तीं येतसे ॥ ७९ ॥
मराठे संवगडी मेळवावे । यवन ठोकून काढावे ।
हस्तीं तीक्ष्ण भाले घ्यावे । अश्वारूढ होउनी ॥ ८० ॥
यवनांचे दुर्ग घेईन । महाराष्ट्रराज्य स्थापीन ।
धर्मसंस्थापना करीन । म्लेंछ पराभवूनी ॥ ८१ ॥
पुनः पुनः ऐशारीती । नानापरी कल्पना उठती ।
होणार कैशी न कळे स्थिती । चित्त मातें नावरे ॥ ८२ ॥

शहाजी होऊन विस्मित । ह्मणे कैशी होणार मात ।
कैलास पती हिमनगजामात । चरित्र त्याचें कळेना ॥ ८३ ॥
दिवसें दिवस गर्भ वाढत । जिजाई देहभान विसरत ।
ह्मणे मी षडाननतात । भक्तकार्या येतसें ॥ ८४ ॥
माला द्यावा मम हस्तीं । पराभावितों दिल्लीपती ।
तुह्मी आतां समस्तीं । स्वधर्मानुसार वागावें ॥ ८५ ॥
परोपरी नित्य बोले । ऐसे नव मास पूर्ण भरले ।
त्याही वरी दश दिन गेले । चिंता लागली शहाजीसी ॥८६॥
वसंत ऋतु वैशाख मास । शुद्ध पक्षीं द्वितीयेस ।
रवि आला मध्यान्हीस । प्रसूति वेळा पातली ॥ ८७ ॥
जुन्नरानजीक दुर्ग शिवनेर । तेथे शहाजींचें मंदिर ।
तये मंदिरीं आतां अवतार । होणार असे प्रभूचा ॥ ८८ ॥
जिजाई जाहली प्रसुत । पुढे पुत्ररत्न दिसत ।
जिजाई झाली हर्षित । पुत्रमुख पाहुनी ॥ ८९ ॥
शहाजीच्या रम्य मंदिरीं । जमल्या नागरिक नारी।
तंतवितंत घन सुस्वरीं । वाद्यें वाजूं लागलीं ॥ ९० ॥
उपाध्ये धांवून आले । शहाजीनें जातकर्म केलें ।
दक्षणा देऊन तोषविले । विप्रवर्ग तेधवां ॥ ९१ ॥
अंतरीं वाटे बहु हरिख । शहाजी निरखी पुत्रमुख ।
पाहून सुंदर बालक । परमाल्हाद उचंबळे ॥ ९२ ॥
सुवासिनींची गर्दी झाली । जिजाईची ओंटी भरिली ।
जिजाई बहुत आनंदली । पुत्रसुख पाहुनी ॥ ९३ ॥
जितुक्या सुवासिनी पातल्या। तितुक्या वस्त्राभरणें गौरविल्या।
शुभ कार्य संपादून गेल्या। स्वकीय गृहीं सर्व ही ॥ ९४ ॥

शहाजी होतां निद्रित । कैलासपती सांगे स्वप्नांत ।
आपण झालों तुझा सुत । म्लेंच्छ गर्व हरावया ॥ ९५ ॥
द्वादश वर्षे पर्यंत । ठेवावें जवळी येथ ।
पुढें होणें असे विख्यात । ह्मणूनि संन्निध न ठेवावें ॥ ९६ ॥
स्वतंत्रपणें राहून । ख्याती दाखवूं करून ।
ऐसें स्वप्न पाहून । शहाजी जागृत जाहला ॥ ९७ ॥
आपण नृशरीर धरिलें । ऐसें देवें सांगितलें ।
परी मायेचें पडळ पडलें । शहाजीवरी तेधवां ॥ ९८ ॥
ह्मणे इतरां समान । पुत्रवंत झालों आपण ।
धर्मकार्यीं वेंची धन । महानंदें करूनी ॥ ९९ ॥
करूनियां नामकरण । ठेविलें शिवाजी अभिधान ।
बाळ दिसे सुलक्षण । मातापितरें तोषती ॥ १०० ॥
पुत्रजन्माचा उत्सव । करिता झाला शहाजी राव ।
नागरिक आनंदले सर्व । शहाजीकुमर पाहुनी ॥ १०१ ॥
जिजाई प्रेमें करून । करी बाळाचें संगोपन ।
पुनःपुनः पुत्रमुख पाहून । तोपतसे अंतरीं ॥ १०२ ॥
जगीं असती बहुत माता । पुत्र ही असती समस्तां ।
परी जिजाईची समता । कोणी करूं शकेना ॥ १०३ ॥
**स्वतेजें अधर्म मोडून । केलें स्वराज्य स्थापन ।**
**ऐसा कुमर जिजाईवांचून । कोणालागीं जाहला १०४**
आदिती कौसल्या देवकी सती । तैसी जिजाई पुत्रवती ।
त्रिभुवनीं जयाची कीर्ती । ऐसा पुत्र प्रसवली ॥ १०५ ॥
असो झाला शिवावतार । पुढें चरित्र दाखविणार ।
व्हा श्रोते हो सादर । पुढील कथा ऐकावया ॥ १०६ ॥

ही श्रीशिवजन्म कथा । परम प्रेमें श्रवण करितां ।
सर्व काम फलती तत्वतां । शंकरवरेंकरूनी ॥ १०७ ॥
श्रीशिवविजयग्रंथ । शिवावतारचरित्र अद्भुत ।
वर्णन करी भावें अनंत । तृतियाध्याय गोड हा ॥ १०८ ॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥



# अध्याय ४ था.

॥ श्रीगणेशायनमः ॥

पूर्वाध्यायीं कथा सुरस । शिवभूप आला जन्मास ।
धन्य केला भोंसले वंश । चित्र चरित्र दाउनी ॥ १ ॥
शुक्लपक्षींचा तारापती । तैशी वृद्धि पावे शिवमूर्ती ।
लीला दावी बालरीती । माता कौतुक करीतसे ॥ २ ॥
पाउलें टाकी मंदमंद । घेई नानापरीचे छंद ।
माता पितयांशीं आनंद । तया पाहून होतसे ॥ ३ ॥
माय देतां दुग्धवाटी । ह्मणे माझी भूक मोठी ।
येरी विस्मय करी पोटीं । मधुर बोल परिसतां ॥ ४ ॥
तीन वर्षे लोटलीं । शहाजींची मती भ्रंशली ।
तयें द्वितीय पत्नी केली । मोहित्यांची आत्मजा ॥ ५ ॥
स्वगृहीं येतां सवत । जिजाबाई झाली दुःखित ।
संगें घेऊन कनिष्ठ सुत । गेली आप्त सदनातें ॥ ६ ॥
विजापूरकरांचे पदरीं । शहाजी राजकार्यें करी ।
कार्य प्रसंगें विजापुरीं । जाऊनियां रहातसे ॥ ७ ॥
वरिष्ट पुत्र संभाजी । सन्निध राखी नित्य शहाजी ।
मातेजवळी शिवाजी । नांदतसे आप्तगृहीं ॥ ८ ॥
कर्नाटकादि नाना स्थळीं । शहाजीनें सरशी केली ।
बादशहाची कृपा झाली । शहाजीवरी तेधवां ॥ ९ ॥
पुढें कांहीं दिन लोटले । शहाजीच्या मनीं आलें ।
शिवाजीतें सन्निध ठेविलें । पाहिजे जिजाईसहित ॥ १० ॥

मग तयें धाडून दूत । बाळास आणिलें मातेसहित ।
उभयतां होऊन एक चित्त । नांदूं लागलीं तेधवां ॥ ११ ॥
पत्नी पुत्रांसमवेत । शहाजी विजापुरीं रहात ।
शिवबाळाचे गुण अद्भुत । शहाजीतें आनंदविती ॥ १२ ॥
कुलवंत निंबाळकर । तयांची कन्या परम सुंदर ।
शीलवती गुणी चतुर । सईबाई नाम तिचें ॥ १३ ॥
शहाजीच्या मना आली । ती शिवाजीतें वधू नेमिली ।
जिजाबाई हर्षली । भावी स्नुषा पाहुनी ॥ १४ ॥
मग सुमुहूर्त पाहिला । दानधर्म बहुत केला ।
महोत्साहें विवाह झाला । शिवाजीचा तेधवां ॥ १५ ॥
यथासांग लग्न झालें । पुढतों राजकार्य उद्भवलें ।
कर्नाटकीं जाणें आलें । शहाजीसी ते काळीं ॥ १६ ॥
मग तया अवसरीं । शहाजीराव मनीं विचारी ।
पत्नी पुत्रां विजापुरीं । न ठेवावें मागुती ॥ १७ ॥
दादोजी कोंडदेव नामक । शहाणा परम विश्वासुक ।
होता शहाजीचा लेखक । तया शहाजी आज्ञापि ॥ १८ ॥
शिवाजीसह जिजाबाई । ययां येथूनियां नेई ।
पुण्यग्रामीं जाऊन राहीं । करीं रक्षण तयांचें ॥ १९ ॥
पुणें सुपें मावळ प्रांत । यांचा ठेवीं बंदोबस्त ।
प्रजा राखावी सुखी समस्त । दुःख कोणा न द्यावें ॥२०॥
शिवाजीतें बहु जपावें । राजकार्यीं चित्त लावावें ।
शहाणपण शिकवावें । तयालागीं सर्वदां ॥ २१ ॥
मग दादोजी तयां घेऊन । निघाला विजापूर सोडून ।
पुण्यपत्तनीं येऊन । सुखें करून राहिला ॥ २२ ॥

द्वितीय पत्नी पुत्र व्यंकोजी । आणि वडील सुत संभाजी ।
यांतें सवें घेऊन शहाजी । जाता झाला कर्नाटकीं ॥ २३ ॥
दादोजीनें पुण्यपत्तनीं । परम रम्य प्रासाद निर्मुनी ।
शिवाजीस तया स्थानीं । मातेसहित ठेविलें ॥ २४ ॥
दादोजी परम चतुर । करी प्रांताचा कारभार ।
लोक सुखी राखी समग्र । कार्य कुशलत्वें करूनी ॥ २५ ॥
जगाचा अनुभव थोर । स्वामीपदीं एकनिष्ठ तत्पर ।
लेखन कार्यीं परम चतुर । नीतिमंत धर्मात्मा ॥ २६ ॥
दादोजी ऐसा सद्गुणयुक्त । त्याहीवरी ईश्वर भक्त ।
न्यायमार्गीं ठेवी चित्त । घात न करीं कोणाचा ॥ २७ ॥
कारभार घेतां हातीं । पाहे प्रजेची कैशी स्थिती ।
मावळे परम दीन दिसती । दया वाटे तयांची ॥ २८ ॥
एकनिष्ठ मावळे जन । न मिळे पोटभरी अन्न ।
सदा कष्टती अन्नाकारण । ऐसें तेणें देखिलें ॥ २९ ॥
तयांचा निर्वाह व्हावा । ह्मणून सांगे राजसेवा ।
सकल देश सुखी असावा । ऐसे उपाय योजीतसे ॥ ३० ॥
राजी राखून शेतकरी । राजभाग संपादन करी ।
राजद्रव्य निजदूत करीं । शहाजीकडे पाठवी. ॥ ३१ ॥
दादोजी भला ब्राह्मण । शिवाजीचा राखी मान ।
पडों नेदी तया न्यून । कोणत्याही प्रकारें ॥ ३२ ॥
दौलतीचा कारभार । शिकवी तया वारंवार ।
समजावून सांगे प्रकार । जाहागिरीचा सर्वही ॥ ३३ ॥
आतां शिवाजी थोर जहाला । स्वतंत्रपणें हिंडूं लागला ।
दादोजीचा मात्र तयाला । धाक कांहीं वांटतसे ॥ ३४ ॥

मेळवी संवगडे मावळे । तयांसंगें खेळखेळे ।
ते जिवलग स्नेही केले । उदारपणा दाउनी ॥ ३५ ॥
शस्त्रविद्या अश्वारोहण । यांचा अभ्यास करी पूर्ण ।
अल्पकाळें झाला निपुण । शिवाजीराव तेधवां ॥ ३६ ॥
धांवत्या अश्वीं आरूढ व्हावें । अचुक निशाण मारावें ।
शीघ्रगामी प्राणी वधावे । ऐशी पटुता संपादिली ॥ ३७ ॥
मावळ्यांवरी करी दया । भाले खड्गादि शस्त्रें तयां ।
देऊन करावया मृगया । वारंवार नेतसे ॥ ३८ ॥
महा चतुर शिवाजी । मावळ्यांतें बहु नावाजी ।
तयांची प्रीती सहजी । शिवाजीवरी बैसली ॥ ३९ ॥
शिवाजीसी तारुण्य आलें । अंगीं शौर्य संचरलें ।
अंतरंगीं येऊं लागलें । तेज जगांत दावावें ॥ ४० ॥
गोब्राह्मणीं निष्ठा अती । स्वधर्मावरी पूर्ण भक्ती ।
कथा कीर्तनीं वाटे प्रीती । शिवाजीतें सर्वदा ॥ ४१ ॥
भागवत आणि भारत । यांतील वीरकथा अद्भुत ।
नित्य ऐकाव्या वाटत । बाहु स्फुरण होतसे ॥ ४२ ॥
धर्मनिष्ठा अंतरीं ठसली । शौर्यवृत्ती मनीं बाणली ।
पराक्रमेच्छा उद्भवली । मनामाजीं सहजची ॥ ४३ ॥
गो ब्राह्मणां कारण । दुःख देती दुष्ट यवन ।
त्यांचें करावें निर्दलन । ऐसा हेतू उद्भवला ॥ ४४ ॥
मावळे मित्र सर्वं घेउनी । पुढील कार्य आणून मनीं ।
दुर्ग कोट पाहे हिंडूनी । आसपास प्रदेशीं ॥ ४५ ॥
म्लेंच्छ पतीचा दुर्ग तोरणा । आला शिवाजीच्या मना ।
मग उपाय करून नाना । घेता झाला तो दुर्ग ॥ ४६ ।

तोरणा दुर्ग हातीं आला । स्वतंत्र राज्याचा पाया घातला ।
मावळे मित्र रक्षणाला । तयां दुर्गीं ठेविले ॥ ४७ ॥
दुर्गामाजी भूमिगत । द्रव्य लाधलें अपरिमित ।
हर्षें करून शहाजीसुत । सैन्य सिद्धता करीतसे ॥ ४८ ॥
मावळे केले निर्भर। ते असती चरणीं तत्पर ।
एकनिष्ठ महाशूर । परम विश्वासू धाडशी ॥ ४९ ॥
बाजी नामें पालसकर । येसू निकम तो रणशूर ।
तानाजी मालुसरा चतुर । बालमित्र असती हे ॥ ५० ॥
पुढील कार्याचा विचार केला । एक दुर्ग नवा बांधिला ।
राजगड ऐसें तयाला । नाम ठेविलें प्रीतीनें ॥ ५१ ॥
सर्व घेऊन मित्र मंडळी । यवन राज्यीं घाले घाली ।
बहु संपत्ति मेळविली । शिवाजीनें यापरी ॥ ५२ ॥
दादोजीतें वृत्त कळलें । तयातें विपरीत चिन्ह भासलें ।
शिवाजीतें बोलाविलें । आपणा सन्निध तयानें ॥ ५३ ॥
ह्मणे शिवबा तूं परम शूर । असशी दक्ष आणि चतुर ।
परी प्रस्तुत अविचार । घडतो ऐसें वाटतें ॥ ५४ ॥
प्रस्तुत बलिष्ट झाले यवन । सत्ताधारी असती पूर्ण ।
यास्तव करून शहाणपण । तयां राजी राखावें ॥ ५५ ॥
म्लेंछ प्रबळ असती जनीं । त्याहीवरी ते आपुले धनी ।
काय लाभ तयां दुखवुनी । विचार याचा करावा ॥ ५६ ॥
सर्व विचार असती ठावे । तुज ज्ञात्या काय सांगावें ।
परी बोलिलों स्वभावें । राग याचा न मानी ॥ ५७ ॥
दादोजीचा सरल भाव । मनीं तोषला शिवाजीराव ।
ह्मणे हितकारी बोधतव । चित्तीं ठेवून वर्तेन ॥ ५८ ॥

पुढें शिवबा दिग्विजय करील। हें दादोजीतें कैसें आटकळेल।
स्वामिभक्तीस्तव बोलिला बोल। जन रीतिची हितोक्ती॥५९॥
शिवें विपरीत बुद्धि धरिली । ही मात विजापुरीं कळली ।
बादशहाची आज्ञा झाली । शहाजीतें तेधवां ॥ ६० ॥
अविचारें होऊन मत्त । राजद्रोह करी तुझा सुत ।
त्याचा करावा बंदोबस्त । नातरी शिक्षा पावाल ॥ ६१ ॥
शहाजी उत्तरीं लिहित । मम पुत्र आहे राजभक्त ।
कांहीं तरी राजकार्यार्थ । कृत्यें करीत असेल ॥ ६२ ॥
अव्यवस्थित यवन दरबार । शहाजीचें वचन ऐकल्यावर ।
राहिला तितुकाच विचार । तया गोष्टीचा तेधवां ॥ ६३ ॥
शिवाजीस चढली हिंमत । पूर्वक्रम चालवी अव्याहत ।
ह्मणे अधर्मी म्लेंच्छ समस्त । पराभवूनि टाकितों ॥ ६४ ॥
शिवाजीचीं कृत्यें धाडशी । चिंता वाटे दादोजीशी ।
ह्मणे काय करावें याशी । मम वचन नायके ॥ ६५ ॥
स्वामीभक्त दादोजी भला । चिंताग्नीनें झुरणी लागला ।
तोच रोग बळावला । झिजलें शरीर तयाचें ॥ ६६ ॥
सर्वांगीं भरला ताप । वाटे मृत्यु आला समीप ।
तदा तो ब्राह्मण निष्पाप । काय करिता जाहला ॥ ६७ ॥
शिवाजीस सन्निध आणिलें । जिजाबाईतें बोलाविलें ।
तयांप्रती बोल बोले । नम्रभावें करूनी ॥ ६८ ॥
पहा माझी कैशी स्थिती । आतां मी घटकेचा सोबती ।
अंतकाळीं तुह्मांप्रती । कांहीं सांगूं इच्छितों ॥ ६९ ॥
जिजाई तुह्मीं लोभ केला । पाळिलें आजवरी आश्रिताला ।
नीट जपा शिवबाळाला । गुंते मम मन तयावरी ॥ ७० ॥

परम शूर गुणी बाळ । परी हूडपणा करील वेळोवेळ ।
वारंवार बोध कराल । तरी पावेल थोरपण ॥ ७१ ॥
शिवबा तूं दीनदयाळ । मित्रालागीं परम स्नेहाळ ।
दिसतसे निश्चयाचें बळ । तुझ्याठाईं पूर्णत्वें ॥ ७२ ॥
तुझी अहंमती वाढेल । परम वैभवास चढवील ।
तुज सत्कीर्ती माळ घालील । ऐसी चिन्हें दीसती ॥ ७३ ॥
असेल ईश्वरी योगायोग । तैसे घडतील कार्य प्रसंग ।
न कळे काय होतील रंग । पुढील काळामाझारीं ॥ ७४ ॥
परी गोष्टी सांगतों चार । त्या ऐक बा करून आदर ।
करूनि सारासार विचार । वर्तणूक ठेविजे ॥ ७५ ॥
मी नव्हे साधू केवळ । नाहीं मज विद्वत्तेचें बळ ।
परी एकनिष्ठेनें तव कुळ । आजवरी सेविलें ॥ ७६ ॥
जहागिरीचा कारभार केला । जगाचा अनुभव घेतला ।
ह्मणून सांगतसें तुजला । कांहीं विचार सुचलेले ॥ ७७ ॥
हा आहे मृत्यु लोक । येथें उपाधी असती अनेक ।
जरी असेल उत्तम विवेक । तरीच सौख्य लाधेल ॥ ७८ ॥
तारुण्य आणि द्रव्यप्राप्ती । प्रमुत्व आणि अविवेकी मती ।
ह्या प्रत्येक गोष्टी असती । अनर्थासी कारण ॥ ७९ ॥
जेथें चहूंची एक वाक्यता । तेथें काय तोटा अनर्था ।
ह्मणून येईल ऐशी अवस्था । तदां विचार धरावा ॥ ८० ॥
मनुष्याचें मन हें मीन । काम क्रोधादि शत्रू जन ।
हे धीवर जाळीं पसरून । गुंतवावया पाहती ॥ ८१ ॥
कैसे षड्रिपु जिंकावे । कैसें मन आवरून धरावें ।
हें सद्गुरूविण न सांगवे । कोणालाही जाणपां ॥ ८२ ॥

लौकिकी जनांच्या रीती । कांहीं सांगतों तुजप्रती ।
त्या बागवून चित्तीं । पुढें वर्तन करावें ॥ ८३ ॥
म्लेंच्छ राजे दुराचारी । यांहीं प्रजा पीडिली भारी ।
धर्म बुडविती नाना परी । बळें मत्त होउनी ॥ ८४ ॥
पहा हे तुझे मावळे लोक । कैसे शूर आणि कंटक ।
परी यांतें कैचें सुख । यवनराज्यामाझारीं ॥ ८५ ॥
गो ब्राह्मण प्रतिपाळ । तुझिया शूरत्वें होईल ।
तरीच धन्य होशील । नर जन्मा येउनी ॥ ८६ ॥
अपार संपत्ति मेळविली । मृत्यु येतां वायां गेली ।
मग कासया हांव धरिली । संपत्तीची पाहिजे ॥ ८७ ॥
जीवीत्व नव्हे स्वाधीन । जाईल काळ केव्हांच घेऊन ।
जरी खपेल सत्कार्याकारण । तरीच धन्यत्व येईल ॥ ८८ ॥
न पाहतां जीवाकडे । जेणें गो ब्राह्मण प्रतिपाळ घडे ।
परोपकार पुण्य जोडे । ऐसें सर्वथा वर्तावें ॥ ८९ ॥
ठेवीं स्वसेवकीं ममता । साधु संतीं धरी नम्रता ।
स्त्रीजनीं असावी सावधता । दीनीं दया करावी ॥ ९० ॥
देशाची मुख्य संपत्ती । फलद्रुप व्हावी सदा शेती ।
यास्तव कृषिवलांवरती । कृपादृष्टी ठेवावी ॥ ९१ ॥
राजभाग घ्यावा नेमस्त । तेणें सुखी राहती समस्त ।
खट्याळ निरुद्योगी मस्त । ऐशा जना दंडावें ॥ ९२ ॥
आतां काय बहुत सांगणें । चित्तीं ठेवीं हीं मम वचनें ।
काय सांगावें या दीनें । शिवबा तुज जाणत्या ॥ ९३ ॥
होऊन कीर्तिश्रीचा नवरा । धन्य करिशील मातृदरा ।
हा मम आशिर्वाद खरा । होईल काळेंकरूनी ॥ ९४ ॥

ऐसा करून उपदेश । दादोजी करी राम नाम घोष ।
हृदयीं आठवी जगन्निवास । आनंदकंद परमात्मा ॥ ९५ ॥
जगींचा ऋणानुबंध सरला । राम राम ह्मणतां प्राण गेला ।
परम दुःख झालें सर्वांला । दादोजीच्या मृत्यूनें ॥ ९६ ॥
होणार तें होऊन गेलें । शिवाजीनें प्रेत दहन करविलें ।
यथासांग संपादिलें । उत्तरकार्य तयाचें ॥ ९७ ॥
दादोजीनें बोध केला । शिवाजीचे हृदयीं ठसला ।
चतुर्थाध्याय संपला । पुढती सादर असावें ॥ ९८ ॥
श्रीशिवविजय ग्रंथ । शिवावतारचरित्र अद्भुत ।
वर्णन करी भावें अनंत । चतुर्थाध्याय गोड हा ॥ ९९ ॥
॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥



# अध्याय ५ वा.

॥ श्रीगणेशायनमः ॥

चतुर्थाध्यायीं झालें कथन । दादोजी पावला निधन ।
आतां पुढील अनुसंधान । श्रोतीं श्रवण करावें ॥ १ ॥
शिवराय स्वतंत्र झाला । जहागीर चालवूं लागला ।
मनामाजीं निश्चय केला । म्लेंच्छ दंडन करावें ॥ २ ॥
तुच्छ मानी संसारसुख । नोळखी आप्तेष्टादिक ।
स्वकार्यीं सहाय होतील लोक । तेच आप्त मानिले ॥ ३ ॥
स्वधर्म रक्षणा कारण । देऊं ह्मणती आपला प्राण ।
ऐशां पुण्य पुरुषांवीण । कोणां आप्त न मानी ॥ ४ ॥
**राष्ट्रकार्यीं येती आडवे । तरी कशास आप्त ह्मणावे ।**
**मामे काके काय करावे । कार्यीं सहाय न होतां ॥ ५ ॥**
विषय–सुखीं मन रमेल । प्रपंच–रंगीं चित्त रंगेल ।
तयासच आप्त–मोह पडेल । क्षणिक सुखा कारणें ॥ ६ ॥
प्रपंच सुख तुच्छ मानिलें । धर्म–संरक्षण आदरिलें ।
शिवाजीचें चित्त गुंतलें । महत्कार्याचे उद्यमीं ॥ ७ ॥
आसपासचे किल्लेकरी । तयांतें स्वेच्छा श्रुत करी ।
साह्य द्यावें झडकरी । ऐसें कळवी तयांतें ॥ ८ ॥
उत्तम दुर्ग चाकण नामक । फिरंगोजी नरसाळा नायक ।
तो करूनि उत्तम विवेक । शिवाजीतें वश झाला ॥ ९ ॥
जवळील मुलुखासह चाकण । तेथें आपुली सत्ता स्थापून ।
फिरंगोजीतें आधिकार दान । राव करी तेथींचें ॥ १० ॥

शिवाजीची सापत्न माता । जी कां मोहित्यांची सुता ।
तिचा बंधू बाजी मोहिता । असे अधिकारी सुप्याचा ॥११॥
प्रत्यक्ष मातुल असून । वश न होई कार्या कारण ।
राव ह्मणे शिक्षा लावीन । मातुळातें निजहस्तें ॥ १२ ॥
धर्मकार्यीं येतो आडवा । मग कशास मातुल ह्मणावा ।
स्पष्ट शत्रू समजावा । ऐसा पुरुष सर्वथा ॥ १३ ॥
मातुळ होता कंसासुर । परी पापें करी अपार ।
ह्मणून वधी रुक्मिणीवर । मातुल भाव टाकुनी ॥ १४ ॥
मातुल विनयें वश न होय । ह्मणून शिवाजी करी अन्य उपाय ।
मावळे सर्व घेऊन जाय । तयाचिये सदनांगणीं ॥ १५ ॥
सांगून पाठवी मोहित्यास । प्रस्तुत आहे फाल्गुन मास ।
आलों पोस्त मागावयास । भेटून झडकरी दे ईजे ॥ १६ ॥
गलबला ऐकून बाहेर आला । 'काय काय' बोलूं लागला ।
शिवरायें हस्त धरिला । खेंचून काढला बाहेरी ॥ १७ ॥
मावळे सत्वर तया वेढिती । हस्त–पाद आंवळून टाकिती ।
येरू येऊन काकुळती । जीवदान द्या ह्मणे ॥ १८ ॥
तयाची संपत्ति अपार । अश्व वस्त्रें जडजवाहीर ।
लूटून घेती मावळे वीर । क्षणमात्र न लागतां ॥ १९ ॥
मोहित्यास तेथून नेला । सुपें परगणा हस्तगत केला ।
शिवाजीस हा लाभ झाला । अल्प आयासें करूनी ॥२०॥
संपत्ति वाढों लागली । वीरश्रीसी भरती आली ।
अपार कीर्ती पसरली । शिवरायाची तेधवां ॥ २१ ॥
मावळ्यांचें सैन्य ठेविलें । ब्राह्मण कारकून कार्यी योजिले ।
सावधपणें कार्य मांडिलें । धर्म स्थापना करावया ॥ २२ ॥

नाना परी उपाय योजून । नित्य नवे गड घेई साधून ।
धर्म संस्थापना मनीं धरून । सतत उद्यम चालवी ॥२३॥
अवघड दुर्ग पुरंदर । नीलकंठराव सुभेदार ।
होता बलाढ्य आणि शूर । यवनांचा आज्ञांकित ॥ २४ ॥
कालवशें मृत्यु पावला । असती तिघे पुत्र तयाला ।
तयांमध्यें कलह लागला । मुख्याधिकारा कारणें ॥ २५ ॥
स्वहितार्थ कलह करिती । शिवाजीस मध्यस्ती सांगती ।
येरू जाऊन पुरंदराप्रती । बोध करी तिघांसी ॥ २६ ॥
बांधवीं कलह न करावा । तुह्मीं ऐक्य भाव राखावा ।
आपुला लौकिक वाढवावा । ऐक्य भाव राखुनी ॥ २७ ॥
गृहकलहें कोण वाढला । कलहें कोण नाश न पावला ।
कलहें कोण धन्य झाला । विचार याचा करावा ॥ २८ ॥
श्रवण करा माझी मात । तुह्मीं होऊन एक चित्त ।
साह्य द्यावें धर्मवृद्ध्यर्थ । मजलागीं सूज्ञ हो ॥ २९ ॥
ऐसें नाना परी बोधिलें । परि तें तयां न मानलें ।
अविचार मोहें मोहिलें । अंतःकरण तयांचें ॥ ३० ॥
हितवचनें नायकतां । शिवाजी क्रोधावला तत्वतां ।
ह्मणे तिघां मूर्खांस आतां । बळें शिक्षा लावीन ॥ ३१ ॥
मावळे वीर बोलाविले । तिघांसही कैद केलें ।
स्वीयसत्ता तयेवेळे । पुरंदरी स्थापिली ॥ ३२ ॥
सत्ता होतसे वाढती । दुर्ग प्रांत हातीं येती ।
यवन राज्यीं पडली धास्ती । शिवाजीची तेधवां ॥ ३३ ॥
कोंकण करावें हस्तगत । ऐसा मनीं उपजे हेत ।
मग त्या कार्यी योजित । शहाणे चौकस ब्राह्मण ॥ ३४ ॥

बोलके विचक्षण चतुर । धर्मनिष्ठ आणि समर धीर ।
ऐसे ब्राह्मण कारकून सत्वर । कोंकणांत धाडिले ॥ ३५ ॥
ते स्थळीं स्थळीं फिरती । नाना प्रकारें भेद घेती ।
दुर्गपतींशीं स्नेह जोडिती । राजकार्याकारणें ॥ ३६ ॥
जें जें घडतसे वृत्त । तें तें शिवाजीस करिती श्रुत ।
सावधपणें मुलूखांत । नाना रूपें फिरती ते ॥ ३७ ॥
कालियानी परगणा थोर । मुलना आमेद तेथील सुभेदार ।
अदीलशाही ताबेदार । सावधपणें राहतसे ॥ ३८ ॥
तेणें राजद्रव्य जमविलें । विजापुरीं धाडावें योजिलें ।
निवडक योद्धे सिद्ध केले । अपार धन न्यावया ॥ ३९ ॥
शिवाजीचे दश कारकून । त्यांनीं रायास धाडिलें लिहून ।
अपार द्रव्य कालियानीहून । विजापुरीं जातसे ॥ ४० ॥
शिवाजीतें वृत्त कळलें । मावळे वीर जमविले ।
परम विश्वासू निवडिले । महत्कार्य साधावया ॥ ४१ ॥
तीनशें अश्व चपळ सुंदर । त्यावरी बैसले मावळे वीर ।
कालियानीच्या रोखें सत्वर । उड्या टाकीत चालिले ॥ ४२ ॥
इकडे राजद्रव्य घेऊन । लोक निघाले कालियानीहून ।
सवें रक्षक सरदार यवन । सावधपणें चालती ॥ ४३ ॥
कांहीं मार्ग आक्रमिला । एके स्थळीं मुक्काम केला ।
अनुभविती विश्रांति सुखाला । यवन- सेवक स्वेच्छेनें ॥ ४४ ॥
ऐसा मुहूर्त मात्र लोटला । तों टापांचा शब्द कानीं आला ।
सेवकवर्ग घाबरला । पाहूं लागला चहूंकडे ॥ ४५ ॥
न्याहाळून पाहती समोर । तों भरधांव येती घोडेस्वार ।
हां हां ह्मणतां सत्वर । निकट येऊन भीडले ॥ ४६ ॥

पाहतां शिवराजाची स्वारी । भयाभीत झाले अंतरीं ।
ह्मणती प्राण संकटामाझारीं । पडलों आह्मी या काळीं ॥४७॥
तयांचा सैनिक रणशूर । सरसावून तीक्ष्ण तरवार ।
धांवला शिवनृपतीवर । परम क्रोधें करूनी ॥ ४८ ॥
शिवाजी नृसिंहा पुढें । यवन मशक काय बापुडें ।
क्षणेक युद्धांतीं पडे । गतप्राण होउनी ॥ ४९ ॥
मुख्य पडतां सेवक पळती । सैरावैरा धांऊं लागती ।
सर्वद्रव्य लागलें हातीं । शिवरायाच्या तेधवां ॥ ५० ॥
रुपये पुतळ्या मोहोरा अपार । नानापरीचीं रत्नें थोर ।
अमोल अश्वही सुंदर । नृपालागीं मिळाले ॥ ५१ ॥
मग द्रव्य चढवून अश्वांवर । त्वरें निघाला समरधीर ।
राजगडीं येऊन सत्वर । अत्यानंदें पोंचला ॥ ५२ ॥
अपार द्रव्य हातीं लागलें । कीर्ति समुद्रा भरतें आलें ।
सेवकजन सुखी केले । वस्त्रें भूषणें देउनी ॥ ५३ ॥
वृत्तांत विजापुरीं कळला । शिवाजीनें छापा घातला ।
सर्व खजिना लुटून नेला । पराभवूनी रक्षकां ॥ ५४ ॥
अघटित कृत्य घडून आलें । सर्व लोक चकित झाले ।
ह्मणती काय होणार न कळे । शिवाजीचे हातुनी ॥५५॥
विजापुरचे मुत्सद्दी थोर । परस्पर करिती विचार ।
तों आणखी वार्ता भयंकर । शिवरायाची ऐकती ॥५६॥
तिकोना किल्ला घेतला । तुंगदुर्ग बळें साधला ।
शिवाजीनें अनर्थ मांडिला । पातशाही अमलांत ॥ ५७ ॥
शिवाजीचे कारकून चतुर । करूनि नाना युक्ति प्रकार ।
किल्लेदार करूनि फितुर । किल्ले घेती कोंकणींचे ॥ ५८ ॥

दुर्जय ठाणीं हस्तगत झालीं । अपार संपदा हातीं आली ।
विजयश्रीनें माळ घातली । शिवरायातें तेधवां ॥ ५९ ॥
चहूंकडे येत यश । वाढों लागला सहज उल्हास ।
स्वराज्य स्थापनेचा हव्यास । दिवसेंदिवस वाढतसे ॥६०॥
हृदयक्षेत्रीं बीज रुजलें । दादोजीवचनामृतें सिंचलें ।
तयां आतां पल्लव फुटले । ईश्वरी कर्तृत्व अगाध ॥ ६१ ॥
भाग्यवान् महाराष्ट्र देश । येथें अवतरला जगन्निवास ।
दंड करून दुष्ट यवनांस । धर्म संस्थापना करील ॥ ६२ ॥
जो जो प्रांत हस्तगत झाला । सावधपणें रक्षी तयाला ।
नच पीडी दीन जनाला । शिवनृपती सभाग्य ॥ ६३ ॥
आबाजी सोनदेव नामक । रायाचा परम विश्वासुक ।
तया पाठवी नरनायक । कालियानी घ्यावया ॥ ६४ ॥
तो रणपंडित परम शूर । सवें घेऊन मावळे वीर ।
अत्त्यावेशें कालियानीवर । एकाएकीं थडकला ॥ ६५ ॥
तेथींचा सुभेदार प्रसिद्ध । रणशूर मुल्ना आमेद ।
तो ससैन्य होऊन सिद्ध । समरांगणीं ठाकला ॥ ६६ ॥
उभय वीर धाविन्नले । एकमेकाशीं हटें भिडले ।
अत्त्यावेशें झगडों लागले । स्वीयविजय साधावया ॥ ६७ ॥
खड्ग लता झळकती । अग्न्यस्त्रांचे धडाड होती ।
परम शौर्यें युद्ध करिती । उभय पक्ष तेधवां ॥ ६८ ॥
महा योद्धा वीर यवन । अत्त्यावेशें पुढें होऊन ।
ससैन्य भिडला येऊन । अपार शौर्य दाखवी ॥ ६९ ॥
एकाएकीं यवन भिडले । मराठे कांहीं कचरले ।
तें आबाजीनें पाहिलें । स्वीय अश्वावरूनी ॥ ७० ॥

क्रोध समुद्र उचंबळला । एकाएकीं घोडा टाकिला ।
सेनानायकासन्मुख आला । निमिषमात्र न लागतां ॥७१॥
आबाजीचा देखून वेग । मराठे धांवले मागोमाग ।
वीररसीं होऊन दंग । शत्रु सैन्य मारिती ॥ ७२ ॥
आबाजीनें अश्व फेंकला । मुलना आमेद शीघ्र गांठिला ।
बळें खड्गप्रहार केला । तयावरी तेधवां ॥ ७३ ॥
तोही खड्गयुद्धीं निपुण । प्रहार चुकवी अश्व फिरवून ।
सवेंच भाला सरसावून । आबाजी मारी तयातें ॥ ७४ ॥
मर्मस्थानीं भाला लागला । तेणें मूर्च्छा येऊन पडला ।
यवन सैन्या पळ सुटला । सेनानायक पडतांची ॥ ७५ ॥
मराठे वीर शीघ्र धांवले । मूर्च्छागतासी त्वरें वेढिलें ।
तयालागीं बद्ध केलें । आबाजीच्या आज्ञेनें ॥ ७६ ॥
हस्तगत होतां सुभेदार । घोडे फेंकिती मराठे वीर ।
कालियानी थोर नगर । क्षणामध्यें घेतलें ॥ ७७ ॥
भयभीत सकळ यवन । आबाजीस आले शरण ।
येरें तयां आश्वासून । प्रजा पीडन वर्जिलें ॥ ७८ ॥
बादशहाचें अपार धन । होतें ठेविलें संरक्षून ।
तें आबाजीनें शोधून । यवनांपासून घेतलें ॥ ७९ ॥
रम्य शहर कालियानी । तयामाजी प्रासाद बांधुनी ।
मोठ्या वैभवें तया स्थानीं । मुलना आमेद रहातसे ॥८०॥
प्रासादीं वृत्त कळलें । सुभेदारातें कैद केलें ।
एकच आक्रांत तये वेळे । तया स्थानीं वर्तला ॥ ८१ ॥
झाला एकचि कल्होळ । स्त्रिया पिटिती वक्षःस्थळ ।
सेवकांची पळापळ । सुरू झाली तेधवां ॥ ८२ ॥

आप्तवर्ग जमूं लागला । इतुकियांत आबाजी धांवला ।
प्रासादास वेढा दिधला । निज सैन्याचा क्षणांत ॥ ८३ ॥
द्वारपाळ होते उद्धट । रोधिती आबाजीची वाट ।
मग तो वीर उद्भट । क्रोधावला अतिशयें ॥ ८४ ॥
उल्हाट यंत्रांचा भडिमार । करून उडवी प्रासादद्वार ।
प्रवर्तला हाहाकार । प्रासादजनीं तेधवां ॥ ८५ ॥
अश्वावरून उतरला । आबाजी प्रासादीं शिरला ।
सेवक जन कैद करविला । निज अनुचरां हातूनी ॥८६॥
सुभेदारसुताची कांता । घाबरे अनर्थ ओढवतां ।
चरण चालीं तत्वतां । पळों पाहे अविचारें ॥ ८७ ॥
मृगी व्याघ्रमुखीं सांपडली । तैशी आबाजीचे समोर आली ।
येरें पाहतांच ओळखिली । यवन स्नुषा ह्मणूनी ॥ ८८ ॥
कठोर शब्दें अटकाव केला । हंबरडा फोडी तदा अबला ।
मग अटकावून तियेला । संरक्षून ठेविली ॥ ८९ ॥
आबाजीची फत्ते झाली । कालियानी हातीं आली ।
जयवाद्यें वाजविलीं । महानंदें तयानें ॥ ९० ॥
एवं महत्कार्य संपादून । शहराचा बंदोबस्त करून ।
यवनीसह मुलनास घेऊन । आबाजी तेथून निघाला ॥९१॥
यवनस्त्री परम सुंदर । आबाजी देखे वारंवार ।
ह्मणे हें स्त्रीरत्न रुचिर । स्वामी चरणीं अर्पीन ॥ ९२ ॥
अहा ही लावण्यखाणी । जंई शिवनृप देखेल नयनी ।
तंई परम लाभ मानील मनीं । स्त्रीरत्न प्राप्तीचा ॥ ९३ ॥
घेऊनियां राजदर्शन । अर्पिन हें अमोल उपायन ।
तो महाराज सुप्रसन्न । मजवरती होईल ॥ ९४ ॥

जयवाद्यें वाजवीत । आबाजी रायासमीप येत ।
श्रुत करी सर्व वृत्तांत । कालियानीचा तेधवां ॥ ९५ ॥
मराठ्यांनीं शर्थ केली । कालियानी हस्तगत झाली ।
राया विपुल संपत्ति मिळाली । तुझिया पुण्यप्रतापें ॥९६॥
हरिला यवनांचा दुर्मद । सुभेदार बळें केला कैद ।
विजयप्राप्तीचा अत्यानंद । प्राप्त झाला आपणां ॥ ९७ ॥
अखिल रत्नामाजी आगळें । ऐसें स्त्रीरत्न हातीं आलें ।
स्वामीचरणासन्निध आणिलें । सेवकानें प्रस्तुत ॥ ९८ ॥
परिसून विजयाची मात । शिवराय संतोषला बहुत ।
आबाजीतें नावाजित । परोपरी करूनी ॥ ९९ ॥
मराठे सरदार बोलाविले । सभास्थानीं एकत्र केले ।
आबाजीस सन्मानिलें । परोपरी तेधवां ॥ १०० ॥
परम शौर्यें हातीं आला । तो सुभेदार पुढें आणिला ।
म्लान वदनें उभा राहिला । शिवराया सन्मुख ॥१०१॥
परम उदार शहाजीसुत । सुभेदारातें सत्कारित ।
ह्मणे खेद न करी चित्तांत । अपयशाचा मम मित्रा ॥१०२॥
जय अथवा पराजय । हा सर्वांस आहे समय ।
त्याचा हर्ष विषाद मानावा काय । बुद्धिमंत नरानें ॥१०३॥
वस्त्रें भूषणें समर्पून । मित्रपणें गोड बोलून ।
सुभेदार दिधला सोडून । शिवरायानें तत्काळ ॥१०४॥
मग आबाजीस घेऊन संगाती । तेथून निघाला शिवनृपती ।
जेथें यवनी ठाविली होती । तयास्थळीं पातले ॥ १०५ ॥
आबाजी यवनीस वाखाणी । ह्मणे नृपा तुज योग्य कामिनी ।
राव उत्तर न देतां वचनीं । तिगे निकट पातला ॥१०६॥

गौर वर्ण मुख प्रफुल्ल । रम्य आकृति नेत्र विशाल ।
शोभायमान मुखकमल । मनोहर दिसतसे ॥ १०७ ॥
डोळेभरून यवनी पाहिली । मग शिवमूर्ती बाजूस वळली ।
आबाजीस तयेवेळीं । राव बोले मंजुळ ॥ १०८ ॥
हे स्त्री भगिनीसम दिसते । बहु दीनत्वें खालीं पाहते ।
अंतःकरण गहिंवरतें । इजलागीं पाहुनी ॥ १०९ ॥
आबाजी जाहला चकित । अंतःकरणीं होय लज्जित ।
अधोवदनें खालीं पाहत । नृपवाक्य ऐकुनी ॥ ११० ॥
नृप बोले याच क्षणीं । गौरवा इला वस्त्र भूषणीं ।
सत्वर स्वगृहीं जाउनी । आनंद पावो अबला ही ॥१११॥
सकळ लोक आश्चर्य करिती। ह्मणती धन्य धन्य शिवनृपती ।
पापमार्गीं न वळे मती । कदाकाळीं ययाची ॥ ११२ ॥
पुण्यप्रताप अलौकिक । दुष्ट जनां लावील धाक ।
होईल सद्धर्म संरक्षक । हाच महात्मा निश्चयें ॥ ११३ ॥
पापी कुबुद्धी मंदमती । त्यांची विषय सुखीं जडे प्रीती ।
परस्त्रीची वांछा धरिती । तेच दुर्बुद्धी पापात्मे ॥ ११४ ॥
धर्म स्थापनेचा हव्यास धरिला । काय मोहेल विषयसुखाला ।
अंतरात्मा असे रंगला । धर्म विजय रंगांत ॥ ११५ ॥
विषय सेवनीं नाहीं आवड । इंद्रियसुखाची नाहीं चाड ।
महत्कृत्यें वाटती गोड । तिकडेच मन लागलें ॥ ११६ ॥
**इंद्रिय सुखीं मन रमेल । मग कैंचें राष्ट्रकार्य घडेल ।**
**मन होऊन अति दुर्बल । मळेल नीच विकारें** ॥११७॥
शिवराज शिवावतार । अवतीर्ण झाला धरणीवर ।
धर्म संस्थापना करणार । चरित्र अपार दाउनी ॥ ११८ ॥

वस्त्रें भूषणें समर्पूनी । मधुर शब्दें सांत्वन करूनी ।
पावती केली त्वरें यवनी । श्वशुर गृहीं नृपानें ॥ ११९ ॥
श्री शिवविजय ग्रंथ । शिवावतार चरित्र अद्भुत ।
वर्णन करी भावें अनंत । पंचमाध्याय गोड हा ॥१२०॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

श्री शिवविजय ग्रंथ शिवावतार चरित्र अद्भुत

# अध्याय ६ वा.

॥ श्रीगणेशायनमः ॥

जय अखिल ब्रह्मांडनायका । जय विश्वस्त्रष्ट्या जगपालका ।
जय भक्त मनोरथपूरका । पुढें ग्रंथ चालवीं ॥ १ ॥
शिवरायाचें विजय वर्णन । पूर्वाध्यायीं झालें कथन ।
आतां पुढील अनुसंधान । सावधपणें परिसावें ॥ २ ॥
शिवरायें लुटिलें धन । दुर्ग कोट घेतले साधून ।
अनर्थ ओढवला दारुण । ऐसें यवनां वाटलें ॥ ३ ॥
खळबळलें विजापूर नगर । मुत्सदी झाले चिंतातुर ।
ह्मणती प्रसंग भयंकर । गुदरेल ऐसें वाटतें ॥ ४ ॥
पातशहातें श्रुत झालें । शिवाजीनें बंड केलें ।
त्यानें शहाजीतें लिहिलें । कर्नाटकामाझारी ॥ ५ ॥
तुह्मी जातिवंत खानदानींचे । परम विश्वासू पातशाहीचे ।
स्वामिभक्ती हेंच ब्रीद साचें । तुमचिया कुळांत ॥ ६ ॥
ऐसें असतां तुझा सुत । होऊन मूर्खपणें उन्मत्त ।
दगाबाजी करितो सांप्रत । याचा बंदोबस्त करावा ॥ ७
तव निष्टेवरी दृष्टी देऊन । आजवर घेतला सांभाळून ।
आतां घेऊं तत्काळ प्राण । शरण न येई जरी तो ॥ ८
वाचून पत्र बयादवार । शहाजी लिही प्रत्युत्तर ।
मूर्ख निघाला माझा कुमर । उपाय कांहीं चालेना ॥ ९
अनेक वेळ पाहिलें सांगून । तो न ऐके माझें वचन ।
तुह्मी खाविंद यजमान । इच्छेनुरूप करावें ॥ १० ॥

शहाजीचा लेख पाहिला । बादशहा संतप्त झाला ।
ह्मणे हाच कारणीं विघ्नाला । ऐसें निश्चयें वाटतें ॥ ११ ॥
घेऊन वजिराचें अनुमत । बादशहा कपटव्यूह रचित ।
बाहेर प्रगटों नेदीमात । आपुलिया कृत्याची ॥ १२ ॥
बाजी घोरपडा मुधोळकर । होता बादशाही सरदार ।
गुप्तरूपें त्यास अनुचर । पाठवून आज्ञापी ॥ १३ ॥
शहाजी आहे कर्नाटकांत । त्यास तुह्मी करावें हस्तगत ।
सुचेल तैसें करून त्वरित । एवढें कार्य करावें ॥ १४ ॥
घोरपड्यास आज्ञा पोंचतां । तो झाला कपट करिता ।
शहाजीस गांठून तत्वतां । बाह्य मित्रत्व वाढवी ॥ १५ ॥
गौरवून मधुरोत्तरीं । शहाजीस भोजना पाचारी ।
अत्यंत मित्रत्व वरिवरी । दावून भुलवी तयातें ॥ १६ ॥
धरून तयाचा विश्वास । शहाजी गेला भोजनास ।
विश्वासघातें तयास । कैद केलें खलानें ॥ १७ ॥
शहाजी हस्तगत झाला । घोरपडा परम आनंदला ।
बंदोबस्तें तयाला । विजापुरीं धाडिलें ॥ १८ ॥
बादशहातें भेटविलें । शहाजीस यवनें निर्भत्सिलें ।
कारागृहीं तया ठेविलें । बहूयातना देउनी ॥ १९ ॥
शहाजीचे कष्ट ऐकून । शिवाजी येईल त्वरित शरण ।
ऐसा विचार चित्तीं धरून । दुःख देती शहाजीतें ॥ २० ॥
चिरेबंदी कारागृहांत । बादशहा शहाजीतें ठेवित ।
नानापरी त्यास छळित । निष्ठुरपणा करूनी ॥ २१ ॥
शिवाजीतें विदित केलें । शरण यावें बऱ्या बोलें ।
नातरी पित्यातें पाठविलें । यमसदना जाणावें ॥ २२ ॥

येतां तुह्मातें गौरवूं । अपार संपत्ती देऊं ।
पूर्वीसारखें चालवूं । अपराध क्षमा करूनी ॥ २३ ॥
तुमचा पराक्रमसागर । पित्याहून झाला थोर ।
परी राजभक्तीचें परिसर । सोडूंनिया चालिला ॥ २४ ॥
हें तों बरवें दिसेना । जरी दुष्कृती टाकाना ।
भेटीप्रती जरी याना । घोरदंड पावाल ॥ २५ ॥
शिवाजीतें वृत्तांत कळला । पिता अविंधें कष्टविला ।
मोड कराया आपुला । ऐशी युक्ती योजिली ॥ २६ ॥
क्रोधाविष्ट झालें मन । न साहे पित्याचा अपमान ।
विजापुरावरी जाऊन । 'लंका' करावी वाटलें ! ॥ २७ ॥
राष्ट्रकार्या लाथ द्यावी । आणि परंजनसेवा आदरावी ।
तरी ऐशी पावावी पदवी । ममपित्यानें सहजची ॥ २८ ॥
म्यां शौर्यें अविंध वधावे । वडिलीं त्यांचे पायीं लागावें ।
हें सर्वकाल न चालावें । यांत वाउगें कायसें ॥ २९ ॥
शिवराय विचारी मानसीं । कैसें दंडावें अविंधासी ।
मुक्त करावया पितयासी । काय योजना करावी ॥ ३० ॥
वीरपत्नी नृपालभार्या । ह्मणे मोह कैंचा स्वराज्यकार्या ।
जगदंबा देईल शौर्या । सदा यशस्वी करील ॥ ३१ ॥
श्रीसी शरण रिघावें । अविंधा कदा न भ्यावें ।
धर्मकार्य सिद्धी न्यावें । याचपरी सर्वथा ॥ ३२ ॥
शिवाजीतें मानवलें । श्रीचें स्मरण केलें ।
पुढती कार्य चालविलें । कारस्थानें साक्षेपें ॥ ३३ ॥
पुढें कांहीं दिवस लोटिले । कर्नाटकीं बंड उठलें ।
यवन मुत्सदी घाबरले । तिकडील वार्ता परिसुनी ॥ ३४ ॥

५४

मुत्सद्दी बोलती शहासी । कैसें केलें शहाजीसी ।
आतां पाठवावें कोणासी । आम्हां कांहीं कळेना ॥ ३५ ॥
कर्नाटकींचा माहितगार । एक शहाजी परम चतुर ।
तयावांचून कोणी इतर । बंड मोडूं शकेना ॥ ३६ ॥
ह्मणून शहाजीस पाचारिलें । बादशहानें गौरविलें ।
ह्मणे कर्नाटकीं जाणें आलें । तुजलागीं प्रस्तुत ॥ ३७ ॥
कांहीं झाला दुःखभोग । त्याचा न धरी मनीं राग ।
आतां करून लगबग । स्वामिकार्य साधावें ॥ ३८ ॥
घोरपड्यानें घात केला । त्याचा असेल क्रोध आला ।
परी तो पाहिजे टाकिला । माझीये आज्ञेवरूनी ॥ ३९ ॥
तयासी न धरीन वैर खचित । ऐशी करी आतां शपथ ।
सुखें जाऊन कर्नाटकांत । विजयी व्हावें झडकरी ॥ ४० ॥
मुक्ततेची वेळ जाणून । शहाजी मान्य करी वचन ।
बादशहाचा निरोप घेऊन । शहाजी तेथून निघाला ॥४१॥
शीघ्र जाऊन कर्नाटकांत । निज प्रतापें बंडें मोडित ।
तदा संभाजी प्रथम सुत । युद्धामाजी निमाला ॥ ४२ ॥
शोकाग्नी शहाजीस लागला । तेणें अंतरीं बहू पोळला ।
शहाजी ह्मणे मत्दुःखाला । कारणीभूत घोरपडा ॥ ४३ ॥
अंतरीं होऊन अत्यंत कुपित । तेथून शिवाजीतें लिहित ।
तूं असशील माझा सुत । तरी एवढें करावें ॥ ४४ ॥
घोरपड्यानें दगा केला । त्याचा सूड पाहिजे घेतला ।
पुत्रधर्म पाहिजे जागविला । तरीच पुत्र ह्मणेन ॥ ४५ ॥
शहाजीराव सुटका पावले । शिवरायातें वृत्त कळलें ।
परम समाधान वाटलें । तयेवेळीं राजया ॥ ४६ ॥

इतुकियांत आलें लेखन । राव मनीं कोपला दारुण ।
ह्मणे घोरपड्याचा सूड घेईन । नाना यत्नें करूनी ॥४७॥
आतां स्वराज्य वाढवावें । सर्व मराठे एक करावे ।
अवघे लोक सुखी व्हावे । ऐसें योजी शिवभूप ॥ ४८ ॥
मराठे सरदार नामांकित । ठायीं ठायीं होते नांदत ।
पातशहाचे आज्ञांकित । तदाज्ञेनें वर्तती ॥ ४९ ॥
तयांकडे धाडून स्वजन । परोपरी त्यांतें बोधून ।
वश करी तयांचें मन । सहाय व्हावया स्वकार्या ॥ ५० ॥
चंद्रराव मोरे नामांकित । जावलीचे राजे विख्यात ।
शूर बलाढ्य जातिवंत । मर्दुमकीनें वागती ॥ ५१ ॥
शिवें नाना यत्न केले । परी त्याचें मन न कळे ।
सर्व यत्न वायां गेले । सामोपचाराचे त्यापाशीं ॥ ५२ ॥
विजापूरकरांचा सरदार । बाजी शामराज नामें शूर ।
तो एकदां शिवाजीवर । आला होता ससैन्य ॥ ५३ ॥
मोऱ्यानें त्याशीं मिळून । केलें तयाचें साह्य पूर्ण ।
उत्तम मार्ग तया दावून । पारघाटीं आणिलें ॥ ५४ ॥
शिवाजी येईल महाडाहून । तेव्हा धरूं दगा करून ।
यापरी मनीं योजून । सैन्य छपवून बैसला ॥ ५५ ॥
अनुचरमुखें वृत्त कळलें । विजापूरचें सैन्य आलें ।
पारघाटीं छपून बैसलें । आपुल्यास दगा करावया ॥ ५६ ॥
ऐकतांच ऐसें वर्तमान । सर्व निवडक मावळे घेऊन ।
शिवाजी निघे महाडाहून । शत्रु नाश करावया ॥ ५७ ॥
विजापूरचे सैन्यावर । एकाएकीं केला निकर ।
पराभव पावून बाजी सरदार । पळून गेला ससैन्य ॥ ५८ ॥

शिवाजीतें वृत्त कळलें । चंद्ररावें साह्य केलें ।
नृपाळ चित्त कुपित झालें । मोऱ्यावरी तेधवां ॥ ५९ ॥
ह्मणे शत्रूस साह्य करून । मोऱ्या झाला शत्रू पूर्ण ।
याचा सूड खचित घेईन । अल्पकाळामाझारीं ॥ ६० ॥
जावली ठाणें दुर्जय । न चले शत्रूचा उपाय ।
विचार करी शिवराय । कैसें कार्य साधेल ॥ ६१ ॥
मोऱ्याशीं धरून नम्रता । जोडिली विनयें मित्रता ।
दाविली विश्वास पात्रता । स्वकार्य युक्ती साधावया ॥६२॥
रघुनाथ बल्लाळ नामें ब्राह्मण । ज्याचा नृपा विश्वास पूर्ण ।
तयासवें मंत्र करून । कार्यसिद्धी योजिली ॥ ६३ ॥
संभाजी कावजी रणशूर । देऊन रघुनाथ पंडिताबरोबर ।
निज मंत्र कथून सत्वर । जावलीस धाडिले ॥ ६४ ॥
शूर मावळे घेऊन सोबती । दोघे आले जावलीप्रती ।
बाह्य भावें दावून प्रीती । मोऱ्याप्रती भेटले ॥ ६५ ॥
गृहीं थोर पाहुणे आले । मोऱ्यानें तयां सत्कारिलें ।
आगमन कारण पुशिलें । मोठेपणा देउनी ॥ ६६ ॥
रघुनाथ बोले मधुरोत्तर । तुह्मी जातिवंत रणशूर ।
परम योग्य कुलीन थोर । अपार कीर्ती तूमची ॥ ६७ ॥
शिवराय तुह्मां मानितो । तुमची सोयरीक इच्छितो ।
शरीर संबंधें स्नेह जडतो । तो न तुटे कधींही ॥ ६८ ॥
शिवराय परम सद्गुणी । तुमची कन्या सुलक्षणी ।
दोघांचा विवाह करूनी । शरीरसंबंध जोडावा ॥ ६९ ॥
चंद्रराव बोले स्मित बोल । जैसें ईश्वरी सूत्र असेल ।
तैसें सहजीं घडेल । आपण चिंता न करावी ॥ ७० ॥

भोजनोत्तर करूं बोलणें । आतां तुह्मी करावीं स्नानें ।
भोजन करावें समाधानें । श्रम परिहार करावा ॥ ७१ ॥
भोजन झालिया उपरी । रघुनाथ बोले मधुरोत्तरीं ।
बोलणें असे कार्य प्रकारीं । एकांत स्थळीं चलावें ॥ ७२ ॥
चंद्ररावें मान्य केलें । दोघांसही एकांतीं नेलें ।
ह्मणे शिवाजीनें सांगितलें । काय काय सांगावें ॥ ७३ ॥
रघुनाथपंत चतुर बोलका । ह्मणे माझें वचन ऐका ।
दुराग्रह धरूं नका । शिवरायाशीं कधींही ॥ ७४ ॥
यवनीं महानाश केला । आपुला धर्म खळें बुडविला ।
विपरीत काळ प्राप्त झाला । यवनामुळें आपणातें ॥ ७५ ॥
सर्व होऊं एकवट । तरीच होतील कृत्यें अचाट ।
पुरवूं यवनांची पाठ । सर्व एकत्र होउनी ॥ ७६ ॥
रघुनाथपंत बोल बोलिला । मोऱ्यालागीं विषाद वाटला ।
ह्मणे याच करितां तुह्मी आला । काय येथें धूर्तहो ॥७७॥
सोयरीकीचें असेल बोलणें । तरीच बोलावें तुवां वदनें ।
बंड पाखंड आह्मांकारणें । नलगेची सर्वथा ॥ ७८ ॥
आह्मी पातशाही आज्ञांकित । आह्मांस न कळे दुजी मात ।
आह्मी न पडूं फंदफितुरांत । कदाकाळीं जाणिजे ॥७९॥
शिवाजी अज्ञानी चुकतो । मूर्खासम उगाच नाचतो ।
बलिवंताशीं स्पर्धा करितो । काय आधारें कळेना ॥८०॥
करील चार दिवस टुरटुर । पतंग जातो दीपावर ।
तैशीच गती होईल साचार । अल्पकाळें जाणिजे ॥ ८१ ॥
गर्जून बोले रघुनाथपंत । ओळखिला नाहीं शहाजीसुत ।
अरे तो प्रचंड वीर अद्भुत । शिक्षा लावील सकळांसी ॥८२॥

चंद्रराव बोले प्रत्यूत्तर । कशास करितां वल्गना फार ।
मजसारखा एक सरदार । पुरे तुह्मांस सकळांशीं ॥ ८३ ॥
ऐकतांच ऐसें वचन । संभाजी कोपला दारुण ।
ह्मणे तुज शिक्षा लावीन । याच समयीं दुरात्म्या ॥८४॥
शिवराय थोर पंचानन । तूं तरी नीच योनि श्वान ।
अज्ञानें राया निंदून । मूर्खा वध्य झालासी ॥ ८५ ॥
चंद्रराव भुजा ठोकी । ह्मणे तुह्मी मिरवितां शेखी ।
परममूर्ख अविवेकी । कैद करीन तुह्मांतें ॥ ८६ ॥
चंद्रराव निष्ठुर बोले । दोघे एकदांच उसळले ।
उडून चंद्ररावावर पडले । सर्पावरी गरुडसे ॥ ८७ ॥
मोऱ्या घातघात ओरडे । संभाजीनें दाबिलें नरडें ।
रघुनाथ सरसावून पुढें । खड्ग उपशी हस्तींचें ॥ ८८ ॥
दोघे होऊन निष्ठुर भारी । त्यावरी चालविती तरवारी ।
घाय लागतां ओरड करी । चंद्रराव तेधवां ॥ ८९ ॥
संभाजीचा चपल हस्त । चंद्ररावाचें शीर उडवित ।
शोणितांचा लोट निघत । शरिरांतून तयाच्या ॥ ९० ॥
संकेतटाळी वाजविली । मावळेमंडळी जमा झाली ।
मग दोघे तयेवेळीं । मावळ्यांत मिसळले ॥ ९१ ॥
बाहेर प्रगटली मात । चंद्ररावाचा झाला घात ।
लोक परम विस्मय करित । काय अनर्थ घडला हा ॥९२॥
चंद्ररावाचे बंधू प्रधान । झडकरी आले तेथें धावून ।
आपुलें सैन्य त्वरें जमवून । वेढा घालिती शत्रूतें ॥ ९३ ॥
इतुकियांत समोरून । महाबळेश्वर पर्वताकडून ।
बहुत घोडेस्वार धावून । येतात ऐसें देखिलें ॥ ९४ ॥

मावळे करिती गर्जना । आला ह्मणती शिवराणा ।
आतां शिक्षा लावुं दुर्जना । अल्पकाळा माझारीं ॥ ९५ ॥
पूर्व संकेतानुरूप । प्राप्त झाला शिवभूप ।
दावी अवघ्यां निजप्रताप । समरठाण मांडुनी ॥ ९६ ॥
चंद्ररावाचे बंधू प्रधान । तवकें करिती युद्ध दारुण ।
दाखविती शूरपण । अत्यावेशें करूनी ॥ ९७ ॥
शिवरायाचा प्रताप अद्भुत । शत्रू झाले पराभूत ।
विजयश्री माळ घालीत । शिवरायास साक्षेपें ॥ ९८ ॥
ऐशी अपूर्व युक्ती रचिली । दुर्जय जावली हस्तगत केली ।
सुप्रसन्न मर्जी झाली । दोघांवरी रायाची ॥ ९९ ॥
महत्कार्य साधिलें । ह्मणून तयां नांवाजिलें ।
वस्त्रभूषणें गौरविलें । आनंदविलें तयांतें ॥ १०० ॥
जावलीखोरा हातीं आला । हा अतिशय लाभ झाला ।
हर्ष वाटे शिव नृपाला । योग्य जागा पाहुनी ॥ १०१ ॥
घांटमाथा आणि कोंकण । यांचे मध्यें हा प्रांत जाण ।
नीरा आणि कोयना मधून । पवित्र नद्या वाहती ॥१०२॥
जिकडे तिकडे घोर कानन । दऱ्याखोऱ्यांची समृद्धि पूर्ण ।
बहू सैन्य बसलें लपून । तरी नुमगे इतरांतें ॥ १०३ ॥
पाहूनियां मुलूख चांगला । शिवरायाच्या मनीं भरला ।
ह्मणे येथें दुर्ग बांधिला । पाहिजे त्वरित निश्चयें ॥१०४॥
घांट आणि तळ कोंकण । यांचे संगमीं दुर्ग बांधून ।
करूं प्रांत संरक्षण । सैन्य येथें ठेउनी ॥ १०५ ॥
मोरोपंत पिंगळे चतुर । तया आज्ञापि रणरंगधीर ।
तुह्मी कार्यी होऊन तत्पर । दुर्ग येथें बांधावा ॥ १०६ ॥

दुर्ग दिसावा परम सुंदर । दुर्ग असावा दृढ अपार ।
दुर्ग असावा उंच जागेवर । यथाशास्त्र बांधवा ॥ १०७ ॥
ऐशी नृपाची आज्ञा झाली । मोरोपंतें शिरीं वंदिली ।
मग अपार संपत्ति वेंचिली । दुर्गरचना करावया ॥ १०८ ॥
मनाजोगा दुर्ग जाहला । शिवराय तेव्हां आनंदला ।
प्रतापगड ऐसें तयाला । नाम ठेविलें प्रीतीनें ॥ १०९ ॥
मोरोपंत चतुर सुजाण । कर्ता राजनिष्ठ ब्राह्मण ।
रायें तया गौरवून । पेशवेपद दीधलें ॥ ११० ॥
उपरी घ्यावया शृंगारपूर । राव प्रेषी सैनिक शूर ।
तेथील शिर्क्यांसवें समर । होऊन नगर मिळालें ॥ १११ ॥
सईबाई नृपालकांता । परम सद्गुणी पतिव्रता ।
प्रसवली परम सुंदर सुता । राव बहुत आनंदला ॥११२॥
भाग्यकाळीं पुत्र झाला । काय सीमा आनंदाला ।
दानधर्म बहुत केला । नृपवर्यानें तेधवां ॥ ११३ ॥
जातकर्मादि संस्कार केले । संभाजी ऐसें नाम ठेविलें ।
शिवरायाचें यश वाढलें । जगतीवरी अपार ॥ ११४ ॥
शिवरायाचे विजयी झेंडे । फडकत चालिले चहूंकडे ।
दिवसेंदिवस सत्ता वाढे । शुक्लेंदुवत् नृपाची ॥ ११५ ॥
शिवरायाचा चरित्ररस । भक्तिभावें सावकाश ।
सेवितां आनंद श्रोतयास । अधिकाधिक वाटेल ॥ ११६ ॥
तुह्मी श्रोते लावून मन । कराल शिवकथा श्रवण ।
प्राप्त होतील उत्तम गुण । तुह्मांलागी तयाचे ॥ ११७ ॥
शिवनृपाचें चरित अगाध । श्रवण करितां होतसे बोध ।
मन कदापि हो न अंध । राष्ट्रकार्या माझारी ॥ ११८ ॥

यास्तव धरून एकाग्रता । पुढें परिसा शिवरायकथा ।
परमानंदें सांगेल वक्ता । पुढील अध्यायीं तुह्मांतें ॥११९॥
श्रीशिवविजयग्रंथ । शिवावतार चरित्र अद्भुत ।
वर्णन करा भावें अनंत । षष्ठाध्याय गोड हा ॥ १२० ॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥



# अध्याय ७ वा.

॥ श्रीगणेशायनमः ॥

तुह्मी श्रोते संत सज्जन । प्रेमें होऊन सावधान ।
नृपकथारस करा सेवन । अमृताहून गोड जो ॥ १ ॥
शिवरायाचा पुण्य प्रताप । दिवसेंदिवस वाढला अमूप ।
निवारील स्वदेशाचा तांप । ऐसें भासों लागलें ॥ २ ॥
तळ कोंकणामाझारीं । गेली शिवरायाची स्वारी ।
युक्ति रचोन परोपरी । बहुत दुर्ग साधिले ॥ ३ ॥
कोंकण प्रांत पहात असतां । आलें राजयाचे चित्ता ।
एक दुर्ग बांधावा तत्वतां । अति दुर्जय या प्रांतीं ॥ ४ ॥
बहुत स्थळें पाहतां शोधून । त्यांत आढळलें एक स्थान ।
संतोषलें नृपाल मन । योग्य स्थळ पाहुनी ॥ ५ ॥
सावित्री नदी मनोरम । तिचे तीरीं महाड ग्राम ।
तयासमीप सर्वोत्तम । पर्वत एक देखिला ॥ ६ ॥
उंच विस्तीर्ण विशाळ । शत्रूस दुर्जय केवळ ।
पाहूनिया ऐसें स्थळ । राव बहुत संतोषला ॥ ७ ॥
त्या रायरी पर्वतीं । आदीलशाही ठाणीं होतीं ।
कोळी घडसी बहुत राहती । रायरीवरी त्या काळीं ॥ ८ ॥
शिवराय अंगें जाऊन । सर्वांस देई हांकलून ।
आपुली सत्ता बळें स्थापून । राहता झाला त्या स्थळीं ॥९॥
ऐसें वाटलें शिवरावा । सर्व दुर्ग शोधून पहावा ।
ठिकाणांचा शोध घ्यावा । स्वांगें सकल पाहुनी ॥ १० ॥

आरूढोन शिबिकायानीं । मुख्यमंत्री सर्व घेउनी ।
राव निघाला तेच क्षणीं । विस्तीर्ण नग पहावया ॥ ११ ॥
चालत असतां पहात पहात । चमत्कार झाला अद्भुत ।
शिबिका आडली अवचित । मागें पुढें सरेना ॥ १२ ॥
कंटकलता लोंबे खालीं । तीतें पालखी आडकली ।
परम चमत्कारें गुंतली । सेवकांस सुटेना ॥ १३ ॥
राव उतरून यानाखालीं । ह्मणे प्रभूची सूचना झाली ।
निशाण फडकेल याच स्थळीं । दिग्विजयाचें आपुलें ॥१४॥
जेथें शिवभूप उतरला । तेथें विजयस्तंभ उभारिला ।
रायें दुर्जय दुर्ग बांधिला । तदा रायरी पर्वतीं ॥ १५ ॥
गडामाजी प्रमुख गड । ह्मणून नाम ठेविलें रायगड ।
रायास वाटे परम आवड । रायगड दुर्गाची ॥ १६ ॥
बहुत अश्व गज पदाती । सैन्य ठेविलें गडावरती ।
शिवरायाची मुख्य वसती । याच गडीं होतसे ॥ १७ ॥
रायगडावरी राहुनी । राज्यसूत्रें चाळवी तेथुनी ।
स्वधर्मीं चित्त ठेवुनी । शिवनृपती वर्ततसे ॥ १८ ॥
बहुत गड कोट घेतले । अनेक प्रांत हातीं आले ।
बंदोबस्तें संरक्षिले । सर्व मुलुख रायानें ॥ १९ ॥
जेणें प्रजेस व्हावें सुख । ऐसा रायाचा असे दंडक ।
तुच्छ मानी स्वीय सुख । शिवराय सर्वदा ॥ २० ॥
धर्म विजयार्थ शौर्य समरीं । परी वैराग्य वसे अंतरीं ।
भगवद्भक्त जनीं आवड धरी । सर्वकाळ शिवभूप ॥ २१ ॥
बहुत आवडे हरिकीर्तन । प्रेमें करी पुराण श्रवण ।
उत्तम उपदेश जाई ठसून । हृदयामाजीं रायाच्या ॥ २२ ॥

रायें नानाग्रंथ ऐकिले । त्यामाजीं एक सार कळलें ।
जरी मुमुक्षूस सद्गुरू मिळे । तरीच सार्थक होईल ॥ २३ ॥
सत्यसिद्धांत ऐसा कळला । नृपहृदयीं चटका लागला ।
ह्मणे सद्गुरू पाहिजे भेटला । तरीच धन्य होईन ॥ २४ ॥
आतां विचार कैसा करूं । कोण्यास्थळीं मिळेल सद्गुरू ।
पापीमन कैसें आवरूं । सद्गुरूकृपा न होतां ॥ २५ ॥
गुरूपदेशाचा विचार । राव करीतसे निरंतर ।
न पडों दे कधीं अंतर । राजकार्या माझारीं ॥ २६ ॥
ऐसा कांहीं काळ लोटतां । महाडग्रामीं भूप असतां ।
तेथें होती हरिकथा । देवालया माझारीं ॥ २७ ॥
हरिकथेची आवड फार । भूप बैसला कीर्तनीं सादर ।
कीर्तनरंगास आला भर । भक्तिभावें करूनी ॥ २८ ॥
अनुपम वक्ता हरिदास । भाविक श्रोता मिळाला त्यास ।
सहजची आला तया उल्हास । कीर्तनामाजी तेदिनीं ॥२९॥
व्यर्थ जन्म सद्गुरूवीण । या विषयाचें प्रतिपादन ।
हरिदासें सुरस करून । श्रोतेजनं रंजविले ॥ ३० ॥
करून वेदांत निरूपण । पुढें लाविलें ध्रुवाख्यान ।
गुरुकृपा होतां पूर्ण । ध्रुवबाळ उद्धरिला ॥ ३१ ॥
सुरस कीर्तन समाप्त झालें । मग सर्व जन स्वस्थलीं गेले ।
शिवरायाचें चित्त लागलें । सद्गुरूकडे सर्वदा ॥ ३२ ॥
कधीं सद्गुरू भेटेल । कधीं सद्गुरू कृपा करील ।
कधीं सद्गुरू उपदेशील । ऐसा ध्यास लागला ॥ ३३ ॥
नृपतीस कळली मात । सद्गुरू रामदास समर्थ ।
स्वदेशीं विचरे प्रस्तुत । लोकानुग्रहा कारणें ॥ ३४ ॥

ब्राह्मणकुळीं असे जन्मला । नारायण नाम पावला ।
परम सुलक्षणी निघाला । बाळपणांत पुरुष जो ॥ ३५ ॥
पितरें विवाह कार्य योजिती । वधूस पुढें उभी करिती ।
ब्राह्मण मंगलाष्टकें ह्मणती । वधुवर ऐक्य करावया ॥३६॥
द्विजीं ह्मणतां सावधान । चपापलें जयाचें मन ।
ह्मणे सुचविती ' सावधान ' । प्रपंचमार्गीं पडों नये ॥३७॥
पुन्हा ऐकतां ' सावधान ' । करिता झाला पलायन ।
बाळ ब्रह्मचारी होऊन । थोर तपस्वी जाहला ॥ ३८ ॥
थोर केलीं तीर्थाटणें । केलीं गायत्री पुरश्चरणें ।
पवित्र होऊन अंतःकरणें । लोकानुग्रहार्थ भ्रमतसे ॥ ३९ ॥
तयासी जावें शरण । तरी काया होईल पावन ।
सहज घडेल परलोकसाधन । त्याचा उपदेश साधितां ॥४०॥
ऐसें योजून तात्काळ । अत्यंत होऊन उतावीळ ।
रामदास दर्शनार्थ नृपाल । त्वरें जाता जाहला ॥ ४१ ॥
ठायींठायीं शोध केला । परी सद्गुरू नाहीं भेटला ।
नृपाळ अत्यंत दुःख पावला । दर्शनावीण गुरूच्या ॥ ४२ ॥
ऐसा वेडावला नृपती । मग विनवी कुलदेवीप्रती ।
जय कुलस्वामिणी तुजप्रती । नमस्कारितों दास मी ॥४३॥
तूं भक्तांची सदयमाय । कोठें आहेत सद्गुरूराय ।
तें सांगून हा काय । पवित्र करी जगदंबे ॥ ४४ ॥
जगीं साधुत्व बहुत मिरविती । कोणास शरण जावें संप्रती ।
तें आज्ञापून मजप्रती । मोक्षमार्गीं लाविजे ॥ ४५ ॥
यापरी करून प्रार्थना । निद्रित जाहला शिवराणा ।
तों जगदंबा देऊन दर्शना । स्वप्नामाजी बोलिली ॥ ४६ ॥

ऊठऊठ मम बाळका । चिंता न करीं नरनायका ।
पावशील गुरुप्रसादसुखा । अल्प काळांत मद्भक्ता ॥ ४७ ॥
जेणें केलें लंका दहन । तो महाराज अंजनीनंदन ।
प्रस्तुत अवतीर्ण होऊन । या भूमंडळीं संचरतो ॥ ४८ ॥
चित्तीं धरून आत्माराम । घेऊन रामदास ऐसें नाम ।
वासना त्यागें होऊन निष्काम । तव देशीं फिरतसे ॥४९॥
तोच सत्गुरू रामदास । शरण जाईं नृपा तयास ।
धंन्य होईल तव वंश । कृपा तयाची साधितां ॥ ५० ॥
शुद्ध होईल अभ्यंतर । सत्कीर्ती वाढेल अपार ।
होईल ध्रुवसम उद्धार । तुझा गुरुकृपेनें ॥ ५१ ॥
ऐसा उपदेश करून । देवी पावली अंतर्धान ।
राव जागृत होऊन । परम विस्मय पावला ॥ ५२ ॥
कोठें सद्गुरू रामदास । कोण शोधून काढील त्यास ।
ऐसा रात्रंदिन ध्यास । शिवरायास लागला ॥ ५३ ॥
रायास अनुचर सांगती । साताऱ्यास देखिली गुरुमूर्ती ।
चांफळग्रामीं असे संप्रती । ऐसें कर्णीं परिसिलें ॥ ५४ ॥
गुरुभेटीची झाली तांतडी । बंदोबस्त ठेवून रायगडीं ।
सर्व सेना घेऊन थोडी । राव तेथुनी निघाला ॥ ५५ ॥
गुरुदर्शनेच्छा वाढे अंतरीं । चांफळास जाऊनियां झडकरी ।
राव सत्गुरुचा शोध करी । कोठें आहेत म्हणूनी ॥ ५६ ॥
शिष्यवर्ग नृपास सांगती । येथें नाहीं गुरुमूर्ती ।
कोण्यास्थानीं असेल संप्रती । न सांगवे कोणातें ॥ ५७ ॥
गुहेंत अथवा पर्वतशिखरीं । अथवा असतील घोरकांतारीं ।
अथवा भ्रमत असतील नगरीं । स्वेच्छेनुरूप कोठेंतरी ॥५८॥

ऐकून ऐसें शिष्यवचन । निघता झाला राव तेथुन ।
स्थळीं स्थळीं पाहे शोधून । गुरूलागीं तेधवां ॥ ५९ ॥
प्रथम शोधी सप्तर्षिनगरीं । कळे गेले पर्वतशिखरीं ।
तेथें जातां गुरु कांतारीं । गेले ऐसें समजलें ॥ ६० ॥
ज्या ज्या गांवीं जनां पुसिलें । तेथें ह्मणती आतांच गेले ।
नृपास अत्यंत कष्ट झाले । तरी दर्शन घडेना ॥ ६१ ॥
मुमुक्षुत्व सत्य कळेल । खरी निष्ठा प्रगट होईल ।
तेव्हांच गुरुदर्शन घडेल । अल्पश्रमें नव्हेची ॥ ६२ ॥
राव नानापरी कष्टला । तरी दर्शनयोग नाहीं आला ।
चित्तीं बहुत खेद झाला । नृपतीच्या तेधवां ॥ ६३ ॥
ह्मणे मी पापी मूढमती । मजला कैंची गुरुप्राप्ती ।
मी अयोग्य ह्मणूनि गुरुमूर्ती । कृपा न करी मजवरी ॥६४॥
जंई देखेन सत्गुरूचरण । तेव्हांच आतां करीन भोजन ।
हाच माझा निश्चय पूर्ण । कळों येईल गुरूतें ॥ ६५ ॥
ऐशी घेऊन सत्यशपथ । नृप बैसला उपोषित ।
सत्गुरूचें नाम घेत । रात्रंदिन भक्तीनें ॥ ६६ ॥
चतुर्थ दिवसाचे अंतीं । निद्रित जाहला शिवनृपती ।
स्वप्नामाजी गुरुमूर्ती । पुढें उभी ठाकली ॥ ६७ ॥
मस्तकीं ठेवून अभयकर । ह्मणती शिवबा धरीं धीर ।
मी भेटेन तुज सत्वर । चिंता मानसीं करूं नको ॥ ६८ ॥
धर्म संस्थापने कारण । तूं झालास राया अवतीर्ण ।
दुष्ट यवन पराभवून । दिग्विजय करशील ॥ ६९ ॥
बोलून ऐसे बोल मंजुळ । प्रसादार्थ देऊन नारिकेळफळ ।
सत्गुरू गुप्त झाले तत्काळ । रघुवीर शब्द बोलुनी ॥७०॥

शिवराय जागृत जाहला । चहूंकडे पाहूं लागला ।
गुरुमूर्ती न दिसे तयाला । तये स्थळीं कोठेंही ॥ ७१ ॥
स्वप्नामाजी श्रीफळ दिधलें । तें नृपें हस्तीं देखिलें ।
नृपतीस आश्चर्य वाटलें । ह्मणे धन्य गुरुवर्य ॥ ७२ ॥
तें श्रीफळ रायें पूजून । तयास ठेविलें जतन करून ।
अद्याप देखिती तया जन । चांफळ ग्रामा मझारीं ॥ ७३ ॥
दृष्टांत होतां सप्रचीत । राव झाला अत्यंत हर्षित ।
आतां गुरु भेटतील खाचित । ऐसा निश्चय वाटला ॥ ७४ ॥
प्रातःकाळीं गुरूकडून । शिष्य आला पत्र घेऊन ।
ह्मणे श्रीशिवरायाकारण । पत्र दिधलें गुरूनें ॥ ७५ ॥
रायाप्रती वृत्त कळलें । सतुगुरूचें पत्र आलें ।
नृपालमन प्रमुदित झालें । प्रिय वार्ता परिसुनी ॥ ७६ ॥
हस्तामाजी पत्र घेऊन । नृपवर्यें केलें वंदन ।
मग वाची स्वयें उकलून । अत्यानंदें करूनी ॥ ७७ ॥
" निश्चयाचा महा मेरू । बहुत जनांस आधारू ।
अखंड स्थितीचा निर्धारू । श्रीमंतयोगी ॥ ७८ ॥
परोपकाराचिया राशी । उदंड घडती जयाशी ।
तयाचे गुण महत्वाशी । तुळणा कैची ॥ ७९ ॥
नरपती हयपती गजपती । गडपती भूपती जळपती ।
पुरंदर आणि छत्रपती । शक्तिपृष्ठभागीं ॥ ८० ॥
यशवंत कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंत ।
पुण्यवंत नीतिवंत । जाणता राजा ॥ ८१ ॥
आचार विचारशील । दानशील धर्मशील ।
सर्वज्ञपणें सुशील । सकळांठायीं ॥ ८२ ॥

धीर उदार गंभीर । शूरवीर्यासि तत्पर ।
सावधपणें नृपवर । तुच्छ केले ॥ ८३ ॥
तीर्थें क्षेत्रें मोडिलीं । ब्राह्मणस्थानें भ्रष्ट झालीं ।
सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ॥ ८४ ॥
देव धर्म गोब्राह्मण । करावया संरक्षण ।
हृदयस्थ झाला नारायण । प्रेरणा केली ॥ ८५ ॥
उदंड पंडित पुराणिक । कवीश्वर याज्ञिक वैदिक ।
धूर्त तार्किक सभानायक । तुमच्याठायीं ॥ ८६ ॥
या भूमंडळाचे ठायीं । धर्म रक्षी ऐसा नाहीं ।
महाराष्ट्र धर्म कांहीं । तुह्मांमुळें राहिला ॥ ८७ ॥
आणीकही धर्मकृत्यें चालती । आश्रित होऊन कित्येक राहती ।
धन्य धन्य तुमची कीर्ती । विश्वीं विस्तारली ॥ ८८ ॥
कित्येक दुष्ट संहारिले । कित्येकांस धाक सुटले ।
कित्येकांस आश्रय झाले । शिवकल्याणराजा ॥ ८९ ॥
तुमचे देशीं वास्तव्य केलें । परंतु वर्तमान नाहीं घेतलें ।
ऋणानुबंधें विस्मरण झालें । काय नेणूं ॥ ९० ॥
सर्वज्ञ मंडळी धर्ममूर्ती । सांगणें काय तुह्मांप्रती ।
धर्म स्थापनेची कीर्ती । संभाळिली पाहिजे ॥ ९१ ॥
उदंड राजकारण तटलें । तेणें चित्त विभागलें ।
प्रसंग नसतां लिहिलें । क्षमा केली पाहिजे" ॥ ९२ ॥
यापरी वाचितां पत्र समग्र । नृपवर्यास आला गहिंवर ।
ह्मणे अंतरसाक्ष सद्गुरूवर । कधीं नयनीं पाहीन ॥ ९३ ॥
सत्गुरूची सत्शिष्यीण । जीस 'आका' ऐसें अभिधान ।
ती ह्मणे ऐक ममवचन । शिवभूपा सज्जना ॥ ९४ ॥

अश्व गज सैन्य सारें । हा पसारा मागें ठेवि रे ।
सवें चार सेवक घेऊन बरे । गुरु दर्शना जाईजे ॥ ९५ ॥
राजवैभवासह जाशील । तरी सत्‌गुरू दुरावेल ।
नम्रपणें प्राप्त होईल । सत्‌गुरूपद तुजलागीं ॥ ९६ ॥
स्वामीचा पट्टशिष्य कल्याण । ह्मणे नृपाची भक्ति देखून ।
सत्‌गुरू तुजला भेटवीन । मजसंगतीं चलावें ॥ ९७ ॥
सर्व सैन्य मागें ठेविलें । चार अनुग सवें घेतले ।
शिवराय तेथून निघाले । स्वामिदर्शन घ्यावया ॥ ९८ ॥
कल्याण निघाला बरोबर । संगें द्वितीय शिष्य दिवाकर ।
चरण चाली चाले नृपवर । अत्युत्कंठित होउनी ॥ ९९ ॥
शिंगणवाडी ग्रामीं नेऊन । नृपाप्रती बोले कल्याण ।
आज घडेल तुजला दर्शन । सत्‌गुरूचें निश्चयें ॥ १०० ॥
वसंतऋतू वैशाखमास । गुरुवासरीं शुद्ध नवमीस ।
राव चालिला दर्शनास । उत्कंठेनें गुरूच्या ॥ १०१ ॥
पुष्पवाटिकेच्या रम्यस्थळीं । सुंदर उदुंबर तरुतळीं ।
होती सत्‌गुरूमूर्ती बैसली । अवचे दुरूनी पाहती ॥१०२॥
गौरवर्ण विशाळभाळ । भाळीं दिसे एक टेंगुळ ।
गंभीर रम्य मुखकमल । सत्‌गुरूचें देखिलें ॥ १०३ ॥
उदुंबरतळीं जेठा मारून । परिधान करून काषाय कौपीन ।
करीत होते नामस्मरण । राघवाचें मुखानें ॥ १०४ ॥
रायें सत्‌गुरू देखिला । अष्टभावें सद्गदित झाला ।
मग साष्टांग प्रणिपात केला । प्रेमाश्रू नयनीं लोटले ॥१०५॥
पुढें होऊन शिष्य कल्याण । साष्टांगें प्रणिपात करून ।
ह्मणे हा शिवभूप आला शरण । गुरुप्रसाद इच्छुनी ॥१०६॥

स्वामी किंचित् हास्य करिती । कल्याणाचे कर्णीं पुसती ।
या नृपाची कैशी स्थिती । उपदेशपात्र आहे कीं ॥१०७॥
कल्याण ह्मणे हें सत्पात्र । हा तरेल इहपरत्र ।
यास द्यावा उपदेशमंत्र । कृपा करून गुरुरायें ॥ १०८ ॥
स्वामी बोलती गंभीरबोल । शिवराया तूं दीनदयाळ ।
धर्मरक्षणार्थ केवळ । प्रस्तुत काळीं झटतोसी ॥ १०९ ॥
राज्य सोडून कासयाशी । बा आलास आह्मांपाशीं ।
आह्मी तरी अरण्यवासी । काय देऊं तुजलागीं ॥ ११० ॥
नृप बोले जोडून कर । मी तुमचा दीन किंकर ।
कृपाळूपणें मजवर । अनुग्रह करावा ॥ १११ ॥
बरें ह्मणून मधुरोत्तरीं । गुरू बैसले आसनावरी ।
पूजासाहित्य सिद्ध करी । राव अनुगां सांगुनी ॥ ११२ ॥
बाळाजी चिटणीस चतुर । निळो सोनदेव रणशूर ।
हे दोघे प्रियकर । होते रायासमीप ॥ ११३ ॥
पूजासाहित्य सिद्ध झालें । नृपतीनें स्नान केलें ।
दिवाकरभट्ट पुढें झाले । गुरुपूजा सांगावया ॥ ११४ ॥
करून गुरुमूर्तीचें आवाहन । रायें अर्पिलें दुकूलवसन ।
चरणीं करून पाद्यसमर्पण । अर्घ्य मागून घातलें ॥११५॥
सवेंच आचमन समर्पिलें । रत्नाभिषेकें स्नान घातलें ।
कस्तुरीमिश्रित गंध चर्चिलें । सत्गुरूतें भक्तानें ॥११६॥
नानाविध वस्त्राभरणें । रायें अर्पिलीं गुरूकारणें ।
तुष्टविला षोडशोपचार पूजनें । सत्गुरुराय तेधवां ॥११७॥
दिवाकरें पूजा सांगितली । षोडशोपचारें पूर्ण झाली ।
आतां प्रार्थना राहिली । ती भूप करी स्वमुखानें ॥ ११८ ॥

मी न जाणें आवाहन । कांहींच नेणें तवपूजन ।
तूं समर्थ कृपा करून । मजसीं क्षमा करावी ॥ ११९ ॥
संसारतापें तप्त झालों । भवसागरीं बुडूं लागलों ।
ह्मणून तुज शरण आलों । रक्षण करीं समर्था ॥ १२० ॥
परमार्थाचा विचार बरवा । गुरूमुखानें श्रवण करावा ।
हा मम हेतू पुरवावा । कृपा मजवरी करूनी ॥ १२१ ॥
ऐसें बोलून शहाजीसुत । अंतरीं झाला सद्गदित ।
साष्टांग घाली प्रणिपात । सत्गुरूपुढें तेधवां ॥ १२२ ॥
पुढिले अध्यायीं कथा सुरस । सत्गुरू करितील उपदेश ।
उचंबळेल भक्तिरस । सत्गुरूचे भाषणीं ॥ १२३ ॥
श्रीशिवविजयग्रंथ । शिवावतार चरित्र अद्भुत ।
वर्णन करी भावें अनंत । सप्तमाध्याय गोड हा ॥ १२४ ॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥



# अध्याय ८ वा.

॥ श्रीगणेशायनमः ॥

पूर्वाध्याय समाप्तीला । राव सत्‌गुरूस शरण गेला ।
आतां सत्‌गुरूनें बोध केला । तो सादर परिसावा ॥ १ ॥
समर्थ बोलती गंभीर वचन । राया एकाग्र करून मन ।
श्रवण करीं माझें वचन । परमार्थ विषय जाणावया ॥ २ ॥
जे बोलती पंचतत्वें । त्यांचीं अभ्यासावीं नांवें ।
तदुपरी स्वानुभवें । रूपें जाणावीं ॥ ३ ॥
यामध्यें शाश्वत कोण । आणि अशाश्वत कोण ।
ऐसें करावें विवरण । प्रत्ययाचें ॥ ४ ॥
पंचभूतांचा विचार । नांव रूप सारासार ।
तोंचि बोलिला निर्धार । सावध ऐका ॥ ५ ॥
पृथ्वी आप तेज वायु आकाश । नांवें बोलिलीं सावकाश ।
आतां रूपाचा विश्वास । श्रवणीं धरावा ॥ ६ ॥
पृथ्वी ह्मणिजे ते धरणी । आप ह्मणिजे तें पाणी ।
तेज ह्मणिजे तें अग्नीतरणी । सतेजादिक ॥ ७ ॥
वायू ह्मणिजे तो वारा । आकाश ह्मणिजे पैसपसारा ।
आतां शाश्वत तें विचारा । आपुले मनीं ॥ ८ ॥
एक शीत चांचपावें । ह्मणिजे वर्म पडे ठावें ।
तैसें थोड्या अनुभवें । बहुत जाणावें ॥ ९ ॥
पृथ्वी रचते आणि खचते । हे तों प्रत्ययास येथें ।
नाना रचना होत जाते । सृष्टीमध्यें ॥ १० ॥

ह्मणोनि रचतें तें खचतें । आपतें ही आटोन जातें ।
तेज ही प्रगटोन विझतें । वारें ही न राहे ॥ ११ ॥
आकाश नाम मात्र आहे । तेंही विचारितां न राहे ।
एवं पंचभूतीक राहे । हें तो घडेना ॥ १२ ॥
ऐसा पंचभूतांचा विचार । नाशिवंत हा निर्धार ।
शाश्वत आत्मा निराकार । सत्य जाणावा ॥ १३ ॥
तो आत्मा कोणास कळेना । ज्ञानेविण आकळेना ।
ह्मणोनियां संतजना । विचारावें ॥ १४ ॥
विचारितां सज्जनासी । ते ह्मणती अविनाशी ।
जन्म मृत्यु आत्मयासी । बोलोंचि नये ॥ १५ ॥
निराकारीं भासे आकार । आणि आकारीं भासे निराकार ।
निराकार आणि आकार । विवेकें वोळखावा ॥ १६ ॥
निराकार जाणावा नित्य । आकार जाणावा अनित्य ।
यास बोलिजे नित्यानित्य । विचारणा ॥ १७ ॥
सारीं भासे असार । आणि असारीं भासे सार ।
सारासार विचार । शोधूनि पहावा ॥ १८ ॥
पंचभूतीक ते मायिक । परंतु भासे अनेक ।
आणि आत्मा एक । व्यापूनि असे ॥ १९ ॥
चौ भूतांमध्यें गगन । तैसें गगनीं असे सघन ।
निवडूनि पाहतां अभिन्न । गगन आणि वस्तू ॥ २० ॥
उपाधियोगेंचि आकाश । उपाधी नसतां निराभास ।
निराभास ते अविनाश । तैसें गगन ॥ २१ ॥
आतां असो विवंचना । परंतु जें पाहतां नासेना ।
तगे तोंचि अनुमाना । विवेकें आणावें ॥ २२ ॥

परमात्मा तो निराकार । जाणिजे हा विचार सार ।
आणि आपण कोण हा विचार । पाहिला पाहिजे ॥२३॥
देहास अंत येतां । वायो जातो तत्वतां ।
हें लटकें ह्मणाल तरी आतां । श्वासोच्छ्वास धरावा ॥२४॥
श्वास कोंडतां देह पडे । देह पडतां ह्मणती मढें ।
मढ्यास कर्तृत्व न घडे । कदाकाळीं ॥ २५ ॥
देहावेगळा वायु न करी । वायूवेगळा देह न करी ।
विचार करितां कांहींच न करी । एकावेगळें एक ॥२६॥
उगेंच पाहतां मनुष्य दिसे । विचार घेतां कांहींच नसे ।
अभेद भक्तीचें लक्षण ऐसें । वोळखावें ॥ २७ ॥
कर्त्ता आपण ऐसें ह्मणावें । तरी आपुले इच्छेसारिखें व्हावें ।
इच्छेसारिखें न होतां मानावें । अवघेंचि वाव ॥ २८ ॥
ह्मणोन कर्ता नव्हे कीं आपण । येथें भोगतां कैंचा कोण ।
हें विचारांचें लक्षण । अविचारें न घडे ॥ २९ ॥
अविचार आणि विचार । तैसा प्रकाश आणि अंधकार ।
विकार आणि निर्विकार । एक नव्हे कीं ॥ ३० ॥
जेथें नाहीं विवंचना । तेथें कांहींच चालेना ।
खरें तेंचि अनुमाना । कदापि नये ॥ ३१ ॥
प्रत्ययास बोलिजे न्याय । अप्रत्यय तो अन्याय ।
जात्यंधास परीक्षा काय । नाना रत्नाची ॥ ३२ ॥
ह्मणोनि ज्ञाता धन्य धन्य । जो निर्गुणाशी अनन्य ।
आत्म निवेदनें मान्य । परम पुरुष ॥ ३३ ॥
यापरी सत्गुरूचें भाषण । जें गोड सुधारसाहून ।
सद्भक्तीनें नृपें परिसून । अंतःकरणीं गहिंवरला ॥ ३४ ॥

ह्मणे प्राशून उपदेशामृत । माझें मन झालें तृप्त ।
ऐसें वदून प्रणिपात । राव घाली साष्टांगें ॥ ३५ ॥
सत्गुरूनें नृपाल उठविला । वरदहस्त शिरीं ठेविला ।
नाममंत्र कर्णी सांगितला । नित्य जप करावया ॥ ३६ ॥
नारिकेलफल आणून । एकमुष्टी मृत्तिका घेऊन ।
अश्व पुरीष मुष्टी दोन । दिधला प्रसाद नृपातें ॥ ३७ ॥
शंका काढिती श्रोते सज्जन । पदार्थ दिधले काय योजून ।
यांतील भावार्थ उकलून । आह्मांप्रती सांगणें ॥ ३८ ॥
वक्ता ह्मणे परिसा खूण । नारिकेलफळ सुचवी कल्याण ।
पृथिव मिळेल तुज लागून । ऐसें मृत्तिका सुचवीतसे ॥३९॥
अश्वपूरीष राया दिधलें । तेणें ऐसें सूचित केलें ।
अश्वसैन्य लाभेल भलें । नृपवर्या तुजप्रती ॥ ४० ॥
कर जोडून बोले राव । सद्गुरूसमीप रहावें सदैव ।
ऐसा आहे मनीं भाव । पूर्ण करीं समर्था ॥ ४१ ॥
समर्थ वदती तूं नृपवर । तव करें धर्मस्थापना होणार ।
शीघ्र होईल म्लेंच्छसंहार । तुझे हातून नृपाळा ॥ ४२ ॥
जन चालवावे स्वधर्मे । शत्रुनाश करावा उद्यमें ।
हींच क्षत्रियांचीं कर्में । येणेंच घडे सार्थक ॥ ४३ ॥
विरक्तपणें होऊन उदास । सोडून द्यावें क्षत्रधर्मास ।
हें योग्य नव्हे क्षत्रियास । यांत सार्थक असेना ॥ ४४ ॥
नीति न्यायीं धरून आवडी । दीनप्रजेचीं वारावीं सांकडीं ।
धर्मरक्षणीं वाटेल गोडी । तरीच धन्यत्व येईल ॥ ४५ ॥
कुलस्वामिणीची सेवा करावी । दृढ उपासना चालवावी ।
निर्मल कीर्ती उरवावी । आपणामागें ॥ ४६ ॥

आतां सुखें स्वस्थळा जावें । क्षात्रधर्में राज्य करावें ।
भूमंडल गाजवावें । प्रताप दावूनी ॥ ४७ ॥
बहुतां दिवसांचें हें बंड । म्लेंच्छ माजले उदंड ।
यांचें करून दुखंड । राज्य करावें ॥ ४८ ॥
जेव्हां वाटेल व्हावें दर्शन । तेव्हां करावें आमुचें सरण ।
मनकामना होईल पूर्ण । श्रीरघुवीर कृपेनें ॥ ४९ ॥
अंतरीं संतोषला भूपती । मग विनवी सद्गुरूप्रती ।
राजधर्म क्षात्रधर्म रीती । कांहीं मजला कथावी ॥ ५० ॥
सत्‌शिष्याचें ऐकून भाषण । सद्गुरू पावले समाधान ।
ह्मणती राजक्षत्रधर्म पावन । एकाग्र मनें परिसिजे ॥ ५१ ॥
सावधपणें प्रपंच केला । तेणें सुखचि पावला ।
दीर्घ प्रयत्नें मांडला । कार्यभाग साधे ॥ ५२ ॥
आधीं मनुष्य ओळखावे । योग्य पाहूनि काम सांगावें ।
निकामी तरी ठेवावे । एकीकडे ॥ ५३ ॥
पाहोन समजोन कार्य करणें । तेणें कदापि नये उणें ।
कार्यकर्त्याच्या गुणें । कार्यभाग होतो ॥ ५४ ॥
कार्यकर्ता प्रयत्नीं जाड । कांहींएक असला हे काड ।
तरी समर्थपणें पाठवाड । केली पाहिजे ॥ ५५ ॥
अमर्याद फितवेखोर । यांचा करावा संहार ।
शोधिला पाहिजे विचार । याथातथ्य ॥ ५६ ॥
मनुष्य राजी राखणें । हींच भाग्याचीं लक्षणें ।
कठिणपणें दूरी धरणें । कांहीं एक ॥ ५७ ॥
समयीं मनुष्य कामा येतें । तया कारणें सोशिजेतें ।
न्याय सांडितां मग तें । सहज्जची खोटें ॥ ५८ ॥

न्याय सीमा उल्लंघूं नये । उल्लंघितां होतो अपाय ।
न्याय नसतां उपाय । होईल कैंचा ॥ ५९ ॥
उपाधीस जो कंटाळला । तो भाग्यापासून चेवला ।
समयीं धीर सांडिला । तोही खोटा ॥ ६० ॥
संकटीं कंटाळों नये । करावे अत्यंत उपाय ।
तरी मग पाहतां काय । उणें आहे ॥ ६१ ॥
बंध बांधावे नेटके । जेणें करितां चतुर तुके ।
ताव न होतां फिके । कारभार होती ॥ ६२ ॥
धुरेनें युद्धासि जाणें । अशीं नव्हेत कीं राजकारणें ।
धुराच करून सोडणें । कित्येक लोक ॥ ६३ ॥
उदंड मुंडें असावीं । सर्वही एक न करावीं ।
वेगळालीं कामें घ्यावीं । सावधपणें ॥ ६४ ॥
मोहरा पेटला अभिमाना । मग तो जिवास पाहेना ।
मोहरे मिळवूनि नाना । वरी चपेटे करी ॥ ६५ ॥
देखोनि व्याघ्राचा चपेटा । मेंढरें पळती बारावाटा ।
मस्त जो तो रेडा मोठा । काय करावा ॥ ६६ ॥
रायांनीं करावे राजधर्म । क्षेत्रीं करावे क्षात्रधर्म ।
ब्राह्मणीं करावे स्वधर्म । नानाप्रकारें ॥ ६७ ॥
तुरंग शस्त्र आणि स्वार । पहिला पहावा विचार ।
निवडूं जातां थोरथोर । शत्रु पळती ॥ ६८ ॥
ऐसा प्रपंचाचा विवेक । स्वल्प बोलिलों कांहींएक ।
एका मनोगतें स्वामिसेवक । असतां बरें ॥ ६९ ॥
अल्प स्वल्प संसारधर्म । मागां बोलिलों राजधर्म ।
आतां ऐका क्षात्रधर्म । परम दुर्लभ जो ॥ ७० ॥

जयास जिवाचें वाटे भय । त्यानें क्षात्रधर्म करूं नये ।
कांहींतरी करूनि उपाय । पोट भरावें ॥ ७१ ॥
विन्मुखमरणीं नर्क होती । वांचून येतां मोठी फजेती ।
इहलोक परलोक जाती । पहानां कां ॥ ७२ ॥
मारितां मारितां मरावें । तेणें गतीस पावावें ।
फिरोन येतां भोगावें । महद्भाग्य ॥ ७३ ॥
नजर करार राखणें । कार्य पाहूनि खतल करणें ।
तेणें रणशूरांचीं अंतःकरणें । चकित होती ॥ ७४ ॥
जैसा भांड्याचा गलोला । निर्भयभारामध्यें पडिला ।
तैसा क्षत्री रिचवला । परसैन्यामध्यें ॥ ७५ ॥
निःशंकपणें भार फूटती । परवीरांचे तवके तुटती ।
जैसा बलिया घालूनि घेती । भेरी उठतां ॥ ७६ ॥
ऐसें अवघेंच उठतां । परदळाची कोण चिंता ।
हरणें लोळवी चित्ता । देखत जैसा ॥ ७७ ॥
मर्दें तकवा सोडूं नये । ह्मणजे प्राप्त होतो जय ।
कार्य प्रसंग समय । ओळखावा ॥ ७८ ॥
कार्य समजेना अंतरें । तें काय झुंजेल विचारें ।
युद्ध करावें खबरदारें । लोक राजी राखतां ॥ ७९ ॥
दोन्हीं दळें एकवटें । मिसळताती लखलखाटें ।
युद्ध करावें खणखणाटें । सीमा सांडूनी ॥ ८० ॥
देव मात्र उच्छेदिला । जित्यापारिस मृत्यू भला ।
आपुला स्वधर्म बुडविला । ऐसें समजावें ॥ ८१ ॥
मराठा तितका मिळवावा । आपुला महाराष्ट्रधर्म वाढवावा ।
ये विषयीं न करितां तकवा । पूर्वज हांसती ॥ ८२ ॥

मरणें तो हक्क चुकेना । देह वांचवितां वांचेना ।
विवेकी होऊनि समजाना । काय करावें ॥ ८३ ॥
भले कुळवंत ह्मणावे । तेही वेगीं हजीर व्हावे ।
हजीर न होतां स्रष्टावें । लागेल पुढें ॥ ८४ ॥
एक जाती दोन जातीं पावला । तो कैसा ह्मणावा भला ।
तुह्मां सकळांस कोप आला । तरी क्षमा केली पाहिजे ॥८५॥
देवद्रोही तितुके कुत्ते । मारूनि घालावे परते ।
देवदास पावती फत्ते । यदर्थी संशय नाहीं ॥ ८६ ॥
देव मस्तकीं धरावा । अवघा हाल कल्लोळ करावा ।
मुलुख बडवा कां बुडवावा । धर्मसंस्थापनेसाठीं ॥ ८७ ॥
विवेक विचार सावधपणें । दीर्घ प्रयत्न केलाचि करणें ।
तुळजावराचे निगुणें । रामें रावण मारिला ॥ ८८ ॥
अहो हे तुळजाभवानी । प्रसिद्ध राम वरदायिनी ।
रामदास ध्यातो मनीं । यन्निमित्य ॥ ८९ ॥
यापरी परमार्थ प्रकार । राजक्षत्र धर्म विचार ।
गुरुमुखें परिसून नृपवर । समाधान पावला ॥ ९० ॥
निळोपंतादि सेवक गुणी । उभे होते कर जोडुनी ।
तयांप्रती संबोधुनी । गुरु करिती भाषण ॥ ९१ ॥
राजधर्म कथन केले । आतां सेवक धर्म असती राहिले ।
ते पाहिजेत श्रवण केले । तुह्मी चित्त देउनी ॥ ९२ ॥
" ऐका प्रपंच विचार । आपुली करणी करी पार ।
येथें नाहीं उत्तर । श्रेष्ठांकडे ॥ ९३ ॥
पूर्वी दरिद्रें पीडिले । ते समर्थें अंगिकारिले ।
शिकवूं शिकवूं शहाणे केले । नाना प्रकारें ॥ ९४ ॥

पहिला होता नाचार । श्रेष्ठीं वाढवूनि केला थोर ।
या वचनीं होतां अनादर । बरवें नव्हे ॥ ९५ ॥
जो आपुलें हित न करी । तो आपुला आपण वैरी ।
तेथें कांहीं कोणावरी । शब्द नाहीं ॥ ९६ ॥
श्रेष्ठांचें मनोगत राखेना । बळेंचि करी वल्गना ।
युक्ति प्रयुक्ति नाना । प्रकारें करी ॥ ९७ ॥
श्रेष्ठांचें केलें मोडावें । आपुलेंचि पुढें प्रतिष्ठावें ।
तरी मग लागे भ्रष्टावें । वैभवापासुनी ॥ ९८ ॥
पुढें पुढें काम करी । मागें कांहींच न करी ।
कार्यातें नासतां उरी । कांहींच पुढें ॥ ९९ ॥
उगाच गर्वें मेला । मागील दिवस विसरला ।
स्वार्थचि करूं लागला । ह्मणजे गेलें ॥ १०० ॥
वडिलास बुद्धि शिकवी । युक्ति बळें जाणीव दावी ।
तया मूर्खासि पदवी । प्राप्त कैंची ॥ १०१ ॥
जो सदांचा चोरटा । जो सदांचा कळकटा ।
कठिण शब्दें बारा वाटा । मनुष्यें केलीं ॥ १०२ ॥
आपुला इतबार राखावा । मग तो सर्व धनी जाणावा ।
उदंड वैभवाचा हेवा । करूं नये ॥ १०३ ॥
कार्य करितां कांहीं न मागे । त्याची चिंता प्रभूसि लागे ।
ऐसें जाणूनि विवेक जागे । ह्मणजे बरें ॥ १०४ ॥
आपणांसी जपूं लागला । श्रेष्ठाचे मनींचा उतरला ।
येणें कोण स्वार्थ झाला । विचारावा ॥ १०५ ॥
स्वामीनीं जें जें बोलावें । तें तें सेवकीं प्रतिष्ठावें ।
वेळ चुकवूनि बोलावें । विनीत होउनी ॥ १०६ ॥

श्रेष्ठांपुढें शहाणपण । हेंचि केवळ मूर्खपण ।
मूर्खपणें नागवण । आली घरा ॥ १०७ ॥
कळेल तरी सांगू नये । वडिलांसी बुद्धी शिकवूं नये ।
नेणणेपणेंचि उपाय । विवेकीं करावा ॥ १०८ ॥
पुढें पुढें निघूं नये । आज्ञेवेगळें वर्तूं नये ।
न मानितां अपाय । नेमस्त आहे ॥ १०९ ॥
आधीं वडिलांसि पुसावें । किंवा आपणाचि करावें ।
याचा विचार करितां बरवें । कल्याण होय ॥ ११० ॥
आधीं निश्चय करितो । मग उगेंचि पुसतो ।
इतका विचार करितो । शहाणा कैंचा ॥ १११ ॥
मी करितों ऐसें पुसणें । तें पुसणें न पुसणें ।
करूं न करूं हें विचारणें । हें उत्तमोत्तम ॥ ११२ ॥
मी शहाणा ऐसें कळलें । तरी स्वतंत्र पाहिजे केलें ।
स्वतंत्र होतां मिरवलें । न शहाणपण ॥ ११३ ॥
हें मनींचें मनीं समजावें । प्रगट कासया करावें ।
घेऊं ये तरी घ्यावें । चातुर्यासी ॥ ११४ ॥
न्याय मानील तो न्यायी । न्याय न मानील तो अन्यायी ।
दगलबाज चिडाई । सुटेल कैशी ॥ ११५ ॥
ज्याचे अंतरीं स्वार्थ बुद्धी । तेथें कैंची असेल शुद्धी ।
बुद्धी सांडितां अवधी । दुःखासी होय ॥ ११६ ॥
ज्याकरितां प्राणी वाढले । त्यांसींच अडवूं लागले ।
ते कैसे ह्मणावे भले । नीतिवंत ॥ ११७ ॥
सेवकीं सेवाचि करावी । स्वामी असूदकीं द्यावी ।
तरीच पाविजे पदवी । कांहींएक ॥ ११८ ॥

समर्थांची मनोगत । तैसेंचि वर्तणें उचीत ।
तेथें चुकतां आघात । नेमस्त आहे ॥ ११९ ॥
सेवक तोचि आडेना । शब्द भुईस पडेना ।
काम चुकलें हें घडेना । कदाकाळीं ॥ १२० ॥
उंच अश्व वेळेस अडे । तरी पाद छेद करणें घडे ।
ऐसें कळोनियां वेडे । अडोंचि लागे ॥ १२१ ॥
मनोगत राखितां श्रेष्ठबोळे । मनोगत चुकतां खवळे ।
ऐसें जयासी न कळे । तो जाणता कैसा ॥ १२२ ॥
स्वामीस जें अवश्य व्हावें । तैसें सेवका न व्हावें ।
होऊनि आडवावें । कोण्या विचारें ॥ १२३ ॥
आपस्वार्थ उदंड करणें । आणि स्वामिकार्य बुडवणें ।
ऐशीं नव्हेत कीं लक्षणें । सेवकांचीं ॥ १२४ ॥
सेवकपणाचें मुख्य वर्म । कांहीं नसावें कृत्रिम ।
कृत्रीम केलिया संभ्रम । पुढें कैंचा ॥ १२५ ॥
धनी कार्जी जितुका सावधान । सर्वकाळ परिछिन्न ।
त्यासि चोरितां निदान । बरें नव्हे ॥ १२६ ॥
थोडी बहुत लालूच करणें । आणि महत्कृत्य बुडविणें ।
महत्व जातां लाजिरवाणें । जनांमध्यें ॥ १२७ ॥
ऐसें बहुत ऐकिलें । कांहीं दृष्टीस देखिलें ।
देखत ऐकत चुकले । ते मनुष्य कैसे ॥ १२८ ॥
कार्य करितां उदंड देतो । चुकतां तो महत्व घेतो ।
ऐसें कळोनि वर्ते तो । प्राणी कैसा ॥ १२९ ॥
सेवक विश्वास दाविती । वैरियांकडे मिळोन जाती ।
त्या चांडाळासीं गती । कोठेंचि नाहीं ॥ १३० ॥

सकळ लोक स्वामियाचे । मागें पुढें अवज्ञेचे ।
सेवक उगेचि मूर्ख नाचे । शब्द बोले ॥ १३१ ॥
धूर्तपणें अंतर साक्षी । नाना प्रकारें परीक्षी ।
दूर गेला परी लक्षी । सर्व कांहीं ॥ १३२ ॥
ह्मणोनि ऐसें न करावें । करणें तें नेमस्त करावें ।
नाना कारणें धरावें । अंतर प्रभूचें ॥ १३३ ॥
सूचित करूनि अंतःकारण । आतां करावें राज्यकारण ।
प्रमाण आणि अप्रमाण । समजलें पाहिजे ॥ १३४ ॥
आकल ह्मणजे कल नाहीं । अन्यायाचा साभिमान नाहीं ।
न्याय नीती समस्त पाहीं । आप्त आणि परावे ॥ १३५ ॥
किती चुकति चाचु घेती । पदरीं घालतां न घेती ।
अन्याय करूनि ह्मणती । अन्याय नाहीं ॥ १३६ ॥
उदंड हांसती दुसऱ्यासी । तेचि गुण आपल्यापाशीं ।
अखंड वर्णिती आपल्यांसी । समर्थी देखतां ॥ १३७ ॥
मागील दिवस विसरतां । उगेंच तोलदारी आणितां ।
अखंड चुकती लालुची करिती । परम अन्यायीं ॥ १३८ ॥
आपणा वेगळें कार्य न व्हावें । अवघें आपणांचि असावें ।
आपलें केलें न मोडावें । ऐशी वासना ॥ १३९ ॥
व्याप आटोप करावा । समर्थ वेळेस आडवावा ।
आपला हेका वाढवावा । अत्यादरें ॥ १४० ॥
स्वयें आपणासि कळेना । समर्थें सांगितलें ऐकेना ।
सत्य असलें मानेना । अभिमानें ॥ १४१ ॥
वैरियाकडे सख्य लावी । समर्थाचें काम बुडवी ।
व्यर्थ लालुच उठाठेवी । उदंड करी ॥ १४२ ॥

इष्ट मित्र शरीरसंबंधीं । व्यापकपणें सूत्रें साधी ।
वैरीवरी हिताळु कुबुद्धी । अंतरीं वसे ॥ १४३ ॥
आज्ञेप्रमाणें असतां । बहुत दुःखें वाटे चिंता ।
आपुले इच्छेनें वर्ततां । बरें वाटे ॥ १४४ ॥
आपुले अवगुण लपवी । श्रेष्ठांपुढें जाणीव दावी ।
धीटपणेंचि दटावी । कोणीएकासी ॥ १४५ ॥
जें समर्थासी पाहिजे । तें आपणासि न पाहिजे ।
आपणासि मानेल तें कीजे । कांहींएक ॥ १४६ ॥
काम सांगतांचि अडे । मीप करूनि वेळेसी दडे ।
कुकर्मीं आदरें पवाडे । नानायत्नें ॥ १४७ ॥
समर्था अडानीं ताल केला । गर्वें लेखिना कोणाला ।
काम नासूनि उडाला । येकीकडे ॥ १४८ ॥
जें पाहिजे समर्थासी । त्यासी करणें वरकसी ।
त्याची गोष्टी हरीकसी । हळुपाडी ॥ १४९ ॥
आपुले अर्थीं वोढोनि आणिती । श्रेष्ठांसि मागें तुच्छ करिती ।
कठीण वेळेसी मिळोनि जाती । शत्रूकडे ॥ १५० ॥
समर्थासी वळेंचि करणें । मर्यादा सोडूनि चालणें ।
मना ऐसें न होतां करणें । अप्रमाद ॥ १५१ ॥
मंज वेगळें काम न चाले । ऐसें मागें पुढें बोले ।
कित्येक लोकचि फोडिले । आपणाकडे ॥ १५२ ॥
समर्थासी कांहींच कळेना । मी सांगतों तें ऐकेना ।
शहाणपणा दाखवी जना । नानाप्रकारें ॥ १५३ ॥
श्रेष्ठ समजोनि न पाहे । मज वेगळें कोण आहे ।
निकामी मिळवूनि काय हे । गळंगळा अवघा ॥ १५४ ॥

अवघें ढाळभाग्य चालतें । येरवीं मुख्यांस काय कळतें ।
आह्मां लोकांकरितां बोळतें । सकळ कांहीं ॥ १५५ ॥
आह्मांप्रमाणें काय जाणें । प्रभू होय परी कांहीं नेणें ।
आह्मांवेगळें कोण शहाणें । आहे येथें ॥ १५६ ॥
पोटासाठीं सेवा करणें । उगेंच फुगती रिकामे ।
थोरपण दिधलें कोणें । सेवकासी ॥ १५७ ॥
ऐसे प्रकारींचे लोक । त्यांस कैसा असेल विवेक ।
मूर्खपणें अविवेक । रक्षिती बळें ॥ १५८ ॥
समर्थासी सांडून सेवकजन । सेवकाकडे लाविती मन ।
ते जाणावे परमहीन । नीच काठीचे ॥ १५९ ॥
ऐसें नेणतां चूक पडती । जाणते अवघेंचि जाणती ।
निकामी आणि गर्व करिती । मूर्खपणें ॥ १६० ॥
सेवकजनांवरी विश्वासला । तो सेवकीं जेर केला ।
समर्थ पराधीन झाला । हेंही अपूर्व ॥ १६१ ॥
कामाकारणें ठेविले । काम पाहुनी वाढविले ।
तेही उगेच गर्वें फुगले । कोण्या हिशोबें ॥ १६२ ॥
या कारणें बदलीत जाणें । सेवक आज्ञेच्यागुणें ।
तरीच समर्थपण जाणें । समर्थासी ॥ १६३ ॥
काम नासलें तरी नासावें । परी सेवकाधीन न व्हावें ।
दास ह्मणे स्वभावें । बोलिलों न्याय ॥ १६४ ॥
न्याय अन्यायासी मानेना । विवेक अविवेक्या कळेना ।
पुण्यमार्ग आवडेना । पापी जनांसी ॥ १६५ ॥
सेवक बहुतांसीं असती । परी पाहों नये हे प्रचीती ।
तथापि हे क्षमा श्रोतीं । केली पाहिजे ॥ १६६ ॥

यापरी पाजून उपदेशामृत । मग रायास बोलती समर्थ ।
आतां भोजन करीं जनांसहित । रघुवीर पूजा करूनी ॥१६७॥
सद्गुरूंचा शिष्य कल्याण । तेणें सर्व सिद्धता करून ।
समस्तांस दिधलें भोजन । अत्यादरें करूनी ॥ १६८ ॥
श्रीरामाचें भजनपूजन । रात्रौ झालें हरिकीर्तन ।
ऐशापरी तीन दिन । रायें हर्षे काढिले ॥ १६९ ॥
मग तो सतुगुरू सकृप । रायास प्रेमें देई निरोप ।
गुरूपदेशें शिवनृप । बहुत धन्यता पावला ॥ १७० ॥
रायास सतुगुरू लाधला । सतुगुरूचा लोभ जडला ।
हा परम लाभ झाला । सीमा नाहीं या लाभा ॥ १७१ ॥
श्रीरामचंद्राचा गुरू वसिष्ठ । पांडवांचा धौम्य श्रेष्ठ ।
तैसाच सतुगुरू स्पष्ट । शिवरायास लाधला ॥ १७२ ॥
बुद्धिवाद सांगेल वारंवार । संकटकाळीं देणार धीर ।
चुकल्या मार्ग दाविणार । कोण सतुगुरू वांचोनी ॥१७३॥
असो ऐसा सतुगुरू संपादून । राव निघता झाला तेथून ।
त्रिरात्र चांफळीं राहून । मग रायगडीं पातला ॥ १७४ ॥
गुरुकृपा शीघ्र फळली । विजयश्री वाढत चालली ।
यवनवीरांस धास्ती पडली । शिवरायाची त्याकाळीं ॥१७५॥
शिवप्रताप वाढला अपार । यवनांस पडला धाक थोर ।
ह्मणती शिवाजी राज्य घेणार । आमुचें ऐसें वाटतें ॥१७६॥
आतां यवन विचार करतील । कैसा शिवाजी नाश पावेल ।
ती कथा सुरस येईल । पुढिल अध्यायीं निश्चयें ॥ १७७ ॥
श्रीशिवविजय ग्रंथ । शिवावतार चरित्र अद्भुत ।
भावें वर्णन करी अनंत । अष्टमाध्याय गोड हा ॥ १७८ ॥

# अध्याय ९ वा.

॥ श्रीगणेशायनमः ॥

जय परब्रह्म सच्चिदानंदा । जय निर्विकल्पा आनंदकंदा ।
जय लक्ष्मीवरा गोविंदा । पुढें ग्रंथ चालवी ॥ १ ॥
सद्गुरू होऊन उपदेश करिशी । अवतार घेउनी धर्म रक्षिसी ।
कवित्व स्फूर्ती तूंच देशी । जगत्सूत्र चालका ॥ २ ॥
अंतरीं उत्पन्न करून स्फूर्ती । ग्रंथ लिहविशी मम हस्तीं ।
ना तरी मी काय मंदमती । तव चरित्र वर्णावया ॥ ३ ॥
पूर्वी कथाभाग वर्णिला । शिवरायाचा प्रताप वाढला ।
पुढें काय वृत्तांत घडला । श्रोतीं श्रवण करावा ॥ ४ ॥
एके दिवशीं विजापुरीं । बादशहा आपुलें दरबार करी ।
समस्त म्लेंच्छ वीर दरबारीं । राजाज्ञेनें पातले ॥ ५ ॥
सुवर्ण खचित सिंहासन थोर । बादशहा आरूढला तयावर ।
भोंवते उभे किंकर । राजचिन्हें घेउनी ॥ ६ ॥
दक्षिणभागीं मुख्य वजीर । वामभागीं बक्षी शूर ।
दोन्ही बाजूस म्लेंच्छ सरदार । स्वीय स्थानीं बैसले ॥ ७ ॥
म्लेंच्छ वीर मुजरे करिती । चोपदार ललकारती ।
यवन दरबार ऐशा रीती । तये वेळीं थाटलें ॥ ८ ॥
बादशहाचे तक्तापुढती । सेवक पैजेचे विडे मांडिती ।
कांहीं महत्कार्य असे संप्रती । ऐसें तदां जाणवलें ॥ ९ ॥
सेवकीं पैजेचे विडे मांडिले । तिकडे सर्वांचें लक्ष्य लागलें ।
काय विघ्न असे ओढवलें । कोणालाही कळेना ॥ १० ॥

घनदाट होतां दरबार । पुढें झाला मुख्य वजीर ।
हात जोडून तक्तासमोर । बादशहातें विनवीतसे ॥ ११ ॥
तवाझेनें दरबार भरलें । सर्व मुत्सदी जमा झाले ।
काय कार्य असे योजिलें । आज्ञा व्हावी तयाची ॥ १२ ॥
बादशहा बोले परवरदिगार । खुदा सबसे जोरावर ।
तुम् सब शूर सरदार । सुनो अहिवाल दौलतकी ॥ १३ ॥
आपुला ताबेदार शहाजी । तयाचा पुत्र नामें शिवाजी ।
तो करितो दगाबाजी । निमकहराम होउनी ॥ १४ ॥
कृतोपकार विसरला । मत्त होऊन धन्यावर उठला ।
फंद फिसाद असे मांडिला । आपुल्या राज्यीं तयानें ॥१५॥
फितुरी करून दुर्ग घेतो । प्रजेवरी धाडे घालितो ।
बळेंचि सत्ता चालवितो । पातशाही मुलुखांत ॥ १६ ॥
करून बहुत दंडेली । मांडिली मुलुखीं बंडाळी ।
खजिन्याची लूट केली । छापे घालुनी तयानें ॥ १७ ॥
उपेक्षा केली आजवरी । तेणें मत्त झाला वैरी ।
आतां बळावला भारी । प्रचंड विघ्न उदेलें ॥ १८ ॥
बडे काफर मावळे । शिवाजीचे साथी झाले ।
धीटपणें करिती हल्ले । आपुल्या मुलुखामाझारीं ॥ १९ ॥
आतां उपेक्षा न करावी । शत्रूस शिक्षा लावावी ।
आपुली शक्ती प्रकट करावी । तरीच नांव राहील ॥२०॥
तुह्मी थोर थोर सरदार । परम प्रतापी समर धीर ।
घेऊन कार्याचा पथकर । महत्कार्य साधावें ॥ २१ ॥
असेल जयास हिंमत । त्यानें पुढें व्हावें येथ ।
पैज विड्यास घालून हात । प्रतिज्ञा वचन बोलावें ॥२२॥

ऐसें बोलतां पृथ्वीपती । सरदार एकमेकांकडे पाहती ।
होती मनामाजी धास्ती । शिवरायाची सर्वांच्या ॥ २३ ॥
अफजलखान नामें सरदार । बादशहाचा परम प्रियकर ।
मदोन्मत्त आणि गर्विष्ठ फार । तो पुढतीं सरसावला ॥२४॥
मिशांवर हात फिरवून । तीक्ष्ण तरवार पडताळून ।
सिंहासनापुढें होऊन । बादशहासी बोलत ॥ २५ ॥
खाविंदाची कृपा असावी । मजकडून सेवा घ्यावी ।
सेवकास आज्ञा व्हावी । शत्रु नाश करावया ॥ २६ ॥
तवकें गांठीन समरांगण । सकल रिपूंस शिक्षा लावीन ।
खुद्द दिल्लीपतीस दंडीन । आज्ञा होतां तुमची ॥ २७ ॥
मज रणशूरापुढें । शिवाजी तें काय बापुडें ।
क्षणांत धरून नरडें । चिरडुनी टाकीन ॥ २८ ॥
जाऊन चढ्या घोड्यानिशीं । बांधून आणितों शिवाजीसी ।
चिंता न करावी मानसीं । अल्पकार्याची स्वामींनीं ॥२९॥
प्रतिज्ञा वचन बोलतों । मीच पैजेचा विडा उचलितों ।
आज्ञा होतांच निघतों । स्वामिकार्य साधावया ॥ ३० ॥
अफजलखान ऐसें बोलिला । बादशहा सुप्रसन्न झाला ।
मग बोले अफजलाला । तूंच वीर निश्चयें ॥ ३१ ॥
गोड शब्दें नांवाजिला । वस्त्र भूषणीं गौरविला ।
आज्ञा दिधली आफजलाला । शिवाजीतें जिंकावया ॥३२॥
द्वादश सहस्र घोडेस्वार । बहुत दिधले पदाती वीर ।
गज उष्ट्र घोडे अपार । आफजलासवें दीधली ॥ ३३ ॥
बंदुका तोफा जेजाला । भाले बरच्या बाण गरनाळा ।
अपार युद्ध सामग्री अफजलाला । बादशहानें दीधली॥३४॥

आधींच गर्विष्ठ आफजलखान । त्यांत झाला फार सन्मान ।
चढून गेला मूर्ख यवन । सारासार कळेना ॥ ३५ ॥
चतुरंग सेना सिद्ध करून । सर्व घेऊन अपार धन ।
निघाला विजापुराहून । सैन्यासहीत गजरेसी ॥ ३६ ॥
जिंकावया दशरथनंदन । रावणें धाडिला प्रधान ।
तैसाच हा अफजलखान । शिवाजीवरी चालिला ॥ ३७ ॥
बादशहाचा घेऊन निरोप । दाखवावया आपुला प्रताप ।
सेनाद्रव्य घेऊन अमूप । आफजलखान निघाला ॥ ३८ ॥
सेना समुद्र चालू झाला । ठाईं ठाईं तळ पडला ।
तुळजापुरासमीप आला । अल्प दिनामाझारीं ॥ ३९ ॥
तुळजापुरची देवी भवानी । शिवनृपतीची कुलस्वामिणी ।
महेशकांता भक्तवरदायिनी । तुळजापुरीं विराजे ॥ ४० ॥
यवन येतो सैन्यासहित । हें तुळजापुरीं कळलें वृत्त ।
घाबरे झाले लोक समस्त । ह्मणती अनर्थ ओढवला ॥ ४१ ॥
परम दुष्ट क्रूर यवन । लुटून नेतील अपार धन ।
देव टाकितील फोडून । कैसें आतां करावें ॥ ४२ ॥
मग चार शहाणे मिळाले । देवालयीं एकत्र झाले ।
ह्मणती रक्षण पाहिजे केलें । श्रीभवानी मूर्तिचें ॥ ४३ ॥
यवन सर्वस्व लुटील । तरी पुन्हा भवानी देईल ।
दुर्जनाचा गर्व हरील । अल्प काळांत अंबिका ॥ ४४ ॥
पवित्र मूर्ती जतन करावी । यवना हस्तीं लागों न द्यावी
गुप्तपणें संरक्षावी । तरीच भक्त आपण ॥ ४५ ॥
ऐशी गुप्त मसलत केली । सत्यमूर्ती तेथून काढिली ।
अन्यस्थळीं नेऊन ठेविली । कोणालाही न कळतां ॥ ४६ ॥

मिथ्या मूर्ती आणून दुसरी । सिंहासनीं ठेविती पुजारी ।
यवन सैन्य इतुक्या अवसरीं । तुळजापूरीं प्रवेशलें ॥४७॥
नगरीं झाला हलकल्लोळ । सुरू झाली पळापळ ।
दुःख देती यवनखळ । पौरवांतें अपार ॥ ४८ ॥
अविवेकें मत्त झाला । खल देवालयीं शिरला ।
मूर्ती फोडूं लागला । सिंहासनावरील ॥ ४९ ॥
यवन दुष्ट दुराचारी । मूर्ती विध्वंसून स्वकरीं ।
हट्टें तियेचें पिष्ट करी । जात्यामाजी घालुनी ॥ ५० ॥
दीन ब्राह्मण बहू पीडिले । नागरिकां परोपरी गांजिले ।
मग सैन्य तेथून निघालें । शिवनृपाशी गांठावया ॥ ५१ ॥
राजवैभवें मार्गीं चालत । स्थळीं स्थळीं मुक्काम करीत ।
गोब्राह्मणां दुःख देत । वांईनगरा पातले ॥ ५२ ॥
नगर दिसलें परम सुंदर । विपुल देखिले कृष्णानीर ।
सभोंवते घोर कांतार । चहूंकडे पाहिलें ॥ ५३ ॥
शिवरायाची ठाणीं पुढती । खानाचे मनीं वाटे भीती ।
मग वांईस करी वस्ती । सकल सैन्याची तेधवां ॥ ५४ ॥
खान वांईस येऊन राहिला । इकडे कैसा वृत्तांत झाला ।
तो पाहिजे श्रवण केला । श्रोतयांनीं साक्षेपें ॥ ५५ ॥
रायगडीं शिवभूप असतां । बहिरजी जासूद आला अवचिता ।
शिवरायास सांगे वार्ता । एकांतांत नेउनी ॥ ५६ ॥
विजापुरीं दरबार झाला । आफजलखानें विडा उचलिला ।
अपार सैन्य घेऊन निघाला । आफजलखान तेथुनी ॥५७॥
बहु बलाढ्य आफजलखान । अंगबळें द्वादश महिपा समान ।
क्रूर घातकी कपटी दारुण । प्रतिज्ञा करून येतसे ॥ ५८ ॥

बहिर्जीनें ऐकून वचन । राव निघाला रायगडाहून ।
वेगें प्रतापगडीं येऊन । बंदोबस्तें राहिला ॥ ५९ ॥
पिंगळे मालुसरे निकम शूर । ठायीं ठायीं होते महाराष्ट्रवीर ।
तयांस दूत पाठउनी सत्वर । प्रतापगडीं बोलाविले ॥६०॥
विघ्न येतसे भयंकर । धरिला पाहिजे आतां धीर ।
तरीच सद्‌गुरू पाडील पार । महत् संकटांतुनी ये समयीं ॥६१॥
प्रयत्नीं परमेश यश देता । ऐशी करून मनीं दृढता ।
त्वरें चालविली सर्व सिद्धता । प्रतापगडीं राहुनी ॥ ६२ ॥
ज्यांस आज्ञापत्रें गेलीं । ती ती मंडळी जमूं लागली ।
प्रतापगडीं गर्दी झाली । महाराष्ट्र वीरांची ॥ ६३ ॥
इतुकियांत वार्ता आली । यवन सेना येऊन धडकली ।
प्रस्तूत वांईस असे राहिली । कांहीं विश्रांती घ्यावया ॥६४॥
मार्गीं प्रजा बहू पीडिली । तुळजापुरची देवी फोडिली ।
यवनें अनन्वीत कर्में केलीं । अविचार मदें मातुनी ॥६५॥
सैन्य उतरलें असे अपार । वाटतें जैसा रत्नाकर ।
होणार शिवरायावरी निकर । दुष्ट यवन सैन्याचा ॥६६॥
परम भयंकर ऐशी वार्ता । प्रतापगडीं कळली समस्तां ।
अंतर्यामीं भीती तत्वतां । सर्वांच्याही उपजली ॥ ६७ ॥
अपार दिसतें यवन बल । परमेश्वर कैसें यश देईल ।
शिवरायाचें कैसें होईल । हीच काळजी सर्वत्रां ॥ ६८ ॥
रायास वृत्तांत कळला । तदा तोही अंतरीं खोंचला ।
बाह्यात्कारें दुसऱ्याला । परम धीरता दाविली ॥ ६९ ॥
लोक अंतरीं भय पावले । हें रायातें आटकळलें ।
ह्मणून सर्वांस पाचारिलें । सभास्थानीं तयानें ॥ ७० ॥

राजाज्ञा श्रवण करुनी । लोक आले सभास्थानीं ।
मग तयांतें नृपचूडामणी । काय बोलता जाहला ॥ ७१ ॥
तुह्मी शूर वीर सकळ । क्षणें शत्रू पराभवाल ।
तुह्मांस जयप्राप्ती होईल । रणांगणीं शूर हो ॥ ७२ ॥
सर्व सेना घेऊन अपार । शत्रू येतसे आपणांवर ।
परी भय न धरितां तिळभर । मर्दुमकीनें रहावें ॥ ७३ ॥
करावया धर्मरक्षण । शत्रूवरी जाऊं आपण ।
समरांगणीं गेले प्राण । तरीच धन्यत्व संपादूं ॥ ७४ ॥
परमेश्वर होईल सहाय । खचित तुमचा होईल विजय ।
आतां तुह्मीं न धरितां भय । बंदोबस्तें रहावें ॥ ७५ ॥
नृपतीची गंभीर वाणी । सर्वत्रांचे ठसली मनीं ।
वीरश्रीचा संचार होउनी । भय गेलें अवघ्यांचें ॥ ७६ ॥
ह्मणती तवाज्ञा आह्मां प्रमाण । शत्रूवरी जाऊं धांवून ।
राया तव पुण्येंकरून । पराभवूं शत्रूतें ॥ ७७ ॥
मग रायें काय केलें । अवघ्यांस तेथून गृहीं धाडिलें ।
मुख्य मंत्री बोलाविले । रजनीमाजी प्रासादीं ॥ ७८ ॥
तानाजी मालुसरे रणशूर । मोरोपंत पिंगळे चतुर ।
रघुनाथपंत समरधीर । ऐसे मंत्री मेळविले ॥ ७९ ॥
राजनिष्ठ शहाणे भले । राजाज्ञेनें जमा झाले ।
मग एकांतीं तया पुसिलें । कैसा विचार करावा ॥ ८० ॥
यवन सेना दिसते अमुप । आपुलें बळ आहे अल्प ।
कैसा उतरेल यवनदर्प । आजचीये प्रसंगीं ॥ ८१ ॥
सैन्य आपुलें रणशूर । मीही आहे जिवावर उदार ।
तवकें जाईन शत्रूवर । भीती मजला न वाटे ॥ ८२ ॥

धारातीर्थीं देह ठेवून । स्वर्गलोकीं करीन गमन ।
माझें मज भय कारण । नाहींच जाणा शूरहो ॥ ८३ ॥
परीसा राज्यतरू लाविला । धर्म स्थापनेचा पाया घातला ।
भरीस घातलें सर्व जनांला । त्याचें काय होईल ॥ ८४ ॥
हीच चिंता मनीं वाटते । त्यामुळेंच हें मन भ्रमतें ।
तूमच्या मनीं काय येतें । निस्पृहपणें बोलावें ॥ ८५ ॥
ऐसें स्पष्ट बोलतां नृपवर । आवघे करिंती मनीं विचार ।
परी कोणासही उत्तर । द्यावयास सुचेना ॥ ८६ ॥
पुनरपी रायें विचारिलें । तुह्मी चतुर शहाणे भले ।
सुचेल तें पाहिजे सांगितलें । या समयीं वीर हो ॥ ८७ ॥
मग तानाजीराव बोलती । प्रसंग दिसतो कठीण अती ।
तथापि धीरें रिपूवरती । तुटोनीयां पडावें ॥ ८८ ॥
जिकडे धर्म तिकडे जय । मिळेल हा मानून निश्चय ।
शत्रू जिंकावयाचा उपाय । धीर धरुनी करावा ॥ ८९ ॥
मोरोपंत वदती मधुरोत्तर । पाहिलें पाहिजे सारासार ।
न करून पुरता विचार । साहस करणें अयोग्य ॥ ९० ॥
रघुनाथपंत ह्मणती नृपाला । दीसते आली कठीण वेळा ।
तुवां न रहावें या स्थळा । शिघ्र रायगडीं जाईजे ॥ ९१ ॥
आह्मी शत्रू रायें झगडून । त्यास सोडूं पराभवून ।
किंवा धारातीर्थीं देह ठेवून । स्वर्ग पावूं स्वधर्में ॥ ९२ ॥
तूं राया राज्यस्थापक । होणार धर्मसंस्थापक ।
ह्मणोन तव देह अमोलिक । संरक्षिला पाहिजे ॥ ९३ ॥
रायें ऐकून ऐसें वचन । ह्मणे धन्य तुह्मी मंत्रीजन ।
माझे ठायीं भक्ति पूर्ण । असे तूमची निर्धारें ॥ ९४ ॥

परी मी येथून न जाईन । संकटीं तुह्मांपुढें होईन ।
यश अपयश सर्व मिळून । पावूं येथेंच शूरहो ॥ ९५ ॥
तरी कोणता विचार करावा । कैसा शत्रू विलया न्यावा ।
आपण कोणता मार्ग धरावा । याचा विचार पडलासे ॥९६॥
रामदास सत्गुरू बुद्धीदाते । जरी आतां येथें असते ।
तरी बुद्धीवाद सांगते । शत्रुनाश करावया ॥ ९७ ॥
अहा काय सत्गुरू येतील । ऐशा संकटीं भेटतील ।
तरीच हें संकट टळेल । भक्तावरील सर्वथा ॥ ९८ ॥
तुजला लागेल जई काज । तेव्हां प्राप्त होईन सहज ।
ऐसा वर दिधला मज । सत्गुरूनें आहे कीं ॥ ९९ ॥
तरी जय सत्गुरू माउली । तुवां पाहिजे कृपा केली ।
संकटें पाहिजेत निरसिली । त्वत्भक्ताची ये काळीं ॥१००॥
शिवराय ऐसें बोलिला । तो बाहेर ध्वनी उठला ।
जय रघुवीर या शब्दांला । परिशिलें सर्वांनीं ॥ १०१ ॥
आला आलारे गुरुवर । गहिंवरून बोले नृपवर ।
तंव तो सत्गुरू उदार । प्राप्त झाला त्या ठाईं ॥ १०२ ॥
पायीं चट्चट् पादुका वाजती । तेजःपुंज दिसे आंगकांती ।
ऐशी अपूर्व सत्गुरूमूर्ती । एकाएकीं प्रगटली ॥ १०३ ॥
नृपें धांवून चरण धरिले । आसनावरी बैसाविलें ।
यथोपचारें पूजन केलें । सत्गुरूचें भक्तानें ॥ १०४ ॥
घालून साष्टांग नमस्कार । पुढती जोडून उभय कर ।
उभा ठाकला नृपवर । सत्गुरूसमीप भक्तानें ॥ १०५ ॥
मग रायास संबोधून । समर्थ बोलती मधुर वचन ।
कां केलेंस माझें स्मरण । रजनीमाजी नृपवरा ॥ १०६ ॥

काय कार्य असे उदेलें । किंवा संकट प्राप्त झालें ।
तें पाहिजे निवेदिलें । शिवराया मजपाशीं ॥ १०७ ॥
समर्थ–सेवका वक्र पाहे । असा भूतळीं कोण आहे ।
प्रभू निरंतर काळजी वाहे । स्वभक्ताची जाणिजे ॥१०८॥
समर्थ ऐसे बोलतां बोल । आतां शिवाजी उत्तर देईल ।
ती कथा परम रसाळ । पुढिल अध्यायीं परिसावी ॥१०९॥
जय सत्गुरू कृपा करा । दुरितकाननवैश्वानरा ।
जय निजभक्त कार्यकरा । नमस्कारितों तुजलागीं ॥११०॥
श्रीशिवविजयग्रंथ । शिवावतारचरित्र अद्भुत ।
वर्णन करी भावें अनंत । नवमाध्याय गोड हा ॥ १११ ॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

# अध्याय १० वा.

॥ श्रीगणेशायनमः ॥

पूर्वाध्यायीं झालें कथन । समर्थ गडीं प्रकट होऊन ।
शिवरायास करिती प्रश्न । कासया स्मरण केलेंस ॥ १ ॥
त्यावरी तो नृपचूडामणी । भक्तिपुरःसर हस्त जोडुनी ।
बोलता झाला नम्र वाणी । गुरुरायाशीं तेधवां ॥ २ ॥
म्लेंच्छीं महाप्रळय मांडिला । दुराचारें धर्म बुडविला ।
आह्मी धर्मरक्षणाला । सदासर्वदा जपतसों ॥ ३ ॥
प्रस्तुत आफ्जुलखान यवन । सवें अपार सैन्य घेऊन ।
आला आमुचेवरी चालून । काय आतां करावें ॥ ४ ॥
हे आमुचे शूर मंत्री । परोपरी करिती मसलती ।
तथापि होईल कैशी गती । कोणासही आटकळेना ॥ ५ ॥
तूं सत्गुरू महाराज । जेणें सिद्धी पावेल काज ।
ऐसा मार्ग दाविजे मज । कृपा करूनि गुरुराया ॥ ६ ॥
यवन कैसा आहे प्रबळ । कैसें आमुचें बलाबल ।
सर्वज्ञत्वें तुजशीं सकल । ज्ञान आहे गुरुराया ॥ ७ ॥
ऐकून शिवनृपाची मात । गंभीरपणें बोलती समर्थ ।
तूं शिवबा पुण्यवंत । शत्रुनाश करशील ॥ ८ ॥
“ सकळ लोक एक करावे । एके विचारें भरावें ।
कष्ट करून घसरावें । म्लेंच्छावरी ॥ ९ ॥
अहंमती लोकीं धरावी । हिंमतीची तरवार करावी ।
चढती वढती पदवी । पावाल येणें ॥ १० ॥

आहे तितुकें जतन करावें । पुढें आणखी मेळवावें ।
महाराष्ट्र राज्य करावें । जिकडे तिकडे " ॥ ११ ॥
श्री अंबा देवी भवानी । शिवबा तुझी कुलस्वामिणी ।
मारवील तुझे हातुनी । दुष्ट म्लेंच्छ जाणिजे ॥ १२ ॥
तुवां राजकारण अंगिकारिलें । तरी पाहिजे सत्वर रक्षिलें ।
राजधर्म श्रवण केले । पाहिजेत नृपाळा ॥ १३ ॥
" नाना वस्त्रें नाना भूषणें । येणें शरीर शृंगारणें ।
विवेकें विचारें राजकारणें । अंतर शृंगारिजे ॥ १४ ॥
शरीर सुंदर सतेज । वस्त्रें भूषणें केलें सज्ज ।
अंतरीं नसतां चातुर्यबीज । कदापि शोभा न पाविजे ॥१५॥
तुंड हेकाड कठोर वचनीं । अखंड तोले साभिमानी ।
न्यायें नीती अंतःकरणीं । घेणार नाहीं ॥ १६ ॥
तरी शीघ्र कोपी सदा । कदापि न धरी मर्यादा ।
राजकारणें संवादा । मिळोंच नेणें ॥ १७ ॥
ऐसे लौंद बेइमानी । कदापि सत्य नाहीं वचनीं ।
पापी अपस्मार जनीं । राक्षस जाणावे ॥ १८ ॥
समया सारिखा समय येईना । नेम सहसा चालेना ।
नेम धरिता राजकारणा । अंतर पडे ॥ १९ ॥
अति सर्वत्र वर्जावें । प्रसंग पाहोन चालावें ।
हटनिग्रहीं न पडावें । विवेकीं पुरुषें ॥ २० ॥
बहुतचि करितां हट । तेथें येऊन पडेल तट ।
कोणी एकाचा शेवट । झाला पाहिजे ॥ २१ ॥
बरें ईश्वर आहे साभिमानी । विशेष तुळजा भवानी ।
परंतु विचार पाहोनी । कार्य करणें ॥ २२ ॥

अखंडची सावधाना । बहुत काय करावी सूचना ।
परंतु कांहींएक अनुमाना । आणिलें पाहिजे ॥ २३ ॥
समर्थापाशीं बहुत जन । राहिला पाहिजे साभिमान ।
निश्चळ करूनियां मन । लोक असती ॥ २४ ॥
म्लेंच्छ दुर्जन उदंड । बहुतां दिसांचें माजलें बंड ।
याकारणें अखंड । सावधान असावें ॥ २५ ॥
सकळ कर्ता तो ईश्वर । तेणें केला अंगिकार ।
तया पुरुषाचा विचार । विरळा जाणें ॥ २६ ॥
न्याय नीती विवेक विचार । नानाप्रसंग प्रकार ।
परीक्षणें परांतर । देणें ईश्वराचें ॥ २७ ॥
महायत्न सावधपणें । समयीं धारिष्ट धरणें ।
अद्भुतची कार्य करणें । देणें ईश्वराचें ॥ २८ ॥
यश कीर्ती प्रताप महिमा । उत्तम गुणांस नाहीं सीमा ।
नाहीं दुसरी उपमा । देणें ईश्वराचें ॥ २९ ॥
देवब्राह्मण आचार विचार । कितीएक जनांस आधार ।
सदा घडे परोपकार । देणें ईश्वराचें ॥ ३० ॥
इहलोक परलोक पाहणें । अखंड सावधपणें राहणें ।
बहुत जनांचें साहणें । देणें ईश्वराचें ॥ ३१ ॥
देवाचा कैं पक्ष घेणें । ब्राह्मणांची चिंता वाहणें ।
बहुत जनांस पाळणें । देणें ईश्वराचें ॥ ३२ ॥
धर्म स्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार ।
झाले आहेत पुढें होणार । देणें ईश्वराचें ॥ ३३ ॥
उत्तम गुणांचा ग्राहक । तर्क तीक्ष्ण विवेक ।
धर्मस्थापना पुण्यश्लोक । देणें ईश्वराचें " ॥ ३४ ॥

समस्त वीरहो मद्वच ऐका । कांहीं चिंता करूं नका ।
शत्रुनाश होईल निका । भगवत्कृपाबळानें ॥ ३५ ॥
मग रायास नेऊन एकांतीं । सत्गुरू कांहीं गुप्त सांगती ।
तें कोणाही इतरांप्रती । कळलें नाहीं बोलणें ॥ ३६ ॥
मग राव दुसरे दिनीं । संपूर्ण लोक सर्व घेउनी ।
पूजावया अंबिका भवानी । देवगृहीं चालिला ॥ ३७ ॥
ततवितंत घनसुस्वर । वाद्यें वाजती मनोहर ।
स्वजनांसहित नृपवर । देवगृहीं प्रवेशला ॥ ३८ ॥
बाहेर मधुर वाद्यें वाजती । ब्राह्मण पूजामंत्र ह्मणती ।
ऐशा गजरें शिवनृपती । पूजाकार्य संपादी ॥ ३९ ॥
पूजा करून षोडशोपचारीं । राव देवीची प्रार्थना करी ।
जय अंबे त्रिपुरसुंदरी । वरदायिनी तुज नमों ॥ ४० ॥
तूंच कारण जगास या । तूं चिच्छक्ती महामाया ।
उत्पत्ति स्थिति लय कार्या । तूंच करिशी स्वेच्छेनें ॥ ४१ ॥
चित्तीं धरून तुझे पाय । केला धर्मस्थापनेचा उपाय ।
धर्मकार्यीं येतां अपाय । तूं वारिशी कृपेनें ॥ ४२ ॥
मदमत्त अफ्जुलखान । आला तुजवरी चालून ।
संकट ओढवलें दारुण । रक्षण करी आमुचें ॥ ४३ ॥
राव बोले गहिंवरून । आह्मी कोणा जावें शरण ।
कोण त्राता तुजवीण । आह्मांलागीं अंबिके ॥ ४४ ॥
शिवरायें ऐसें बोलून । केलें साष्टांग वंदन ।
सर्वेच नेत्र मिटून । राव ध्यानस्थ बैसला ॥ ४५ ॥
राव असतां ध्यानस्थ । श्रीभवानी मूर्तिमंत ।
प्रत्यक्ष तया दर्शन देत । निज स्वरूप दावुनी ॥ ४६ ॥

ह्मणे ना भीं ना भीं बालका । राया सद्धर्म प्रतिपालका ।
महाराष्ट्र राज्य संस्थापका । सहाय्य असे मी तुजप्रती ॥४७॥
तूं मद्भक्त प्रियकर । आफ्जुलखान ह्मैसा दुष्ट फार ।
बळी घेईन मजसमोर । तवहस्तें तयाचा ॥ ४८ ॥
मी सायुध सशस्त्र होऊन । भक्ता तुझी पाठ राखीन ।
दुष्ट यवन क्षणें वधीन । तुझ्या हस्तें बालका ॥ ४९ ॥
ऐसें देऊन वरदान । देवी पावली अंतर्धान ।
राव विसर्जून ध्यान । जागृतीस पातला ॥ ५० ॥
मग सर्व महाराष्ट्रवीर । जवळ बोलावी नृपवर ।
राजाज्ञेनें लहान थोर । राजासमीप पातले ॥ ५१ ॥
मोरोपंत पिंगळे चतुर । कृष्णाजी नाईक रणशूर ।
सरनोबत नेताजी पालकर । रघुनाथ बल्लाळ सुरनीस ॥५२॥
निळोपंत आण्णाजीपंत । गंगाजी मंगाजी सोमाजीपंत ।
भले ब्राह्मण पुरोहित । रायानिकट पातले ॥ ५३ ॥
ऐशिया समयीं तत्वतां । तेथें आली जिजाऊ माता ।
नृपें तिजसह समस्तां । संबोधून कळविलें ॥ ५४ ॥
झाला देवीचा साक्षात्कार । तीच शत्रू संहारणार ।
निर्भय असावें अंतर । समस्तांचें शूरहो ॥ ५५ ॥
मग शिवरायें मधुर बोलें । देवी वचन सर्व ऐकविलें ।
अखिल जन तुष्ट केले । रसिक वाणीनें आपुल्या ॥ ५६ ॥
शिवरायाचे वचनांतीं । सकल जयजयकार करिती ।
झाली विजयश्रीची स्फूर्ती । सर्व वीरांच्या अंतरीं ॥ ५७ ॥
आफ्जुलखान मशक बापुडें । काय करील आह्मापुढें ।
जेणें शत्रूस अपयश जोडे । ऐसें करूं क्षणांत ॥ ५८ ॥

सर्व वीरीं हर्ष पिकला । अंतरीं युद्धोत्साह उठला ।
वीरश्रीचा पूर आला । महाराष्ट्र वीरीं तेधवां ॥ ५९ ॥
करून देवीचा जयजयकार । स्वस्थळां गेले लोक समग्र ।
सावधपणें तो नृपवर । सैन्यसिद्धता चालवी ॥ ६० ॥
आतां असो हें अनुसंधान । श्रोतीं करावें सिंहावलोकन ।
वांई नगरीं अफ्जुलखान । येऊनीयां राहिला ॥ ६१ ॥
मेळवून मुत्सदी स्वजन । विचार करी आफ्जुलखान ।
शिवरायास जिंकावयाकारण । काय यत्न करावा ॥ ६२ ॥
शिवाजी तो बडा काफर । तैसाच आहे रणशूर ।
नाहीं हस्तगत होणार । सहजावृत्ती करूनी ॥ ६३ ॥
कांहीं कपटोक्रम करावा । शिवाजी जिवंत हातीं धरावा ।
शीघ्र विजापुरीं न्यावा । कैद करून संप्रति ॥ ६४ ॥
दत्ताजीपंत नामें ब्राह्मण । होता खानाचा कारकून ।
लेखक चतुर वक्ता सुजाण । आवडता खानाचा ॥ ६५ ॥
खानें तयास पाचारिलें । नांवाजून एकांतीं नेलें ।
ह्मणे एक कार्य असे योजिलें । तुवां केलें पाहिजे ॥ ६६ ॥
चतुरपणें कार्य करशील । तरी तुजला भाग्य येईल ।
बादशाहा सुप्रसन्न होईल । तुजवरी खचीत ॥ ६७ ॥
समर प्रसंग न करितां । शिवाजीसी जोडावी मित्रता ।
ऐसें वाटे मम चित्ता । व्यर्थ युद्ध करूं नये ॥ ६८ ॥
शिवाजी आहे सुजाण । तूं तरी चतुर ब्राह्मण ।
सामोपचारें तया बोधून । आमुच्या भेटीस आणावें ॥६९॥
तुवां शिवाजीस बोधावें । कीं बादशहासी वैर न करावें ।
तयापाशीं नम्र असावें । ह्मणजे कल्याण होईल ॥ ७० ॥

आह्मी इच्छितों तव कल्याण । मानितों तुजला मित्रासमान ।
तूंही आह्मांस भेटून । तुष्ट करीं झडकरी ॥ ७१ ॥
मित्रत्व आमुचें जोडशील । तरी तुझा मान राहील ।
बादशाहाही गौरवील । माझ्या वचनें तुजलागीं ॥ ७२ ॥
यत्नें मुलूख संपादिलास । दुर्ग कोट सिद्ध केलेस ।
आह्मी विनवून बादशहास । तुझें तुजकडे चालवूं ॥ ७३ ॥
यापरी मधुर बोलून । वश करीं शिवाजीचें मन ।
ते आह्मी एकत्र भेटून । करूं पुढील विचारणा ॥ ७४ ॥
पंत बोले बहु बरें । राव वळवीन मधुरोत्तरें ।
तयास आणीन सामोपचारें । तुमचिया दर्शना ॥ ७५ ॥
ऐशी होऊन मसलत । कांहीं सैन्य घेऊन समवेत ।
तेथून निघाला पंत । प्रतापगडीं यावया ॥ ७६ ॥
हेजीब येतो खानाकडून । शिवाजीस कळलें वर्तमान ।
गडीं सर्व सिद्धता करून । मार्ग प्रतीक्षा करीतसे ॥ ७७ ॥
पंत येतांच गडाउपरी । राव अत्यंत सन्मान करी ।
तयास बसवून गजावरी । गजरें नेलें प्रासादीं ॥ ७८ ॥
स्नान पान वस्त्र भूषण । तया दिधलें रुचिर भोजन ।
परम संतोषला ब्राह्मण । उत्तम सन्मान पाहुनी ॥ ७९ ॥
सभास्थान करून सुशोभित । मंत्री सरदार जमवून तेथ ।
रायें त्या स्थळीं दत्ताजीपंत । पाचारून आणिला ॥ ८० ॥
कुशल प्रश्न विचारिले । मग आगमनकारण पुसलें ।
मधुरोत्तरें पंत बोले । शिवरायास तेधवां ॥ ८१ ॥
तुह्मी प्रतापी शूर वीर । कुलीन आणि समर धीर ।
तुमची कीर्ती अपार । भूमंडळीं गाजते ॥ ८२ ॥

तुमचे वडील नामांकित । पातशहाचे आज्ञांकित ।
राजनिष्ठ विश्वासू बहुत । शहा तयां मानितो ॥ ८३ ॥
तुह्मी बहुत ख्याती केली । परंतु कांहींशी बुद्धी फिरली ।
राजनिष्ठा कमी केली । कशाकारणें कळेना ॥ ८४ ॥
होणार तें होऊन गेलें । तें आतां पाहिजे विसरलें ।
योग्य वेळीं सावध झालें । आतां पाहिजे सुजाणा ॥८५॥
आफजुलखान निरोप सांगतो । तुमचें मित्रत्व करूं इच्छितो ।
उभयतां भेटूं ह्मणतो । मित्रत्वानें शिवराया ॥ ८६ ॥
बादशहासीं नम्र व्हावें । आफजुलखानास तुवां भेटावें ।
बलाबल चित्तीं पहावें । विवेक मनीं करूनी ॥ ८७ ॥
मित्रत्वाची इच्छा धराल । तरी राया सिद्धी येईल ।
किल्ले मुलुखही राहील । तुह्मांकडे सर्वदा ॥ ८८ ॥
खानें विचार सांगितला । तो मी तुह्मांतें कथन केला ।
आतां चित्तीं सुचेल तुह्मांला । तैसा विचार करावा ॥८९॥
पंताचे बोल ऐकून । राव किंचित् हास्य करून ।
बोलता झाला मधुर वचन । गंभीरस्वरें तेधवां ॥ ९० ॥
पंत तुह्मी चतुर सुजाण । त्याहीवरी अहां ब्राह्मण ।
अमृततुल्य तुमचें वचन । गोड आह्मां लागतें ॥ ९१ ॥
व्हावें कल्याण आमुचें । हेंच तुमच्या चित्तीं साचें ।
तुमचें वचन आह्मांस रुचे । परम संतोषें करून ॥ ९२ ॥
दावाल पंथ सुखकर । त्यामार्गें आह्मी चालणार ।
न वर्तूं तुमच्या बाहेर । मग आह्मी कधींही ॥ ९३ ॥
आपण सर्व हिंदूजन । एकमेकां बंधूसमान ।
करूं एकमेकांचें कल्याण । हाच स्वधर्म जाणुनी ॥ ९४ ॥

शरीरसुखार्थ नाहीं भुललों । उदर भरणार्थ नाहीं भुकेलों ।
स्वराज्य रक्षणार्थ सिद्ध झालों । ऐसें मनीं समजावें ॥९५॥
आपुल्या राज्या माझारी । जितकीं बंडें झालीं पुढारी ।
तीं मोडूनियां लवकरी । प्रजा सुखी करावी ॥ ९६ ॥
हाच मनीं धरिला हेत । तुह्मी स्वजन सहाय समस्त ।
होतां साधेल आपुला अर्थ । ऐसें सत्य जाणिजे ॥ ९७ ॥
राज्यांतील बंडें मोडावीं । प्रजा आपुली सुखी व्हावी ।
धर्म संस्थापना करावी । हाच प्रयत्न आमुचा ॥ ९८ ॥
आह्मी दुसऱ्यातें नच पीडितों । नच दुसऱ्याचें धन घेतों ।
आपुलें राज्य संरक्षितों । यथाशक्ती यत्नानें ॥ ९९ ॥
शिवमुखींची ऐशी मात । ऐकून पंत झाला चकित ।
ह्मणे आश्चर्य अद्भुत । श्रवण केलें आज मी ॥ १०० ॥
बंड कोणास तुह्मी ह्मणतां । अहा कोणाचें धन लुटितां ।
अविचारें काय बोलतां । मजलागीं कळेना ॥ १०१ ॥
शिव बोले भ्रम न हा । बंड तुमचा बादशहा ।
तुह्मी विचार करून पहा । आपुल्या मनीं चतुरहो ॥१०२॥
पंत बोले नम्र बोल । धन्यास बंड कोण ह्मणेल ।
बादशहा बंड होईल । कैसा आह्मा कळेना ॥ १०३ ॥
शिवराय ह्मणे योग्य प्रश्न । याचें उत्तर आतां देईन ।
परी देऊन अवधान । मद्वचन परिसावें ॥ १०४ ॥
हें संपूर्ण भरतखंड । येथें हिंदूंची सत्ता अखंड ।
ऐसें असतां कोणी बंड । मांडिलें तें परिसावें ॥ १०५ ॥
हा आपुला देश संपूर्ण । येथील जलतरू काष्ठ पाषाण ।
यांचे खरे स्वामी आपण । कोण असत्य ह्मणेल ॥ १०६ ॥

ऐसें असतां यवन दुष्ट । आपुल्या देशीं येऊन पापिष्ठ ।
नाना बंडें करून स्पष्ट । दुःख देती आपणां ॥ १०७ ॥
एक झाले दिल्लीपती । एक विजापुरीं स्वामित्व भोगिती ।
हाय आह्मां दास ह्मणती । काय गती कर्माची ॥ १०८ ॥
अहा घरधनी राहती उपाशीं । यांच्या चालती नित्य मिजासी ।
हाहा चोराची होऊन सरशी । साव खालीं पाहतो ॥१०९॥
आमुच्या जनीं कष्ट करावे । यांनीं आयतें बसून खावें ।
बलात्कारें सर्वस्व हरावें । दीन ह्मणुनी आमुचें ॥ ११० ॥
यांनीं सुवर्णमंचकीं निजावें । आह्मांस झोंपडेंहि न मिळावें ।
यांनीं उत्तमोत्तम अन्न खावें । आह्मां कोरडें मिळेना ॥१११॥
यांचीं रांडापोरें वहावया । आह्मी कष्टवावी आपुली काया ।
हाय आमुचे जन्म वांयां । यांचेमुळें जाहले ॥ ११२ ॥
कवडी कवडी मेळवावी । या दुष्टांची भर करावी ।
यांनीं संपत्ति उडवावी । जातभाईंत आपुल्या ॥ ११३ ॥
स्वजातीय असला शंख । तरी तो आमुचा नायक ।
आह्मांतील शहाणा सुरेख । नीचस्थान तयाला ॥ ११४ ॥
परम चांडाल यवनदुर्मती । आमुचा धर्मोच्छेद करिती ।
पवित्रमूर्ती फोडून टाकिती । अविचारें नराधम ॥ ११५ ॥
बळें दावून मरणभय । आह्मां हिंदूंचे भ्रष्टविती काय ।
धर्ममार्गास नाना अपाय । दुष्टपणें आणिती ॥ ११६ ॥
दुष्ट चांडाल नराधम । किती वर्णूं पापकर्म ।
बहुत गांजिला आमुचा धर्म । तैसाच आमुचा देशही ॥११७॥
पहा तुह्मी चतुर ब्राह्मण । राजकारणीं अत्यंत निपुण ।
तुह्मी असावें मुख्य प्रधान । विजापुरच्या दरबारीं ॥११८॥

नोडगे बुद्धिहीन अविचारी । तेच असती महा पुढारी ।
तुह्मां सांगती कारकूनगिरी । काय अपमान ल्हान हा ॥११९॥
बडा शेख आफजुलखान । तुह्मांस त्याची सेवा सांगून ।
यवनीं केले अत्यंत हीन । काय अपमान ल्हान हा ॥१२०॥
तुह्मी विवेकें पहावें । मी तुह्मांस काय सांगावें ।
उचित असेल तें करवावें । मजकडून पंतहो ॥ १२१ ॥
वीररसें ओथंबले । यथार्थत्वें परिप्लुत झाले ।
ऐसे रायाचे बोल निघाले । मौक्तिकापरी तेधवां ॥ १२२ ॥
पंत ऐकून गहिंवरला । क्षणएक भान विसरला ।
मग विनयें बोलूं लागला । ऐक राया सुजाणा ॥ १२३ ॥
नृपवर्या मधुरोत्तरें । बोलिलास तें सर्व खरें ।
तथापि अनेक कार्यप्रकारें । विचार केला पाहिजे ॥१२४॥
प्रस्तुत ते असती सबळ । आपण बोलून काय फळ ।
उगाच काळमुखीं कवळ । कासया व्हावें नृपाळा ॥१२५॥
राव बोले मधुरवाणी । तुह्मी चतुर राजकारणी ।
व्यवहारदक्ष परम गुणी । बहुत योग्य दिसतसां ॥ १२६ ॥
ते कशानें झाले सबळ । कशा कारणें आपण निर्बळ ।
हा विचार करितां केवळ । वाद उगाच होईल ॥ १२७ ॥
असो आतां झाला उशीर । उद्यांक सांगूं आमुचा विचार ।
तुह्मांस श्रम झाले फार । आतां विश्रांती घेइजे ॥ १२८ ॥
यापरी बोलणें होऊन । घरोघर गेले सभाजन ।
रात्रीं रायें पाचारून । पंतालागीं आणिलें ॥ १२९ ॥
अत्यंत गुप्त एकांतस्थानीं । राव नेई पंतालागुनी ।
मग अत्यंत मधुरवचनीं । पंताप्रती वदतसे ॥ १३० ॥

आप्त सखासोयरा प्राण । तूंच आमुचा आज पूर्ण ।
तरी आतां द्वैत टाकून । सत्य सत्य बोलावें ॥ १३१ ॥
म्लेंच्छ मनीं काय वर्तते । काय शिक्षा करील आह्मांतें ।
कैसें आमुचें कार्य होतें । तें त्वां सत्य सांगावें ॥ १३२ ॥
तुह्मी आह्मांस सहाय्य व्हावें । एवढें कार्य सिद्धीस न्यावें ।
महद्यश संपादावें । तरीच धन्यत्व येईल ॥ १३३ ॥
कशास पाहिजे नीच यवन । मीच महत्पदीं चढवीन ।
धर्मकार्यी घालाल मन । तरी उणें कायहो ॥ १३४ ॥
शिववचनें पंत भाळला । क्षणामध्यें मोह पावला ।
शिवरायास वश झाला । अंतर्यामा पासुनी ॥ १३५ ॥
ह्मणे अफ्जुलखान आहे कपटी । याचा विश्वास न धरावा पोटीं ।
घेऊं इच्छितो तुमची भेटी । घात तुमचा करावया ॥ १३६ ॥
दुर्गप्रांत तुजकडे राखीन । हें दिसतें मिथ्यावचन ।
वरीवरी आशा लावून । घात कराया पाहतो ॥ १३७ ॥
नृप बोले फार उत्तम । ठकवूं पाहतो काय अधम ।
तरी भगवंत आत्माराम । तयासची ठकवील ॥ १३८ ॥
तुवां आतां तेथें जाऊन । सांगणें झाला शिवाजी दीन ।
सर्व राहिलें उद्दामपण । येतो शरण तुजला तो ॥ १३९ ॥
तो तुह्मांस अत्यंत विनवितो । तुमची भेट घेऊं इच्छितो ।
परी येथ यावया भय पावतो । शिक्षा कराल ह्मणूनी ॥ १४० ॥
नम्रपणें ऐसें बोलुन । मम भेटीस येईल यवन ।
ऐसें तुह्मी आणा घडवून । चतुराईनें लवकरी ॥ १४१ ॥
कराल एवढें राजकारण । तरी मी उतराई होईन ।
तुह्मांस धन्य करीन । सत्य वचन हें माझें ॥ १४२ ॥

पंत 'बहुवरें' बोले वचन । खानास आणीन भेटीकारण ।
तुह्मी स्वार्थ घ्यावा साधून । वाटेल तैशा प्रकारें ॥ १४३ ॥
अमोल रत्न वस्त्र भूषण । रायें पंतास केलीं अर्पण ।
करून बहुत सन्मान । मधुर वचनें गौरविलें ॥ १४४ ॥
कृष्णाजी भास्कर नामक । होता रायाचा विश्वासुक ।
तयास आज्ञापी नरनायक । खानाकडे जावया ॥ १४५ ॥
दोघांसवें सांगून निरोप । पाठविता झाला त्यांस नृप ।
पुढें कथारस गोड आमूप । श्रोतीं सादर सेवावा ॥ १४६ ॥
स्वदेश संरक्षणाकारणें । केवीं तनु मन धन समर्पणें ।
कैशीं असती राजकारणें । श्रोतीं सादर परिसावीं ॥१४७॥
श्रीशिवविजयग्रंथ । शिवावतार चरित्र अद्भुत ।
वर्णन करी भावें अनंत । दशमाध्याय गोड हा ॥ १४८ ॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

# अध्याय ११ वा.

॥ श्रीगणेशायनमः ॥

घेऊन रायाचा निरोप । दोघे आले खानासमीप ।
त्या समयीं तो यवनाधीप । आदर करी दोघांचा ॥ १ ॥
ह्मणे कुशल आहे कीं शिवाजी । काय बोलिला आपुल्या काजीं ।
मित्रत्वास असे कीं राजी । शीघ्र तुह्मी सांगावें ॥ २ ॥
मग बोले दत्ताजीपंत । शिवाजी तुमचा आज्ञांकित ।
नम्रपणें तुह्मां विनवीत । कृपा करा ह्मणूनी ॥ ३ ॥
कांहीं अन्याय असती घडले । ते पाहिजेत क्षमा केले ।
मित्रत्वें पाहिजे संरक्षिलें । आह्मालागीं सर्वस्वीं ॥ ४ ॥
तुह्मीं महाप्रतापी शूर । आह्मी काय गरीब लाचार ।
कृपा कराल दीनावर । तरीच रक्षण होईल ॥ ५ ॥
ऐसें शिवाजी बोलिला । आहे तुह्मांवर विश्वासला ।
आतां धीर देऊन तयाला । सुखी आपण करावें ॥ ६ ॥
खान चित्तीं संतोषून । मनीं ह्मणे धन्य आपण ।
कपट युक्ती सिद्धीस जाऊन । खचित यश येईल ॥ ७ ॥
मग बोले अहो पंत । शिवाजी कधीं येणार येथ ।
आमुच्या भेटीनें अनर्थ । सर्व त्याचा टळेल ॥ ८ ॥
मग बोले कृष्णाजी भास्कर । शिवाजी भेटण्यास आहे तत्पर ।
परी तयाचें अंतर । येथें यावया भीतसे ॥ ९ ॥
तुमची सेना प्रचंड अती । बहुत भीरू त्याची प्रकृती ।
येथें यावया वाटते भीती । तयालागीं जाणिजे ॥ १० ॥

मनीं धरून उदारपण । प्रचंड सैन्य मागें ठेवून ।
भेटीस यावें आपण । ऐसें शिवाजी इच्छितो ॥ ११ ॥
मध्य ठिकाण असे जावली । तेथें आपुली स्वारी आली ।
ह्मणजे शिवाजी गडाखालीं । येऊनियां भेटेल ॥ १२ ॥
ऐकून कृष्णाजीची मात । खान झाला संतोषित ।
मनीं ह्मणे आपुला बेत । सिद्धी जाईल निश्चयें ॥ १३ ॥
शिवाजी आहे विश्वासला । आतां आपुला कार्यभाग झाला।
कपटें फसवून तयाला । कैद करूं क्षणांत ॥ १४ ॥
मग बोले कृष्णाजीस । आह्मी मान्य तुमच्या वचनास ।
निर्भय करून मानस । शिवें आह्मांस भेटावें ॥ १५ ॥
आतां तुह्मीं शीघ्र जाऊन । शिवाजीस बहू विश्वासुन ।
भेटीस यावें घेऊन । विलंब बहू न करावा ॥ १६ ॥
मग तो कृष्णाजीपंत चतुर । आज्ञा घेऊन निघाला सत्वर ।
वाट पाहे जंव नृपवर । तंव येऊन ठेपला ॥ १७ ॥
वृत्त सर्व सांगीतलें । खानाचे बोल ऐकविले ।
खान येणार ऐसें कथिलें । नृपवराशीं तेधवां ॥ १८ ॥
येरीकडे आफजलखान । शिव भेटीचा निश्चय करून ।
निघता झाला वांईहून । कांहीं सैन्यासमवेत ॥ १९ ॥
ठोकिल्या गमन संकेत भेरी । वाद्यें वाजती नाना परी ।
यवन वीर महागजरीं । मार्ग क्रमूं लागले ॥ २० ॥
लागला पर्वताचा चढाव । अडखळूं लागले गज अश्व ।
प्रशस्तपणें नाहीं वाव । सर्व सैन्य चालावया ॥ २१ ॥
दऱ्या खोऱ्या मार्ग भयाण । पंथ क्रमितां कष्टती यवन ।
ह्मणती प्रसंग दिसतो कठीण । काय होणार कळेना ॥२२॥

खडे कंटक पायीं रुतती । बोरी करवंदी वसनीं गुंतती ।
मार्गीं अपार दुःख पावती । यवन सैनिक तेधवां ॥ २३ ॥
प्रचंड सैन्यीं फूट झाली । कांहीं सेना मागें राहिली ।
कांहीं मार्ग चुकून भटकली । आड रानांत एकीकडे ॥२४॥
शहाणे यवन तये वेळां । ह्मणती आफ्जुलखान भरीं भरला ।
पोक्त विचार सोडून दिधला । मार्ग सोडिला तयानें ॥२५॥
विनाशकाल समीप आला । ह्मणून दुर्बुद्धी सुचली त्याला ।
सर्व सैन्यासह विलयाला । जाईल ऐसें वाटतें ॥ २६ ॥
शिवाजी धूर्त काफर । राहिला दुर्जय दुर्गावर ।
आतां खानास बुडविणार । ऐसें निश्चयें वाटतें ॥ २७ ॥
एवं कष्टें मार्ग क्रमिती । पदोपदीं संकटें भोगिती ।
आफ्जुलखान ऐशा रीती । जावलीसमीप पातला ॥ २८ ॥
स्थळीं स्थळीं सैन्य राहिलें । सर्व रानोमाळ पसरिलें ।
अल्प सैन्य पुढें आलें । आफ्जुलखाना समवेत ॥ २९ ॥
दत्ताजीपंतास बोलावून । तयास आज्ञा करी खान ।
तुवां गडावरी जाऊन । शिवाजीस आणावें ॥ ३० ॥
पंत तेथून निघाला । शिवरायास येऊन भेटला ।
ह्मणे शत्रू प्राप्त झाला । निकटभागीं राजया ॥ ३१ ॥
राव बोले फार उत्तम । तुह्मी साह्यकर्ते चतुर परम ।
नाश पावेल नराधम । मम हस्तें करूनी ॥ ३२ ॥
आजपासून तृतीयदिवशीं । मी येईन त्याचे भेटीशी ।
तुह्मी आणावें तयासी । मजलागीं भेटावया ॥ ३३ ॥
परंतु पंत असे सांगणें । वर्तणूक ठेवा सावधपणें ।
कार्यसिद्धी चातुर्यविणें । होणार नाहीं सर्वथा ॥ ३४ ॥

माझा कळवून मित्रपणा । अफ्जुलखानास एकटा आणा ।
मधुरवचनें बोलून नाना । बहु विश्वास दावावा ॥ ३५ ॥
पंतास सांगून ये रीती । धाडून खानाकडे मागुती ।
मग शिवराव पाचारिती । महाराष्ट्र वीरां समीप ॥ ३६ ॥
ह्मणे शूरहो समय पातला । शत्रू आपल्या समीप आला ।
आतां दावून पराक्रमाला । कीर्तिध्वज फडकावूं ॥ ३७ ॥
मोरोपंत आणि पालकर । यांनीं सेना घेऊन अपार ।
घोर कांतारीं रहावें सत्वर । जावली समीप गुप्तरूपें ॥३८॥
तानाजी मालुसरे रणशूर । यांनीं चढावें घांटावर ।
सज्ज करून महाराष्ट्र वीर । युद्धास सिद्ध असावें ॥ ३९ ॥
सिद्ध होतांच आमुचा मंत्र । आह्मी सोडूं उल्हाट यंत्र ।
त्या आवाजासरसे सर्वत्र । शत्रुसैन्यीं घुसावें ॥ ४० ॥
जिवाकडे न पहावें । चित्तीं भय न धरावें ।
शत्रुसैन्य कापीत जावें । वीरमदें भरूनी ॥ ४१ ॥
उडवावी एकच धुमाळी । करावी सैन्याची रांगोळी ।
भवानीस अर्पावे बळी । शत्रु सैन्याचे अपार ॥ ४२ ॥
खालून मोरोपंत येतील । वरून मालुसरा गर्दी करील ।
तरीच शत्रु सैन्य पावेल । नाश सर्व जाणिजे ॥ ४३ ॥
आतां सर्वांनीं निघावें । नेमिलेल्या स्थळीं जावें ।
सावधपणें कार्य करावें । मनीं धीर धरूनी ॥ ४४ ॥
असावें निर्भय अंतरीं । भवानी आहे पाठीवरी ।
मर्दुमकीची शर्थ भारी । करून शत्रु जिंकावा ॥ ४५ ॥
यापरी शिवनृप बोलिला । सर्व वीरीं जयघोष केला ।
आज्ञा प्रमाण शब्द उठला । वीर समूहीं तेधवां ॥ ४६ ॥

मग मोरोपंतादि सर्व वीर । गेले आज्ञेनुरूप सत्वर ।
गुप्तरूपें समरधीर । स्थळीं स्थळीं राहिले ॥ ४७ ॥
संकेत दिवस पातला । राव प्रातःकाळीं उठला ।
आज्ञा दिधली अवघ्यांला । प्रासादांगणीं यावया ॥ ४८ ॥
नृपें करून मंगलस्नान । धूतवस्त्र केलें परिधान ।
मग देवगृहीं जाऊन । देवी भवानी पूजिली ॥ ४९ ॥
षोडशोपचारें करून पूजा । उभा ठाकला शिवराजा ।
प्रसन्न व्हावया शंभुभाजा । भावें स्तोत्र आरंभी ॥ ५० ॥
जय त्रिपुरसुंदरी जगज्जननी । जय आदिमाते वरदायिनी ।
जय कृपाकरे भवानी । परम भावें वंदितों ॥ ५१ ॥
तुझा कृपा प्रसाद पावलों । म्लेंच्छ वधावया उद्युक्त झालों ।
तुझ्या चरणा समीप आलों । वरप्रसाद मागावया ॥ ५२ ॥
माते तव कृपा होईल । तरीच संकट निरसेल ।
तव प्रसादें यश येईल । मजलागीं निश्चयें ॥ ५३ ॥
ऐशी प्रार्थून शंभुकांता । नरनायक स्तब्ध राहतां ।
चमत्कार झाला अवचितां । श्रोतीं सादर परिसावा ॥ ५४ ॥
अंबिकेच्या सव्यकरांत । पद्मपुष्प होतें शोभत ।
तें उडून अकस्मात । नृपांजलींत पडियेलें ॥ ५५ ॥
पद्मरूपें अभयदान । देवी देई रायाकारण ।
रायें कृपाप्रसाद मानून । प्रेमें मस्तकीं वंदिला ॥ ५६ ॥
झाला एकचि जयजयकार । वाद्यें वाजूं लागलीं सुस्वर ।
मग तो शिवाजी नृपवर । प्रासादचत्वरीं प्रवेशला ॥ ५७ ॥
पाचारून समस्त ब्राह्मण । त्यांचें करी यथाविधी पूजन ।
तयांस दक्षिणाभरणें देऊन । आशीर्वाद संपादी ॥ ५८ ॥

मग दीन दुर्बल भिकारी । राव तयांतें धर्म करी ।
बहुत दानधर्म ऐशापरी । राव करिता जाहला ॥ ५९ ॥
आप्तस्वकीय बोलावून । पुत्र संभाजी पुढें घेऊन ।
राव करी षड्रसभोजन । जिजाऊमाते समवेत ॥ ६० ॥
भोजन झालियाऊपरी । स्वीय सभास्थाना माझारी ।
राव सत्वर पाचारी । आप्त सोयरे मंत्रीजन ॥ ६१ ॥
मग सर्वांस संबोधून । राव बोले गंभीरवचन ।
तुह्मी सर्व आप्तजन । कृपा मजवरी करीतसां ॥ ६२ ॥
शत्रू बलाढ्य बलसागर । त्यांशीं आज गांठ पडणार ।
वेळ दिसते भयंकर । काय होईल कळेना ॥ ६३ ॥
आह्मांस भवानीचें वरदान । सद्गुरूची कृपा पूर्ण ।
नाश पावेल दुष्ट यवन । काळजी कांहीं करूं नये ॥६४॥
ईश्वरीसूत्र अघटित । काय होईल नकळे निश्चित ।
तुह्मी सर्व विचारवंत । सावधपणें असावें ॥ ६५ ॥
व्हावया स्वराष्ट्रउन्नती । रक्षावया स्वधर्माप्रती ।
जीवित्व तुच्छ मानून चित्तीं । प्रस्तुत आह्मी जातसों ॥६६॥
परमेश यश देईल । शत्रुसंहार शीघ्र होईल ।
मग आह्मी तुह्मी सकल । भेटूं परम आनंदें ॥ ६७ ॥
परी न जाणो ब्रह्मवटित । जरी कांहीं घडेल विपरीत ।
तरी मग तुह्मी समस्त । कदा धीर त्यजूं नये ॥ ६८ ॥
कैसा आह्मी साक्षेप केला । कैसा स्वधर्म जागविला ।
कैसा प्राण तुच्छ मानिला । ठावें आहे तुह्मांसी ॥ ६९ ॥
चित्तीं धरून परम विवेक । आह्मांहून करावें अधिक ।
एक करून सकल लोक । कार्यभाग साधावा ॥ ७० ॥

हें संभाजी बाळ अज्ञान । देतों तुह्मांस निरवून ।
याचें करावें संगोपन । परम. प्रीती करूनी ॥ ७१ ॥
राज्यवैभव लक्ष्मी धन । हें सर्व कर्तृत्वाआधीन ।
आळस भीरुत्व नित्य टाकून । आपुलें नांव राखावें ॥७२ ।
"अहंमती लोकीं धरावी । हिंमतीची तरवार करावी ।
चढती बढती पदवी । पावाल तेणें ॥ ७३ ॥
सकल लोक एक करावे । एक विचारें त्यांस भरावें ।
कष्ट करून घसरावें । म्लेंच्छावरी ॥ ७४ ॥
आहे तितुकें जतन करावें । पुढें आणखी मेळवावें ।
महाराष्ट्र राज्य करावें । जिकडे तिकडे" ॥ ७५ ॥
ही सत्गुरूची मधुरवाणी । सदासर्वदा ठेवून मनीं ।
प्रयत्न करून निशिदीनीं । म्लेंच्छसंहार करावा ॥ ७६ ॥
धारातीर्थीं देह पडेल । तरी उत्तम लोक प्राप्त होईल ।
समरांगणीं यश येईल । तरी साधेल स्वराज्य ॥ ७७ ॥
दोहींकडून लाभ थोर । यास्तव गांठावें वीरें समर ।
तवकें करावा निकर । शत्रूवरी सर्वदा ॥ ७८ ॥
आतां कासया फार भाषण । मनीं धरावी मुख्य खूण ।
म्लेंच्छ अवघे पराभवून । स्वधर्मरक्षण करावें ॥ ७९ ॥
जीवित्व तृणवत् मानून । पुत्रकांता मोह त्यागून ।
संपत्तीवर पाणी सोडून । आह्मी आज जातसों ॥ ८० ॥
जरी असेल ऋणानुबंध । तरी होईल पुन्हा संबंध ।
नाश पावेल दुष्ट अविंध । आमुच्या हस्तें करूनी ॥ ८१ ॥
कांहीं होईल अवचट । तरी तुमची आमुची हीच भेट ।
मग धैर्य धरावें अचाट । हेंच मागणें मागतों ॥ ८२ ॥

संपतां नृपतीचें भाषण । जयजयकारें गर्जती सर्वजण ।
ह्मणती नृपा तूं गुणनिधान । यश खचित पावशील ॥ ८३ ॥
देवी भवानी कृपा करील । तवहस्तें शत्रू निवटील ।
आह्मांस सौख्य देशील । थोर विजय मिळवुनी ॥ ८४ ॥
ईशेच्छेनें कांहीं होवो । आमुचा त्वत्पदीं अढळ भावो ।
परमेश्वर सिद्धीस नेवो । धर्मस्थापना सत्कार्य ॥ ८५ ॥
चित्तीं शंका न धरणें । सिद्धीस नेऊं तुझीं वचनें ।
अर्पू स्वीय तनु मन धनें । म्लेंच्छ निवटूं प्रतापें ॥ ८६ ॥
बहु बरें ऐसें बोलून । निघता झाला राव तेथून ।
त्वरें प्रासादीं जाऊन । करी प्रयाण सिद्धता ॥ ८७ ॥
भरजरी चोळणा पायीं घातला । कटीस रेशमी कांचा कसिला ।
लोह कवच अंगीं त्याला । शहाजीसूनू तेधवां ॥ ८८ ॥
मुक्तलग झगा भरजरी । कवचावरून परिधान करी ।
गळां रत्नमाळा साजिरी । अपूर्व शोभा देतसे ॥ ८९ ॥
माथां मंदील बांधिला । शिरीं कलगी तुरा खोंविला ।
कस्तूरीतिलक भाळीं रेखिला । शोभायमान दिसतसे ॥९०॥
कर्णीं कुंडलें झळकती । दैदिप्यमान अंगकांती ।
परम रम्य शिवमूर्ती । दिसों लागली तेधवां ॥ ९१ ॥
झग्याच्या अस्तनीखालीं । वाघनखें दडवून घेतलीं ।
तीक्ष्ण कट्यार गुप्त ठेविली । शिरस्त्राणामाझारीं ॥ ९२ ॥
थोर तरवार तेजस्विनी । जिचें नाम असे भवानी ।
ती कंबरेस लटकावुनी । पंच हत्यारें बांधिली ॥ ९३ ॥
प्रयाणाची सिद्धता झाली । शिवमूर्ती कैशी शोभली ।
जैशी श्रीकृष्णमूर्ती निघाली । कंसासुर वधावया ॥ ९४ ॥

मग अंतर्गृहामाझारी । शिवराव प्रवेशे झडकरी ।
प्रेमें साष्टांग नमन करी । जिजाऊ मातेकारणें ॥ ९५ ॥
मातेपरतें नाहीं दैवत । ऐसा श्रुतीचा मथितार्थ ।
शिवराय पूर्ण मातृभक्त । भावें वंदितो मातेसी । ९६ ॥
जिजाऊ माता परम स्नेहाळ । हळूच बोले मधुर बोल ।
उठ शिवबा तव मुखकमळ । डोळे भरून पाहूं दे ॥९७॥
हस्तीं धरून उठविलें । परम स्नेहें जवळ बसविलें ।
प्रफुल्ल मुखकमळ अवलोकिलें । नेत्र धाले तयेचे ॥ ९८ ॥
हस्त जोडून बोले नृपती । वरदहस्त ठेवून शिरावरती ।
आज्ञा द्यावी मजप्रती । दुष्ट म्लेंच्छ वधावया ॥ ९९ ॥
श्रीसद्गुरू कृपा करील । भवानी माझी पाठ राखील ।
तुमचा आशिर्वाद संरक्षील । मजलागीं निर्धारें ॥ १०० ॥
ऐसें बोलतां शिवनृपती । मातृनेत्रीं अश्रू येती ।
ह्मणे बाळा तुजप्रती । कुलस्वामिनी रक्षील ॥ १०१ ॥
सत्गुरूची कृपा अपार । होईल दुष्टांचा संहार ।
तूं विजयी होऊन सत्वर । मजलागीं भेटशील ॥ १०२ ॥
वीरजा वीरपत्नी मजप्रती । ऐसे सर्वत्र लोक बोलती ।
आतां वीरमाता ह्मणती । ऐसें करून दाखवी ॥ १०३ ॥
गोपालकृष्णें कंस वधिला । कीं भीमें कीचक संहारिला ।
तैसेंच वधून त्या यवनाला । शीघ्र विजय संपादी ॥१०४॥
होईल शत्रूचा निःपात । यशस्वी होईल तव हस्त ।
हा मी आशिर्वाद तुजप्रत । शिवबाळा देतसें ॥ १०५ ॥
यापरी आशिर्वाद देऊन । हस्त फिरवून मुखावरून ।
पुन्हा मुखचंद्र न्याहाळून । जिजाऊ माता पाहतसे ॥१०६॥

पुनःपुन्हां करून वंदन । राव निघाला तेथून ।
प्रासादांगणीं येऊन । शीघ्र अश्वीं आरूढला ॥ १०७ ॥
भोंवते मिळाले सर्व लोक । शूर वीर सर्व सैनिक ।
तयालागीं नरनायक । आज्ञा करी स्वमुखानें ॥ १०८ ॥
दुर्गद्वारीं सज्ज असावें । पुढें अवध्यांनीं न यावें ।
दुर्गरक्षण यत्नें करावें । परम शौर्य दावुनी ॥ १०९ ॥
संभाजी कावजी रणशूर । जिवबा महाली समरधीर ।
तिजा कृष्णाजी भास्कर चतुर । नृपें सवें घेतले ॥ ११० ॥
दुर्गापासून जावलीपर्यंत । वृक्ष लता जाळ्या बहुत ।
त्यामाजीं लपवून ठेवित । ठायीं ठायीं सैनिकां ॥ १११ ॥
ऐसी सर्व सिद्धता करून । भवानी सत्गुरू आठवून ।
परमोत्साहें शहाजीनंदन । दुर्गाबाहेर पडियेला ॥ ११२ ॥
पुढिले अध्यायीं कथा सुरस । अपूर्व माजेल वीररस ।
परमेश्वर देईल यश । शिवरायाकारणें ॥ ११३ ॥
श्रीशिवविजय ग्रंथ । शिवावतारचरित्र अद्भुत ।
वर्णन करी भावें अनंत । एकादशाध्याय गोड हा ॥११४॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

# अध्याय १२ वा.

॥ श्रीगणेशायनमः ॥

पूर्वाध्यायाचे अंतीं । स्वांगें निघाला शिवनृपती ।
पुढें वर्तली कैशी स्थिती । श्रोतीं सादर परिसावी ॥ १ ॥
प्राप्त होतां संकेतदिन । दत्ताजीपंत खानासमीप जाऊन ।
ह्मणे शिवाजी भेटवीन । आजिचे दिनीं तुह्मांतें ॥ २ ॥
आतां न लावितां उशीर । भेटीस चलावें तुह्मी सत्वर ।
ऐकतां ऐसें मधुरोत्तर । खान बहुत आनंदला ॥ ३ ॥
मनीं ह्मणे अफजुलखान । आज प्राप्त झाला सुदिन ।
शिवाजीस धरून नेईन । विजापुरीं सहजची ॥ ४ ॥
धरून आमुचा विश्वास । शिवाजी येतो भेटीस ।
आतां न पडतां आयास । निश्चयें विजय मिळेल ॥ ५ ॥
आमुचा विश्वास न धरितां । दुर्गीं राहून युद्ध करिता ।
तरी कठिणसमय येता । ऐशा दुर्जय मुलुखांत ॥ ६ ॥
महामूर्ख हिंदू जात । सांपडणार आपुल्या हातांत ।
धरून नेऊं जिवंत । बादशहा सन्मुख ॥ ७ ॥
किंवा बळेंच कंवटाळून । तत्काळ घेईन त्याचा प्राण ।
मी बळिष्ट अफजुलखान । काय तो पामर मजपुढें ॥ ८ ॥
ऐसा मनीं विचार करून । दत्ताजीपंतास बोले वचन ।
चला शीघ्र करूं गमन । भेट घेऊं शिवाजीची ॥ ९ ॥
मुख्य मुत्सद्दी बोलाविले । खानें त्यांस एकांतीं नेलें ।
मग तयांस कळविलें । शिवाजी हातीं येतसे ॥ १० ॥

सलुखाचीं बोलणीं केलीं । दुर्गप्रांताची आशा लाविली ।
शिवाजीची बुद्धी मोहविली । गोड बोलणें लावुनी ॥११॥
टाळून अवघा युद्धप्रसंग । एकांत भेटीचा आणिला योग ।
अकस्मात धरून अपूर्व रंग । करून दावूं जनातें ॥ १२ ॥
समस्तांस बरवें वाटलें । ह्मणती युद्धाचें कारण सरलें ।
मग अफ्जुलखानें राहविलें । सर्व दळ तेथेंची ॥ १३ ॥
एकनिष्ठ सय्यदनामक । होता खानाचा सेवक ।
सवें घेऊन तोच एक । अफ्जुलखान निघाला ॥ १४ ॥
सय्यद बडा रणशूर । हातीं घेऊन तीक्ष्ण तरवार ।
खानापुढें चाले सत्वर । वीरगतीनें तेधवां ॥ १५ ॥
जिंकावया दशरथनंदन । लंकेहून निघाला रावण ।
त्याचपरी अफ्जुलखान । शिवाजीवरी चालिला ॥ १६ ॥
कोस एक टाकून जावली । पुढें खानाची स्वारी आली ।
दत्ताजीपंत तयेस्थळीं । येऊनियां भेटला ॥ १७ ॥
शिवरायें तयेस्थळीं । होतीं पटसदनें निर्मिलीं ।
परम रमणीय शोभलीं । अति कुशलत्वें करूनी ॥ १८ ॥
लाल रेशमी पडदे बांधिले । वरी किनखापी सोगे सोडिले ।
मुक्त घोंस लटकाविले । ठायीं ठायीं सुंदर ॥ १९ ॥
बैठकी घालून नानापरी । लोड गाद्या तया उपरी ।
शुभ्रसफेत अस्तरणें वरी । घालून शोभा आणिली ॥ २० ॥
लाविल्या चित्रविचित्र झालरी । चित्रें रेखिलीं नानाप्रकारीं ।
पाहतां आनंद होय अंतरीं । ऐशीं स्थानें शोभती ॥ २१ ॥
एक लाल दुसरी सफेत । तृतीय कृष्णवर्ण चौथी पीत ।
पांचवीचा वर्ण हरित । सहावी केशरी विराजे ॥ २२ ॥

जंबूफळाचा जैसा वर्ण । तैशी सातवी शोभायमान ।
एवं सातसदनें रायें निर्माण । केलीं होतीं त्याठायीं ॥ २३ ॥
चित्रविचित्र रंग खुलती । तऱ्हेतऱ्हेचे पक्षी नाचती ।
मंदसुगंध त्यांत उठती । मनोल्हादकारक ॥ २४ ॥
ऐशा रम्यस्थाना संनिध । प्राप्त झाला दुष्ट अविंध ।
गर्वभरें होऊन अंध । सारासार विसरला ॥ २५ ॥
दत्ताजीपंत पुढें होऊन । खानास करी मधुर भाषण ।
ह्मणे शिवाजी चतुर सुजाण । तोषवितो आपणां ॥ २६ ॥
वेंचून अपार संपत्ती । आपणांस द्यावया विश्रांती ।
पहाया वनस्थानाप्रती । शोभा कैशी आणिली ॥ २७ ॥
सप्तसभा केल्या निर्माण । त्या विलोकी स्वयें खान ।
ह्मणे वैभव आणि धन । शिवें कोठून मेळविलें ॥ २८ ॥
तऱ्हेतऱ्हेचे अमोल पदार्थ । शिवें केले संगृहीत ।
एवढें वैभव खचित । बादशहातें नाहींच ॥ २९ ॥
मग मनीं खान बोलत । शिवाजी होऊन मदोन्मत्त ।
लूट करून बादशाहींत । अपार धन मेळवितो ॥ ३० ॥
आतां त्याची सद्दी फिरली । अनिष्ट वेळ जवळ आली
मज वीराशीं गांठ पडली । जिवंत धरून नेईन ॥ ३१ ॥
भेटावया शिवनृपाळा । खान झाला उताविळा ।
पंतास ह्मणे ते वेळां । शीघ्र आणीं शिवाजी ॥ ३२ ॥
पंत बोले मधुरोत्तर । क्षणैक आपण धरावा धीर ।
शिवाजी येईल सत्वर । आपणांतें भेटावया ॥ ३३ ॥
ऐसा क्षणएक लोटला । तों शिवराव समीप आला ।
खानें दुरून देखिला । शिवभूपाळ येतसे ॥ ३४ ॥

सय्यद सेवक शस्त्रपाणी । सावध फिरतो खानामागुनी ।
हें अवलोकिलें दुरूनी । शिवरायें सुजाणें ॥ ३५ ॥
सशस्त्र सेवक पाहिला । शिवराय तेथेंच दबकला ।
खान मनांत विशंकला । शिवाजी न ये ह्मणूनी ॥ ३६ ॥
कृष्णाजी भास्कर पुढें झाला । खानास येऊन भेटला ।
खान बोले शिवाजी थांबला । काय कारण सांगावें ॥३७॥
खानापुढें नम्र होऊन । पंत बोले मधुर वचन ।
शिवाजी सर्वस्वीं शरण । तुह्मांलागीं येतसे ॥ ३८ ॥
बहुत भीरू त्याची प्रकृती । त्यास शस्त्राची वाटते भीती ।
स्तब्ध झालासे संप्रती । सशस्त्र सेवक पाहुनी ॥ ३९ ॥
शौर्यहीन धैर्यहीन । आह्मी हिंदू शक्तीहीन ।
तुमचा सशस्त्र योद्धा पाहून । शिवाजी भय पावला ॥४०॥
तरी आतां समय पहावा । सशस्त्र वीर दूर करावा ।
कार्यभाग सिद्धीस न्यावा । भेट देऊन कृपेनें ॥ ४१ ॥
अफ्जुलखान भरीं भरला । दुर्विधीनें मोह घातला ।
अविवेकें मतिभ्रष्ट झाला । सुविचार नाठवे ॥ ४२ ॥
खान बोले हास्य करून । शिवाजी येतसे काय शरण ।
दूर करितों भय कारण । क्षणमात्रें तयाचें ॥ ४३ ॥
मग सेवकास आज्ञापून । दूर घालवी खान तेथून ।
परम उत्कंठित होऊन । वाट पाहे नृपाची ॥ ४४ ॥
सशस्त्र सेवक गेला दूर । ऐसें पाहतां नृपवर ।
पुढें येऊन सत्वर । खानानिकट पातला ॥ ४५ ॥
अफ्जुलखान बलोद्धत । भव्य शरीर शक्तिवंत ।
उग्रत्वें कालसम दिसत । प्रचंड पर्वतासारिखा ॥ ४६ ॥

मदोन्मत्त द्वादशमहिष । तयां इतुकें बळ खानास ।
भुजायुद्धीं दुर्जय सर्वांस । ऐसा खान प्रतापी ॥ ४७ ॥
शिवाजीची लहान मूर्ती । सकुमार दिसे अंगकांती ।
तयापाहून यवन चित्तीं । अत्यानंद उचंबळला ॥ ४८ ॥
मनीं ह्मणे हा दिसे निर्बल । आह्मी तरी अत्यंत सबळ ।
याच्या नाशास एक पळ । लागणार नाहीं आह्मांतें ॥४९॥
शिवराय संनिध पातला । खान तया निकट आला ।
कठिणसमय प्राप्त झाला । काय होणार कळेना ॥ ५० ॥
हास्य करून बोले खान । तूंच काय शहाजीनंदन ।
मूर्खपणें हांव धरून । काय कर्में करितोस ॥ ५१ ॥
न लागतां एक क्षण । तुजशीं मी शिक्षा लावीन ।
परी आतां आलास शरण । चित्तीं विवेक करूनी ॥ ५२ ॥
रहावें वाटतें मित्रपणें । तरी आतां भेटूं सन्मानें ।
नम्रपणें कार्य साधणें । हेंच योग्य तुजलागीं ॥ ५३ ॥
अफजुलखानें ऐसें बोलून । दोन्ही भुजा त्वरें पसरून ।
रायास धरिलें कंवटाळून । वरी प्रेम दावुनी ॥ ५४ ॥
घ्यावा शिवरायाचा प्राण । ऐसा मनीं निश्चय करून ।
उभयहस्तें आंवळून । नृपास रगडूं लागला ॥ ५५ ॥
तंव तो नृपवीर चूडामणी । काय करी तेचक्षणीं ।
अस्तनींतून कट्यार काढुनी । हस्तीं घेता जाहला ॥ ५६ ॥
अफजुलखानाचें पुष्ट उदर । त्यांत खुपशी नृप कट्यार ।
तैशींच वाघनखें सत्वर । रोंवून आंतडीं ओढिलीं ॥ ५७ ॥
शिवनृपाळ परम चपळ । न लावितां एकही पळ ।
उदर विदारून सकल । खान केला घाबरा ॥ ५८ ॥

दगा दगा खान ओरडे । मुक्ततेसाठीं धडपडे ।
शिवरायें दाबून नरडें । शरीरीं प्रहार चालविले ॥ ५९ ॥
राव वदे तूं मत्तमहिष । मद्यमांसें पुष्टलास ।
तुझा बळी देऊन देवीस । तुष्ट करीन तिजप्रती ॥ ६० ॥
यवनाचें बल अद्भुत । घाव सोसून उडे त्वरित ।
शिरला आपुल्या शिबिकेंत । धांवा धांवा ह्मणूनी ॥ ६१ ॥
शिबिकावाहक होते जवळ । त्यांनीं पाहून कठिण वेळ ।
न लावितां एक पळ । शिबिका घेऊन धांवले ॥ ६२ ॥
जिवबा महाली रणशूर । खड्ग उपसून धांवला सत्वर ।
शिबिकावाहकांचे पायांवर । घाव घाली त्वरेनें ॥ ६३ ॥
तटतटा पाय तुटून पडती । वाहक शिबिका खालीं टाकिती ।
परम दुःखें हांक फोडिती । घात घात ह्मणूनी ॥ ६४ ॥
शिवमहाराज पंचानन । खड्ग उपसून आला धांऊन ।
अफ्जुलखानाचें शीर कापून । धरणीवरी पाडिलें ॥ ६५ ॥
सय्यद होता दूर ठेविला । त्यानें तेथून गलबला ऐकिला ।
त्वरा करून धांऊन आला । शिवराया सन्निध ॥ ६६ ॥
अफ्जुलखानाचें शीर कापिलें । तें सय्यदें दुरून पाहिलें ।
चित्त त्याचें क्रोधावलें । स्वामिभक्तीनें तेधवां ॥ ६७ ॥
उपसून तीक्ष्ण तरवार । नृपावरी धांवला सत्वर ।
ह्मणे तुजला मारून ठार । सूड घेईन ये क्षणीं ॥ ६८ ॥
सबल हस्तें प्रहार केला । चपलत्वें रायें चुकविला ।
पुन्हां सांवरून खड्गाला । नृपतीवरी धांवतसे ॥ ६९ ॥
रोंखून नृपाचा कंठनाळ । सय्यद उगारी खड्ग निर्मळ ।
आतां कैसा वांचेल नृपाल । काळजी सर्वां वाटली ॥ ७० ॥

सय्यदें करावा जो प्रहार । तंव जिवबा धांवला सत्वर ।
पळ एक न लावितां उशीर । यवन हस्त तोडिला ॥ ७१ ॥
सशस्त्र हस्त उडून पडला । सय्यद धरणीवरी कोसळला ।
एवं विजय प्राप्त झाला । शिवरायातें तेधवां ॥ ७२ ॥
अफ्जुलखानाचें शीर कापिलें । शिवराय यशस्वी झाले ।
मग नृपें काय केलें । तये समयीं परिसावें ॥ ७३ ॥
स्वसैनिकां कळावया खूण । उल्हाटयंत्र दिधलें सोडून ।
तो भयंकर ध्वनी परिसून । सैनिकां खूण समजली ॥७४॥
झाला झाला ध्वनी ह्मणती । शत्रुनाश झाला निश्चिती ।
सकल वीरांचे बाहु स्फुरती । वीरमदें करूनी ॥ ७५ ॥
तानाजी मोरोपंतादि सैनिक । सकल वीरांस मारून हांक ।
ह्मणती आतां चला निःशंक । सैन्यावरी शत्रूच्या ॥ ७६ ॥
हरहरमहादेव ऐसें गर्जून । भाले खड्ग पडताळून ।
महाराष्ट्रवीर चालले धांऊन । वीरोत्साहें तेधवां ॥ ७७ ॥
जावलीपासून वांईपर्यंत । यवनसैन्य होतें अव्यवस्थित ।
त्यावरी ओढवला कल्पांत । एकाएकीं तेधवां ॥ ७८ ॥
शिवाजी खानास शरण आला । युद्धप्रसंग सहज टळला ।
हें वृत्त यवन सैन्याला । कळलें होतें पूर्वींच ॥ ७९ ॥
यास्तव होऊन निर्भय चित्त । सैन्य राहिलें अस्ताव्यस्त ।
सर्व होऊन शस्त्ररहित । होते आनंदें राहिले ॥ ८० ॥
कोणी झाले निद्रावश । कोणी करितां भोजनास ।
कोणी मिजासी सावकाश । होते तमाखू ओढित ॥ ८१ ॥
गप्पागोष्टी कोणी सांगती । कोणी नाना क्रीडा करिती ।
कोणी मार्गांमाजी लोळती । मद्यें मत्त होउनी ॥ ८२ ॥

गज अश्वांचे नाना मेळे । होते ठायीं ठायीं बांधिले ।
महात राउत स्वस्थ राहिले । एकीकडे सहजची ॥ ८३ ॥
बर्च्या तरवारी संगिनी भाले । होते स्थळीं स्थळीं आडकाविले ।
यवन सरदार होते गुंतले । मद्यसेवनीं तेधवां ॥ ८४ ॥
ऐशी असावध असतां मंडळी । मराठ्यांची फौज लोटली ।
एकाएकीं गर्दी केली । सैन्यावरी तियेनें ॥ ८५ ॥
उद्भट योद्धे महाराष्ट्र जन । त्याहीवरी चढलें स्फुरण ।
अनर्थ ओढवला दारुण । यवनांवरी तेधवां ॥ ८६ ॥
महाराष्ट्र वीर प्रहार करिती । चरचरां शिरकमळें कापिती ।
पळों लागतां भाले मारिती । अवकाश नाहीं क्षणाचा ॥ ८७ ॥
एकाएकीं पडला घाला । यवन सैन्यीं आकांत झाला ।
सकल सैन्याचा धीर सुटला । न सुचे उपाय कोणासी ॥ ८८ ॥
मोरोपंत ससैन्य घुसला । तानाजीनें अनर्थ मांडिला ।
यवन आक्रंदती ते वेळा । तोबा तोबा ह्मणूनी ॥ ८९ ॥
इतुक्यांत सैन्यीं शब्द उठला । अफ्जुलखानाचा वध झाला ।
तो ऐकतां सकल सैन्याला । प्रळय काळ वाटला ॥ ९० ॥
नाश पावला मुख्य सरदार । द्यावया नाहीं कोणी धीर ।
काळासारिखे महाराष्ट्र वीर । शत्रु संहार चालविती ॥ ९१ ॥
झाला एकचि हलकल्होळ । भंग पावलें यवन बळ ।
शिव नृपाचें दैव सबळ । महद्यश लाभलें ॥ ९२ ॥
सहस्त्रावधी सैनिक यवन । धारा तीर्थीं पावले पतन ।
उरले ते दांतीं तृण । धरून शरण पातले ॥ ९३ ॥
गज अश्व शोभिवंत । यांचा झाला नाश बहुत ।
यवन सैन्य पराभूत । ऐशापरी जाहलें ॥ ९४ ॥

अश्व गज संपदा बहुत । झाली सहज हस्तगत ।
मग पुढें होऊन मोरोपंत । एकत्र करी संपदा ॥ ९५ ॥
तृण धरून शरण आले । त्यांस जिवदान पंतें दिधलें ।
अश्व गज धन हस्तगत केलें । शिवराया कारणें ॥ ९६ ॥
दोन शतकें गज मिळाले । सप्त सहस्र अश्व हातीं आले ।
चारशें उष्ट्र प्राप्त झाले । मोरोपंतासीं तेधवां ॥ ९७ ॥
नाना रत्नें जड जवाहीर । मोहोरा पुतळ्या रुपये अपार ।
दाग दागिने वसनें सुंदर । सहज हातीं लागलीं ॥ ९८ ॥
अफ्जुलखानाची पुत्रकांता । घोर प्रसंगीं पळत असतां ।
लागली तानाजीचे हाता । तेणें रक्षून ठेविली ॥ ९९ ॥
यापरी थोर यश संपादून । प्राप्त द्रव्य सर्व घेऊन ।
मोरोपंतादि सैनिक गण । शिव दर्शना निघाले ॥ १०० ॥
श्रीशिवविजय ग्रंथ । शिवावतार चरित्र अद्भुत ।
वर्णन करी भावें अनंत । द्वादशाध्याय गोड हा ॥ १०१ ॥
॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

# अध्याय १३ वा.

॥ श्रीगणेशायनमः ॥

करीत रण वाद्यांचा गजर । रायासमीप आले महाराष्ट्र वीर ।
विजयोत्साहें नृपवर । अत्यानंद पावला ॥ १ ॥
सकल वीरांशीं गोड बोलून । मधुर शब्दें नांवाजून ।
मग पुढें शहाजीनंदन । काय करिता जाहला ॥ २ ॥
अफजुलखानाचें शीर घेऊन । जय भवानी ऐसें गर्जून ।
दत्ताजीपंतासह सैनिक गण । सर्व घेऊन मुरडला ॥ ३ ॥
वाद्यें वाजती सुस्वरीं । वीर गर्जती परोपरी ।
जय ध्वनी दुमदुमला अंबरीं । नादें निराळ कोंडलें ॥ ४ ॥
ऐशा गजरें शिव नृपती । प्राप्त झाला दुर्गाप्रती ।
विजय तेजें शिव मूर्ती । तदा बहुत शोभली ॥ ५ ॥
राजपथीं स्वारी चालली । नागरिकांची गर्दी लोटली ।
जन मनें संतुष्ट झालीं । शिव मूर्ती देखुनी ॥ ६ ॥
शिव नृपाचें सुंदर वदन । पाहून नागरिक स्त्रीजन ।
सुवर्ण पुष्पें करें उडवून । गौरव करिती रायाचा ॥ ७ ॥
ऐशा गजरें शिव नृपती । पातला देवगृहाप्रती ।
रायें धांव घेऊन पुढती । नमन साष्टांगीं घातलें ॥ ८ ॥
उभा राहून देवीसमोर । उभय हस्त जोडी नृपवर ।
अंतरीं आलासे गहिंवर । तये वेळीं नृपतीतें ॥ ९ ॥
ह्मणे जय जय कुलस्वामिणी । देवी अंबिके माते भवानी ।
तुवां मजवरी कृपा करूनी । महद्यश अर्पिलें ॥ १० ॥

मज निर्बलास पुढें करून । नाश पावविलास बलाढ्य यवन ।
मज आणिलें संरक्षून । तूंच आज कृपाकरें ॥ ११ ॥
किती करावी तव स्तुती । आह्मी मानव अल्पमती ।
ऐशीच सदैव आह्मावरती । तुझी कृपा असावी ॥ १२ ॥
शिवरायें ऐसें बोलून । पुनरपी केलें साष्टांगनमन ।
मग राव तेथून निघून । अंतर्गृहीं प्रवेशला ॥ १३ ॥
जिजाऊ माता परम स्नेहाळ । पुत्रदर्शनार्थ होती उतावेळ ।
ह्मणे केव्हां भेटेल माझें बाळ । बहुत श्रमीं झालेलें ॥ १४ ॥
शिवराय येऊन धांवत । करिता झाला साष्टांग प्रणिपात ।
मातृनयनीं अश्रु लोटत । येत गहिंवर प्रेमानें ॥ १५ ॥
बोले माता स्फुंदस्फुंदून । बाळा ऊठ पाहूंदे वदन ।
सखया आलास भागून । बैस अंकीं सुखानें ॥ १६ ॥
व्याघ्रमुखांतून परतलास । कीं कालदंष्ट्रेतून निघालास ।
कुलस्वामिणीनें दिधलें यश । तुजलागीं शिवबाळा ॥ १७ ॥
हस्तीं धरून नृप उठविला । परम वात्सल्यें हृदयीं धरिला ।
प्रेमाश्रूंचा अभिषेक केला । नृपावरी मातेनें ॥ १८ ॥
मधुर वचनें राव बोले । माते तव आशिर्वादें संरक्षिलें ।
त्वत्कृपेनें शत्रु निर्दाळिले । महत्पुण्याई तूमची ॥ १९ ॥
माता ह्मणे पापीचंडाळ । यांची तुजला दृष्ट लागेल ।
अहा हे तव मुखकमल । काय रम्य दिसतसे ॥ २० ॥
दहींभातादि पदार्थ आणून । शिवनृपतीच्या मुखावरून ।
माता टाकी ओंवाळून । दृष्टिदोष जावया ॥ २१ ॥
मग तो यशस्वी शहाजीनंदन । वेगें सभास्थानीं जाउन ।
पाचारी सकळ सैनिकगण । सभास्थानीं भेटावया ॥ २२ ॥

तानाजी सूर्याजी मोरोपंत । गंगाजी मंगाजीपंत रघुनाथ ।
आण्णाजी सुभानजी कृष्णाजीपंत । सकल वीर पाचारिले ॥ २३ ॥
कृष्णाजी सुभानजी नाईक शूर । बाळकृष्णपंत मुजुमदार ।
परम चतुर सोनोपंत डबीर । सभास्थानीं पातले ॥ २४ ॥
संपूर्ण महाराष्ट्रवीर एकवटले । सभास्थानीं जमा झाले ।
जयजयकार तयेवेळे । सर्व करिती रायाचा ॥ २५ ॥
मग रायें काय केलें । दत्ताजीपंतास पाचारिलें ।
आपणांनिकट बैसविलें । बहुत सन्मानें गौरवुनी ॥ २६ ॥
राव सर्वांस संबोधून । बोलता झाला गंभीरवचन ।
ह्मणे शूरहो तुह्मी प्रताप करून । अपार यश मेळविलें ॥ २७ ॥
अपार विक्रम तुह्मी दाविला । ह्मणून विजय प्राप्त झाला ।
दुष्ट म्लेंच्छ नाश पावला । मम हस्तें वीर हो ॥ २८ ॥
तुह्मी एकनिष्ठ सर्वजण । तशांत भवानीचें वरप्रदान ।
त्याहीवरी गुरुकृपा पूर्ण । मग काय संदेह विजयाचा ॥ २९ ॥
अशीच निष्ठा नित्य ठेवाल । तरी दिवसेंदिवस उत्कर्ष होईल ।
स्वराज्यवृद्धी पावेल । अल्पकाळा माझारीं ॥ ३० ॥
नृपतीचा भाषणौघ संपला । जयजयकाराचा ध्वनी उठला ।
मग मोरोपंत पुढें झाला । विनयें उत्तर द्यावया ॥ ३१ ॥
पंत बोले मधुर बोल । शत्रू होता महा प्रबल ।
परी तव पुण्याईचें बळ । नाश करी तयाचा ॥ ३२ ॥
श्रीकृष्णें कंस मर्दिला । कीं भीमें कीचक वधिला ।
तैसेंच मारून अफजुलाला । तूं यशस्वी झालास ॥ ३३ ॥
प्रबल शत्रूचें झालें निधन । तुझा तूंच तया कारण ।
आह्मांस देशी मोठेंपण । कशाकारणें नृपवरा ॥ ३४ ॥

आह्मी सर्व तुझे किंकर । असों तवाज्ञेंत तत्पर ।
आह्मांवरी कृपा अपार । सर्वदा तुझी असावी ॥ ३५ ॥
शिवराय चतुर सुजाण । दत्ताजीपंताकडे वळून ।
ह्मणे या सर्व यशास कारण । पंत आपण जाहलां ॥३६॥
धरून स्वधर्माभिमान । सहाय झालेत आह्मास आपण ।
ह्मणून हें संकट दारुण । टळलें आजचें निश्चयें ॥ ३७ ॥
हिंवरें नामक सुंदर ग्राम । तो आपणांस देतों इनाम ।
तुह्मीं चतुर गुणधाम । स्वीकार याचा करावा ॥ ३८ ॥
मग इनाम पत्र लिहवून । त्यावरी राजमुद्रा स्वयें करून ।
दत्ताजीपंतास करी अर्पण । शिवराय ते काळीं ॥ ३९ ॥
मधुर वाणी पंत बोले । तुह्मी धर्मरक्षण अंगिकारिलें ।
पुण्य प्रतापें यश आलें । आमुचें साह्य कायसें ॥ ४० ॥
आमुचा करून फार सन्मान । दिधलें इनामपत्र करून ।
तवाज्ञा आह्मां प्रमाण । करितों स्वीकार आनंदें ॥ ४१ ॥
शिवराव परम उदार । वस्त्रें भूषणें आणून अपार ।
नांवाजून सकळ वीर । अर्पण करी सर्वांतें ॥ ४२ ॥
सुवर्ण कटकें मुक्ताहार । कंठ्या चौकडे पोंच्या सुंदर ।
मोहोरा पुतळ्या होन अपार । राव देई सर्वांतें ॥ ४३ ॥
जैसा ज्याचा विक्रम झाला । तैसें बक्षिस दिधलें तयाला ।
हर्ष वाटे अवघ्यांला । शिवरायाच्या कृतीनें ॥ ४४ ॥
अफ्जुलखानाची कांता कुमर । होतीं आणिलीं गडावर ।
तयांसही तो शिव नृपवर । वस्त्राभरणें समर्पी ॥ ४५ ॥
नाना परी गोड बोलून । त्यांचें करी समाधान ।
मग तयांची मुक्तता करून । जाऊं दिलीं विजापुरीं ॥४६॥

शिवरायाची पुण्यकृती । अवघे सभाजन वर्णिती ।
धन्य धन्य भूप ह्मणती । दीन दयाळ धर्मात्मा ॥ ४७ ॥
इतुक्यांत 'रघुवीर' शब्द उठला । सत्गुरू तये स्थळीं पातला ।
शिवराव परम आनंदला । गुरु दर्शन होतांची ॥ ४८ ॥
प्रथम करून साष्टांग नमन । मग वरासनीं गुरूस बसवून ।
राव यथाविधी करी पूजन । सत्गुरूचें भक्तीनें ॥ ४९ ॥
मग उभय हस्त जोडून । ह्मणे तुमची कृपा पूर्ण ।
ह्मणून शत्रुनाश होऊन । अपार यश मिळालें ॥ ५० ॥
सत्गुरू बोले गंभीर बोल । तूं नृपाल पुण्यशील ।
धर्मस्थापना कार्य करशील । अल्पकाळा माझारीं ॥ ५१ ॥
तूं उदार भाग्यवंत । उत्तम पुरुष गुणीं युक्त ।
धन्य होशील जगत्रयांत । पुण्य प्रतापें करूनी ॥ ५२ ॥
उत्तम पुरुषें कैसें वागावें । तें सांगेन आतां स्वभावें ।
नीट अवधान असों द्यावें । शिवराया सच्छिष्या ॥ ५३ ॥
"आपण यथेष्ट जेवणें । उरलें अन्न तें वाढणें ।
परंतु वायां दवडणें । हा धर्म नव्हे ॥ ५४ ॥
तैसें ज्ञानी तृप्त व्हावें । तोंचि ज्ञान जनांस सांगावें ।
परी बुडों न द्यावें । बुडतयासी ॥ ५५ ॥
उत्तम गुण स्वयें घ्यावे । ते बहुतांस सांगावे ।
वर्तल्याविण बोलावे । ते शब्द मिथ्या ॥ ५६ ॥
स्नानसंध्या देवतार्चन । एकाग्र करावें जपध्यान ।
हरिकथा निरूपण । केलें पाहिजे ॥ ५७ ॥
शरीर परोपकारीं लावावें । बहुतांच्या कार्यास यावें ।
उणें पडों न द्यावें । कोणी एकाचें ॥ ५८ ॥

आडलें गांजलें जाणावें । यथाशक्ती कामास यावें ।
मृदु वचन बोलत जावें । कोणी एकासी ॥ ५९ ॥
दुसऱ्यांचे दुःखें दुःखी व्हावें । परसंतोषें सुखी व्हावें ।
प्राणिमात्र मेळवून घ्यावे । बरव्या शब्दें ॥ ६० ॥
बहुतांचे अन्याय क्षमावे । बहुतांचे कार्यभाग करावे ।
आपल्यापरी व्हावे । परखे जन ॥ ६१ ॥
दुसऱ्याचें अंतर जाणावें । तदनुसारचि वर्तावें ।
लोकांस परीक्षित जावें । नानाप्रकारें ॥ ६२ ॥
नेमकेंचि बोलावें । तत्काळचि प्रतिवचन द्यावें ।
कदापि रागास न यावें । क्षमारूपें ॥ ६३ ॥
आळस अवघाच दवडावा । यत्न उदंडाचि करावा ।
शब्दमत्सर न करावा । कोणी एकाचा ॥ ६४ ॥
उत्तम पदार्थ दुसऱ्यास द्यावा । शब्द निवडून बोलावा ।
सावधपणें करीत जावा । संसार आपुला ॥ ६५ ॥
मरणाचें स्मरण असावें । हरिभक्तीसी सादर व्हावें ।
मरोन कीर्तीस उरवावें । येणेंप्रकारें ॥ ६६ ॥
नेमकपणें वर्तों लागला । तो बहुतांस कळों आला ।
सर्व आर्जवी तयाला । काय उणें ॥ ६७ ॥
ऐसा उत्तमगुणीं विशेष । तयास ह्मणावें पुरुष ।
जयाच्या भजनें जगदीश । तृप्त होय ॥ ६८ ॥
उदंड धिःकारून बोलती । तरी चळों न द्यावी शांती ।
दुर्जनासि मिळोन जाती । धन्य ते साधू ॥ ६९ ॥
उत्तम गुणीं शृंगारिला । ज्ञानवैराग्यें शोभला ।
तोचि एक जाणावा भला । भूमंडळीं ॥ ७० ॥


स्वयें आपण कष्टावें । बहुतांचें सोशीत जावें ।
झिजून कीर्तीस उरवावें । नाना प्रकारें ॥ ७१ ॥
कीर्ती पाहूं जातां सुख नाहीं । सुख पाहता कीर्ती नाहीं ।
विचारेंवीण कोठेंचि नाहीं । समाधान ॥ ७२ ॥
परांतरास न लावावा ढका । कदापि पडों न द्यावा चुका ।
क्षमाशीळें तयाचा तुका । कोण नाहीं ॥ ७३ ॥
आपलें अथवा परावें । कार्य अवघेंचि करावें ।
प्रसंगीं कामास चुकावें । हें विहित नव्हे ॥ ७४ ॥
बरें बोलतां सुख वाटतें । हें तों प्रत्यक्ष कळतें ।
आत्मवत् परावेंतें । मानीत जावें ॥ ७५ ॥
कठिण शब्दें वाईट वाटतें । हे तों प्रत्ययास येतें ।
तरी मग वाईट बोलावें तें । काय निमित्त ॥ ७६ ॥
आपणासची मोडा घेतला । तेणें कासावीस झाला ।
आपणावरून दुसऱ्याला । राखीत जावें ॥ ७७ ॥
जे दुसऱ्यास दुःख करी । ते अपवित्र वैखरी ।
आपणास घात करी । कोणीएक प्रसंगीं ॥ ७८ ॥
पेरलें उगवतें । बोलण्यासारिखें उत्तर येतें ।
तरी मग कर्कश बोलावे तें । काय निमित्त ॥ ७९ ॥
आपुल्या पुरुषार्थ वैभवें । बहुतां सुखी करावें ।
परंतु कष्टी करावें । हे राक्षसी क्रिया ॥ ८० ॥
दंभदर्प अभिमान । क्रोध आणि कठिण वचन ।
हें अज्ञानाचें लक्षण । भगवद्गीतेंत बोलिलें ॥ ८१ ॥
जो उत्तमगुणें शोभला । तोचि पुरुष महाभला ।
कित्येक लोक तयाला । शोधीत फिरती ॥ ८२ ॥

क्रियेवीण शब्दज्ञान । तेंचि श्वानाचें वमन ।
भले तेथें अवलोकन । कदापि न करिती ॥ ८३ ॥
मनापासून भक्ती करणें । उत्तम गुण अगत्य धरणें ।
तया महापुरुषाकारणें । धुंडीत येती ॥ ८४ ॥
ऐसा जो महानुभाव । तेणें करावा समुदाव ।
भक्तियोगें देवाधिदेव । आपुला करावा ॥ ८५ ॥
आपण अवचितें मरोन जावें । मग भजन कोणें करावें ।
याकारणें भजनास लावावे । बहुत लोक ॥ ८६ ॥
जेणें बहुतांस घडे भक्ती । ते हे रोकडी प्रबोधशक्ती ।
बहुतांचे मनोगत हातीं । घेतलें पाहिजे ॥ ८७ ॥
बोलण्यासारिखें चालणें । स्वयें करून बोलणें ।
तयांचीं वचनें प्रमाणें । मानिती जनीं ॥ ८८ ॥
जें जनास मानेना । तें आपुले न ये मना ।
आपण एकला जन नाना । सृष्टीमध्यें ॥ ८९ ॥
बहुतांसी भांडतां एकला । सैन्यावांचून पुरवला ।
या कारणें बहुतांला । राजी राखावें" ॥ ९० ॥
ऐसें उत्तम गुणांचें लक्षण । शिवराया तूं चतुर सगुण ।
यास्तव तुझे हस्तें करून । धर्मवृद्धी होईल ॥ ९१ ॥
कर्ता करविता परमेश्वर । हा चित्तीं ठेव विचार ।
अहंता ममता राखीं दूर । तरीच सौख्य होईल ॥ ९२ ॥
विजयें मन आनंदेल । तरी अपजयें दुःख होईल ।
यास्तव जय अपजय सकल । ईश्वरास अर्पावे ॥ ९३ ॥
निमित्त मात्र सर्व जन । कर्ता एक नारायण ।
यास्तव टाकून अभिमान । कर्तव्य कर्मे करावीं ॥ ९४ ॥

परमेश यश देईल । याहून महद्यश लाघेल ।
महाराष्ट्रराज्य वाढेल । तव हस्तें बालका ॥ ९५ ॥
यापरी उपदेशामृत पाजून । रायास देऊन आशीर्वचन ।
गुरू पावले अंतर्धान । प्रतापगडावरूनी ॥ ९६ ॥
धन्य भाग्य महाराष्ट्र देश । शिवरूपें दैव आलें उदयास ।
पार नाहीं आनंदास । तया काळीं स्वदेशीं ॥ ९७ ॥
संपली अफ्जुलखान वध कथा । जी ऐकून आनंद समस्तां ।
वीरश्री स्फुरेल तत्वतां । महाराष्ट्रजनां माझारीं ॥ ९८ ॥
शिव नृपतीचें चरित्र सुरस । त्यांतही अफ्जुलखान वध विशेष ।
ह्मणून वर्णिलें सावकाश । विस्तारपूर्वक या देशीं ॥ ९९ ॥
हा नव्हे अफ्जुलखान वध । महाराष्ट्र वैभवाचा पाया शुद्ध ।
शिव नृपतीचा संबंध । वेगळा झाला येथुनी ॥ १०० ॥
पूर्वीं शिवराया कारणें । होतीं जनांचीं साशंक मनें ।
निरनिराळीं अनुमानें । करीत होते सर्वही ॥ १०१ ॥
दरवडेखोर कोणी ह्मणती । कोणी मूर्ख अविचारी बोलती ।
कोणी निश्चित अनुमान करिती । कीं नाश पावेल हा ॥ १०२ ॥
जे कां राष्ट्रीं विचारी जन । तेज जाणती हा सुलक्षण ।
करील धर्म संरक्षण । दुष्ट यवनां दंडुनी ॥ १०३ ॥
ऐसे निरनिराळे विचार । करीत होते लोक समग्र ।
नाश पावतां अफ्जुलखान वीर । सर्व विकल्प विराले ॥ १०४ ॥
एक झाली महाराष्ट्र मंडळी । ह्मणती हा कैलासनाथ शशिमौळी ।
अवतरलासे भूमंडळीं । धराभार हरावया ॥ १०५ ॥
सकळ देश एकवटला । वीरश्री मदें फार भरला ।
देव मानून शिवरायाला । तदाज्ञेनें वर्तती ॥ १०६ ॥

हें अफ्जुलखान वध कथानक । श्रवण करितां भक्तिपूर्वक ।
पापें दग्ध होतीं सकाळिक । भवानीकृपेनें निश्चयें ॥१०७॥
त्रिवार भक्तांनें वाचितां । शत्रुनाश होईल तत्वतां ।
सतत आवर्तन करितां । नित्य विजय होईल ॥ १०८ ॥
श्रीशिवविजय ग्रंथ । शिवावतार कथा अद्भुत ।
वर्णन करी भावें अनंत । त्रयोदशाध्याय गोड हा ॥१०९॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥



# अध्याय १४ वा.

॥ श्रीगणेशायनमः ॥

अफजुलखानाचें पारिपत्य झालें । रायास अपार यश लाधलें ।
आतां पुढें कैसें वर्तलें । श्रोतीं सादर परिसावें ॥ १ ॥
प्रतापगडीं स्वसौधांत । राव असतां एकदां निद्रित ।
कुलस्वामिनी येऊन स्वप्नांत । आज्ञा करी रायातें ॥ २ ॥
बाळा तुजला साह्य केलें । अफजुलखानास मारविलें ।
थोर यश मिळवून दिधलें । तुजप्रती बाळका ॥ ३ ॥
पुढेंही असती उदंड कारणें । आहे धर्माचा उद्धार करणें ।
यास्तव प्रतापगडीं राहणें । अवश्य असे मजलागीं ॥ ४ ॥
तरी न लावितां उशीर । येथें देवालय बांधीं सुंदर ।
मूर्ती सिद्ध करून सत्वर । माझी स्थापना करावी ॥ ५ ॥
यापरी स्वप्नीं आज्ञापून । देवी पावली अंतर्धान ।
शिवराव जागृत होऊन । स्वप्न कथी समस्तां ॥ ६ ॥
कुलस्वामिणीची आज्ञा झाली । ती नृपें सकळां कळविली ।
त्वरें सिद्धता चालविली । भवानीचे मंदिराची ॥ ७ ॥
सुंदर देवालय बांधून । गंडकीहून आणिला पाषाण ।
उत्तम मूर्ती सिद्ध करून । विध्युक्त केली स्थापना ॥ ८ ॥
पुजारी पुराणीक हवालदार । वाजंत्री गवयी मुजुमदार ।
इत्यादि अधिकारी समग्र । देवस्थानीं नेमिले ॥ ९ ॥
नाना भोजनें अलंकार । देवीस अर्पी नृपवर ।
दानधर्म करूनि अपार । देवस्थान चालविलें ॥ १० ॥

देवी भवानी साक्षात । तदा येऊन राहिली तेथ ।
तुळजापुरीं होती दृष्टांत । याचपरी जनांस ॥ ११ ॥
कोणी असेल नवस केला । तो प्रतापगडीं पाहिजे फेडिला ।
तेथेंच मान्य होईल मजला । अन्यत्र नसे मी आतां ॥१२॥
यापरी रायाची कुलस्वामिनी । शंभुकांता देवी भवानी ।
प्रतापगडीं राहिली येउनी । रायास साह्य करावया ॥१३॥
यापरी वृत्त झालियावरी । मग तो शिवराय काय करी ।
सैन्य सिद्धता करून झडकरी । अन्य दुर्ग घेतसे ॥ १४ ॥
असाध्य दुर्ग नामें रांगणा । तैसाच द्वितीय दुर्ग खेळणा ।
स्वयें करून युद्धकंदना । दोन्ही दुर्ग साधिले ॥ १५ ॥
सुदृढ दुर्ग पन्हाळानामक । वश झाला तेथील नायक ।
आयास न पडतां कांहींएक । रायें दुर्ग साधिला ॥ १६ ॥
यापरी असाध्य दुर्ग बहुत । तैसाच भोंवतालचा प्रांत ।
नृपें केला हस्तगत । अल्पकाळा माझारीं ॥ १७ ॥
विजापुरीं वृत्त कळलें । राजदरबार भयभीत झालें ।
सकल मुत्सद्दी घाबरले । शिवप्रताप परिसुनी ॥ १८ ॥
उद्भटयोद्धा अफ्जुलखान । शिवाजीहस्तें पावला मरण ।
आतां प्रसंग दिसतो कठीण । ऐसें तयां वाटलें ॥ १९ ॥
शिवाजी बहुत युक्तिवंत । हस्तगत करितो मुलखप्रांत ।
आतां बादशाहीचा अंत । होणार ऐसें वाटतें ॥ २० ॥
यापरी भयें बोलती यवन । बादशहाही जाहला खिन्न ।
आकांत ओढवला दारुण । विजापुरीं तेधवां ॥ २१ ॥
मग शहानें दरबार केलें । सकळ मुत्सद्दी मेळविले ।
सर्वांचेही विचार घेतले । पुढील कार्याकारणें ॥ २२ ॥

यवनयोद्धा सिद्धी जोहर । महाप्रतापी समरधीर ।
तया आज्ञापी शहा सत्वर । शिवनृपास जिंकावया ॥२३॥
सर्वे घेऊन सैन्य अपार । त्वरें निघाला सिद्धीजोहर ।
ह्मणे प्रतापें शहाजीकुमर । मीच जिंकीन निश्चयें ॥ २४ ॥
पन्हाळा दुर्ग दुर्घट अत्यंत । त्यावरी होता शहाजीसुत ।
यवनें स्वीय सैन्यासहित । वेढा तया घातला ॥ २५ ॥
दुर्गावरून महाराष्ट्रवीर । करिती उल्हाटयंत्रांचे भडिमार ।
परी तें यवनसैन्य अपार । भंग न पावे सर्वथा ॥ २६ ॥
सिद्धीजोहर बलिष्ठ यवन । बैसला दुर्गास घेरा घालून ।
परस्परें रणकंदन । क्षणोक्षणीं होतसे ॥ २७ ॥
जोहराचें सैन्य बहुत । दुर्गीं कोंडिला शहाजीसुत ।
दुर्गामाजी वर्तला आकांत । उपाय कांहीं सुचेना ॥ २८ ॥
सभोंवार वेढा पडला । अन्नपाण्याचा दुष्काळ झाला ।
कल्पांत काळ दुर्गीं वाटला । महाराष्ट्रवीरां तेधवां ॥ २९ ॥
जरी जावें दुर्ग त्यजून । तरी न दिसे मार्ग कोठून ।
तैसेंच रहावें धीर धरून । तरी अन्न मिळेना ॥ ३० ॥
यापरी दुर्गीं पडला विचार । पुढें सरसावती यवनवीर ।
युद्धकुशल सिद्धीजोहर । लगट करी दुर्गावरी ॥ ३१ ॥
ऐसे लोटले कित्येक दिन । मग काय करी शहाजीनंदन ।
महाराष्ट्रवीर पाचारून । आज्ञा करी तयांतें ॥ ३२ ॥
यवनसैन्य बळावलें । आतां आपुला विचार न चले ।
तरी स्थान पाहिजे सोडिलें । नाना यत्नें करूनी ॥ ३३ ॥
तुह्मी चला धीर धरून । शत्रुसैन्याची फळी फोडून ।
आपण सुखरूप जाऊं निघून । भवानीचे कृपेनें ॥ ३४ ॥

मग तो शिवराय युक्तिवंत । जोहराप्रती संदेश धाडित ।
आह्मी हतवीर्य झालों प्रस्तुत । मैत्री करूं इच्छितों ॥३५॥
तुह्मी बलिष्ठ सरदार थोर । आह्मी तुमचे दीन किंकर ।
कृपा करून आह्मांवर । आमुचें रक्षण करावें ॥ ३६ ॥
संदेश यवनें परिसिला । अविचारें चित्तीं हर्षला ।
ह्मणे शिवाजी हस्तगत झाला । महद्यश लाधलें ॥ ३७ ॥
यवन कळवी शिवनृपास । तुह्मी यावें आमुच्या भेटीस ।
विचार करून सावकाश । सल्ला करूं आपण ॥ ३८ ॥
ऐकून यवनाचा निरोप । भेटीस निघाला शिवनृप ।
येतां शत्रुसैन्यासमीप । यवन सामोरा पातला ॥ ३९ ॥
यवन करी हर्षें स्वागत । मग दोघे करिती एकांत ।
मधुर भाषणें शिवनेरनाथ । प्रसन्न करी शत्रूसी ॥ ४० ॥
नानापरी बोलतां बोल । सहज जाहला सायंकाळ ।
मग बोले शिवनृपाळ । उंदईक येऊं परतुनी ॥ ४१ ॥
रात्रौ चित्तीं करून विचार । उदयीक ठरवूं साम प्रकार ।
तुह्मी कुलीन दयाळू थोर । सांभाळावें आह्मांतें ॥ ४२ ॥
यवन चित्तीं संतोषला । शिवरायास निरोप दिधला ।
नृपाळ दुर्गीं प्रवेशला । इष्टकार्य साधुनी ॥ ४३ ॥
यवनदळीं कळली मात । शिवाजी झाला हस्तगत ।
लोक झाले हर्षभरित । ह्मणती बरें जाहलें ॥ ४४ ॥
शिवनृपाळ शरण आला । युद्धप्रसंग सहज टळला ।
आपुला कार्यभाग साधला । अल्पकाळा माझारीं ॥ ४५ ॥
ऐसें वदती समस्त अविंध । रात्रीं राहिले असावध ।
दुर्गीं शिवराय स्वजनसुखद । काय करिता जाहला ॥४६॥

रात्र होतां एक प्रहर । सज्ज करी महाराष्ट्रवीर ।
सर्वांसह दुर्गाबाहेर । एकाएकीं पाडियेला ॥ ४७ ॥
यवनसैन्य अव्यवस्थित । त्यांशीं भिडला अकस्मात ।
शत्रुसैन्य दुभागून त्वरित । राव पुढें चालला ॥ ४८ ॥
रांगण्याचा मार्ग लक्षून । महाराष्ट्रवीर जाती धांवून ।
चकित झाले सर्व यवन । ऐसें कर्म पाहुनी ॥ ४९ ॥
धरा मारा यवन बोलती । एकमेकांस दोष देती ।
परस्परें कलह करिती । शत्रु गेला ह्मणूनी ॥ ५० ॥
गजबज उठली यवनदळीं । सज्ज झाली वीरमंडळी ।
सेनापतीस मात कळली । शत्रु पळाला ह्मणूनी ॥ ५१ ॥
परम क्रोधावला सिद्धीजोहर । ह्मणे शिवाजी घातकी चोर ।
आह्मांस ठकवून दुर्गाबाहेर । गेला पळूनि अवचित ॥५२॥
रणवाद्यांचा करून गजर । ससैन्य निघाला सिद्धीजोहर ।
गांठावया शहाजीकुमर । हांव धरिती दुरात्मे ॥ ५३ ॥
धरा धरा मुखें गर्जत । यवन सैन्य चालिलें त्वरित ।
मागें पाहतां शहाजीसुत । म्लेंच्छबल देखिलें ॥ ५४ ॥
रांगणा तीन कोस राहिला । यवनसैन्याचा लोट आला ।
तदा शिवनृपाळ बोलिला । निज वीरांस संबोधुनी ॥ ५५ ॥
समीप आली यवन पृतना । दूर राहिला दुर्ग रांगणा ।
आतां कराल रणकंदना । तरीच रक्षण होईल ॥ ५६ ॥
बाजी परभू शूर वीर । नृपास देई प्रत्युत्तर ।
आह्मी पराभवूं शत्रु समग्र । दुर्गीं जावें आपण ॥ ५७ ॥
आह्मी सेवक पुढें होऊन । पर दळास धरितों आडवून ।
शौर्यें करूं रणकंदन । तुवां जावें तोंवरी ॥ ५८ ॥

प्रसंग दिसतो परम कठिण । मारूं किंवा जाऊं मरून ।
तुंवां रांगण्यावरी जाऊन । सुखरूप रहावें ॥ ५९ ॥
भला भला राव बोले । तव भाषणें चित्त हर्षलें ।
ऐशा समयीं शौर्य दाविलें । तरीच धन्यत्व येईल ॥ ६० ॥
रिपु रोधावा धरून धीर । आह्मी जातों दुर्गावर ।
तुमचे साह्यार्थ सैन्य अपार । दुर्गावरून धाडितों ॥ ६१ ॥
सुखरूप पोंचतां दुर्गावर । तेथून करूं पांच बार ।
ती खूण पारिसतां सत्वर । निघून यावें ससैन्य ॥ ६२ ॥
यापरी सांगून शिव नृपाळ । पुढें चालिला उतावेळ ।
बाजीसहित महाराष्ट्रदळ । मार्ग रोखून राहिलें ॥ ६३ ॥
यवन सैन्य धांऊन आलें । महाराष्ट्रवीर सरसावले ।
तुंबळ युद्ध होऊं लागलें । उभयतांचें तेधवां ॥ ६४ ॥
अग्नियंत्राचे भडिमार होती । तीक्ष्ण खड्गांचे घाव करिती ।
परस्परांस भाले हाणिती । शौर्य दाविती अपार ॥ ६५ ॥
तटतटां तुटती कंठनाळ । रुधिर मांसाचा होय चिखल ।
परम क्रोधें उभय दळ । घोर संगर माजवी ॥ ६६ ॥
महाराष्ट्र वीर बलसागर । बाजी मिळाला त्यांस सरदार ।
पराभविती यवन वीर । अल्पकाळामाझारीं ॥ ६७ ॥
यवन दळ पुढें आलें । बाजी वीरें पराभविलें ।
असंख्य दळ मागून लोटलें । यवनांचें बाजीवरी ॥ ६८ ॥
सभोंवता घेरा देऊन । महाराष्ट्र जनां कोंडिती यवन ।
तीक्ष्ण शस्त्रे घेती प्राण । आकांत थोर प्रवर्तला ॥ ६९ ॥
शत्रु सैन्य असंख्यात । पाहून बाजी धाके मनांत ।
ह्मणे माझा स्वामी शिवनाथ । पावो सुखरूप गडावरी ॥ ७० ॥

स्वजनांप्रती धीर देत । शत्रु सैन्याचा रोध करीत ।
बाजी वीर प्रतापवंत । स्वामिनिष्ठा दाखवी ॥ ७१ ॥
यवन सेना बळावली । बाजी वीराचे सन्निध आली ।
महाराष्ट्र सेना भय पावली । प्राणसंकट ओढवलें ॥ ७२ ॥
हस्तीं घेऊन खड्ग प्रचंड । प्रताप करी बाजी उदंड ।
खड्गें करी खंड विखंड । यवन वीर स्वहस्तें ॥ ७३ ॥
यवन वीरांचा लोट आला । निर्वाण समय येऊन ठेपला ।
पृष्ठावरी घाव लागला । एकाएकीं बाजीच्या ॥ ७४ ॥
धैर्य धरून अश्व दावितां । शिरीं लागला भाला अवचितां ।
व्याकूळ होऊन बाजी तत्वतां । धरणीवरी पडियेला ॥७५॥
रांगण्याकडे मुख करून । बाजी पाहे डोळे लाऊन ।
ह्मणे माझा स्वामी शहाजीनंदन । पोंचला कीं सुखरूप ॥७६॥
धारातीर्थीं मरण येतें । बहूत मजला प्रिय वाटतें ।
परी मम मन गुंतून राहतें । नृप वार्ता परिसावया ॥७७॥
सुखरूप पोंचला शहाजीनंदन । ऐशी वार्ता कर्णीं परिसेन ।
तरीच जातील माझे प्राण । मानव देह सोडुनी ॥ ७८ ॥
स्वामिनिष्ठेचा झाला निकर । इतुक्यांत धडाडले पांच बार ।
बाजी वीराचा आनंदभर । न समाये ब्रह्मांडीं ॥ ७९ ॥
पोंचला पोंचला माझा धनी । परिसिले खुणेचे ध्वनी कानीं ।
आतां सुखें प्राण सोडुनी । स्वर्गलोकीं जाईन ॥ ८० ॥
बाजी वीरें ऐसें बोलून । राम नामाचा गजर करून ।
तत्काळ सोडिला आपुला प्राण । रणभूमिकेमाझारीं ॥८१॥
धन्य धन्य बाजी वीर । स्वामिनिष्ठा दाविली अपार ।
विमल यश उर्वीवर । चिरस्थायी ठेविलें ॥ ८२ ॥

सत्कीर्तीनें विश्व भरिलें । बाजी वीरें स्वकुल उद्धरिलें ।
महत् स्वामिकार्य साधिलें । प्राण देऊन आपुला ॥ ८३ ॥
स्वामिभक्त अंजनीकुमर । तैसाच आमुचा बाजी वीर ।
महाराष्ट्र मातेचें पवित्रोदर । शोभविलें तयानें ॥ ८४ ॥
बाजी वीराचा अंत झाला । शिवराय सुखरूप पोंचला ।
हें देखून महाराष्ट्रमेळा । फुटला चहूं दिशांकडे ॥ ८५ ॥
खिन्न झाले सर्व यवन । ह्मणती शिवाजी गेला हातुन ।
घोर संग्रामीं वीरगण । बहुत पतन पावले ॥ ८६ ॥
सेनापती सिद्धी जोहर । ह्मणे आलें अपेश थोर ।
आतां बादशहासमोर । जाऊं कोण्या मुखानें ॥ ८७ ॥
शिवाजीनें दगा केला । आतां सुस्थळीं असे राहिला ।
आमुचा अत्यंत नाश झाला । पुढें कैसें करावें ॥ ८८ ॥
यापरी अत्यंत दुःख करून । मागें फिरला मूर्ख यवन ।
शेष सैन्य सर्व घेऊन । परत गेला स्वस्थळीं ॥ ८९ ॥
शिवनृपाचें अरिष्ट टळलें । महद्यश रायास लाधलें ।
शत्रुसैन्य भंग पावलें । पुण्यप्रतापें नृपाच्या ॥ ९० ॥
समर्थ गुरूचें आशिर्वचन । भवानीचें वरप्रदान ।
स्वयें नृपती पुण्यपावन । कां न वरील जयश्री ॥ ९१ ॥
स्वदेशधर्माचा अभिमान धरून । तुच्छ मानून तनमनधन ।
कष्ट करून रात्रंदिन । शिवराय विजयी जाहला ॥ ९२ ॥
बहुत दुर्ग हस्तगत झाले । अपार सैन्य सज्ज राहिलें ।
समृद्ध मुलूख हातीं लागले । शिवरायाच्या येसमयीं ॥ ९३ ॥
यांत न व्हावी अव्यवस्था । ह्मणूनि तो राव तत्वतां ।
उत्तम नियम योजी स्वतां । कारभाराचे संपूर्ण ॥ ९४ ॥


शूर असून नीतिमंत । त्यांस दुर्गाधीश राव नेमित ।
शहाणे चौकस लेखक समस्त । प्रत्येक दुर्गीं ठेविले ॥९५॥
इमानी मावळे रणशूर । रक्षणार्थ ठेविले दुर्गावर ।
तोफा बंदुकादि शस्त्रें समग्र । दुर्गीं सज्ज ठेविलीं ॥ ९६ ॥
अधिकारी नेमून मुलुखांत । उत्तम करी बंदोबस्त ।
चोरादिकांस शासून त्वरित । प्रजा सुखी ठेवीतसे ॥ ९७ ॥
राजभाग नेमस्त घेऊन । समृद्ध राखी प्रजाजन ।
कृषिकर्मास उत्तेजन । वारंवार देतसे ॥ ९८ ॥
थकले भागले शेतकरी । त्यांस सहाय देई परोपरी ।
दुःखें तयांचीं निवारण करी । कृपाळूपणें भूपती ॥ ९९ ॥
स्वसैन्याचे भाग करून । त्यावरी नेमी योग्यजन ।
शूर विश्वासुक ओळखून । आधिपत्य देई तयांस ॥१००॥
सबनीस सरनोबत हवालदार । तिथे अधिकारी गडावर ।
योग्य पाहून नेमी नृपवर । बंदोबस्ताकारणें ॥ १०१ ॥
दुर्ग रक्षणार्थ मावळे लोक । निवडून ठेवी नरनायक ।
नऊ पाइकांस एक नायक । यापरी सेवक ठेविले ॥१०२॥
चतुर विप्रांस करी सबनीस । परभू ठेवी कारखानवीस ।
जातीवंत मराठ्यांस । सरनोबती देतसे ॥ १०३ ॥
घोडेस्वारांचें ठेविलें लष्कर । मराठे बारगीर शिलेदार ।
नानाजाती अश्व सुंदर । पागेमध्यें ठेविले ॥ १०४ ॥
मुजूमदार जमनीस वेगळाले । पागेवरी रायें नेमिले ।
सर्वांवरी मुख्य केलें । सरनोबतास नृपानें ॥ १०५ ॥
जमाखर्चादि कार्य सारें । करावें चौघांचिया विचारें ।
ऐशापरी नृपवरें । कार्यपद्धती योजिली ॥ १०६ ॥

विजयादशमीचा मुहूर्त साधुनी । गृह सोडावें सैनिकांनीं ।
परप्रदेशीं प्रवेशूनीं । यशसंपदा मेळवावी ॥ १०७ ॥
स्वारीवरी जातां लष्कर । स्त्रिया न न्याव्या बरोबर ।
ऐसें आज्ञापी नृपवर । सर्व स्वीय सैनिकां ॥ १०८ ॥
रांडभांड वेश्या वनिता । लष्करामाजी कोणी नेतां ।
नृप शिक्षा करी तत्वतां । देहांताची तयातें ॥ १०९ ॥
स्त्रीसुखाच्या भरीं भरेल । तो काय पराक्रम करील ।
पराभूत सहजीं होईल । स्त्रीलंपट मानव ॥ ११० ॥
स्त्रियांमुळें पडतें वैर । स्त्रियांमुळें बिघडे शरीर ।
स्वामिकार्यामध्यें अंतर । स्त्रियांमुळें पडतसे ॥ १११ ॥
यास्तव स्त्रियांचा सहवास । स्वारींत नसावा सैनिकांस ।
ऐशी व्यवस्था शिवनरेश । सूज्ञपणें करीतसे ॥ ११२ ॥
प्रतापें शत्रु जिंकावे । दुर्ग मुलूख मेळवावे ।
आपुलें वैभव वाढवावें । अपार संपदा मेळवुनी ॥ ११३ ॥
परप्रांत हातीं आला । तरी न करावा बदमामला ।
निरपराधी प्रजाजनांला । उपद्रव न द्यावा ॥ ११४ ॥
दुखवूं नये गायीब्राह्मण । त्रासवूं नये अबलाजन ।
पोरें वृद्ध शक्तिहीन । यांस दुःख न द्यावें ॥ ११५ ॥
ऐशी नीती मनीं धरून । सैनिकांनीं करावें वर्तन ।
अष्टमास स्वारी करून । मग यावें स्वदेशीं ॥ ११६ ॥
वैशाखांत येऊन प्रांतीं । नृपास स्वारीची द्यावी झडती ।
मेळविली असेल संपत्ती । समर्पावी नृपातें ॥ ११७ ॥
मग सेवेचें स्वरूप पाहून । नृप इनाम देईल त्यांतून ।
तें घेऊन सुखें करून । चतुर्मास रहावें ॥ ११८ ॥

यापरी योजून कार्यपद्धती । तदनुसार वर्तवी नृपती ।
सर्व सैनिक सदा मानिती । आज्ञाप्रमाण रायाची ॥११९॥
शिवराय चतुर सद्गुणी । करवी भूमिकेची मोजणी ।
योग्यायोग्य स्थळें पाहुनी । राजभाग बसवीतसे ॥ १२० ॥
तोडरमल्ल चतुर प्रमाण । अकबराची आज्ञा घेऊन ।
पूर्वीं करी धरागणन । राजभाग घ्यावया ॥ १२१ ॥
तोडरमल्ल गणनेउपरी । निजामशाही कारभारी ।
पुन्हा धरेची गणना करी । मलिकंबर नामक ॥ १२२ ॥
दोघांच्याही पाहून रीती । उत्तम विचार करी नृपती ।
मग योजी नवी पद्धती । क्षेत्रगणना करावया ॥ १२३ ॥
मेदिनीच्या गणनेसाठीं । पंचहस्त पांच मुठी ।
एवढी करी एक काठी । शिवनृपती स्वदेशीं ॥ १२४ ॥
लांबरुंद काठ्या वीस । बिघा ऐसें अभिधान त्यास ।
यापरी बिघे एकशें वीस । होतां चाहूर जाहला ॥ १२५ ॥
ऐसें योजून गणनाप्रमाण । राजभाग नेमस्त करून ।
तो शिवराय गुणनिधान । सुखी ठेवी कृषिवलां ॥ १२६ ॥
शुचिकर्मठ विद्वान ब्राह्मण । यांस देई वर्षासन ।
नृपतीचें अभिष्ट चिंतन । ते करिती सर्वदां ॥ १२७ ॥
स्थळीं स्थळींचीं देवस्थानें । पूजानैवेद्य तयांकारणें ।
व्हावा एतदर्थ वेतनें । नृपें करून दीधलीं ॥ १२८ ॥
यवनांचेही पूज्य पीर । तयांसही तो नृपवर ।
वेतनें देई पूर्वापार । जीं जीं होतीं चाललीं ॥ १२९ ॥
भूधेनूचा वत्स सुंदर । प्रजा तयातें शिवनृपवर ।
नित्य देई सुख अपार । ह्मणून तुष्ट भूधेनू ॥ १३० ॥

भूधेनुका वहु तुष्टली । शिवनृपाळा प्रसन्न जाहली ।
अभीष्टार्थ देऊं लागली । नृपवर्यास सप्रेमें ॥ १३१ ॥
कार्यव्यवस्था नृपें केली । त्यांतील कांहीं कांहीं वर्णिली ।
विस्तारभयास्तव संक्षिप्त केली । श्रोतीं क्षमा करावी ॥१३२॥
श्रीशिवविजयग्रंथ । शिवावतार चरित्र अद्भुत ।
वर्णन करी भावें अनंत । चतुर्दशाध्याय गोड हा ॥१३३॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥



# अध्याय १५ वा.

॥ श्रीगणेशायनमः ॥

पूर्वाध्यायाचे अंतीं । वर्णिली राजकार्य पद्धती ।
शिवरायाची गृहस्थिती । कांहीं वर्णू यापुढें ॥ १ ॥
सईबाईशीं विवाह जाहला । पुढें संभाजी पुत्र जन्मला ।
तो भाग पूर्वीच वर्णिला । यथा योग्य प्रसंगीं ॥ २ ॥
शिवराय तया उपरी । पंच भार्या प्रेमें वरी ।
एवं षष्ठ कांता सुंदरी । नृपतीच्या जाहल्या ॥ ३ ॥
षष्ठ नायका चंद्रानना । कमनीय रूपा सुलोचना ।
नायक महाभाग शिवराणा । रंजवितो परस्परें ॥ ४ ॥
सईबाई प्रथम कामिनी । दुजी सोयराबाई लावण्यखाणी ।
तिसरी पुतळाबाई सत्गुणी । विशेष प्रिय रायातें ॥ ५ ॥
कुलवंत निंबाळकर । त्यांची कन्या प्रथम सुंदर ।
शिर्के नामें शूर सरदार । द्वितीय सुता तयांची ॥ ६ ॥
रणशूर वीर मोहिता । त्याची तिसरी गुणी सुता ।
यापरी तिघी नृपाल कांता । परमप्रिय रायातें ॥ ७ ॥
निज स्त्रियार्थ रम्य मंदिरें । रायगडीं निर्मिलीं नृपवरें ।
अभिनव शोभा नाना प्रकारें । मंदिरांप्रती आणिली ॥ ८ ॥
राजकार्यी होतां श्रम । कांहीं घ्यावया सुखविराम ।
तो शिवराय गुण धाम । मंदिरीं येऊन राहतसे ॥ ९ ॥
पतिव्रतांचीं सस्मित मुखें । जंई जंई राव देखे ।
पूर्ण होऊन अत्यंत हरिखें । गत श्रम होतसे ॥ १० ॥

प्रिय षष्ठ स्त्रियांकारणें । निर्मिलीं होतीं भिन्न भुवनें ।
निज भार्यांस कांहीं उणें । राव पडों न देई ॥ ११ ॥
भार्या मंदिरीं क्रमानुरूप । जाऊन राही शिव नृप ।
सौख्य देई तयां अमूप । गृहस्थाश्रम पाळुनी ॥ १२ ॥
साधु संत आणून घरीं । त्यांची प्रेमें सेवा करी ।
दीन दुबळे भणंग भिकारी । अन्नदानें पोषीतसे ॥ १३ ॥
कार्यं प्रसंगें फिरत असतां । नमस्कारी साधु संता ।
तुकारामादि भगवद्भक्तां । भेटे जाऊन पुनःपुनः ॥ १४ ॥
तया काळीं महाराष्ट्रांत । जे जे साधु होते नांदत ।
त्यांच्यापदीं होऊन विनीत । कृपा संपादी तयांची ॥ १५ ॥
संत ह्मणती हा विरक्त पूर्ण । 'धर्मरक्षक' ह्मणती सामान्य जन ।
स्त्रिया मानिती मूर्त मदन । शिवरायास तेधवां ॥ १६ ॥
गुरुराय कृपा करिती । तेणें तुष्टे शिव नृपती ।
चांफळादि संस्थानाप्रती । स्वास्थ्यें करून देतसे ॥ १७ ॥
सत्गुरूचीं नाना स्थानें । तेथें देई वर्षासनें ।
भक्तियुक्त अंतःकरणें । घालवी उत्साह तेथींचे ॥ १८ ॥
सत्गुरूनें कित्येक वेळां । भक्तिभावाचा प्रत्यय घेतला ।
नृपाळ पूर्ण कशीं उतरला । तेणें तुष्टला गुरुवर ॥ १९ ॥
नित्य इच्छि संत संग । तेणें घडले बहुत प्रसंग ।
चमत्कारिक आले योग । भक्ति भावें नृपाच्या ॥ २० ॥
अनेक चमत्कार तेव्हां घडले । विस्तार भयार्थ येथें गाळिले ।
परी मच्चित्त विरस झालें । सुरस कथा सोडितां ॥ २१ ॥
एके समयीं शहाजीसुत । गुरूस भेटून आला परत ।
सोयराबाईच्या मंदिरांत । होता सुखें राहिला ॥ २२ ॥

तदा वर्तली अपूर्व कथा । ती प्रेमें वर्णू आतां ।
आवधान द्या ऐसें समस्तां । श्रोतयांप्रती विनवितों ॥२३॥
वसंत ऋतु उष्ण काळ । होती प्रहर रात्रीची वेळ ।
स्वच्छ चांदणें होतें सोज्वळ । मंद वायु वाहतसे ॥ २४ ॥
आधींच रायगड उत्तम स्थल । त्यांत ही ती रम्य वेळ ।
आल्हाद जनक सकळ । वस्तू तेव्हां दीसती ॥ २५ ॥
प्रहर रात्रींची तोफ सुटली । तेणें गजबज मंदावली ।
रायगडा शांतता आली । तये वेळीं कांहींशी ॥ २६ ॥
भव्य प्रासाद शोभिवंत । महाराष्ट्र वीरीं परिवेष्टित ।
होता रायगडीं शोभत । रजनींमाजीं अत्यंत ॥ २७ ॥
सशस्त्र होऊन महाराष्ट्र वीर । तदा रक्षिती राजद्वार ।
उष्ट्र गज अश्व सुंदर । होते ठाणीं बांधिले ॥ २८ ॥
कामधंदा आटोपूनी । सेवक वळती शय्यास्थानीं ।
निवांतता राजभुवनीं । येत होती तेधवां ॥ २९ ॥
सुवर्णदीप प्रकाशले । होते ठायीं ठायीं ठेविले ।
तेणें राजभुवन उजळलें । होतें तेव्हां सहजची ॥ ३० ॥
ऐशा सुरम्य अवसरीं । तया सौधाच्या सज्जावरी ।
तो महाभाग यवनारी । शिवराय उभा असे ॥ ३१ ॥
उच्चस्थल शोभायमान । तेथें नृपाल उभा राहून ।
दुर्गप्रदेशीं दृष्टी लावून । अनुपम शोभा पाहतसे ॥ ३२ ॥
अमृतोपम जयांतील नीर । तें गंगासागर सरोवर ।
दिसत होतें तेथून समोर । आनंददायक तेधवां ॥ ३३ ॥
राजसौधाचें प्रतिबिंब शांत । पडलें होतें सरोवरांत ।
तेणें शोभा अपूर्व दिसत । सरोवराची तेधवां ॥ ३४ ॥

चंपक मोगरा बकुल मालती । पुष्पलता नानाजाती ।
बगिच्यामाजी शोभा देती । राजवाड्यासमोर ॥ ३५ ॥
मंदमंद वायूशीतळ । घेऊन पुष्पांचा मधुर परिमळ ।
गच्चीवरी नृपाजवळ । पोंचवीत होता तयातें ॥ ३६ ॥
महत्कार्य हातीं धरिलें । तेणें शिवराय बहु भागले ।
ह्मणून स्वयें तोषविलें । वातदेवें वाटतें ॥ ३७ ॥
प्रियदर्शन सुधाकर । करी अमृतवृष्टी अपार ।
धर्मस्थापकाचा श्रम परिहार । सत्वर व्हावा ह्मणूनी ॥३८॥
सुगंध शीतल वाहे वात । तेणें शिवराय संतोषत ।
मधुर ध्वनी कर्णीं येत । मधुनमधुन तेधवां ॥ ३९ ॥
कथाकीर्तनीं होत गायन । त्याचा पडसाद उठे मधून ।
तिकडेच वेधे नृपालमन । क्षणक्षणीं सहजची ॥ ४० ॥
वसंत होता प्राप्त झाला । कुसुमलतांना बहर आला ।
कोकिलातें शब्द फुटला । होता मधुर त्याकाळीं ॥ ४१ ॥
तो महाभाग शिवनृपती । न्याहाळून पाहे सभोंवती ।
परमाल्हाद वाटे चित्तीं । रमणीय वेळ देखुनी ॥ ४२ ॥
रम्यदर्शनें धाले नयन । पुष्प परिमळें तोषलें मन ।
सुस्वर रवें निवाले कर्ण । सबाह्याभ्यंतर संतोषलें ॥ ४३ ॥
रजनीसमय परम सुखकर । पूर्ण होते बाह्योपचार ।
ऐशासमयीं अनंगवीर । नृपालदेहीं संचरला ॥ ४४ ॥
चंचल झालें अंतःकरण । प्रियेकडे लागलें मन ।
प्रियतमा न येई अजून । ह्मणून विषाद वाटतसे ॥ ४५ ॥
अनंगभरें होऊन आतुर । पुनः पुनः पाहे सोपानद्वार ।
न सुचे कांहीं क्षणभर । रायालागीं तेधवां ॥ ४६ ॥

सज्जावरी उभा राहून । दुसरीकडे लावूं पाहे मन ।
परी तो अनंगवीर दारुण । मन ओढी प्रियेकडे ॥ ४७ ॥
पुन्हा रंगमहालीं प्रवेशून । निश्चल पाहे मंचकीं बैसून ।
लागलें स्त्रियेचें ध्यान । चित्त तळमळूं लागलें ॥ ४८ ॥
तंव नूपुरांचा मधुर रव । कर्णीं ऐके शिवराव ।
उचंबळला अंतर्भाव । भूपतीचा तेधवां ॥ ४९ ॥
रुणझुण शब्द चढत चढत । पातला सोपानद्वारापर्यंत ।
आतुरपणें भूप पाहत । द्वाराकडे आनंदें ॥ ५० ॥
सोयराबाई नृपालकांता । परम सुंदर पतिव्रता ।
द्वार उघडून तत्वतां । रंगमहालीं प्रवेशली ॥ ५१ ॥
भरजरी पैठणी परिधान केली । हिरवी कंचुकी अंगीं घातली ।
शरीरलता शृंगारिली । अमोल अलंकार घालुनी ॥ ५२ ॥
नीलकुंतल सांवरूनी । नेटकी घातली मस्तकीं वेणी ।
केतकी गुलाब मध्यें खोवुनी । शोभा बहुत आणिली ॥५३॥
मूद राखडी शिरीं लेइली । मुक्ताफळांची बिंदी बांधिली ।
कुंकुमाची चीर रेखिली । रम्य भाळीं सुंदर ॥ ५४ ॥
प्रफुल्ल दिसती नेत्रकमळें । त्यांत कज्जल सुरेख भरिलें ।
नेत्रीं सतेज पाणी खेळे । अनुपम शोभा तयाची ॥ ५५ ॥
मुखचंद्र अल्हादकारक । गौरवर्ण जैसें कनक ।
रत्नजडीत अमोलिक । नाकीं नथ विराजे ॥ ५६ ॥
हिरे माणकें पाचू अमोल । मुक्ताफळें सुंदर सुढाळ ।
यांचे अलंकार निर्मळ । कंठामाजी शोभती ॥ ५७ ॥
अधरोष्ठ रक्तवर्ण । बहुत दिसे शोभायमान ।
कीं तें अमृतपात्र भरून । शिवरायार्थ ठेविलें ॥ ५८ ॥

गोल वक्षोज अंबरावृत । हृदयदेशीं दिसती उन्नत ।
शिवरायाचे धन्य हस्त । विसांवती ज्या स्थळीं ॥ ५९ ॥
कटिभाग सूक्ष्म केवळ । आरक्त दिसती पादतळ ।
मार्जी नूपुरांचा शब्द कोमळ । मनोहर होतसे ॥ ६० ॥
सुकुमार हस्तें पदर सांवरित । हंसगतीनें चाले चमकत ।
परम मनोहर मूर्ती दिसत । नृपभार्येची तेधवां ॥ ६१ ॥
होतांच प्रियेचें प्रियदर्शन । उचंबळलें रायाचें मन ।
वाटे द्यावे आलिंगन । एकदांच जाउनी ॥ ६२ ॥
तो महाराज चतुर सगुण । मनोवाजी धरी खेंचून ।
मग निद्रामिष करून । मंचकावरी पहुडला ॥ ६३ ॥
राजपत्नी सलज्ज सस्मित । अधोवदनें खालीं पहात ।
पातली मंचकापर्यंत । साशंक होउनी पाहतसे ॥ ६४ ॥
नेत्र झांकून मदनमूर्ती । पहुडलीसे शयनावरती ।
प्रिया विस्मय करी चित्तीं । पती निद्रित पाहुनी ॥ ६५ ॥
मनीं बोले राजबाळी । कां आज त्वरें निद्रा लागली ।
अहा काय काया शिणली । राजकार्यें करूनी ॥ ६६ ॥
सर्वांग पाहे न्याहाळून । ह्मणे धन्य धन्य माझें जनन ।
बहुत जन्मींच्या पुण्यें करून । ऐसा भर्ता लाधल्यें ॥ ६७ ॥
अहा ही मूर्ती श्यामसुंदर । पाहून घेईन डोळेभर ।
जागृतपणीं लज्जा थोर । मुख पाहों नेदीच ॥ ६८ ॥
ऐसें बोलून ते सुंदरी । हळूच चढली मंचकावरी ।
शिवरायाची मूर्ती साजिरी । उत्सुकपणें पाहतसे ॥ ६९ ॥
सबाह्याभ्यंतर आनंदलें । प्रेमरसाचें भरतें आलें ।
उभयहस्त पुढें झाले । स्पर्श करिती प्रियातें ॥ ७० ॥

राव होता पूर्ण जागृत । शरीरास लागला मृदु हस्त ।
काया जाहली पुलकित । अनंगाच्या प्रभावें ॥ ७१ ॥
पत्नि छद्म भार्या समजली । चित्तामाजीं ओशाळली ।
झणत्कारें तत्क्षणीं उठली । पदर सांवरी करानें ॥ ७२ ॥
पदनूपुरें रुणझुणलीं । हस्तकंकणें झणत्कारिलीं ।
काया किंचित् कंप पावली । नृपभार्येची तेधवां ॥ ७३ ॥
राव उठोन झडकरी । विनोदपूर्वक हास्य करी ।
प्रेमें आलिंगून सुंदरी । चुंबन घेई प्रियेचें ॥ ७४ ॥
राव बोले गोड वाणी । प्रिये भागलीस कार्यें करूनी ।
आतां येथें सुखासनीं । स्वस्तपणीं बैसावें ॥ ७५ ॥
रमणीय बोले मधुरोत्तर । आह्मांस कैंचे श्रम फार ।
गृहामाजी अष्टौप्रहर । सुखें करूनी राहतों ॥ ७६ ॥
राजकार्यांचे श्रम त्रास । येथें असती अहर्निश ।
तेणें बहुत कष्ट देहास । येथें असतील जाहले ॥ ७७ ॥
जळोत राक्षस मुसलमान । कधीं पडों न देती चैन ।
आह्मांस दुर्लभ होतें दर्शन । धाक सदा वाटतो ॥ ७८ ॥
आज रायगडीं निद्रा करणें । उद्यां रानोमाळ धांवणें ।
शत्रुसैन्यीं परवां शिरणें । ऐसें सर्वदां चालतें ॥ ७९ ॥
चैन नाहीं रात्रंदिवस । दगदगीनें जीव कासाविस ।
किती तरी मेला त्रास । ध्यावा जिवास कळेना ॥ ८० ॥
आज सुखें निद्रा करावी । पादसेवा करीन बरवी ।
मजकडून सेवा घ्यावी । कृपाळूपणें प्रस्तुत ॥ ८१ ॥
प्रेमभराचीं मधुर बोलणीं । येतां प्रियेच्या मुखांतूनी ।
तो महाभाग नृप सत्‌गुणी । अत्यंत अंतरीं संतोषला ॥८२॥


प्रियास्कंधीं हस्त ठेवून । सोत्कंठ पाहे रम्य वदन ।
पुनः पुनः घेई चुंबन । शिवराय सभाग्य ॥ ८३ ॥
स्मितपूर्वक बोले नृपाळ । आह्मास श्रम कैसे बाधतील ।
दृष्टीस पडतां तव मुखकमळ । श्रमपरिहार होतसे ॥ ८४ ॥
नको नको पादसंवाहन । कष्ट निरशील परिरंभण ।
ऐसें बोलून आलिंगन । शिवरायें दीधलें ॥ ८५ ॥
रम्य मंचकीं सुखासनीं । मग दोघें बैसलीं येउनी ।
उत्तम तांबूल त्रयोदशगुणी । भार्या अर्पी पतीतें ॥ ८६ ॥
चंदनउटी सुगंधशीत । राजपत्नी नृपा चर्चित ।
सुपुष्पहार गळां घालित । आवडीनें नृपाच्या ॥ ८७ ॥
तुष्ट होऊनि प्रेमभरें । करिती विनोद परस्परें ।
वेध लाविला पंचशरें । शरसंधान करूनी ॥ ८८ ॥
एकवस्तू द्विधा करिती । ऐसे धन्वी अनेक असती ।
अनंगाची संधानरीती । विपरीत असे जगांत ॥ ८९ ॥
पंचशरांच्या बाणघातें । द्वैत अवघें लया जातें ।
उभयवस्तूंचें ऐक्य होतें । धन्य धन्वी अनंग ॥ ९० ॥
रजनीसमय पूर्ण एकांत । अनुकूल असती उपचार समस्त ।
प्रेमयुक्त कांताकांत । अपार सौख्य भोगिती ॥ ९१ ॥
या नरजन्मा माझारीं । सुखें असती परोपरी ।
परी या स्त्रीसुखाची सरी । कोणालाही नाहींच ॥ ९२ ॥
धर्मपत्नीचें सलज्ज पाहणें । धर्मपत्नीचें मधुर बोलणें ।
धर्मपत्नीशीं विनोद करणें । सौख्य उपजवी स्वर्गीचें ॥९३॥
धर्मपत्नीचा उपभोग बहुत । हें अत्यंत शुद्ध अमृत ।
याच्या सेवनें मानव तृप्त । सबाह्याभ्यंतर होतसे ॥ ९४ ॥

असो आपुली नायक नायिका । प्रेमें अनुभविती एकांतसुखा ।
रात्र झाली द्वादश घटिका । निद्रासमय पातला ॥ ९५ ॥
दुर्गद्वारें बंद जाहलीं । गजबज अवघी स्थिरावली ।
सकळ प्राण्यांस शांतता आली । निद्राभरें तेधवां ॥ ९६ ॥
ऐशा रमणीय रजनीं प्रसंगीं । प्रियेस घेऊन निजोत्संगीं ।
शिवराय एकांतसुख भोगी । अत्यानंदें करूनी ॥ ९७ ॥
गोमांतक प्रांतामधून । उत्तम आम्रफळें निवडून ।
रायाप्रती उपायन । धाडिलें होतें सेवकीं ॥ ९८ ॥
त्यांचें जाहलें नृपास स्मरण । मग बोले प्रिये आपण ।
उत्तम आम्रफळें भक्षण । करूं आतां यथेच्छ ॥ ९९ ॥
सेवकास मारून हांक । आंबे आणवी नरनायक ।
उत्तम रसाळ फळें सुरेख । सुवर्णताटीं ठेविलीं ॥ १०० ॥
अत्यंत उत्तम आम्रफळें । पाहून प्रियेस भूप बोले ।
सत्‌गुरूंस नाहीं समर्पिलें । यांतील फळ एकही ॥ १०१ ॥
सत्‌गुरूंस अर्पिल्यावीण । कैशी रूची घ्यावी आंपण ।
आम्रफळ भक्षावया कारण । मनीं उत्कंठा वाटते ॥ १०२ ॥
सत्‌गुरू रामदास समर्थ । कोठें आहेत न कळे प्रस्तुत ।
कैसा माझा पुरेल हेत । आजचिये प्रसंगीं ॥ १०३ ॥
राव होऊन उत्कंठित । बैसला विवंचना करीत ।
'जयरघुवीर' शब्द इतुक्यांत । नृपवर्यें परिसिला ॥ १०४ ॥
रायें शब्द ओळखिला । ह्मणे माझा सत्‌गुरू आला ।
आनंदाचा पूर लोटला । नृपचित्तीं तेधवां ॥ १०५ ॥
तयासमयीं सत्‌गुरू माउली । नृपालमंदिरीं प्रगट झाली ।
रायें साष्टांग नमस्कारिली । गुरुपदकमलें भक्तीनें ॥ १०६ ॥

यथोपचारें केलें पूजन । मग आम्रफळें केलीं अर्पण ।
गुरुरायाचें प्रसन्न मन । फळें पाहुनी जाहलें ॥ १०७ ॥
स्मितपूर्वक गुरू बोलती । राया फळें मधुर असती ।
देऊन आपुल्या पत्नीप्रती । भक्षण करीं येसमयीं ॥१०८॥
बरीच झाली असे रजनी । जाणें असे आह्मांलागुनी ।
यास्तव तुह्मी फळें सेवुनी । तृप्त व्हावें उभयतां ॥ १०९ ॥
राव होऊन आश्चर्यभरित । ह्मणे कैसे आलेत येथ ।
कैसे जाणार आतां त्वरित । परमाश्चर्य मज वाटे ॥११०॥
नृपवर्याचा धरून हस्त । बाहेर आले गुरू समर्थ ।
ह्मणती चांफळाहुनी येथ । आतांच आलों नृपाळा ॥१११॥
आंबे पाहून उत्कंठित । जाहलास हें आलें मनांत ।
यास्तव येणें पडलें येथ । तुझ्यासाठीं नृपाळा ॥ ११२ ॥
कल्याणादि शिष्य समस्त । चांफळीं असतील वाट पाहत ।
यास्तव तेथेंच जातों त्वरित । शिवराया येसमयीं ॥११३॥
यापरी बोलून मधुर वचन । रायासह तटावरी येऊन ।
जयरघुवीर ऐसें गर्जुन । उड्डाण केलें समर्थें ॥ ११४ ॥
उड्यांवरी उड्या घेत । दृष्टीआड झाले समर्थ ।
राव झाला अत्यंत विस्मित । गुरुलीला पाहुनी ॥ ११५ ॥
ह्मणे सत्गुरू रामदास । सत्यसत्य अंजनेयअंश ।
आज आलें प्रत्ययास । धन्य भाग्य आमुचें ॥ ११६ ॥
चित्तामाजी गहिंवरून । पुनः पुनः करूनिं वंदन ।
परतून आला शहाजीनंदन । सौधामाजीं आपुल्या ॥११७॥
शिवनृपाल शिवावतार । रामदास ते अंजनीकुमर ।
जनां दाविती लीला अपार । चित्रचरित्रें करूनी ॥ ११८ ॥

सहज कथेचा ओघ आला । ह्मणून शृंगार कांहीं वर्णिला ।
श्रोतीं क्षमा करावी मजला । परम कृपाळू होउनी ॥११९॥
श्रीशिवविजय ग्रंथ । शिवावतार चरित्र अद्भुत ।
वर्णन करी भावें अनंत । पंचदशाध्याय गोड हा ॥१२०॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥



# अध्याय १६ वा.

॥ श्रीगणेशायनमः ॥

श्रोतीं करून सिंहावलोकन । पहावें पूर्वानुसंधान ।
सिद्धीजोहरें पलायन । केलें पराभव पावुनी ॥ १ ॥
विजापुरीं कळलें वृत्त । जोहर झाला पराभूत ।
बादशहा अत्यंत कुपित । सिद्दीवरी जाहला ॥ २ ॥
ह्मणे हा होऊन फितुरी । हातींचा सोडून दिधला वैरी ।
निर्भर्त्सिलें परोपरी । बादशहानें तयातें ॥ ३ ॥
मग शहानें केला विचार । पराभूत होतात सरदार ।
आतां धाडावा आपुला वजीर । शिवाजीतें जिंकावया ॥ ४
रस्तमजमा नामें वजीर । होता बलाढ्य आणि शूर ।
त्यातें शहा प्रेपी सत्वर । सैन्य अपार देउनी ॥ ५ ॥
वजिरें विचार केला मनीं । आधीं दुर्ग घ्यावे साधुनी ।
मग शिवाजीवरी जाउनी । पराभवावें तयातें ॥ ६ ॥
ऐशापरी संकेत करून । रांगण्याजवळी आला यवन ।
दुर्गाप्रती वेढा घालून । शौर्यें संगर चालवी ॥ ७ ॥
तेथील गडकरी रणशूर । करिती शौर्यें तदा समर ।
वार्ता कळतां नृपवर । साह्यार्थ सैन्य धाडीतसे ॥ ८ ॥
नृपतींचे सैनिक शूर । चालून गेले शत्रूवर ।
गडकरीही करिती निकर । त्याचसमयीं अरीवरी ॥ ९ ॥
दोहींकडून नेट झाला । यवन वीरांचा धीर सुटला ।
पराभव क्षणें झाला । यवन सेनेचा तेधवां ॥ १० ॥

एवं पराभूत होऊन । रुस्तुमजमा गेला पळून ।
विजापुराप्रती जाऊन । वार्ता कथी समस्तां ॥ ११ ॥
अबदुल करीम नामा यवन । तैसाच दुसरा बेलोलखान ।
विजापुरचे दोघे प्रधान । हांव धरिती युद्धाची ॥ १२ ॥
द्वादश सहस्र घोडेस्वार । घेऊन पडले पुराबाहेर ।
वीरमदें भरून सत्वर । रांगणा दुर्ग वेढिला ॥ १३ ॥
तेथील गडकरी परम शूर । साह्यार्थ होतें दळ अपार ।
अत्यावेशें करिती संगर । शिवरायास आठवुनी ॥ १४ ॥
वीरमदें भरीं भरलीं । रण वाद्यांची घाई लागली ।
दोन्ही दळें एकवटलीं । घोर युद्ध प्रवर्तलें ॥ १५ ॥
दोन्ही वीर प्रतापवंत । हटें झुंजती रणांगणांत ।
कोण विजयी होणार येथ । न कळे कांहीं तेधवां ॥१६॥
पुण्यप्रतापी शिवनृपाळ । धर्मरक्षणार्थ झटे केवळ ।
मग ईश्वराचें पाठबळ । कां न मिळेल तयाला ॥ १७ ॥
चालू असतां घोर समर । कांहीं भागले महाराष्ट्र वीर ।
इतुक्यांत पर्जन्य अपार । एकाएकीं पातला ॥ १८ ॥
मेघें व्यापिलें सर्व अंबर । वात सुटला भयंकर ।
विद्युल्लतेचे कडाड थोर । होऊं लागले तेधवां ॥ १९ ॥
पर्जन्य वृष्टी होऊं लागली । मुसळ धार सुरू झाली ।
तदा गडबडे वीर मंडळी । युद्ध कोणा सुचेना ॥ २० ॥
भव्य दुर्गाचा धरून आधार । उभे राहिले महाराष्ट्र वीर ।
म्लेंच्छ सैन्य निराधार । नाश पावे तेधवां ॥ २१ ॥
पर्जन्याची धार सतत । होती प्रहर एक पडत ।
यवन सैन्यीं नाश बहुत । तियेमुळें जाहला ॥ २२ ॥

झाला एकच हलकल्लोळ । दाणादाण झाली केवळ ।
भंग पावलें यवन दळ । काढिती पळ सर्वही ॥ २३ ॥
कोणी कोणास न पुसतां । पळों लागलें सैन्य तत्वतां ।
अतर्क्य परमेश्वरी सत्ता । नृपास जय लाधला ॥ २४ ॥
उभय वजीर खिन्न होऊन । तेथून करिती पलायन ।
कष्टें जीव सांभाळून । विजापुरीं प्रवेशले ॥ २५ ॥
ईश्वरें दुर्ग रक्षिला । नृपतीस जय दिधला ।
प्रताप महिमा वाढविला । शिवनृपाचा अत्यंत ॥ २६ ॥
कोणी कायसांवत नामक । होता मराठा रणशूर एक ।
तो न करून मनीं विवेक । रायावरी पातला ॥ २७ ॥
बाजी नामें पालसकर । होता नृपाचा सरदार शूर ।
तेणें तयावरी निकर । केला शौर्यें करूनी ॥ २८ ॥
दोघांचीही गांठ पडली । खड्ग युद्धाची गर्दी उडाली ।
अन्योन्य हस्तें मुक्ती मिळाली । दोघांसही रणांगणीं ॥२९॥
युद्ध कामना सहज जिरली । स्वस्थळीं दोन्ही सैन्यें गेलीं ।
दोन वीररत्नें हरपलीं । अविवेकें यापरी ॥ ३० ॥
पातशहातें कळलें वृत्त । प्रधान झाले पराभूत ।
खिन्न झाला शहा अत्यंत । ह्मणे शत्रू नाटोपे ॥ ३१ ॥
प्रतिज्ञा करून वीर गेले । ते पराभवून परत आले ।
आतां स्वयें पाहिजे गेलें । तरीच शत्रू भंगेल ॥ ३२ ॥
स्वयें जाण्याचा करून विचार । सज्ज करी सैन्य अपार ।
अत्यंत गजरें विजापूर । बादशहानें सोडिलें ॥ ३३ ॥
करावया श्रीरामहनन । स्वयें निघाला दशानन ।
तयापरी बलिष्ठ यवन । रायावरी चालिला ॥ ३४ ॥

शिवनृपाच्या राज्यीं येऊन । कांहीं दुर्ग घेई साधून ।
पुढें वर्षाकाळ आला दारुण । कांहीं उपाय चालेना ॥३५॥
मग ससैन्य कृष्णा तीरीं । बादशहा वस्ती करी ।
बहुत हांव चित्तीं धरी । शिवाजीतें जिंकावया ॥ ३६ ॥
कोण चुकवील ईश घटित । बंडें उठलीं कर्नाटकांत ।
बादशहांचे कर्णीं वृत्त । आलें भयंकर तेथींचें ॥ ३७ ॥
कहर बंडाचा उसळला । ऐकून शहा घाबरला ।
मोठा विचार पडे तयाला । काय आतां करावें ॥ ३८ ॥
कर्नाटकीं जावें निघून । तरी इकडील राहतें कारण ।
न जातां अनर्थ दारुण । घडणार ऐसें वाटतें ॥ ३९ ॥
शहा बैसला चिंतातुर । तों तेथें आले वाडीकर ।
सांवत नामें योद्धे शूर.। शहाप्रती विनविती ॥ ४० ॥
ह्मणती आह्मी तव सेवक । शिवाजीशीं झगडूं निःशंक,।
पराभवून त्याचे सैनिक । बंड मोडूं तयाचें ॥ ४१ ॥
तव कार्य करूं बरवें । परी कांहीं साह्य द्यावें ।
आह्मां दासांस आज्ञापावें । अपार विक्रम दाखवूं ॥ ४२ ॥
शहा होता विवंचनेंत । ह्मणून रुचली तया मात ।
ह्मणे हेंच योग्य दिसे प्रस्तुत । दुजा उपाय सुचेना ॥४३॥
बाजी घोरपडा शूर बहुत । आणि बेलोलखान प्रतापवंत ।
या दोघांस शहा कथित । साह्य द्यावें सांवतां ॥ ४४ ॥
तिघांवरी भार टाकून । शहा त्वरित निघाला तेथून ।
परतून जातां त्याचें मन । खिन्न बहुत जाहलें ॥ ४५ ॥
घोरपडा, सांवत, बेलोलखान । एकत्र झाले तिघेजण ।
ह्मणती काय युक्ती योजून । शिवाजीतें जिंकावें ॥ ४६ ॥

'निज सदनीं जाऊन त्वरित । करावी सैन्य सिद्धता बहुत ।
मग संग्राम करावा अद्भुत' । ऐशी मसलत ठरविली ॥४७॥
तिघे तिहींकडे निघून गेले । सैन्य सिद्धता करूं लागले ।
अविचार मोहें मोहिले । कार्याकार्य कळेना ॥ ४८ ॥
विशाळगडीं असतां नृपवर । तेथें कळलें वृत्त समग्र ।
ह्मणे तिघां मूर्खांस सत्वर । बळें शिक्षा लावीन ॥ ४९ ॥
मत्पित्यास जेणें ठकविलें । विश्वास दावून कैद केलें ।
यास्तव पित्यानें आज्ञापिलें । ज्यांस शिक्षा करावया ॥५०॥
तो घोरपडा नीच मलिन । आतां येणार मजवरी चालून ।
तरी प्रथम त्याचें शासन । स्वयें केलें पाहिजे ॥ ५१ ॥
रायाप्रती कथिती दूत । मुधोळ नामें स्वनगरांत ।
घोरपडा आहे प्रस्तुत । सैन्य सिद्धता करीतसे ॥ ५२ ॥
दूत मुखींची ऐशी मात । ऐकून शिवराय निघे त्वरित ।
निवडक योद्ध्यांसमवेत । मुधोळ नगरीं प्रवेशला ॥ ५३ ॥
शिवरायाची देखून स्वारी । नागरिक भय पावले अंतरीं ।
हाहाकार प्रवर्तला नगरीं । जन समस्त घाबरले ॥ ५४ ॥
विद्युद्गतीनें अश्व फेंकित । नृप चालिला सेनेसहित ।
घोरपड्याचे गृहास त्वरित । वेढा नृपें घातला ॥ ५५ ॥
द्वारीं ठेवून रक्षक गण । अश्वावरून उडी टाकून ।
राव घेई करीं कृपाण । शत्रु नाश करावया ॥ ५६ ॥
कृप भोजांस ठेऊन द्वारीं । पितृघात आठवून अंतरीं ।
द्रोण पुत्र धृष्टद्युम्न शिबिरीं । जैसा क्रोधें प्रवेशला ॥५७॥
त्याचपरी शहाजीनंदन । पितृ घातें संतप्त होऊन ।
घोरपड्याच्या गृहीं शिरून । विजयी खड्ग चालवी ॥५८॥

घोरपड्याचे बंधू दोन । रायावरी आले धांवून ।
रायें घातलें कंठस्नान । एकदांच दोघांतें ॥ ५९ ॥
कराया नृपाचें निवारण । जे जे कोणी आले धांवून ।
ते ते पावले स्वर्गभुवन । शिवरायाच्या करानें ॥ ६० ॥
प्रसंग पाहून भयंकर । बाजी घोरपडा दडे सत्वर ।
त्याचा शोध करी नृपवर । गृह समस्त धुंडोनी ॥ ६१ ॥
अंतःपुरीं होता दडाला । तो नृपें शोधून काढिला ।
बळें लत्ताप्रहार केला । कटीमध्यें तयाच्या ॥ ६२ ॥
घोरपडा तेव्हां उलथून पडे । 'मेलों मेलों' ह्मणून ओरडे ।
शिवाजीनें दाबिलें नरडें । घोरपड्याचें तेधवां ॥ ६३ ॥
धृष्टद्युम्नाच्या छातीवरी । अश्वत्थामा बैसे ज्यापरी ।
तैसाच शिवराय ये अवसरीं । घोरपड्याच्या बैसला ॥६४॥
घोरपडा बोले आक्रंदून । तुह्मी शिवराय नीतिनिपुण ।
कैसा घेतां माझा प्राण । असावध मी असतां ॥ ६५ ॥
मज तुह्मी सोडून द्यावें । दोघांनींही सज्ज व्हावें ।
न्यायें युद्ध करूं बरवें । समरांगणीं जाउनी ॥ ६६ ॥
छापा घालून करणें घात । हें तुह्मांप्रती नाहीं उचित ।
तुह्मी शिवराय नीतिमंत । अनुचित कृत्य करूं नका ॥६७॥
घोरपड्याचें ऐकून भाषण । शिवराय बोले गर्जून ।
दुष्टा आतांच झालें स्मरण । तुजला कैसें न्यायाचें ॥ ६८ ॥
माझा पिता शूर सज्जन । त्यास अत्यंत विश्वास दावून ।
कपटें भोजनांस निमंत्रून । कोणी केला घात रे ॥ ६९ ॥
मम पिता निर्दोष सुमती । दुष्टा दिधलास यवन हस्तीं ।
तेव्हां तुझी न्यायमती । कोठें होती सांगरे ॥ ७० ॥

मज पित्राज्ञा असे प्रमाण । आतां घेतों तुझा प्राण ।
पूज्य देवतेचें करीं स्मरण । मनामाजीं प्रस्तुत ॥ ७१ ॥
यापरी रायें बोलून वचन । त्वरें सरसाविला भव्य कृपाण ।
घोरपड्याचा कंठ छेदून । क्षणें केला नृपानें ॥ ७२ ॥
झाला एकच हलकल्लोळ । स्त्रिया पिटिती वक्षस्थळ ।
कृतकार्य होऊन शिवनृपाळ । शीघ्र तेथून परतला ॥ ७३ ॥
पितृहेतू सिद्धीस गेला । रायास परम संतोष वाटला ।
मग राव विशाळगडीं आला । सैन्यासहित त्वरेनें ॥ ७४ ॥
घोरपड्याचा नाश जाहला । मग रायें विचार केला ।
आतां शीघ्र सांवताला । जिंकणें योग्य असे हें ॥ ७५ ॥
मग अत्यंत त्वरा करून । ससैन्य निघाला शहाजीनंदन ।
सांवतवाडी प्रांतीं जाऊन । प्रताप आपुला दाविला ॥७६॥
अजासदनीं पंचानन । शिरून करितो अनर्थ दारुण ।
त्याचपरी शहाजनिंदन । निकर करी त्याप्रांतीं ॥ ७७ ॥
सांवत अवघे भंग पावले । फिरंग्यांकडे पळून गेले ।
शिवरायें हस्तगत केले । दुर्गप्रांत तेथींचे ॥ ७८ ॥
स्वशत्रूंस थारा दिधला । तेणें शिवराय क्रोधावला ।
ह्मणे फिरंगी मत्त झाला । हरीन गर्व तयाचा ॥ ७९ ॥
फिरंगी दुष्ट अल्पमती । माझा थोर पराक्रम नेणती ।
मजसवें युद्धीं तगतील किती । पाहतों आतां क्षणांत ॥८०॥
शिवमूर्ती क्रोधावली । फिरंग्यांस ही वार्ता कळली ।
तयां अत्यंत भीती वाटली । ह्मणती नाश होईल ॥ ८१ ॥
त्यांनीं सुविचार चित्तीं करून । सांवतातें दिलें हांकलून ।
मग ते नृपास आले शरण । ह्मणती रक्षण करावें ॥ ८२ ॥

तव प्रताप विसरून गेलों । अविवेकें मरीं भरलों ।
परी आतां शरण आलों । शिवराया तुजप्रती ॥ ८३ ॥
प्रांत मुलूख सर्व घेऊन । आतां आमुचा रक्षीं प्राण ।
आम्हीं तुझे दास होऊन । सेवा करूं सदैव ॥ ८४ ॥
यापरी होतां शरणांगत । राव तयातें जीवदान देत ।
देशमुखांचें वतन त्यांप्रत । करून देता जाहला ॥ ८५ ॥
यापरी रायास यश लाधलें । दुष्ट शत्रूंचें त्रिकूट फुटलें ।
दोन वैरी भंग पावले । पुण्यप्रतापें नृपाच्या ॥ ८६ ॥
आतां राहिला बेलोलखान । त्यास आलें पाचारण ।
कर्नाटक प्रांतामधून । पातशहाचें तेधवां ॥ ८७ ॥
इकडील शत्रू पराभवार्थ । तुम्ही निघून यावें त्वरित ।
बेलोलखानास आनंद बहुत । या आज्ञेनें जाहला ॥ ८८ ॥
म्हणे 'इलाई' प्रसन्न झाला । शिवाजीशीं प्रसंग टळला ।
मग तो त्वरित निघून गेला । कर्नाटका माझारीं ॥ ८९ ॥
रणांगणीं विक्रम दावून । बंडवाल्यांस पराभवून ।
शहा आला परतून । विजापुरीं लौकरी ॥ ९० ॥
मग दरबारीं विचार चालला । यश येतें शिवाजीला ।
सिद्धी न ये निज यत्नाला । काय आतां करावें ॥ ९१ ॥
अबदुल महंमद नामें वजीर । होता राजकारणीं अत्यंत चतुर ।
तेणें शहास कळविला विचार । 'सख्य शिवाजीसीं करावें' ॥ ९२ ॥
स्ववीरगण हतवीर्य झाला । दुजा उपाय नाहीं राहिला ।
यास्तव शहानें मान्य केला । हा विचार तेधवां ॥ ९३ ॥
मग पाचारून शहाजीला । शहानें तयाचा सन्मान केला ।
म्हणे वळवून आपुल्या सुताला । मित्र करीं आमुचा ॥ ९४ ॥

सभाग्य बलिष्ठ तुझा सुत । आह्मी हतवीर्य झालों प्रस्तुत ।
तूं होऊन आतां मध्यस्त । करी साम आमुचा ॥ ९५ ॥
स्वपुत्राचे गुण वर्णन । ऐसें यवन मुखें ऐकून ।
प्रेमाश्रूनीं भरले नयन । शहाजीचे तेधवां ॥ ९६ ॥
मग शहाजी मध्यस्थ होऊन । देई दोघांत साम करून ।
दोघांनींही आजपासून । कलह अगदीं न करावा ॥ ९७ ॥
जो जो प्रांत शिवें घेतला । तो त्याकडे तसाच राहिला ।
पुढें मात्र यवन देशाला । शिवें त्रास न द्यावा ॥ ९८ ॥
यापरी दोघांचा साम ठरला । दोघांनाही हर्ष झाला ।
मग वाटलें शहाजीला । स्वसुतातें भेटावें ॥ ९९ ॥
प्रतापी निवाला निज कुमर । जाऊन पाहूं डोळेभर ।
ऐसा चित्तांत करून विचार । शहाजी देशीं पातला ॥ १०० ॥
भेटीस येतो आपुला पिता । ही रायास कळतां वार्ता ।
हर्ष वाटला नृपाल चित्ता । चालला सामोरा गजरेंसी ॥ १०१ ॥
उभयतांची भेट झाली । पितृमूर्ति रायें वंदिली ।
पितृचरणीं मिठी घातली । शिवरायें तेधवां ॥ १०२ ॥
शहाजीस आला गंहिवर । ह्मणे ऊठ ऊठ बाळा सत्वर ।
तुझें मुखकमल मनोहर । डोळे भरून पाहूं दे ॥ १०३ ॥
स्वहस्तें सुतास उठवून । शहाजी करी परिरंभण ।
प्रेमें मस्तक अवघ्राण । करिता झाला पुनःपुनः ॥ १०४ ॥
धन्य भाग्य शहाजीराव । उदरीं आला महादेव ।
पराक्रम दावून अपूर्व । दुष्ट समस्त दंडिले ॥ १०५ ॥
कसाही असो निज सुत । तो पित्यास प्रिय अत्यंत ।
शिवरायासम प्रतापवंत । किती प्रियतम होईल ॥ १०६ ॥

प्रेमाश्रूंचा वर्षाव करीत । शहाजी पुत्रमुख न्याहाळीत ।
ह्मणे उपजून आमुच्या कुळांत । उद्धरिलेंस तयातें ॥१०७॥
मिळविलेंस अतुल यश । महाराष्ट्रराज्य स्थापिलेंस ।
धर्मस्थापनेचा हव्यास । धरून दंडिलेंस खलांतें ॥ १०८ ॥
ममाज्ञा मानून प्रमाण । घोरपड्याचा हरिलास प्राण ।
विक्रमें वैभव संपादून । मंज धन्य त्वां केलें ॥ १०९ ॥
विनीत होऊन राव बोले । तुमचें सुकृत फळां आलें ।
अपार यश मज लाधलें । आशिर्वादें वडिलांच्या ॥११०॥
शहाजीस प्रेमभाषणें । शिवरायाचीं नम्र वचनें ।
आतां विस्तारभयाकारणें । सोडणें आलीं मजप्रती ॥१११॥
अमोल अलंकार वस्त्रेंभूषणें । रायें अर्पिलीं पित्याकारणें ।
तुष्टविला बहुत सन्मानें । निजपिता नृपवर्यें ॥ ११२ ॥
एकत्र राहून कांहींदिन । अंतःकरणीं तुष्ट होऊन ।
मग शहाजी गेला तेयून । पूर्व स्थळीं आपुल्या ॥ ११३ ॥
विजापूरकर हतवीर्य झाले । रायास अपार यश लाधलें ।
महाराष्ट्रराज्य स्थापित झालें । शिवरायाच्या प्रतापें ॥११४॥
आतां पुढें अपूर्व रंग । दिल्लीपतीशीं पडेल प्रसंग ।
महावीर पावतील भंग । शिवनृपाच्या प्रतापें ॥ ११५ ॥
एकनिष्ठा कर्तृत्वशक्ती । अतुल विक्रम स्वदेशभक्ती ।
एकवटतां कार्यनिष्पत्ती । कैशी होते पहावें ॥ ११६ ॥
श्रीशिवविजयग्रंथ । शिवावतार चरित्र अद्भुत ।
वर्णन करी भावें अनंत । षोडशाध्याय गोड हा ॥ ११७ ॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

# अध्याय १७ वा.

॥ श्रीगणेशायनमः ॥

शिवरायाचा प्रताप अपार । हतवीर्य झाले विजापुरकर ।
नृपतींचें सोडून वैर । मित्रत्वानें राहिले ॥ १ ॥
किल्ले मुलुख संपादिला । तो रायाकडे निर्वेध राहिला ।
बादशहा स्वस्थ बैसला । विजापूर नगरींचा ॥ २ ॥
मग रायें मनीं योजिलें । विजापुरकरांस पराभविलें ।
आतां पाहिजे यश हरिलें । दिल्लीपतीचें निश्चयें ॥ ३ ॥
मग वीर मंडळी बोलाविली । अपार सेना सज्ज केली ।
ती दोन मार्गें वांटिली । पुढील कार्या कारणें ॥ ४ ॥
पदाती वीर आगळे । त्यावरी मोरोपंतास नेमिलें ।
शूर घोडेस्वार दिधले । नेटाजीच्या आज्ञेंत ॥ ५ ॥
मोरोपंत नेटाजी पालकर । दोघेही वीर समरधीर ।
तयांस प्रेषी नृपवर । दिल्लीपतीच्या राज्यांत ॥ ६ ॥
वीरश्रीसह दोघे निघाले । मोंगलांच्या राज्यीं शिरले ।
गडकोट बळें घेतले । आपुला विक्रम दाउनी ॥ ७ ॥
जुन्नरा समीप दुर्ग बहुत । ते घेई शौर्यें मोरोपंत ।
नेटाजीनें मांडिला अनर्थ । मोंगल राज्यामाझारीं ॥ ८ ॥
मांडिली एकच रणधुमाळी । बळें यवनांचीं स्थळें लुटिलीं ।
बहुत संपत्ति मेळविली । यवनवीर पराभवुनी ॥ ९ ॥
दुष्ट यवनांस शिक्षा लावून । यश संपदा मेळवून ।
नेटाजी आला परतून । पुण्यग्रामीं सत्वर ॥ १० ॥

मुलूख लुटून केला फस्त । महाराष्ट्रवीरीं मांडिला अनर्थ ।
हें दिल्लीपतीस कळलें वृत्त । अनुचरमुखें सर्वही ॥ ११ ॥
अवरंगजेब दिल्लीपती । सत्ताधीश बलाढ्य भूपती ।
स्वहितार्थ पापीं प्रवृत्ती । सदासर्वदा जयाची ॥ १२ ॥
बंधुपित्याचा करून घात । जो जाहला सिंहासनस्थ ।
सत्तावैभवें होऊन मत्त । जो पीडी जनांतें ॥ १३ ॥
त्या अवरंगजेबास वृत्त कळलें । शिवाजीनें बंड केलें ।
दुर्गकोट बहुत घेतले । दक्षिणेंतील आपुले ॥ १४ ॥
संतप्त झाला दुष्ट यवन । ह्मणे निमकहराम शहाजीनंदन ।
आतां तयास शिक्षा लावीन । अल्प काळामाझारीं ॥ १५ ॥
मातृभगिनीचा भ्रतार । षास्तेखान नामें सरदार ।
होता रणशूर तोलदार । तयास शहा आज्ञापी ॥ १६ ॥
तुह्मी सेना घेऊन त्वरित । स्वयें जावें दक्षिणेंत ।
मर्दुमकीची करूनि शिकस्त । शिवाजीस धरावें ॥ १७ ॥
अफ्जुलखानाचा घात केला । पातशाही मुलुख लुटिला ।
यास्तव नुपेक्षावें तयाला । शिक्षा सत्वर करावी ॥ १८ ॥
ऐकतां ऐसें आज्ञापन । गर्विष्ठपणें बोले खान ।
अल्पकाळांत शिक्षा लावीन । शिवाजीस निश्चयें ॥ १९ ॥
शिवाजी जंगली वानर । आह्मी बलाढ्य योद्धे शूर ।
क्षण एक न लावितां उशीर । जिवंत धरूं तयातें ॥ २० ॥
लंकापतीचे वीर राक्षस । तुच्छ मानिती कपीश्वरांस ।
तैसेच दिल्लीपतीचे दास । अवमानिती शिवातें ॥ २१ ॥
रघुनंदना जिंकावया । लंकेहून निघाला अतिकाया ।
तैसेंच शिवनृपास धरावया । षास्तेखान निघाला ॥ २२ ॥

रोहिले पठाण रजपूत । राठोर रांगडे नानाजात ।
ऐसे सैनिक शूर बहुत । खान घेई समागमें ॥ २३ ॥
एकलक्ष पदाती वीर । पन्नास सहस्र घोडेस्वार ।
बंदुका गरनाला भाले अपार । षास्तेखान सज्ज करी ॥२४॥
पांचशें तोफा पल्लेदार । खान घेई बरोबर ।
अश्व रथ उष्ट्र गज सुंदर । अपार सर्वे घेतलें ॥ २५ ॥
रुपये मोहरा पुतळ्या होन । ऐसें बत्तीस कोटी घेई धन ।
एवं द्रव्य सेना सर्वे घेऊन । षास्तेखान निघाला ॥ २६ ॥
चालून दरकुच दरमजल । खान आला पुण्याजवळ ।
अपार दावून सेनाबळ । पुण्यपत्तन घेतलें ॥ २७ ॥
पुण्यग्रामीं स्वयें शिरून । नृपप्रासादीं राहे यवन ।
सकल सैन्य सज्ज ठेवून । बंदोबस्तें राहिला ॥ २८ ॥
जिजाई आणि शिव नृपती । ज्या प्रासादीं राहिलीं होतीं ।
त्याच प्रासादीं यवन दुर्मती । सेवकांसह राहिला ॥ २९ ॥
भोंवतालचे दुर्ग कोट । घ्यावया यत्न करी अचाट ।
परी महाराष्ट्र वीर उद्भट । नच देती तयातें ॥ ३० ॥
राजगडीं असतां शहाजीसुत । बहिरजी जासूद आला धांवत ।
ह्मणे सज्ज व्हावें नृपा त्वरित । महा अरिष्ट पातलें ॥३१॥
दिल्लीपतीचा प्रियकर । षास्तेखान सरदार थोर ।
सर्वे घेऊन सेना अपार । तुह्मांनिकट पातला ॥ ३२ ॥
मागें अफ्जुलखान युद्धा आला । त्याहून षास्तेखान असे आगळा ।
परमेश्वर रक्षील तुह्मांला । तरीच यश येईल ॥ ३३ ॥
सैन्यासह पुण्यास येऊन । तुमच्या प्रासादीं राहिला यवन ।
भ्रष्ट केलें तुमचें स्थान । विचार याचा करावा ॥ ३४ ॥

परिसतांचि ऐशी मात । सर्वत्रांस व्हावया श्रुत ।
राव पाचारी वीर समस्त । आपणांसन्निध तेधवां ॥ ३५ ॥
मोरोपंत नेटाजी पालकर । दादाजी चिमणाजी दोघे शूर ।
इत्याद्यनेक महाराष्ट्र वीर । रायानिकट पातले ॥ ३६ ॥
वार्ता कळवी शिव नृपाळ । ह्मणे दिल्लीपतीचें अपार बळ ।
पातलें पहा येऊन जवळ । विचार याचा करावा ॥ ३७ ॥
ऐकतांच शत्रूचें आगमन । महाराष्ट्र वीरां चढे स्फुरण ।
ह्मणती पराभवूं दुष्ट यवन । ईश कृपेनें संप्रती ॥ ३८ ॥
शिवराज ह्मणे शिखानष्ट । परम निर्दय क्रूर दुष्ट ।
परी प्रस्तुत आहे बलिष्ठ । कैसें आतां करावें ॥ ३९ ॥
माझी माय कुळस्वामिनी । साह्य देईल मजलागुनी ।
तरीच मी शत्रु जिंकोनी । अपार यश मेळवीन ॥ ४० ॥
शिवराय ऐसें बोलून । ध्यानस्थ झाले नेत्र मिटून ।
चित्तीं जगदंबिकेचें स्मरण । प्रेमभरें करीतसे ॥ ४१ ॥
ऐसा क्षण एक लोटला । तों चमत्कार अपूर्व झाला ।
श्रोतीं पाहिजे परिशिला । पूर्ण चित्त देउनी ॥ ४२ ॥
शिव नृपास चढे स्फुरण । हांक फोडी ओरडून ।
मी जगदंबा आदिकारण । आखिल चराचराची ॥ ४३ ॥
तूं शिवाजी माझें बाळ । मी करीन त्वत्प्रतिपाळ ।
दुष्ट म्लेंच्छ निर्दाळून सकळ । तुजला राज्य समर्पीन ॥ ४४ ॥
तुवां चिंता सर्व सोडावी । मर्दुमकीची शर्थ करावी ।
शत्रूस शिक्षा लावावी । स्वसामर्थ्य दावुनी ॥ ४५ ॥
मी तुझी पाठ राखीन । तव हस्तें शत्रू पराभवीन ।
धर्म संस्थापना पूर्ण करवीन । निःसंशय बालका ॥ ४६ ॥

शिव शरीरीं संचार करून । अंबिका गर्जे ऐसें वचन ।
सवेंच पावतां अंतर्धान । राव निचेष्ट पडियेला ॥ ४७ ॥
मोरोपंतादि सैनिक चतुर । रायास करिती शीतळोपचार ।
सावध होऊनि नृपवर । मधुर वचन बोलिला ॥ ४८ ॥
ह्मणे क्षणेक ध्यान केलें । तों दैदीप्यमान तेज दिसलें ।
अहाहा अंतःकरण धालें । तया तेजा पाहुनी ॥ ४९ ॥
सकल तेजाची मूर्ती झाली । माझी जगदंबा भवानी दिसली ।
मम शरीरीं प्रवेशली । ऐसें मजला वाटलें ॥ ५० ॥
अपार तेज अवलोकून । माझें सुटलें देहभान ।
पुढें काय घडलें वर्तमान । तेंही मजला स्मरेना ॥ ५१ ॥
ऐसें बोलतां शहाजीकुमर । सर्व करिती जयजयकार ।
ह्मणती धन्यभाग्य तूं नृपवर । प्रसन्न झाली अंबिका ॥५२॥
तव शरीरीं प्रवेशून । अंबिका बोलली अभय वचन ।
मीं तुझी पाठ राखून । पराभवीन शत्रूतें ॥ ५३ ॥
जैसें अंबिकेचें भाषण झालें । तें सर्व रायास कळविलें ।
शिवनेत्रीं अश्रू आले । प्रेमभावें तत्काळ ॥ ५४ ॥
ह्मणे भवानी दीनदयाळ । मज संकटीं संरक्षील ।
सद्गुरूही कृपा करील । यश येईल निश्चयें ॥ ५५ ॥
हाच सुमुहूर्त मज मिळाला । शुभ शकुन हाच झाला ।
सकल शूरहो उठा चला । दुष्ट यवन जिंकावया ॥ ५६ ॥
एक सहस्र महाराष्ट्र वीर । जे अपार शूर समरधीर ।
निवडून काढी नृपवर । शत्रूवरी न्यावया ॥ ५७ ॥
चपल अश्व सज्ज केले । अवघे वीर सशस्त्र झाले ।
अश्वांवरी आरूढले । रघुवीर नाम गर्जुनी ॥ ५८ ॥

महाराष्ट्र वीरांचे बाहु स्फुरती । सुंदर अश्व थै थै नाचती ।
चालून.जावया ओढ घेती । कष्ट पडती आंवरावया ॥५९॥
लगाम खेंचतां खिंकाळती । भूमीस टापांचे प्रहार करिती ।
किंचित् वक्र होउनी मुरडती । उडों पाहती एकदांच ॥६०॥
शिव नृपाल सज्ज झाला । विजयी अश्वावरी बैसला ।
सशस्त्र सुंदर कैसा शोभला । दशरथनंदनासारिखा ॥६१॥
सकल सैन्यापुढें होऊन । बोलता झाला गंभीर वचन ।
शूर वीरहो त्वरा करून । चला गांठूं शत्रूसी ॥ ६२ ॥
धर्मसंस्थापने कारण । जीवित्व तृणवत् मानून ।
आपण शीघ्र करूं गमन । शत्रुनाश करावया ॥ ६३ ॥
धारातीर्थीं देह पडतील । तरी अपूर्व सुखें स्वर्गीं मिळतील ।
विजयश्री प्राप्त होईल । तरी भोगूं स्वराज्य ॥ ६४ ॥
शिवराय ऐसें बोलून । 'जयरघुवीर' नाम गर्जून ।
अश्व फेंकी त्वरें करून । सत्गुरूप्रती आठउनी ॥ ६५ ॥
वीर 'रघुवीर' गर्जले । सहस्त्र अश्व एकदांच उडाले ।
रायासहित चालू झाले । वीरमदें भरूनी ॥ ६६ ॥
चपल अश्व उड्या घेती । वायूसारिखे मार्गीं धांवती ।
न घेतां क्षणेक विश्रांती । पंथ क्रमिती त्वरेनें ॥ ६७ ॥
एक घटिका रात्र झाली । तों पुण्यासमीप स्वारी पातली ।
मग तेथेंच थांबवी मंडळी । शिवराय तेधवां ॥ ६८ ॥
मोरोपंत पिंगळे चतुर । नेटाजी पालकर रणशूर ।
तयांस आज्ञापि नृपवर । तुह्मीं येथें असावें ॥ ६९ ॥
आपुली सेना सज्ज ठेवावी । शत्रु सैन्याची पाळद राखावी ।
प्रसंगीं मर्दुमकी करावी । निर्भय चित्त होउनी ॥ ७० ॥

आह्मी नगरीं प्रवेश करितों । दुष्ट यवनाचा समाचार घेतों ।
शत्रूस शिक्षा लावितों । पळमात्र न लागतां ॥ ७१.॥
ऐसें शिव नृपाळ बोलला । अश्वावरून उतरला ।
नगरीं जावया सज्ज झाला । अपार धैर्य रायाचें ॥ ७२ ॥
दादाजी चिमणाजी नामक । दोघे बंधू विश्वासुक ।
देशपांड्ये आज्ञाधारक । कृपापात्र रायाचे ॥ ७३ ॥
दोन शतकें वीर निवडून । तयां दोघांसह सर्व घेऊन ।
वरकड सैन्य मागें ठेवून । शिवराय निघाला ॥ ७४ ॥
शत्रुसेना समुद्र भरला । त्यावरी कैसा राव चालिला ।
कैसा साहसीं धीर झाला । आश्चर्य वाटे जनातें ॥ ७५ ॥
बिनीस चिमणाजी चालिला । वीरवर्ग मागून निघाला ।
पुण्यपत्तनीं प्रवेशला । शिवराजा यापरी ॥ ७६ ॥
अस्तंगत दिवाकर । मार्गीं पडला अंधकार ।
त्वरें चालिले महाराष्ट्र वीर । राजप्रसाद गांठावया ॥ ७७ ॥
यवन सैनिक रस्तोरस्तीं । सशस्त्र होउनी स्वयें फिरती ।
आल्या गेल्यास दरडाविती । बळें मत्त होउनी ॥ ७८ ॥
मार्गीं नृपाळ चालतां । गांठ पडली अवचितां ।
ह्मणती कोण कोठें जातां । अंधारांतुनी अपरात्रीं ॥ ७९ ॥
बिनीस चिमणाजी रणशूर । समयसूचक आणि चतुर ।
निर्भयपणें देई उत्तर । कांहो व्यर्थ विचारितां ॥ ८० ॥
तुह्मांस कैशी नसे ओळख । आह्मी सर्व तुमचेच सैनिक ।
नगरवेशीचे संरक्षक । पहारा बदलून जातसों ॥ ८१ ॥
आमची झाली दिवसपाळी । आतां आली दुजी टोळी ।
पुन्हां जाणें पडेल सकाळीं । प्रस्तुत भोजना जातसों ॥८२॥

ऐकतांच ऐसें चोख उत्तर । बेदाद अवघेंच दरबार ।
शोध न करितां यवन वीर । जाऊं देती नृपाळा ॥ ८३ ॥
एवं ससैन्य पंथ क्रमिला । राव प्रासादासमीप आला ।
सावधपणें पाहूं लागला । कैशी स्थीति शत्रूची ॥ ८४ ॥
देखून दुर्जेय प्रासाददेश । निर्भयपणें सावकाश ।
यवन होते निद्रावश । रजनीमाजीं तेधवां ॥ ८५ ॥
कृप, भोज, द्रौणीवीर । जैसे पाहती पांडवशिबिर ।
तैसे दादाजी, चिमणाजी नृपवर । यवनशिबिर पाहती ॥८६॥
पश्चिमद्वारीं स्थापून दादाजी । दक्षिणद्वारिं ठेवी चिमणाजी ।
मग तो महाराज शिवाजी । स्वयें प्रासादीं प्रवेशला ॥८७॥
निवडक योध्द्यांसमवेत । प्रासादीं शिरला शहाजीसुत ।
कोठें खान आहे निद्रित । शोधून पाहूं लागला ॥ ८८ ॥
नृपतीचें धैर्य अपार । हस्तीं घेऊन नग्न तरवार ।
त्वरें आक्रमिलें अंतःपुर । क्षणमात्र न लागतां ॥ ८९ ॥
मध्यरात्र असे जाहली । निद्रित होती सर्व मंडळी ।
अंतःपुरीं दीपावली । प्रकाशमान दिसतसे ॥ ९० ॥
यवन स्त्रिया समस्त । होत्या पडल्या अस्ताव्यस्त ।
कांहीं निजल्या कांहीं जागृत । सुखशयनीं लोळती ॥९१॥
एकाएकीं महाराष्ट्रवीर । उभे ठाकले तयांसमोर ।
काळासारिखे भयंकर । जागृत स्त्रियांनीं देखिले ॥ ९२ ॥
भयंकर मूर्ती दिसल्या । यवनस्त्रिया घाबरल्या ।
मग एकदांच ओरडल्या । 'धांवा धांवा' ह्मणूनी ॥ ९३ ॥
झाला एकचि गलबला । घात घात शब्द उठला ।
रक्षकवर्ग धांऊन आला । अंतःपुरा सन्निध ॥ ९४ ॥

जे जे रक्षक पुढें येती । त्यांस महाराष्ट्रवीर वधिती ।
तोबा तोबा यवन बोलती । कोण शत्रू कळेना ॥ ९५ ॥
झाला एकाचि हलकल्लोळ । स्त्रिया पिटिती वक्षस्थळ ।
अस्ताव्यस्त यवन सकळ । गेले घाबरून ते काळीं ॥ ९६ ॥
महाराष्ट्रवीर सरसावले । पाडिती यवनांचीं शिरकमळें ।
यवन वीर पळूं लागले । सौधद्वारें लक्षुनी ॥ ९७ ॥
धृष्टद्युम्नाच्या भव्य शिबिरीं । अश्वत्थामा अनर्थ करी ।
तैसाच निकर ये अवसरीं । शिवरायें मांडिला ॥ ९८ ॥
अश्वत्थामा शिवनृपाळ । स्वयें संहारी यवनबळ ।
म्लेंच्छ पळों लागले सकळ । प्राण आपुले रक्षावया ॥९९॥
कृप भोज कौरववीर । तैसेच दादाजी चिमाजी रणशूर ।
बळें रक्षिती सौधद्वार । जाऊं न देती कवणातें ॥ १०० ॥
शिवरायसिंहास टाकून । जे जे येती पळून यवन ।
दादाजी चिमाजी पंचानन । प्राण घेती तयांचा ॥ १०१ ॥
यापरी अनर्थ ओढवला । मग शिवराय पुढें चालिला ।
षास्तेखान कोठें निजला । शोध करी भूपती ॥ १०२ ॥
अंतःपुरीं होत गलबला । तेणें खान जागृत जाहला ।
तों महा अनर्थ देखिला । मृत्यु समीप उभा असे ॥१०३॥
खान चित्तीं घाबरला । स्त्रीजनांमाजी दडाला ।
शिवराय शोधीत आला । तयास्थानीं तेधवां ॥ १०४ ॥
भूप देखे अंतःपुरीं । खान नाहीं शय्येवरी ।
स्त्रीजनांमाजीं शोध करी । कोठें रिपू लपाला ॥ १०५ ॥
भयाभीत यवनदारा । पळों लागल्या सैरावैरा ।
शिवराजा पुण्यवंत खरा । न धरी शस्त्र तयांवरी ॥१०६॥

षास्तेखान घाबरला । स्त्रियांसवें पळों लागला ।
नृपें दुरून देखिला । शत्रू जातो पळूनी ॥ १०७ ॥
शिवभूप पंचानन । म्लेंच्छमेषावरी जाई धांवून ।
षास्तेखानाचा घ्यावया प्राण । करी प्रहार खड्गाचा ॥१०८॥
प्राणांतक प्रहार केवळ । तुटून पडावें शिरकमळ ।
परी खानाचें दैव सबळ । चुकला प्रहार तेसमयीं ॥१०९॥
मर्मस्थानें सर्व चुकलीं । तरवार हस्तावरी लागली ।
षास्तेखानाचीं बोटें तुटलीं । रक्त वाहे भळभळां ॥ ११० ॥
विव्हळ होऊन ओरडे खान । स्त्रियांसवें गेला पळून ।
हाहाकार झाला दारुण । आकांत थोर वर्तला ॥ १११ ॥
प्रासादांत शत्रु शिरला । ऐसा नगरीं ध्वनीं उठला ।
सैनिकवर्ग धांऊन आला । राजद्वारा सन्निध ॥ ११२ ॥
मुख्य शत्रू पळून गेला । जनसमुदाय जमूं लागला ।
मग भूप तेथून निघाला । स्वीयजनां समवेत ॥ ११३ ॥
नगरीं एकच गलबला । त्यांतून राव त्वरें चालिला ।
वेगें पुराबाहेर आला । स्वीय सैन्यासमीप ॥ ११४ ॥
सैनिकांस कळवून वृत्त । ससैन्य निघाला राव त्वरित ।
लक्षून राजगडाचा पंथ । मार्ग क्रमी त्वरेनें ॥ ११५ ॥
पुण्यपत्तनीं यवन सैनिक । प्रासादीं धांवले सकाळिक ।
कोठें रिपूचे असती लोक । शोधून पाहती चहूंकडे ॥११६॥
षास्तेखानाचीं बोटें तुटलीं । यवन वीरांचीं प्रेतें पडलीं ।
परी कैशी गोष्ट घडली । कोणासही कळेना ॥ ११७ ॥
चहूंकडे पाहती शोधून । परी कोठेंही नाढळे शत्रूजन ।
भयग्रस्त जाहले यवन । कैसें जाहले कळेना ॥ ११८ ॥

महाराष्ट्रवीर दृष्टीस पडले । परी प्रासादीं कैसे आले ।
एकाएकीं गुप्त झाले । कैशापरी कळेना ॥ ११९ ॥
षास्तेखान पुढें आला । सैनिकवर्ग भोंवता मिळाला ।
भीती वाटे अवघ्यांला । महा अनर्थ पाहुनी ॥ १२० ॥
षास्तेखान क्रोधावला । ह्मणे रक्षकीं घात केला ।
येऊं दिलें शत्रु सैन्याला । प्रासादांत आमुच्या ॥ १२१ ॥
मग बोलती प्रासादरक्षक । परम सुस्त आपुले सैनिक ।
नगरीं शिरतां अरीचे लोक । कां न वारिलें तयातें ॥ १२२ ॥
एकदांच सौधीं घुसले । त्यांपुढें आमुचें न चाले ।
स्वसैन्यें असतें आडविलें । ह्मणजे येते कासया ॥ १२३ ॥
क्रोधें सैनिक बोलती । यांत नाहीं आमुची सुस्ती ।
आह्मी नगरासभोंवती । रात्रंदिन फिरतसों ॥ १२४ ॥
थोडे असती शत्रुजन । बहुधा आले वेष बदलून ।
एकाएकीं प्रासाद गांठून । निकर केला तयांनीं ॥ १२५ ॥
भ्याड मूर्ख द्वारपाळ । ह्मणून आली ऐशी वेळ ।
आह्मी वीर असतां प्रबळ । केला अनर्थ अरीनीं ॥ १२६ ॥
षास्तेखान क्रोधावला । अत्यंत अंतरीं संतप्त झाला ।
ह्मणे तुह्मां अवघ्यांला । शिक्षा लावीन निश्चयें ॥ १२७ ॥
भ्याड सुस्त अवघे असतां । एकमेकावरी लोटितां ।
'तोबा' अपजय यापरता । नाहीं दुजा आह्मांतें ॥ १२८ ॥
सहस्रावधी सैनिक ठेविले । वेतन देउनी बाळगिले ।
ते खासे कामा आले । प्राणसंकटीं आमुच्या ॥ १२९ ॥
अल्प रिपुजन धांऊन आले । आमुच्या अंतरगृहीं शिरले ।
आमुचें सैन्य स्वस्थ राहिलें । झोंपा घेत आनंदें ॥ १३० ॥

किंवा वाटे शंका अंतरीं । कोणी तरी आहेत फितुरी ।
त्यावीण निर्धास्त अंतःपुरीं । कैसा शत्रू शिरेल ॥ १३१ ॥
आज खुदानें खैर केली । ह्मणून माझी काया वांचली ।
परी आज काळोखी आली । अपयशाची मम मुखा ॥१३२॥
आमुच्यांत दिसतें फितुरपण । आज शत्रू गेला बोटें तोडून ।
उद्यां शीर नेईल कापून । कैसें आह्मीं करावें ॥ १३३ ॥
ऐसा विचार होत असतां । उदयाद्रीवरी आला सविता ।
षास्तेखान सांगे समस्तां । यवनवीरां मेळवूनी ॥ १३४ ॥
निद्रित असतां दगा झाला । आमुचा धीर सर्व सुटला ।
येथें केव्हांच मुकूं प्राणाला । ऐसें मनीं वाटतें ॥ १३५ ॥
शिवाजी तो असे सैतान । क्षणें मारिला अफजुलखान ।
आमुच्या अंतर्गृहीं शिरून । केलें घायाळ आह्मांसी ॥१३६॥
केव्हांच कोठून येईल । आमुचें शीर कापून नेईल ।
हें कोणासही न कळेल । दगाबाज तो असे ॥ १३७ ॥
यास्तव तुह्मी सज्ज व्हावें । दिल्लीस जावया निघावें ।
पुढें होणार तें होवो स्वभावें । काय करावें तयाला ॥१३८॥
यापरी सेनेस आज्ञापून । षास्तेखान आटोपी भोजन ।
मग गमनसंकेत वाद्यें वाजवून । सैन्यासहित निघाला ॥१३९॥
सर्व सैन्य सवें घेऊन । निघून गेला षास्तेखान ।
शिवरायाचें महा विघ्न । ऐशापरी निरसलें ॥ १४० ॥
राव राजगडीं पातला । जयजयकाराचा घोष केला ।
उल्हाटयंत्रें सोडून अवघ्यांला । निज विजय कळविला ॥१४१॥
निघून गेला षास्तेखान । रायास कळलें वर्तमान ।
मग नृपाचें हर्षलें मन । विघ्न टळलें ह्मणूनी ॥ १४२ ॥

पास्तेखान बलोद्धत । अपार सेना तयासमवेत ।
कैसा विजय होईल प्राप्त । होती चिंता समस्तां ॥ १४३ ॥
परी भवानीचें पाठबळ । विजयी झाला शिवनृपाळ ।
अपार चरित्र रसाळ । शिवराय दावीतसे ॥ १४४ ॥
श्रीशिवविजयग्रंथ । शिवावतार चरित्र अद्भुत ।
वर्णन करी भावें अनंत । सप्तदशाध्याय गोड हा ॥१४५॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

# अध्याय १८ वा.

॥ श्रीगणेशायनमः ॥

पूर्वाध्याय समाप्तीला । षास्तेखान परतून गेला ।
पुढें वृत्तांत कैसा वर्तला । श्रोतीं सादर परिसावें ॥ १ ॥
शिव नृपाळ एके दिनीं । बैसला असतां सभास्थांनीं ।
सत्गुरू रामदास सत्गुणी । एकाएकीं प्रगटले ॥ २ ॥
रायें वंदून गुरु चरण । यथोपचारें केलें पूजन ।
गुरूनें आशिर्वाद देऊन । रायालागीं तोषविलें ॥ ३ ॥
जीं जीं राजकार्यें घडून आलीं । तीं तीं रायें कथन केलीं ।
गुरुमूर्ती प्रसन्न झाली । नृप कार्यें परिसुनी ॥ ४ ॥
सत्गुरूचें होतां दर्शन । विरक्त झालें नृपाळ मन ।
मग बोले कर जोडून । सत्गुरूराया समर्था ॥ ५ ॥
नर देह प्राप्त झाला । अनेक मार्ग दिसती तयाला ।
कोणता पाहिजे स्वीकारिला । सांग दयाळा मजलागीं ॥६॥
प्रवृत्ती निवृत्ती व्यवहार वेदांत । इत्यादि शतशः दिसती पंथ ।
साशंक होतें माझें चित्त । कोणता मार्ग धरावा ॥ ७ ॥
ज्या कारणें जन्म झालें । तें पाहिजे सिद्धीस गेलें ।
तरी कैसें पाहिजे वर्तलें । सांग उदारा गुरुवर्या ॥ ८ ॥
जेणें साधेल इहलोक । सुगम होईल परलोक ।
ऐसा मजला सुविवेक । कृपा करून सांगावा ॥ ९ ॥
सत्गुरू ह्मणती शिव नृपाळा । कांहीं सुविचार सांगेन तुजला ।
तेणें संतोष वाटून मनाला । चित्तशुद्धी होईल ॥ १० ॥

प्राप्त झाला नर देह । परी तो व्हावया हितावह ।
कोणास भजावें हा संदेह । अज्ञानें जनां वाटतो ॥ ११ ॥
नाना शास्त्रें धांडोळितां । आयुष्य पुरेना सर्वथा ।
तरी संशयाची व्यथा । वाढोंचि लागे ॥ १२ ॥
नाना तीर्थें थोर थोरें । सृष्टीमध्यें अपारें ।
सुगमें दुर्गमें दुष्करें । पुण्यदायकें ॥ १३ ॥
ऐशीं तीर्थें सर्वहा करी । ऐसा कोण रे संसारी ।
फिरों जातां जन्मवरी । आयुष्य पुरेना ॥ १४ ॥
नाना तपें नाना दानें । नाना योग नाना साधनें ।
हीं सर्वही देवाकारणें । करिजेत आहे ॥ १५ ॥
पावावया देवाधिदेवा । बहुविध श्रम करावा ।
तेणें देव ठायीं पडावा । हें सर्व मत ॥ १६ ॥
पावावया भगवंतातें । नाना पंथ नाना मतें ।
तया देवाचें स्वरूप तें । कैसें आहे ॥ १७ ॥
बहुत देव सृष्टीवरी । त्यांची गणना कोण करी ।
एक देव कोणेपरी । ठायीं पडेना ॥ १८ ॥
बहुविध उपासना । ज्याची जेथें पुरे कामना ।
तो तेथेंचि राहिला मना । सुदृढ करूनी ॥ १९ ॥
बहु देव बहु भक्त । इच्छा झाले आसक्त ।
बहु ऋषि बहु मत । वेगळाले ॥ २० ॥
बहु निवडतां निवडेना । एक निश्चय घडेना ।
शास्त्रें भांडती पडेना । निश्चय ठायीं ॥ २१ ॥
बहुत शास्त्रीं बहुत भेद । मत मतांसि विरोध ।
ऐसा करितां विवाद । बहुत गेले ॥ २२ ॥

सहस्रामध्यें कोणी एक । पाहे देवाचा विवेक ।
परी त्या देवाचें कौतुक । ठायीं न पडे ॥ २३ ॥
ठायीं न पडे ऐसें ह्मणतां । तेथेंचि लागली अहंता ।
देव राहिला परता । अहंता गुणें ॥ २४ ॥
आतां असो हें बोलणें । नाना योग ज्या कारणें ।
तो देव कोण्या गुणें । ठायीं पडे ॥ २५ ॥
देव कोणास ह्मणावें । कैसें तयास जाणावें ।
तेंचि बोलणें स्वभावें । बोलिजेल ॥ २६ ॥
जेणें केलें चराचर । केले सृष्टयादि व्यापार ।
सकळ कर्ता निरंतर । नाम जयाचें ॥ २७ ॥
जेणें केल्या मेघमाळा । चंद्र बिंबीं अमृत कळा ।
तेज दिधलें रवि मंडळा । जया देवें ॥ २८ ॥
ज्याची मर्यादा सागरा । जेणें स्थापिलें फणिवरा ।
जयाचेनि गुणें तारा । अंतरिक्ष ॥ २९ ॥
ज्याची खाणी चारी वाणी । चौऱ्यायशी लक्ष योनी ।
जेणें निर्मिले लोक तीन्ही । तयां नांव देह ॥ ३० ॥
ब्रह्मा विष्णु आणि हर । हे जयाचे अवतार ।
तोचि देव हा निर्धार । निश्चयेंसी ॥ ३१ ॥
देव्हाऱ्याचा उठोन देव । करूं नेणें सर्व जीव ।
तयाचेनि ब्रह्म कटाव । निर्मिला न वचे ॥ ३२ ॥
ठायीं ठायीं देव असती । तिहीं केली नाहीं क्षिती ।
चंद्र सूर्य तारा जी मूर्ती । तयाचेनि नव्हे ॥ ३३ ॥
सर्व कर्ता तोचि देव । पाहूं जातां निरवयव ।
ज्याची कळा लीळा लाघव । नेणती ब्रह्मादिक ॥ ३४ ॥

पैस अवकाश आकाश । कांहींच नाहीं तें भकाश ।
तया निर्मळीं वायूस । जन्म जाहला ॥ ३५ ॥
वायूपासून झाला वन्ही । वन्हीपासून झालें पाणी ।
ऐशी जयाची करणी । अघटित घडली ॥ ३६ ॥
उदकापासून सृष्टी झाली । स्तंभेवीण उभारली ।
ऐशी विचित्र कळा केली । त्या नांव देव ॥ ३७ ॥
देवें निर्मिली हे क्षिती । तिचे पोटीं पाषाण होती ।
तयांसच देव ह्मणती । विवेक हीन ॥ ३८ ॥
जो निर्माण कर्ता । तो ये सृष्टीपूर्वीं होता ।
मग हे तयाची सत्ता । निर्माण जाहली ॥ ३९ ॥
कुलालपात्र पूर्वीं आहे । पात्र कांहीं कुलाल नव्हे ।
तैसा देव पूर्वींच आहे । पाषाण नव्हे सर्वथा ॥ ४० ॥
मृत्तिकेचें सैन्य केलें । कर्ते वेगळे राहिले ।
कार्यकारण एक केलें । तरी होणार नाहीं ॥ ४१ ॥
तथापि होईल पंचभौतिक । निर्गुण नव्हे कांहींएक ।
कार्यकारणाचा विवेक । भूतापरता नाहीं ॥ ४२ ॥
अवघी सृष्टी जो कर्ता । तो एक सृष्टीहून परता ।
तेथें संशयाची वार्ता । काढूंच नये ॥ ४३ ॥
खांब सूत्रीच बाहुली । जेणें पुरुषें नाचविली ।
तोचि बाहुली हे बोली । घडे केवी ॥ ४४ ॥
छाया मंडपींची सेना । सृष्टीसारखी रचना ।
सृष्टी चाळी परी तो नाना । व्यक्ती नव्हे ॥ ४५ ॥
तैसाच सृष्टीकर्ता देव । परी तो नव्हे सृष्टीभाव ।
जेणें केले नाना जीव । तो जीव कैसेनी ॥ ४६ ॥

जें जया करणें पडे । तो तें नोहे कैसें घडे ।
ह्मणून वायांच बापुडे । संदेहीं पडती ॥ ४७ ॥
सृष्टी ऐसेचि स्वभावें । गोपूर निर्मिलें स्वभावें ।
परी तो गोपुरकर्ता नव्हे । निश्चयेसीं ॥ ४८ ॥
तैसें जग निर्मिलें जेणें । तो वेगळा पूर्णपणें ।
एक ह्मणती मूर्खपणें । जगतोचि जगदीश ॥ ४९ ॥
एवं जगदीश तो वेगळा । जगनिर्माण ज्याची कळा ।
तो सर्वांमध्यें निराळा । असोनि सर्वी ॥ ५० ॥
ह्मणून भूतांचा कर्दम । त्यासि अलिप्त आत्माराम ।
अविद्यागुणें माया भ्रम । सत्यचि वाटे ॥ ५१ ॥
मायोपाधि जगडंबर । आहे सर्वही साचार ।
ऐसा विपरीत विचार । कोठेंचि नाहीं ॥ ५२ ॥
ह्मणोन जगमिथ्या साच आत्मा । सर्वांपर जो परमात्मा ।
अंतर्बाह्य अंतरात्मा । व्यापून असे ॥ ५३ ॥
तयास ह्मणावें देव । येर हें अवघेंचि वाव ।
ऐसा आहे अंतरभाव । वेदांतींचा ॥ ५४ ॥
पदार्थ वस्तू नाशवंत । हें तो अनुभवास येत ।
याकारणें भगवंत । पदार्था वेगळा ॥ ५५ ॥
देव निर्मळ आणि अचल । शास्त्रें बोलती सकळ ।
तया निश्चळास चंचळ । ह्मणों नये सर्वथा ॥ ५६ ॥
देव आला देव गेला । देव उपजला देव मेला ।
ऐसें बोलतां दुरिताला । काय उणें ॥ ५७ ॥
जन्म मरणाची वार्ता । देवास न लगे सर्वथा ।
देव अमर जयाची सत्ता । त्यास मृत्यू कैसेनी ॥ ५८ ॥

उपजणें आणि मरणें । येणें जाणें दुःख भोगणें ।
हें त्या देवाचें करणें । तो कारणा वेगळा ॥ ५९ ॥
अंतःकरण पंचप्राण । बहुत तत्वीं पिंडज्ञान ।
यांसर्वांस आहे चळण । ह्मणूनि देव नव्हेतां ॥ ६० ॥
एवं कल्पनेरहित । तया नांव भगवंत ।
तेथें देवपणाची मात । भासत नाहीं ॥ ६१ ॥
ऐसें देवस्वरूप निश्चित । नृपाळा तूं ठेवी चित्तांत ।
तेणें होशील संशयरहित । देवत्वरूपासंबंधें ॥ ६२ ॥
नृप बोले जोडून हस्त । एक शंका उठली चित्तांत ।
तूं महाराज सद्गुरू समर्थ । संशयरहित करावें ॥ ६३ ॥
पृथ्वीमध्यें लोक सकळ । एक संपन्न एक दुर्बळ ।
एक दुर्बळ एक वोंगळ । काय निमित्तें ॥ ६४ ॥
कित्येक राजे नांदती । कित्येक दरिद्र भोगती ।
कित्येकांची उत्तम स्थिती । कित्येक अधमाधम ॥ ६५ ॥
ऐसें काय निमित्त झालें । हें मज अज्ञाना न कळे ।
ह्मणून पाहिजे निरूपिलें । कृपा मजवरी करूनी ॥ ६६ ॥
ऐकून रायाचा संशय । बोलता झाला सद्‌गुरूराय ।
जेणें समाधान होय । सत्‌शिष्याचें बहूत ॥ ६७ ॥
ह्मणे हे सकल गुणांपाशीं गती । सगुण भाग्यश्री भोगिती ।
अवगुणांस दरिद्र प्राप्ती । यदर्थीं संदेह नाहीं ॥ ६८ ॥
जो जेथें उपजला । तो तेथें व्यवसायी उमजला ।
तयास लोक ह्मणती भला । कार्य कर्त्ता ॥ ६९ ॥
जाणता तो कार्य करी । नेणता कांहींच न करी ।
जाणता तो पोट भरी । नेणता भीक मागे ॥ ७० ॥

हें तों प्रगटचि असे । जनीं पाहतां प्रत्यक्ष दिसे ।
विद्येवीण करंटा वसे । विद्या तो भाग्यवंत ॥ ७१ ॥
आपली विद्या न शिकशी । तरी काय भीक मागशी ।
जेथें, तेथें बुद्धी ऐशी । वडिलें सांगती ॥ ७२ ॥
वडील आहे करंटा । आणि समर्थ होय धाकुटा ।
कां जो विद्येनें मोठा । ह्मणोनियां ॥ ७३ ॥
विद्या नाहीं बुद्धी नाहीं । विवेक नाहीं साक्षेप नाहीं ।
कुशळता नाहीं व्याप नाहीं । ह्मणून प्राणी करंटा ॥ ७४ ॥
इतुकेंही जेथें वसे । तेथें वैभवास उणें नसे ।
वैभव सोडितां अपैसे । पाठीस लागे ॥ ७५ ॥
वडील समर्थ धाकुटा भिकारी । ऐका याची कैशी परी ।
वडिलां ऐसा व्याप न करी । ह्मणोनियां ॥ ७६ ॥
जैशी विद्या तैशी हांव । जैसा व्याप तैसें वैभव ।
तोलासारिखा हाव भाव । लोक करिती ॥ ७७ ॥
विद्या नसे वैभव नसे । तेथें निर्मळ कैंचा असे ।
करंटपणें वोखटा दिसे । वोंगळ आणि विकारी ॥ ७८ ॥
पशु पक्षी गुणवंत । त्यांस ग्रहण करिती समर्थ ।
गुण नसतां जिणें व्यर्थ । प्राणिमात्रांचें ॥ ७९ ॥
गुण नाहीं गौरव नाहीं । सामर्थ्य नाहीं महत्व नाहीं ।
कुशलता नाहीं तर्क नाहीं । प्राणिमात्रांसी ॥ ८० ॥
याकारणें उत्तम गुण । तोंचि भाग्याचें लक्षण ।
लक्षणेंवीण अवलक्षण । सहजची झालें ॥ ८१ ॥
जनांमध्यें जो जाणता । त्यास आहे मान्यता ।
कोणीएक विद्या असतां । महत्व पावे ॥ ८२ ॥

प्रपंच अथवा परमार्थ । जाणता तोचि समर्थ ।
नेणता जाणिजे व्यर्थ । निष्कारण ॥ ८३ ॥
नेणतां विंचू सर्प डसे । नेणतां जीव घात असे ।
नेणतां कार्य नासे । कांहीं एक ॥ ८४ ॥
नेणतां प्राणी सिंतरे । नेणतपणें तऱ्हें भरे ।
नेणतपणें ठके विसरे । पदार्थ कांहीं ॥ ८५ ॥
नेणतां वैरी जिंकिती । नेणतां अपायीं पडती ।
नेणतां संहारिती । घडती जीवनाश ॥ ८६ ॥
आपुलें स्वहित न कळे जनां । तेणें भोगिती यातना ।
ज्ञान नेणतां अज्ञाना । अधोगती ॥ ८७ ॥
जाणतां समर्थांचें अंतर । प्रसंगें वर्ते तदनुसार ।
भाग्य वैभव अपार । तेणेंचि पावे ॥ ८८ ॥
ह्मणोन जाणणें नव्हे सामान्य । जाणता होइजे सर्व मान्य ।
कांहींच नेणे तो अमान्य । सर्वत्र करिती ॥ ८९ ॥
पदार्थ देखोन भूतभावी । नेणता झडपोन प्राण ठेवी ।
मिथ्या आहे उठाठेवी । जाणते जाणती ॥ ९० ॥
जाणत्यास कळे वर्म । नेणत्याचें खोटें कर्म ।
सकळ कांहीं धर्माधर्म । जाणता कळे ॥ ९१ ॥
नेणत्यास यम यातना । जाणत्यास कांहींच लागेना ।
सकळ जाणून विवंचना । करी तो मुक्त ॥ ९२ ॥
नेणतां कांहीं राजकारण । अपमान करून घेती प्राण ।
नेणतां कठिण वर्तमान । समस्तांस होय ॥ ९३ ॥
ह्मणोनियां नेणणें खोटें । नेणते प्राणी ते करंटे ।
जाणतां विवरण तुटे । जन्म मरण ॥ ९४ ॥

ह्मणून अलक्ष करूं नये । जाणणें हाचि उपाय ।
जाणतां सांपडे सोय । परलोकाची ' ॥ ९५ ॥
ऐसा गुरूचा सदुपदेश । अमृताहून गोड विशेष ।
परिसून रायास वाटला हर्ष । ह्मणे धन्य जाहलों ॥ ९६ ॥
मग बोले कर जोडून । प्रपंचीं गुंततें माझें मन ।
जेणें घडेल परलोक साधन । ऐसें कार्य कथावें ॥ ९७ ॥
तदा सद्गुरू करिती स्मित । ह्मणती अपार घडलें सुकृत ।
नित्य कष्टशी धर्मरक्षणार्थ । काय अधिक याहुनी ॥ ९८ ॥
धर्मरक्षण हेंच व्रत । नृपाला तूं राखीं सतत ।
परोपकारीं सदा चित्त । ठेवून राज्य करावें ॥ ९९ ॥
नम्रपणें राव बोलत । हें तो गुरुकृपेनें आहे घडत ।
दुजीं कांहीं व्रतें प्रस्तुत । कृपा करून कथावीं ॥ १०० ॥
समर्थ बोलती मधुर बोल । आणखीं कांहीं इच्छा असेल ।
तरी पुण्य बहुत घडेल । ऐसें कांहीं सांगतों ॥ १०१ ॥
शंकर तुमचें आराध्य दैवत । तुह्मी तयाचे पूर्ण भक्त ।
तत्कृपेनें ऐश्वर्यवंत । तुह्मी प्रस्तुत जाहला ॥ १०२ ॥
तो महादेव पार्वतीरमण । जेणें राहील सुप्रसन्न ।
ऐशी सेवा तुह्मांकडून । अवश्य घडली पाहिजे ॥ १०३ ॥
येईल पवित्र मास श्रावण । तेव्हां कोटि लिंगें प्रेमें करून ।
अत्युत्साहें त्यांचें पूजन । नृपवर्या करावें ॥ १०४ ॥
अपार विप्रांस घालिजे भोजन । विद्वज्जनांस दक्षिणा दान ।
देऊन तोषवावे द्विजजन । श्रावण मासीं प्रतिवर्षीं ॥१०५॥
येणें उमावर तुष्ट होईल । नृपा तुजवरी कृपा करील ।
इह परत्रीं सौख्य होईल । तुजप्रती निश्चयें ॥ १०६ ॥

एक विचार माझे चित्तीं । नृपा येतसे दिवसरातीं ।
तुजप्रती कथितों संप्रती । नृपवर्या सुजाणा ॥ १०७ ॥
आपुले देशीं लोक समग्र । परस्परांस करिती जोहार ।
ही अविंधरीत अश्रेयकर । निश्चयें करूनी त्यजावी ॥१०८॥
म्लेंच्छरीत स्वीकारणें । हें आपणांस लाजिरवाणें ।
शिवराया साभिमानें । रीत एवढी त्यजावी ॥ १०९ ॥
मुखें ह्मणावें रामराम । ऐसा करावा राया नियम ।
तूं सत्ताधीश गुणधाम । प्रजेप्रती आज्ञापिजे ॥ ११० ॥
अविंध रीत येणें सुटेल । नामोच्चाराची वृद्धी होईल ।
त्वत्कीर्ती चिरकाळ राहील । पडतां रीत यापरी ॥ १११ ॥
ऐसे गुरूचे ऐकून बोल । नम्रपणें वदे नृपाळ ।
आज्ञेनुरूप कार्य घडेल । सद्‌गुरूराया समर्था ॥ ११२ ॥
गुरुशिष्य झाले हर्षित । मग गेले तेथून समर्थ ।
विश्वोद्धारकार्यानिमित्त । अवतार जयाचा उर्वीवरी ॥११३॥
समर्थगुरूनें कथन केलें । तैसेंच रायें घडवून आणिलें ।
स्वकीर्तीनें विश्व भरिलें । शिवरायें यापरी ॥ ११४ ॥
श्रीशिवविजयग्रंथ । शिवावतार प्रताप अद्भुत ।
वर्णन करी भावें अनंत । अष्टादशाध्याय गोड हा ॥११५॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

# अध्याय १९ वा.

॥ श्रीगणेशायनमः ॥

समर्थ गुरूनें उपदेश केला । तो पूर्वाध्यायीं वर्णिला ।
पुढें कैसा वृत्तांत झाला । वर्णूं प्रेमें करूनी ॥ १ ॥
करून सिंहावलोकन । पहा मागील अनुसंधान ।
पराभूत षास्तेखान । गेला ससैन्य दिल्लीकडे ॥ २ ॥
शिवरायें प्रताप केला । षास्तेखान पराभविला ।
वार्ता कळतां अवघ्यांला । जन विस्मित जाहले ॥ ३ ॥
वानरीं जिंकिला लंकानाथ । तैसेंच प्रवर्तलें येथ ।
ईश्वरी कर्तृत्व अघटित । ऐसें लोक बोलती ॥ ४ ॥
जगदुद्धार व्हावया पूर्ण । सदाशिव झालासे अवतीर्ण ।
अपार लीला जनां दावून । म्लेंच्छगर्व हरीतसे ॥ ५ ॥
षास्तेखान पळून गेला । दिल्लीस कैसा वृत्तांत वर्तला ।
तो आतां पाहिजे श्रवण केला । सादरचित्तें करूनी ॥ ६ ॥
रात्रंदिन मजला मारित । खान आक्रमी दिल्लीपंथ ।
अल्पकाळें पोहोंचून तेथ । राजदर्शना निघाला ॥ ७ ॥
वजीर मुत्सद्दी मेळवूनी । रत्नखचित सिंहासनीं ।
अवरंगजेब पातशहा मानी । होता वैभवें बैसला ॥ ८ ॥
षास्तेखान दक्षिणेंत गेला । तो पराभवील शिवाजीला ।
हा भरंवसा पातशहाला । पूर्ण होता तेधवां ॥ ९ ॥
स्वस्थचित्तें अवरंगजेब । पाहे राज्याचा हिशेब ।
इतक्यांत कळविती हेजीब । षास्तेखान येतसे ॥ १० ॥
अल्पकाळांत कैसा आला । ऐशा संशयीं शहा पडला ।
तों खान निकट पातला । खिन्न मुद्रा करूनी ॥ ११ ॥

पातशहा समीप येऊन । खान घाली लोटांगण ।
ह्मणे करीं माझें संरक्षण । परम भय वाटतसे ॥ १२ ॥
शहास झाला विस्मय । ह्मणे हा चमत्कार काय ।
काय घडला न कळे अपाय । ऐशा प्रबळ सैनिका ॥१३॥
मग षास्तेखान बोले मात । शिवाजी नव्हे मानव खचित ।
केव्हांच करील आपुला घात । कळणार नाहीं कोणातें ॥१४॥
शिवाजी केवळ सैतान । त्याशीं कलह न करावा आपण ।
आपुले संरक्षावे प्राण । नच जावें तयाकडे ॥ १५ ॥
लंकापुरीं दशाननास । मारीचें केला उपदेश ।
दुखवूं नको रामचंद्रास । तैसेंच येथें जाहलें ॥ १६ ॥
खान बोले दीन वदन । एकाएकीं आला शहाजीनंदन ।
आमुच्या शिबिरीं प्रवेशून । कल्पांत केला तयानें ॥ १७ ॥
इलाईनें कृपा केली । ह्मणून तुमची भेट जाहली ।
पहा ही माझीं बोटें तुटलीं । शिवाजीचे हातुनी ॥ १८ ॥
आतां तुह्मी सावध व्हावें । शिवाजीच्या वाटे न जावें ।
आपुलें वैभव सांभाळावें । दिल्लीमध्यें राहुनी ॥ १९ ॥
मारिच वचनें रावण कोपला । तैसाच शहा संतप्त झाला ।
ह्मणे आग लागो तुझ्या मुखाला । व्यर्थ कासया बरळसी ॥२०॥
शिवाजी तो क्षुद्रमूषक । त्याचा सांगशी काय धाक ।
कैसा नाहीं तुज विवेक । व्यर्थ जन्मा आलासी ॥ २१ ॥
नामर्द भ्याड निपजलास । ह्मणून पळूनि आलास ।
मूर्खा कालिमा आणिलीस । आमुच्या राज्यास आज तूं ॥२२॥
जा जा नीघ तूं येथून । पुन्हा न दाखवीं कृष्णवदन ।
तुझ्या जाहागिरी आजपासून । खालसा केल्या जाणिजे ॥२३॥

यापरी शहानें निर्भर्त्सिला । दूतां करवीं घालवून दिधला ।
जहागीर सरंजाम जप्त केला । सर्व तयाचा शहानें ॥२४॥
आपुली सेना पळून आली । शिवाजीची कीर्ती वाढली ।
बादशहातें चिंता लागली । ह्मणे कैसें करावें ॥ २५ ॥
सरदार नावाजून धाडिला । तो भ्याड नामर्द निपजला ।
आपुल्यास कलंक लाविला । पलायन करूनी ॥ २६ ॥
शहास बोले मुख्य वजीर । धास्त खाऊन आला सरदार ।
तरी आपण न सोडावा धीर । पराभवूं शत्रूतें ॥ २७ ॥
एकाहून एक थोर । बलिष्ठ आपुले सरदार ।
शिवाजी तो क्षुद्र पामर । किती टिकेल आपणांशीं ॥२८॥
यापरी शहास धीर देऊन । वजिरें केलें समाधान ।
उपरी दरबार विसर्जून । पातशहा उठला ॥ २९ ॥
जिंकावया शहाजीसुत । कोणास धाडावें दक्षिणेंत ।
हा विचार करी चित्तांत । अवरंगजेब दिल्लीपती ॥ ३० ॥
घेऊन वजिराचें अनुमत । बादशहा योजना करीत ।
जयसिंगनामें रजपूत । परम शूर प्रतापी ॥ ३१ ॥
'मिरझाराजा' जया ह्मणती । परम शूर प्रख्यात कीर्ती ।
तयास पाचारी दिल्लीपती । एकांतस्थाना माझारीं ॥ ३२ ॥
ह्मणे तुह्मी समरधीर । दिल्लीपतीचे एकनिष्ठ वीर ।
शौर्य धैर्य रणीं अपार । तुमचें असे निश्चयें ॥ ३३ ॥
एक कार्य असे उद्भवलें । तें तुह्मी पाहिजे सिद्धीस नेलें ।
तुमचे पराक्रम तेज आगळें । कार्य सहजीं होईल ॥ ३४ ॥
दक्षिणदेशा माझारीं । मऱ्हाठा शिवाजी बंड करी ।
करितो लूटफाट भारी । आपुल्या राज्यप्रदेशीं ॥ ३५ ॥

जिंकावया त्वरें तयाशी । तुह्मी जावें दक्षिणप्रदेशीं ।
शिक्षा लावून शिवाजीसी । अपार यश मिळवावें ॥ ३६ ॥
शंका न धरावी मनांत । सेना द्रव्य देतों बहुत ।
सिद्धीस न्यावा आमुचा हेत । एवढें कार्य करूनी ॥ ३७ ॥
गौरवयुक्त ऐशापरी । बादशहा बोलिला मधुर वैखरी ।
जयसिंग संतोषला अंतरीं । गोड वाक्यें परिसुनी ॥ ३८ ॥
मग बोले जयसिंगशूर । आह्मी एकनिष्ठ सरदार ।
तवाज्ञेंत असों तत्पर । सदासर्वदां भक्तीनें ॥ ३९ ॥
प्रत्यक्ष काळास लावीन धाक । शिवाजी तें बापुडें मशक ।
विलंब न लावितां क्षणएक । शिक्षा लावीन तयातें ॥४०॥
बादशहा संतुष्ट होऊन । वस्त्रें भूषणें करी अर्पण ।
ह्मणे दलभार सज्ज करून । त्वरें जावें येथुनी ॥ ४१ ॥
वजिरास शहा आज्ञापित । जयसिंग जातो दक्षिणेंत ।
द्रव्यसेना द्यावी बहुत । तयासवें सत्वर ॥ ४२ ॥
बादशहाची आज्ञा झाली । अपार सेना सिद्ध केली ।
दक्षिणेंत जावया निघाली । जयसिंगा समवेत ॥ ४३ ॥
रोहिले आरब मोंगल रजपूत । कडवे शिपाई नानाजात ।
शूरवीर निघाले बहुत । दक्षिणेंत जावया ॥ ४४ ॥
गोलंदाज पदाती स्वार । आड हत्यारी पंचहत्यारी वीर ।
बर्खंदाज योद्धे नाना प्रकार । सज्ज झाले जावया ॥ ४५ ॥
सेनासमुद्र सज्ज झाला । दक्षिणेंत जावया निघाला ।
जयसिंग सेनापती शोभला । स्वीयतेजें करूनी ॥ ४६ ॥
अवरंगजेब परम कपटी । शंका उपजली त्याचे पोटीं ।
हिंदूहिंदूंची पडणार गांठी । काय होईल कळेना ॥ ४७ ॥

जयसिंग हिंदू रजपूत । शिवाजी हिंदू जातिवंत ।
दोघे होतील एकचित्त । तरी अनर्थ होईल ॥ ४८ ॥
अफजुलखानाचा कारकून । होता काफर हिंदू ह्मणून ।
जात्याभिमानें फितुर होऊन । शिवाजीस मिळाला ॥४९॥
तैसेंच जरी येथें घडेल । तरी महाअनर्थ होईल ।
जयसिंगाचें सेनाबळ । अपार असें वाटलें ॥ ५० ॥
जयसिंग फितुरी न होय । ऐसा योजावा कांहीं उपाय ।
नातरी घडेल अपाय । ह्मणून सावध असावें ॥ ५१ ॥
विश्वासुक यवन सरदार । द्यावा जयसिंगाबरोबर ।
ह्मणजे गुप्त कारभार । होणार नाहीं सहजची ॥ ५२ ॥
जयसिंगाचा प्रियकर । रामसिंगनामें तरुण कुमर ।
तयाशीं बोलून मधुरोत्तर । आपणांसंनिध ठेवावें ॥ ५३ ॥
पुत्र असतां आपणांसमीप । धाक राहील आपोआप ।
होईल कार्याचा साक्षेप । अनुकूल प्रकारें करूनी ॥ ५४ ॥
कपटबुद्धी ऐशी धरून । जयसिंगास आणी पाचारून ।
ह्मणे तुह्मी शूर सज्जन । त्वरें सिद्ध जाहला ॥ ५५ ॥
तुह्मी काळाशीं करणार समर । एकटेच जाणार शत्रूवर ।
परी मम मन होऊन अधीर । कांहीं भीती पावतसे ॥५६।
यास्तव प्रबल सरदार । देतों तुमचे बरोबर ।
तुह्मी दोघे समरधीर । त्वरें शत्रू जिंकाल ॥ ५७ ॥
बलिष्ठ सरदार दिलेलखान । देतों तुह्मांसवें आज्ञापून ।
तो तुमच्या आज्ञेंत राहून । साह्य तुह्मां करील ॥ ५८ ॥
प्रिय पुत्राचा होणार वियोग । चित्तीं मानूं नका उद्वेग ।
अल्पकाळें येईल प्रसंग । पुन्हा आपुल्या भेटीचा ॥ ५९ ॥

रामसिंग आह्मांस बंधु समान । ठेवा आह्माजवळी आणून ।
येथें राहील सुखेंकरून । काळजी कांहीं न करावी ॥६०
निष्कपटी थोर रजपूत । ह्मणे ही तुमची कृपा बहुत ।
आह्मी तुमचे आज्ञांकित । सुचेल तैसें करावें ॥ ६१ ॥
दिलेलखान सर्व येईल । तरी बहुत बरें होईल ।
रामसिंग येथें राहील । स्वामिआज्ञेंत सुखानें ॥ ६२ ॥
भाषणें होऊन गोड बहुत । यापरी तेव्हां जाहला बेत ।
मग बादशहा आज्ञा देत । जयसिंगासी जावया ॥ ६३ ॥
जयसिंग आणि दिलेलखान । दोघे योद्धे प्रतापवान ।
शिवनृपास जिंकावया कारण । उद्युक्त झाले तेधवां ॥६४॥
जिंकावया रामचंद्रजीस । निघाले अही मही राक्षस ।
तैसेच हे शिवरायास । जिंकावया चालले ॥ ६५ ॥
मोहोरा पुतळ्या सतळ्या होन । नक्त रुपये कोट तीन ।
ऐसें अपार दिधलें धन । बादशहानें समागमें ॥ ६६ ॥
एक सहस्र हत्ती सुंदर । तीस सहस्र घोडे स्वार ।
सशस्त्र पदाती वीर अपार । ऐशी सेना दीधली ॥ ६७ ॥
तोफा बंदुका भाले तीर । जेजाला गरनाळा ढाला अपार
दारू गोळ्यांचा संच भरपूर । बादशहानें दीधला ॥ ६८ ॥
एवं समुद्रप्राय सेना घेऊन । दिनशुद्धी उत्तम पाहून ।
दिल्लीहून दोघे जण । मोठ्या गजरें निघाले ॥ ६९ ॥
सेना समुद्र मार्गीं चालिला । तेणें धुरोळा बहुत उठला ।
सूर्यप्रकाश तेव्हां लोपला । अंधार झाला सहजची ॥७०॥
मागें टाकून दिल्ली प्रांत । कांहीं आक्रमण करून पंथ ।
सेना थांबवी रजपूत । सुंदर सरिता देखुनी ॥ ७१ ॥

लांब रुंद एक योजन । एवढे उतरले सैनिक गण ।
अश्व गज पदाती संपूर्ण । तयास्थानीं राहिले ॥ ७२ ॥
जयसिंग राजा पुण्यश्लोक । होता शूर आणि धार्मिक ।
चित्तीं करिता झाला विवेक । एकांत स्थानीं बैसुनी ॥७३॥
दाक्षिण देशीं महाराष्ट्र कुळांत । शिवाजी निपजलासे प्रस्तुत
म्लेंच्छ पराभवितो समस्त । नाना युक्ती करूनी ॥ ७४ ॥
अफ्जुलखान स्वयें मारिला । षास्तेखान पराभविला ।
करितो धर्म संस्थापनेला । ऐसें चित्तीं वाटतें ॥ ७५ ॥
यवन वीर बलार्णव । त्यांचा करितो पराभव ।
यवनांचा न चले उपाव । शिवाजीसी जिंकावया ॥ ७६ ॥
मराठे तो हीन बल । शिवाजी झाला कैसा सबल ।
ईश कृपा असे अनुकूल । शिवाजीसी वाटतें ॥ ७७ ॥
ईश कृपा बलीयसी । यश देते शिवाजीसी ।
कार्य सिद्धी होईल कैशी । ऐशा स्थळीं आपुली ॥ ७८ ॥
जगदीश प्रसन्न होईल । तरीच कार्यीं यश येईल ।
ना तरी अपकीर्ती वरील । आपणातें निश्चयें ॥ ७९ ॥
यापरी विचार करून । बोलाविले विद्वान ब्राह्मण ।
ईश प्रसाद घडावया कारण । अनुष्ठान आरंभिलें ॥ ८० ॥
भवानी व्हावया सुप्रसन्न । सहस्त्र चंडी अनुष्ठान ।
विध्युक्त आरंभिती ब्राह्मण । मंत्र गजर चालविती ॥८१॥
कृशान चेतवून यथापद्धती । होम द्रव्याच्या आहुती देती ।
यथाकाळीं पूर्णाहुती । विप्र वर्गीं अर्पिली ॥ ८२ ॥
चालतां अनुष्ठानाचा गजर । जयसिंग राहिला निराहार ।
प्रसन्न होवो परमेश्वर । ऐसें मनीं चिंतीतसे ॥ ८३ ॥

पूर्णाहुती समर्पिली । अपार दक्षिणा द्विजां दिधली ।
ते दिनीं निद्रा लागली । रजनीमाजीं तयातें ॥ ८४ ॥
निद्रेंत जाहला साक्षात्कार । भवानी उभी राहिली समोर ।
ह्मणे बालका श्रमलास फार । पारणा आतां करावी ॥८५॥
तुझी अपार भक्ती देखून । मी जाहल्यें सुप्रसन्न ।
आतां निर्धास्त करून मन । वर मागें मद्भक्ता ॥ ८६ ॥
जयसिंग बोले जोडून कर । प्रस्तुत निघालों शिवाजीवर ।
करावें लागेल घोर समर । यश येवो मजलागीं ॥ ८७ ॥
भवानी करी मंदस्मित । ह्मणे दोघेही माझे भक्त ।
पुरवीन दोघांचेही हेत । चिंता न करीं बालका ॥ ८८ ॥
शिवाजी हस्तगत होईल । तुझा कीर्तिध्वज फडकेल ।
तोही सुखरूप जाईल । राज्यावरी आपुल्या ॥ ८९ ॥
तूं माझा प्रियदास । तुज न येईल अपयश ।
आतां स्वस्थ करून चित्तास । त्वरें पुढती जाईजे ॥ ९० ॥
यापरी देऊन वरप्रदान । देवी पावली अंतर्धान ।
येरू जागृत होऊन । विस्मय करी मानसीं ॥ ९१ ॥
परम समाधान वाटलें । दुसरें दिनीं पारणें केलें ।
मग सर्व सैन्य आज्ञापिलें । पुढें मार्ग क्रमावया ॥ ९२ ॥
परमोत्साहें मार्ग क्रमित । सैन्य आलें दक्षिणेंत ।
पुण्यपत्तनीं अकस्मात । येऊनियां पोंचलें ॥ ९३ ॥
पुढिले अध्यायीं कथा सुरस । वृत्त कळेल शिवनृपास ।
अद्भुत माजेल वीररस । श्रोतीं सादर परिसावें ॥ ९४ ॥
श्रीशिवविजयग्रंथ । शिवावतार चरित्र अद्भुत ।
वर्णन करी भावें अनंत । एकोनविंशतितमोध्याय गोड हा ॥९५॥

# अध्याय २० वा.

॥ श्रीगणेशायनमः ॥

महाभाग शिवनृपती । ससैन्य असतां गडावरती ।
बहिरजी जासूद शीघ्रगती । तयेस्थानीं पातला ॥ १ ॥
बहिरजीचें म्लान वदन । पाहून चरकलें नृपालमन ।
ह्मणे कां दिसे खिन्न वदन । काय विघ्न ओढवलें ॥ २ ॥
नम्रपणें बहिरजी बोले । प्रचंड विघ्न असें ओढवलें ।
महा अरिष्ट प्राप्त झालें । तुह्मांवरी प्रस्तुत ॥ ३ ॥
मिरझाराजा जयसिंग रजपुत । शूर पराक्रमी प्रतापवंत ।
त्याहीवरी ईश्वरभक्त । तुह्मांवरी येतसे ॥ ४ ॥
दिल्लीपतीनें पाठविला । दिलेलखान सवें दिधला ।
लक्ष सैन्य घेऊन आला । पुण्यपत्तनासमीप ॥ ५ ॥
यवन गर्विष्ठ मदमत्त । युद्धकार्यीं अव्यवस्थित ।
तुह्मी पराभविलेत समस्त । परी येथें न चाले ॥ ६ ॥
आतां विचार बरा करावा । समय प्रसंग ओळखावा ।
आपुला आब राखावा । युक्ति प्रयुक्तीं योजुनी ॥ ७ ॥
शिवराव बोले हास्य करून । कर्ता करविता नारायण ।
जय अपजय त्या आधीन । वृथा चिंता कासया ॥ ८ ॥
परमेश्वर प्रसन्न जाहला । आह्मी राज्याचा साक्षेप केला ।
तोच संरक्षिल आह्मांला । महत्संकट टाळुनी ॥ ९ ॥
रायें यापरी बोलून । मंत्रीवर्गास केलें पाचारण ।
ते त्वरित आले धांवून । संकटवार्ता परिसुनी ॥ १० ॥

मोरोपंत पिंगळे चतुर । तानाजी मालुसरे रणशूर ।
रघुनाथपंडित समरधीर । रायानिकट पातले ॥ ११ ॥
संभाजी, कावजी, हिरोजी । भला विश्वासुक निरोजी ।
राघोजी रणशूर माणकोजी । महाराष्ट्रवीर पातले ॥ १२ ॥
श्रीशिवराय सीतारमण । तानाजी मालुसरा अंजनीनंदन ।
सुग्रीव अंगद महाराष्ट्र जन । तदा वाटती बैसले ॥ १३ ॥
मग सर्वांस संबोधून । रायें कळविलें वर्तमान ।
आतां प्रसंग दिसतो कठिण । कैसा विजय मिळेल ॥१४॥
आजवरी आले म्लेंच्छखळ । ते ते पातकी दुष्ट सकल ।
ह्मणून पराभविले केवळ । ईशकृपेनें आपण ॥ १५ ॥
भीष्माचार्य भारती वीर । तैसाच जयसिंग समरधीर ।
पराक्रम करील अपार । रणांगण गांठिल्या ॥ १६ ॥
तुह्मी वीर चतुर सुजाण । विचार करा लावून मन ।
आतां उपाय करावा कवण । सांगा मजप्रती शूरहो ॥१७॥
तानाजी बोले गर्जना करून । मांझे बाहू पावती स्फुरण ।
शत्रूवरी जाऊं धावून । पराभवूं शत्रूंतें ॥ १८ ॥
कसाही असो रजपूत । आहे म्लेंच्छपक्षीं प्रस्तुत ।
मग कां न होईल घात । आपुल्या हस्तें तयाचा ॥ १९ ॥
आपण गाजवूं तडाखे । तेणें शत्रू पळेल धाकें ।
ऐसें न करितां धक्के । बसतील राज्या ॥ २० ॥
मोरोपंत बोले मधुर वचन । काल पहावा निरखून ।
तैसेंच करावें आचरण । तरीच सिद्धी होईल ॥ २१ ॥
केला पाहिजे सुविवेक । तरीच होईल यत्न सार्थक ।
साहस करितां अप्रासंगिक । स्वार्थ बुडेल सर्वही ॥ २२ ॥

जन्मभरी कष्ट केले । दुर्लभफळ मेळविलें ।
क्षणेक चुकून वांयां गेलें । ऐसें सर्वथा न व्हावें ॥ २३ ॥
निरनिराळे प्रसंग येती । तेथें पाहिजे भिन्न युक्ती ।
सर्वकाळीं एक रीती । कामा नये कदापी ॥ २४ ॥
मग बोले रघुनाथपंत । जयसिंग आहे रजपूत ।
तयास दावून विनय बहुत । गुप्तरूपें वळवावा ॥ २५ ॥
धर्मबंधुत्व दाखवावें । मधुर बोलावें स्नेहभावें ।
तयास वश करावें । ह्मणजे कार्य साधेल ॥ २६ ॥
मग बोले मोरोपंत । ऐशी न घडेल गोष्ट प्रस्तुत ।
पहा शहाचा बंदोबस्त । कैशापरी यासमयीं ॥ २७ ॥
द्रवेल रजपुताचें मन । ह्मणून सवें दिधला दिलेलखान ।
पुत्र आपुल्या समीप ठेवून । तयास आहे गुंतविलें ॥२८॥
जरी केले उपाय शत । तरी वश न होईल रजपूत ।
जय न येईल रणांगणांत । त्याच्यापुढें आपणां ॥ २९ ॥
ऐकून ऐसें स्पष्ट वचन । तानाजी झाला कोपायमान ।
ह्मणे तुह्मी भ्याड ब्राह्मण । नसतें भय दावितां ॥ ३० ॥
आह्मी भवानीचे पूर्ण भक्त । दुजें तिजें नाहीं जाणत ।
सिंहासारख्या उड्या घेत । चाळून जाऊं शत्रूवरी ॥३१॥
मारूं किंवा पावूं मरण । हाच आमुचा निश्चय पूर्ण ।
कशास लांब लांब बोलून । आह्मां भय दावितां ॥ ३२ ॥
तानाजी बोले भुजा पिटून । कळिकाळाची नरडी मोडीन ।
क्षणांत शिक्षा लावीन । स्वशत्रूस निज हस्तें ॥ ३३ ॥
मग बोले मोरोपंत । तुह्मी वीर प्रतापवंत ।
शौर्य धैर्य पराक्रम बहुत । तुमच्या ठायीं नांदतो ॥ ३४ ॥

मारूं किंवा पावूं मरण । हें आह्मां तुह्मांस शोभेल वचन ।
परी राजदेह संरक्षण । खचित झालें पाहिजे ॥ ३५ ॥
भ्याडपणें नाहीं बोललों । मी स्वसुखार्थ नाहीं भुकेलों ।
जगद्धितार्थ वाक्य वदलों । राग याचा नसावा ॥ ३६ ॥
यत्न करून मेळविलें । त्याचें पाहिजे रक्षण झालें ।
ना तरी सर्व वायां गेलें । ऐसें न व्हावें सर्वथा ॥ ३७ ॥
निकरें शत्रूवरी जाऊन । धारातीर्थीं पावूं मरण ।
जाऊं सूर्यमंडल भेदून । उत्तम लोकीं खचीत ॥ ३८ ॥
परी इकडे काय होईल । महाराष्ट्र राज्य ठार बुडेल ।
धर्म स्थापना तैशीच राहील । विचार याचा करावा ॥३९॥
सयुक्तिक पंताचे बोल । ऐकून तोषला शिव नृपाळ ।
ह्मणे यथार्थ बोलतां केवळ । संतुष्ट मम मन जाहलें ॥४०॥
तानाजी तुह्मी शूर वीर । तुमचा पराक्रम अपार ।
क्षणें कराल शत्रु संहार । शंका नाहीं मुळींच ॥ ४१ ॥
तुह्मां महाराष्ट्र सिंहापुढें । शत्रु सैन्य मशक बापुडें ।
तुह्मां युद्ध संग्राम आवडे । शत्रु नाश करावया ॥ ४२ ॥
आपुलें राज्य राजकारण । आहे भवानीचे स्वाधीन ।
आज्ञा मिळेल तिजकडून । तैसे वर्तूं ये समयीं ॥ ४३ ॥
मम मुखें भवानी वदेल । तुमचा वाद सर्व मिटवील ।
सत्य मार्ग आपणां दावील । तुह्मीं चिंता न करावी ॥४४॥
यापरी सर्वांस सांगून । ध्यानस्थ बैसला शहाजीनंदन ।
नासिकाग्रीं दृष्टी लावून । भवानी अंतरीं आठविली ॥४५॥
स्तब्ध झाले मनोविकार । पुढें एकाग्र झालें अंतर ।
भवानीची मूर्ती सुंदर । पुढें उभी राहिली ॥ ४६ ॥

तीच मूर्ती मनीं ठसली । क्षणें तन्मय वृत्ती झाली ।
देवी भवानी संचरली । सर्वांगांत रायाच्या ॥ ४७ ॥
दैवीक तेजें होय स्फुरण । शरीर हालों लागलें संपूर्ण ।
आतां देवी बोलेल वचन । चित्त देती सर्वही ॥ ४८ ॥
नृपाल वदन शुक्तींतून । वाक्य मौक्तिकें पडती गळून ।
लिहून घेती चतुर जन । पूर्ण अवधान देउनी ॥ ४९ ॥
'जयसिंग धार्मिक रजपूत । त्याहीवरी माझा भक्त ।
त्यातें अपयश प्रस्तुत । न देववे मजलागीं ॥ ५० ॥
त्यास विजय देणें पडतें । शिवाजीस त्याकडे जावें लागतें ।
पुढें दिल्लीस जाणें पडतें । शिवबाळास ये समयीं ॥ ५१ ॥
बाळास रक्षावया कारण । मी स्वयें सवें जाईन ।
सहज संरक्षून आणीन । राज्यावरी आपुल्या ॥ ५२ ॥
राज्यस्थापनेचा सुवर दिधला । त्याचा अभिमान असे मजला ।
यश देईन शिव नृपाला । सत्य सत्य जाणिजे' ॥ ५३ ॥
ऐशीं मधुर वाक्यें बोलून । देवी पावली अंतर्धान ।
क्षणेक शिवराय सुजाण । मूर्च्छागत पडियेला ॥ ५४ ॥
सवेंच होतां जागृत । जन सांगती अखिल वृत्तांत ।
भवानीचें बोलणें समस्त । ऐकविलें रायातें ॥ ५५ ॥
ऐकून देवीचें अभयदान । संतुष्ट जाहला शहाजीनंदन ।
आतां करील संरक्षण । भवानी माता आपुलें ॥ ५६ ॥
रायास जाहला थोर हरिख । समाधान पावले सर्व सैनिक ।
इतुक्यामाजी दूत एक । रजपुताकडून पातला ॥ ५७ ॥
जयसिंगरायें पत्र दिधलें । तें तेणें प्रविष्ट केलें ।
रायें वाचावया कथिलें । रघुनाथपंताकारणें ॥ ५८ ॥

वाचून दावी रघुनाथपंत । तुह्मी आह्मी एक रजपूत ।
यास्तव टाकून शंका समस्त । भेटीस यावें आमुच्या ॥५९॥
पत्र ऐकून बोले नृपवर । रघुनाथपंत तुह्मी परम चतुर ।
जयसिंगाकडे जाऊन सत्वर । प्रसन्न तया करावें ॥ ६० ॥
पंडितराव ऐशी किताबत । राव रघुनाथपंतास देत ।
सन्मानून तया धाडित । जयसिंगाकडे त्वरेनें ॥ ६१ ॥
रघुनाथपंत शीघ्र निघाला । जयसिंगातें मानें भेटला ।
मधुर शब्दें गौरविला । मिरझाराजा तयानें ॥ ६२ ॥
मधुर बोले रजपूत । तुह्मी आह्मी एक जात ।
यास्तव व्हावें तुमचें हीत । ऐसें आह्मी इच्छितों ॥ ६३ ॥
पृथ्वीपती बलिष्ठ यवन । कासया करावें त्याशीं भांडण ।
आपुला होईल नाश पूर्ण । चित्तीं खूण समजावी ॥ ६४ ॥
यास्तव कळवा शिवाजीस । शीघ्र जावें तुह्मीं दिल्लीस ।
पातशहा कृपा करील खास । ममवचनें तुह्मांवरी ॥ ६५ ॥
रामसिंगनामें ममसुत । आहे दिल्लीमाजी प्रस्तुत ।
तो तुमचें कार्य समस्त । राजदरबारीं करील ॥ ६६ ॥
रघुनाथपंत बोले वचन । तुह्मी रायास पित्यासमान ।
तुमची आज्ञा तया प्रमाण । यांत अंदेशा न धरावा ॥६७॥
तव वचन मान्य करील । शिवराय दिल्लीस जाईल ।
त्वत्कृपायश देईल । रायालागीं यावेळीं ॥ ६८ ॥
साम करून ऐशापरी । रघुनाथपंत परतला झडकरी ।
शिवरायातें श्रुत करी । वार्ता समस्त तेथींची ॥ ६९ ॥
क्षणेक विचार करून राय । करिता झाला दृढ निश्चय ।
न टळेल अन्योपायें समय । यास्तव जावें दिल्लीतें ॥ ७० ॥

मुत्सद्दी थोर विश्वासूक । त्यांतें कळवी नरनायक ।
तुह्मी धरून धैर्य विवेक । राज्य रक्षात्रें आपुलें ॥ ७१ ॥
बंदोबस्तें सतत रहावें । गडकोट संरक्षावे ।
धैर्यें शत्रू पराभवावे । तरीच राज्य राहील ॥ ७२ ॥
यापरी राव बोलिला । प्रयाणसिद्धता करूं लागला ।
हें वृत्त दिलेलखानाला । अनुचरमुखें समजलें ॥ ७३ ॥
यवनचित्त संतापलें । ह्मणे हिंदू हिंदू एक झाले ।
महद्यश हातींचें गेलें । काय आतां करावें ॥ ७४ ॥
मग स्वीय सैन्य सज्ज करून । जयसिंगास बोले कठोर वचन ।
तुह्मी 'आमुचे वरिष्ठ असून । अद्याप स्वस्थ बैसलां ॥ ७५ ॥
आह्मांस आतां न धरवे धीर । ह्मणून धैर्यें करूं समर ।
शिवाजीस पराभवून सत्वर । आह्मीं नेऊं दिल्लीतें ॥ ७६ ॥
यापरी बोलून उत्तर । रणवाद्यांचा करी गजर ।
दिलेलखान निघाला सत्वर । समरभूमी गांठावया ॥ ७७ ॥
पांच सहस्र पठाण वीर । आणिक दुसरे सैनिक शूर ।
तोफा जेजाले बर्चा तीर । घेऊनियां निघाला ॥ ७८ ॥
दुर्जय दुर्ग पुरंदर । घ्यावया चालिला यवन वीर ।
अभिमान उद्भवला अपार । यवन चित्तीं तेधवां ॥ ७९ ॥
पुरंदर दुर्ग बळें घेईन । तेव्हांच शिरीं पगडी बांधीन ।
ऐसें बोलिला प्रतिज्ञावचन । दिलेलखान अभिमानें ॥ ८० ॥
यवन सैनिक परमशूर । दुर्गावरी करिती निकर ।
उल्हाटयंत्रांचा भडिमार । दिलेलखान करितसे ॥ ८१ ॥
पुरंदरीं दुर्गनायक । होता मुरारबाजी नामक ।
कायस्त रायाचा विश्वासुक । महाशूर बलाढ्य ॥ ८२ ॥

दोन सहस्त्र मावळे वीर । सवें घेऊन करी समर ।
दिलेलाची सेना अपार । घोरकदन प्रवर्तलें ॥ ८३ ॥
उद्भटयोद्धे महाराष्ट्रवीर । यवनांवरी करिती निकर ।
म्लेंच्छ सैन्य गणना अपार । धैर्यें युद्ध चालविती ॥ ८४ ॥
यवन सैन्याचा लोट देखिला । मुरारबाजी क्रोधावला ।
हातीं खड्ग घेऊन धाविन्नला । यवनांवरी धैर्यानें ॥ ८५ ॥
तो नरवीर पंचानन । तोंडीत चालिला वीर यवन ।
आक्रांत प्रवर्तला दारुण । यवन सैन्यीं तेधवां ॥ ८६ ॥
दिलेलखानें तया देखिलें । शौर्य धैर्य नांवाजिलें ।
ह्मणे हें वीररत्न पैदा झालें । ईशेच्छेनें भूवरी ॥ ८७ ॥
दिलेलखान कळवी तयास । तूं मिळशील आमुच्यां पक्षास ।
तरी देऊं थोर बक्षीस । नांवाजून तुजलागीं ॥ ८८ ॥
येरें तयास धिःकारिलें । जीवित्व तृणवत् मानिलें ।
स्वामिकार्य आदरिलें । सर्वस्वाहून अधिक ॥ ८९ ॥
सन्मुख देखून दिलेलखान । मुरारबाजी चालिला धांवून ।
यवनाचा कंठ लक्षून । खड्गप्रहार करीतसे ॥ ९० ॥
खड्गयुद्धीं खान निपुण । घाव चुकवी अंग चोरून ।
क्षणें मारून तीव्र बाण । मुरारजी विंधिला ॥ ९१ ॥
वर्मीं लागतां प्रचंड बाण । मुरारबाजी पावला पतन ।
गर्जना करिती दुष्ट यवन । थोर विजय मानुनी ॥ ९२ ॥
महाराष्ट्रवीर त्वरें धांवले । यवनयोद्धेही उसळले ।
कडोविकडी झुंज लागलें । उभयवीरांचें तेधवां ॥ ९३ ॥
दिलेलखानाचे सैनिकगण । अपार पावले रणीं पतन ।
तीन शतकें महाराष्ट्रगण । रणांगणीं पडियेले ॥ ९४ ॥

पुरंदर दुर्ग हातीं येईना । विचार पडला दिलेलखाना ।
ह्मणे काय करावी योजना । मावळे युद्धीं दुर्जय ॥ ९५ ॥
इकडे रायास वृत्त कळलें । आपुलें वीररत्न हरपलें ।
रायास अपार दुःख झालें । वीर मृत्यूनें तेधवां ॥ ९६ ॥
राव करि चित्तीं विचार । आपण स्वयें दिल्लीस जाणार ।
मग कासया चालवावें समर । वीरनाश होतसे ॥ ९७ ॥
कुलस्वामिणीतें वंदून । सद्गुरूचें स्मरण करून ।
प्रियमातेचें आशिर्वचन । रायें प्रेमें घेतलें ॥ ९८ ॥
ब्राह्मण पंडित साधु संत । दक्षिणा देऊन केले तोषित ।
आशीर्वचनें संपादित । राव सकलांपासुनी ॥ ९९ ॥
रघुनाथपंतास सवें घेऊन । राव निघाला त्वरें करून ।
रजपुताचे स्थानीं येऊन । तयालागीं भेटला ॥ १०० ॥
शिवराय गृहीं पातला । जयसिंग परम आनंदला ।
परम स्नेहें आलिंगिला । शिवराय तयानें ॥ १०१ ॥
राव बोले मधुर वचन । तुह्मी आह्मांस पित्यासमान ।
आमुचें करावें संरक्षण । वडीलपणें ये समयीं ॥ १०२ ॥
दिलेलखानें निकर मांडिला । वीरसंहार चालविला ।
आह्मी पुरंदर दुर्ग तुह्मांला । स्नेहपूर्वक देतसों ॥ १०३ ॥
जयसिंगराय करी भाषण । तुह्मी आमुचे आप्तजन ।
तुह्मांस अभय असें पूर्ण । कांहीं चिंता न करावी ॥ १०४ ॥
दिलेलखानास कळवी रजपूत । शिवाजी झाला शरणागत ।
गडकोट किल्ले समस्त । प्राप्त झाले आपणांतें ॥ १०५ ॥
तुह्मी युद्ध बंद करावें । शीघ्र आमुच्या भेटीस यावें ।
शिवाजीसही भेटावें । साम झाला प्रस्तुत ॥ १०६ ॥

जयसिंगाचा संदेश ऐकून । चित्तीं क्रोधावला दिलेलखान ।
ह्मणे माझें यश हिरावून । जयसिंगानें घेतलें ॥ १०७ ॥
मग निरुपाय चित्तीं जाणून । तेथून निघाला दिलेलखान ।
जयसिंग निकट येऊन । अत्यादरें भेटला ॥ १०८ ॥
शिवाजी, जयसिंग, दिलेलखान । तिघे भेटले स्नेहेंकरून ।
मग सामभाव बहु बोलून । गोडी केली तिघांनीं ॥१०९॥
रायास जयसिंग बोले वचन । तुह्मी दिल्लीस करावें गमन ।
बादशहाची कृपा संपादून । शीघ्र यावें स्वदेशीं ॥ ११० ॥
मत्पुत्र तुह्मां साह्य करील । बादशहातें भेटवील ।
दुर्गकोट किल्ले राहतील । तुह्मांकडे निश्चयें ॥ १११ ॥
रायास यापरी सांगून । रामसिंगास देई लेखन ।
राव मान्य करी वचन । समय प्रसंग ओळखुनी ॥ ११२ ॥
पुढिले अध्यायीं कथा सुरस । शिवराय जाईल दिल्लीस ।
परमेश देईल थोर यश । रायालागीं त्यास्थळीं ॥ ११३ ॥
श्रीशिवविजयग्रंथ । शिवावतार चरित्र अद्भुत ।
वर्णन करी भावें अनंत । विंशातितमोध्याय गोड हा ॥११४॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

# अध्याय २१ वा.

॥ श्रीगणेशायनमः ॥

घेऊन सर्वांचा निरोप । दिल्लीस चालिला शिवभूप ।
दिवसेंदिवस पुण्यप्रताप । वाढतसे जयाचा ॥ १ ॥
सवें घेतला पुत्र संभाजी । सेवक चतुर निराजी, हिरोजी ।
माणकोजी, तैसा दत्ताजी । रायें सवें घेतले ॥ २ ॥
त्रिंबक सोनदेव रणशूर । रघुनाथपंत परम चतुर ।
आणिक मावळे सहस्र वीर । राव घेऊन निघाला ॥ ३ ॥
प्रवर्तून धर्मकाजीं । हस्तिनापुरा चालिले कृष्णजी ।
त्याचपरी नृप शिवाजी । दिल्लीपुरीं चालिला ॥ ४ ॥
बादशहास कळलें वृत्त । भेटीस येतो शहाजीसुत ।
येरू करी बंदोबस्त । अपाय न घडावा ह्मणूनी ॥ ५ ॥
स्थळीं स्थळींचे सुभेदार । तयांस कळवी दिल्लीश्वर ।
शिवाजीस सन्मानून फार । दिल्लीप्रती धाडावें ॥ ६ ॥
सुखरूप करून पंथक्रमण । दिल्लीस पावला शहाजीनंदन ।
रामसिंग सामोरा जाऊन । प्रीतिपूर्वक भेटला ॥ ७ ॥
शिवाजीची रम्यमूर्ती । रामसिंगाची जडली प्रीती ।
ह्मणे महल्लाभ मजप्रती । तव दर्शनें जाहला ॥ ८ ॥
कर्ण धाले कीर्ती ऐकून । दर्शनें धाले आज नयन ।
राया देई आलिंगन । तोषेल माझें सर्वांग ॥ ९ ॥
सुभग मनोहर भूप उदार । स्वयें आलिंगी जयसिंगकुमर ।
ह्मणे तूं माझा सहोदर । पाठिराखा बांधव ॥ १० ॥

प्रेमाश्रूंनीं दोघे न्हाले । परस्पर स्नेहदर्शनें सुखावले ।
मग रामसिंगें स्वगृहा नेलें । शिवरायास सन्मानें ॥ ११ ॥
सुस्थळ सुवस्त्र सुभोजन । रायास अर्पी जयसिंगनंदन ।
सुखें क्रमी एकदिन । शिवराय त्यास्थळीं ॥ १२ ॥
मग रात्रौ एके स्थानीं । दोघे बैसले सुखासनीं ।
कुशल वृत्तं परस्पर पुसोनी । एकमेकां सांगती ॥ १३ ॥
शिवराय बोले मम बांधवा । आह्मी कैसा विचार करावा ।
येथील प्रकार सर्व ठावा । आहे तुजला अनुभवें ॥ १४ ॥
तव पित्यानें विश्वास दिधला । तेणें आगमनाचा योग घडला ।
आतां संरक्षून आह्मांला । जाऊं द्यावें स्वस्थाना ॥ १५ ॥
अवरंगजेब काय बोलतो । त्याचा हेतू कैसा दिसतो ।
बहुत कपटी ऐसें ऐकतों । वृत्त आह्मी सदैव ॥ १६ ॥
आह्मी अफ्जुलखान मारिला । षास्तेखान पराभविला ।
तेणें बादशहा भय पावला । किंवा नाहीं सांगिजे ॥ १७ ॥
आह्मी भेटल्या काय करील । सन्मानील कीं अपमानील ।
किंवा कारागृहीं घालील । कैसें वाटतें तुह्मांतें ॥ १८ ॥
रामसिंग बोले नृपवरा । शहा अत्यंत कपटी खरा ।
त्याचें हितगुज अन्य नरा । सर्वथाही कळेना ॥ १९ ॥
परम संशयी त्याचें मानस । कोणावरी नाहीं विश्वास ।
परी तो असे सत्ताधीश । काय करील नेणवे ॥ २० ॥
तुमच्या प्रतापें मनीं जळतो । तुमचा नाश सदा इच्छितो ।
परी बाह्यतः गोड बोलतो । तुह्मांविषयीं सर्वदां ॥ २१ ॥
धर्मस्थापक तुह्मी नृपाळ । जेव्हां स्वदेशीं सुखरूप जाल ।
तेव्हां माझी काळजी उडेल । शिवराया जाणिजे ॥ २२ ॥

भूप बोले चिंता न करीं । भवानी आहे पाठीवरी ।
विघ्न करील जरी वैरी । तरी निवटील स्वहस्तें ॥ २३ ॥
उभयतांचीं बोलणीं चाललीं । रात्र केव्हांच सरून गेली ।
परी तयां नाहीं समजली । गोष्टी बोलतां परोपरी ॥ २४ ॥
द्वितीय दिन उगवला । रायें नित्य नेम सारिला ।
कळवावया बादशहाला । रामसिंगानें धाडिलें ॥ २५ ॥
दिल्लीस पातला शहाजीसुत । हें रामसिंगें केलें श्रुत ।
शहा अंतरीं भयाभीत । वृत्त परिसुनी जाहला ॥ २६ ॥
बाह्य दाखवी समाधान । ह्मणे त्याचा करा सन्मान ।
त्यास देऊन रम्य सदन । यथोपचारें गौरवा ॥ २७ ॥
विश्रांती घेवो दोन दिवस । मग पाचारूं तया भेटीस ।
उणें पडो न द्यावें तयास । कोणत्याही प्रकारें ॥ २८ ॥
कोतवालास आज्ञापून । भूपास दिधलें उत्तम सदन ।
सेवेस देऊन अनुचर गण । प्रेम फार दाविलें ॥ २९ ॥
ऐसे चार दिन लोटले । मग शहानें दरबार भरविलें ।
शिवरायास पाचारिलें । भेटावया त्या स्थळीं ॥ ३० ॥
भयग्रस्त शहाचें चित्त । ह्मणे शिवाजी आहे हुन्नरवंत ।
काय करील न कळे अनर्थ । यास्तव सावध असावें ॥ ३१ ॥
एकांतीं कथी दिवाणास । दूर बसवावें शिवाजीस ।
जवळ येतां अनर्थास । कारण होईल निश्चयें ॥ ३२ ॥
शिवाजीस मधुर कथावें । अल्प सेवक सवें आणावे ।
मोठ्या बंदोबस्तें असावें । सकल वीरीं आपुल्या ॥ ३३ ॥
बादशहाचा येतां निरोप । सज्ज जाहला शिव भूप ।
यवनास दावावया प्रताप । पुत्रासहित निघाला ॥ ३४ ॥

रामसिंगाचा हस्त धरून । मार्गी चालिला शहाजीनंदन ।
नागरिक आले धांवून । शिव मूर्ती पहावया ॥ ३५ ॥
हिंदु धर्माचा उद्धारक । महाराष्ट्र राज्याचा संस्थापक ।
त्याचें पाहूं मनोहर मुख । ह्मणून लोक धांवती ॥ ३६ ॥
दुतर्फा वस्ती लागली । मधून रायाची स्वारी चालली ।
नागरिकांची दाटी झाली । राजमार्गी तेधवां ॥ ३७ ॥
हिंदू जनांचे नेत्र निवती । यवन अंतरीं संतापती ।
युवती समाधान पावती । शिव मुखकमल विलोकुनी ॥३८॥
जनक मानिती हिंदू जन । स्त्रियांस वाटे मूर्त मदन ।
कृतांत भाविती दुष्ट यवन । शिवरायास तेधवां ॥ ३९ ॥
कंसासुराच्या रंग सदनीं । अक्रूरासह आला चक्रपाणी ।
तेंवीं रामसिंगास सवें घेउनी । राव प्रासादीं प्रवेशला ॥४०॥
वैभव ऐश्वर्य अपार भरलें । दिल्लीपतीचें दरबार थाटलें ।
महाराष्ट्रीयांचे नेत्र दिपले । थोर वैभव पाहुनी ॥ ४१ ॥
रत्नखचित मयूरासन सुंदर । त्यावरी बैसला दिल्लीश्वर ।
यवन मुत्सद्दी थोर थोर । ठायीं ठायीं बैसले ॥ ४२ ॥
ऐशा रम्यस्थला माझारीं । राव शिवाजी प्रवेश करी ।
सकल चोपदार त्या अवसरीं । एकदांच ललकारले ॥ ४३ ॥
मुख्य वजीर जाफरखान । शहास कळवी पुढें होऊन ।
शिवाजी आला दक्षिणेंतून । तव दर्शन घ्यावया ॥ ४४ ॥
अवरंगजेब पाहे टवकारून । ह्मणे हाच काय शहाजीनंदन ।
शिवराय पुढें होऊन । तीन सलाम करीतसे ॥ ४५ ॥
एक पावो श्रीशंभूस । दुसरा सलाम भवानीस ।
तिसरा आपल्या प्रिय पित्यास । ऐसें मनीं भाविलें ॥ ४६ ॥

अवरंगजेब बोले वजिरास । सुस्थळीं बसवा शिवाजीस । 
पूर्व संकेतानुरूप रायास । वजीर दूरी बैसवी ॥ ४७ ॥
मरु देशींचा जसवंत नृपती । बैसला असे स्थानावरती ।
शिवरायास तया खालती । वजीर नेऊन बैसवी ॥ ४८ ॥
रामसिंगमुखें रायास कळलें । आपलयास सामंताखालीं बैसविलें ।
अपमानभरें क्रोधावलें । चित्त नृपाचें तेधवां ॥ ४९ ॥
मी स्वतंत्र महाराष्ट्रनायक । हा जसवंत काय मजहुन अधिक ।
माझें सामर्थ्य दिल्लीपालक । नेणुनी अपमान करीतसे ॥५०॥
तें नररत्न क्रोधावलें । उभयनेत्र आरक्त झाले ।
बाहुस्फुरण होऊं लागलें । शिवरायाचें तेधवां ॥ ५१ ॥
रामसिंग पाहे निरखून । तों मूर्ती दिसे कोपायमान ।
इतक्यांत राव ओढी कृपाण । म्यानांतून झडकरी ॥ ५२ ॥
सहज रामसिंग घाबरला । वामकरें दावूं लागला ।
'शांतहो शांतहो' बोलिला । रायालागीं हळूच ॥ ५३ ॥
परम धूर्त दिल्लीपती । शिवक्रोध जाणिला चित्तीं ।
संबोधून रामसिंगाप्रती । काय आहे विचारी ॥ ५४ ॥
रामसिंग बोले मधुर बोल । हे दक्षणी लोक कोमल ।
उष्णतेनें होऊन विव्हल । तप्त सहजी जाहले ॥ ५५ ॥
शहा मनीं भयभीत झाला । ह्मणे यांस न्या परतून गृहाला ।
पुन्हा पाचारूं भेटीला । तेव्हां मग आणावे ॥ ५६ ॥
बादशहा ऐसें बोलला । रामसिंग तत्काळ उठला ।
करीं धरून शिव नृपाळा । बाहेर पडला त्वरेनें ॥ ५७ ॥
रामसिंग बोले नम्र वचन । तुह्मी न यावें देश सोडून ।
ते आलेत आतां काय कारण । क्रोध येथें करीतसां ॥५८॥

सुखें जाल देशीं परतून । तेव्हां मी निश्चिंत होईन ।
येथें अविचार द्या सोडून । यश द्यावें मजलागीं ॥ ५९॥
सभेतून शिवनृपाळ गेला । तदा बादशहा आनंदला ।
ह्मणे आज घात चुकला । बहुत बरें जाहलें ॥ ६० ॥
विसर्जून आपुलें दरबार । एकांतीं जमवी यवन वीर ।
ह्मणे काय करावा विचार । शिवाजीचा या समयीं ॥६१॥
सनम्र बोले पास्तेखान । दिल्लीमाजीं पातलें विघ्न ।
केव्हां कैसा प्रसंग दारुण । येईल आतां कळेना ॥ ६२ ॥
चाळीस गज शिवाजी उडाला । आमुच्या गोटामध्यें शिरला ।
रात्रीमाजीं दगा केला । तैसें होईल या ठायीं ॥ ६३ ॥
जाफरखान बोले उत्तर । शिवाजी आहे दगेखोर ।
यास्तव न करून अन्य विचार । कैद करावा तयातें ॥६४॥
यवन वीर ऐशा रीती । परोपरी करिती मसलती ।
येरीकडे शिवनृपती । काय करिता जाहला ॥ ६५ ॥
रघुनाथपंत पंडित । त्यांस राव आज्ञापित ।
तुह्मी जाऊन प्रासादांत । पातशहातें विनवावें ॥ ६६ ॥
आह्मी तुमचे दीनदास । लांबून आलों दर्शनास ।
कृपा करून सेवकास । सेवा कांहीं सांगावी ॥ ६७ ॥
विजापुरादि राज्यें बुडवून । तुह्मांप्रती करितों अर्पण ।
यास्तव आह्मांस निरोप देऊन । आपुल्या देशीं धाडिजे ॥६८॥
नृपाज्ञा शिरीं वंदून । रघुनाथपंत निघाला तेथून ।
राजसदनीं प्रवेशून । बादशहातें विनविलें ॥ ६९ ॥
रायें संदेश सांगितला । तो शहातें पंतें कथिला ।
ह्मणे आज्ञा द्यावी आह्माला । आपुल्या देशीं जावया ॥७०॥

शहा बोले धरा धीर । आह्मी करूं सर्व विचार ।
मग तुह्मांस देऊं उत्तर । अल्पकाळा माझारीं ॥ ७१ ॥
परतून आला रघुनाथपंत । ह्मणे बादशहा कपटी बहुत ।
वाटे करणार आपुला घात । चिन्ह बरवें नसे हें ॥ ७२ ॥
इकडे पातशहा काय करी । शहरकोतवालास पाचारी ।
ह्मणे सेना घेऊन बरोबरी । शिवाजी कैद करावा ॥ ७३ ॥
पोलादजंग कोतवाल । सवें घेई दशसहस्त्र दळ ।
त्वरें घेऊन गृहाजवळ । शिवनृपास वेढिलें ॥ ७४ ॥
सर्व महाराष्ट्रवीर पाहती । वेढा पडला सभोंवती ।
परोपरी दुःख करिती । महाराष्ट्रवीर तेधवां ॥ ७५ ॥
अहा परदेशीं येऊन पडलों । मुलांबाळांतें अंतरलों ।
व्याघ्रमुखीं कवळ जाहलों । मरणें आतां सुटेना ॥ ७६ ॥
शिवराय परम धैर्यवान । करी अवघ्यांचें शांतवन ।
ह्मणे प्रसंग दिसतो दारुण । परी धैर्य न सोडावें ॥ ७७ ॥
देवी भवानी कृपा करील । सद्गुरू आपणां संरक्षील ।
संकटकाळ निघून जाईल । चिंता कांहीं न करावी ॥ ७८ ॥
समस्तांस धीर देऊन । भवानीचें करून स्मरण ।
निद्रिस्त जाहला शहाजीनंदन । सद्गुरूप्रती आठवुनी ॥७९॥
शिवरायाची कुलस्वामिनी । स्वप्नीं आली देवी भवानी ।
ह्मणे बालका भय झाकुनी । धैर्य धरूनी असावें ॥ ८० ॥
उदंड कार्यें करणें आहेत । सुखरूप नेईन दक्षिणेंत ।
तुवां असावें स्वस्थचित्त । भीती न धरीं सर्वथा ॥ ८१ ॥
ऐशापरी बोध करून । देवी पावली अंतर्धान ।
शिवराय जागृत होऊन । स्वप्न कथी अवघ्यातें ॥ ८२ ॥

साक्षात्कार रायास झाला । समस्तांस आनंद वाटला ।
सकल जनांस धीर आला । स्वप्नवृत्त श्रवणानें ॥ ८३ ॥
चित्तीं करून विचारणा । बादशहास कळवी शिवराणा ।
एक विज्ञप्ती आणून मना । आज्ञा व्हावी मजलागीं ॥८४॥
मी झालों हस्तगत । आतां दिल्लीस राहिलों प्रस्तुत ।
परी माझे सैनिक समस्त । व्यर्थ कासया राखावे ॥ ८५ ॥
आमुचें सैन्य सहस्त्र विशेष । येथें पाहिजे कासयास ।
तरी निरोप देऊन यास । दक्षिणेंत धाडावें ॥ ८६ ॥
बादशहानें ऐकला निरोप । ह्मणे पिडा जाते आपोआप ।
निर्बल होऊन शिवभूप । आपुल्या हस्तीं येतसे ॥ ८७ ॥
शहा मान्य करी वचन । राव देशीं पाठवी स्वजन ।
कारकून हुजरे दहाजण । स्वसंनिध ठेविले ॥ ८८ ॥
शिवाजीस कैद केलें । रामसिंगातें वृत्त कळलें ।
तया अत्यंत दुःख जाहलें । ऐसा प्रसंग पाहुनी ॥ ८९ ॥
बादशहाकडे जाऊन । ह्मणे कैसें केलें बेइमान ।
आमुंच्या विश्वासें शहाजीनंदन । दिल्लीमाजी पातला ॥९०॥
आमुचा करून उपमर्द । शिवाजीस केलेंत क़ैद ।
आतां आह्मांवरी शब्द । कोणताही असेना ॥ ९१ ॥
यापरी क्रोधें बोलून । रामसिंग गेला तेथून ।
स्वहस्तें पत्र लिहून । स्वपित्यातें कळवीतसे ॥ ९२ ॥
बाह्यात्कारें स्वस्थचित्त । शिवराय कालकंठित ।
पुत्रभृत्यां समवेत । आनंद जनां दाखवी ॥ ९३ ॥
यवन मुत्सद्दी थोर थोर । त्यांसी मित्रत्व जोडी अपार ।
पाहरेकऱ्यांशीं बोले मधुर । स्नेह संपादी तयांचा ॥ ९४ ॥

संदुकांत मेवामिठाई घालून । मुत्सद्यांस पाठवी उपायन ।
उत्तम पदार्थ मेळऊन । ऐसे धाडी सर्वदा ॥ ९५ ॥
पाहरेकरी वीर यवन । प्रथमदिनीं पाहती उघडून ।
नानावस्तू दृष्टीं देखून । तैसेच पुढें धाडिती ॥ ९६ ॥
ऐशा संदुका नित्य जाती । शंका न वाटे कोणाप्रती ।
मग तो चतुर शिवनृपती । काय करिता जाहला ॥ ९७ ॥
मेळवून सर्व सेवक । स्वविचार कथी नरनायक ।
ह्मणे सावधपणें निःशंक । कार्य एवढें करावें ॥ ९८ ॥
हृदयीं चिंतून सद्गुरुनाथ । पुत्रास घेऊन समवेत ।
राव बैसला संदुकेंत । सेवक निःशंक उचलिती ॥ ९९ ॥
प्रत्यही संदुका जशा जाती । ही ही गेली त्याच रीती ।
संशय न वाटे कोणाप्रती । अपार कर्तृत्व रायाचें ॥१००॥
हिरोजी फर्जंद परम चतुर । तो निजे नृपशय्येवर ।
शेला पांघरून समग्र । हस्त बाहेर टाकिला ॥ १०१ ॥
होता एक हुजऱ्या लहान । तो करी पादसंवाहन ।
तें पाहून रक्षकगण । ह्मणती शिवाजी निजलासे ॥१०२॥
इकडे रायाचे अनुचर । संदुकेसह आले बाहेर ।
क्षणमात्र न करितां उशीर । नगराबाहेर पडियेले ॥१०३॥
दूर टाकून लोकवस्ती । तेथें संदुका क्षिप्र उघडिती ।
स्वसुतासह शिवनृपती । पडला बाहेर त्याकाळीं ॥ १०४ ॥
राजवेशाचा करून त्याग । भस्में चर्ची राव सर्वांग ।
स्वसुतासही तोच रंग । राव स्वहस्तें देतसे ॥ १०५ ॥
निकट ठेवून चार सेवक । वरकडांस आज्ञापी नरनायक ।
तुह्मी चतुर समस्त लोक । आपल्या देशां चलावें ॥१०६॥

सर्वांस करून मार्गस्थ । चार सेवक आणि स्वसुत ।
सवें घेऊन नरनाथ । वेप बदलून चालिला ॥ १०७ ॥
स्वदेशाची धरावी वाट । तरी मागून यवन करितील लगट ।
याकारणें तो वीर उद्भट । पंथ धरी मथुरेचा ॥ १०८ ॥
इकडे दिल्लीपुरीप्रती । पाद संवाहकातें यवन पुसिती ।
काय कारणें शिवनृपती । फार वेळ निजलासे ॥ १०९ ॥
तो ह्मणे दुखे मस्तक । ह्मणून निजला नरनायक ।
गलबला न करितां कांहीं एक । निजूं द्यावें सूज्ञहो ॥ ११० ॥
तें यवनांस सत्य वाटलें । निश्चिंतपणें उगे राहिले ।
नित्य क्रमास अनुसरले । पाहरा करिती बाहेरी ॥ १११ ॥
ऐसा कांहीं काळ लोटला । हुजऱ्या बाहेर निघून गेला ।
संकेतानुरूप मार्गस्थ झाला । अघटित घटना रायाची ॥ ११२ ॥
हिरोजी तैसाच निद्रित । बाहेर दिसे एक हस्त ।
तेणें संशय न ये चित्तांत । कोणाच्याही तेधवां ॥ ११३ ॥
ऐसा लोटला काळ बहुत । मग हिरोजी आणी चित्तांत ।
दूर गेला असेल नरनाथ । आतां भय असेना ॥ ११४ ॥
शेला शय्येवरी ठेविला । हिरोजी तत्काळ बाहेर आला ।
नम्रपणें सांगे यवनाला । औषध आणाया जातसें ॥ ११५ ॥
मस्तकशूळ रायास उठला । यास्तव न करावा तुह्मी गलबला ।
साच सर्व वाटे यवनांला । ह्मणती त्वरित येइंजे ॥ ११६ ॥
हिरोजी तेथून निसटला । संकेतानुरूप मार्गस्थ झाला ।
आतां कोणी नाहीं उरला । दिल्लीपुरा माझारीं ॥ ११७ ॥
पुढें लोटला एक प्रहर । यवन मनीं करिती विचार ।
आज दिसतो शून्याकार । काय कारणं कळेना ॥ ११८ ॥

जे जे सेवक बाहेर गेले । ते ते नाहीं परतून आले ।
शिवाजीस एकटें टाकिलें । शय्येवरी नवल हें ॥ ११९ ॥
शिवाजील उठला कपाळशूळ । परी आंत न दिसे चळवळ ।
निवांत निर्जन दिसतें स्थळ । काय कारण कळेना ॥१२०॥
पाहरेकरी एक यवन । आंत शिरून पाहे निरखून ।
कोणी न दिसतां त्याचें मन । शंकायुक्त जाहलें ॥१२१॥
नीट शय्ये समीप गेला । शय्येवरील उचली शेला ।
तों कोणीच नाहीं निजला । ऐसें दृष्टीं देखिलें ॥ १२२ ॥
'दगा दगा' ओरडे यवन । सकल यवन येती धांवून ।
गुप्त जाहले महाराष्ट्र जन । ह्मणून ओरडूं लागले ॥१२३॥
धांवून आला पोलादखान । ह्मणे कैसे सुस्त आवघे जन ।
येरू ह्मणती आह्मांकारण । दोप न लाविजे सर्वथा ॥१२४॥
शिवाजी आह्मां देखतां । नाहींसा झाला अवचिता ।
कैसा गेला न कळे सर्वथा । कोणालाही जाणिजे ॥१२५॥
पातशहास वृत्त कळलें । महाराष्ट्र जन गुप्त झाले ।
कोणीकडे कैसे गेले । तें न जाणे कोणीही ॥ १२६ ॥
पातशहा मनीं घाबरला । ह्मणे शिवाजी हातींचा निसटला ।
आपण आहे दुखविला । आतां सूड घेईल ॥ १२७ ॥
यवन वीरांचा पाहरा चांगला । मग शिवाजी कैसा निसटला ।
काय गगनामाजी गेला । किंवा शिरला भूतळीं ॥ १२८ ॥
शिवाजी दिसतो महा सैतान । न कळे काय आणील विघ्न ।
आतां होईल संरक्षण । कैशापरी कळेना ॥ १२९ ॥
शहरामाजीं प्रगटली मात । लोक झाले आश्चर्यचकित ।
ह्मणती आतां महा अनर्थ । ओढवणार कांहीं तरी ॥१३०॥

पातशहानें करून विचार । आज्ञापिले स्वीय सरदार ।
चारी दिशा शोधून सादर । शिवाजीस धरावें ॥ १३१ ॥
सुतासहित नरनाथ । माथुरापुरीं झाला प्राप्त ।
तेथें वार्ता झाली श्रुत । यवन येती शोधावया ॥ १३२ ॥
मोरोपंत पिंगळे सगुण । तयांचे शालक तिघेजण ।
मथुरा नगरीं सुखेंकरून । होते राहत त्या काळीं ॥१३३॥
काशिनाथ, कृष्ण, विसाजीपंत । तिघे बंधू सत्कर्मरत ।
काळ क्रमिती मथुरेंत । कांहीं व्यवहार करूनी ॥ १३४ ॥
राव तयां गुप्त भेटला । सर्व वृत्त कळवी तयांला ।
ह्मणे रक्षा मम सुताला । कांहीं काळ या ठायीं ॥१३५॥
गुप्तपणें देशीं जाईन । मग तुह्मांस दूत धाडीन ।
सुतासह तुह्मां नेईन । सुखी करीन मित्रहो ॥ १३६ ॥
नृपवचनास ते मान्य झाले । रायें स्वसुतास तेथें ठेविलें ।
मग शिवराय पुढें चालिले । तापस वेष धरूनी ॥ १३७ ॥
वाराणसी पवित्र नगर । तेथें गेला शहाजीकुमर ।
जान्हवी स्नानें ताप समग्र । नाशून शांती वाटली ॥१३८॥
घेऊन विश्वेश्वर दर्शन । साधु संतांस भावें वंदून ।
शिवराय निघाला तेथून । स्वदेशास यावया ॥ १३९ ॥
नाना संकटें मार्गीं उद्भवती । भवानी वरें सर्व निरसती ।
ऐशापरी श्रीशिवमूर्ती । स्वदेशास पातली ॥ १४० ॥
राजगडीं त्वरें जाउनी । रायें वंदिली जिजाऊ जननी ।
येरू पुत्रमुख पाहुनी । स्फुंदस्फुंदोनी रडतसे ॥ १४१ ॥
चतुर्दश वर्षें अरण्यवास । भोगून राम आले अयोध्येस ।
तदा आनंद कौसल्येस । तोच जिजाऊस जाहला ॥१४२॥

अनंत विघ्नें निवारून । यवनांस अपयश देऊन ।
रायास आणिलें संरक्षून । भवानीनें यापरी ॥ १४३ ॥
राव देशीं परतून आला । जैसा कुडींत प्राण प्रवेशला ।
वृत्त कळलें अवघ्यांला । आनंद जाहला महाराष्ट्रीं ॥१४४॥
सकल सरदार एकवटले । शिवरायास भावें भेटले ।
नृपें सर्व वृत्त निवेदिलें । दिल्लीकडील जनांसी ॥ १४५ ॥
संभाजीबाळ मागें राहिलें । तें आणाया दूत प्रेषिले ।
ते मथुरेमाजीं प्रवेशले । बंधुत्रयास भेटतां ॥ १४६ ॥
एकनिष्ठ बंधू तिघे जण । केलें बाळाचें संरक्षण ।
आपुला भाचा ऐसें जनां सांगून । होतें गृहीं ठेविलें ॥१४७॥
तेथें अधिकारी होता यवन । तयास कळली कांहीं कुणकुण ।
यांनीं शिवपुत्र संरक्षून । असे निज गृहीं ठेविला ॥१४८॥
गृहीं पातला दुष्ट यवन । ह्मणे हा बाळ नवीन कोण ।
तिघे बोलती नम्र होऊन । भाचा असे आमुचा ॥ १४९ ॥
व्हावें संशयाचें निवारण । ह्मणून त्यासह करिती भोजन ।
धन्य धन्य तिघे सगुण । एकनिष्ठ रायासीं ॥ १५० ॥
यापरी बाळ संरक्षिलें । तया न्यावया दूत आले ।
तिघांसही बोलाविलें । शिवरायें स्वदेशीं ॥ १५१ ॥
संभाजीस सवें घेऊन । त्वरें निघाले तिघेजण ।
सुखरूप स्वदेशीं येऊन । रायालागीं भेटले ॥ १५२ ॥
रायें केला अपूर्व सन्मान । तयांस अर्पिलें अपार धन ।
वस्त्र भूषणें समर्पून । संतोषविलें तिघांसीं ॥ १५३ ॥
यापरी शिवराय सुतासहित । सुखरूप आला दक्षिणेंत ।
पुढें चरित्र दावील बहुत । श्रोतीं सादर परिसावें ॥१५४॥

हें आख्यान दिल्लीप्रयाण । भक्तिभावें करितां पठण ।
होईल विघ्नांचें निरसन । सद्‌गुरुकृपेनें सर्वथा ॥ १९५ ॥
तीनवेळ भावें वाचितां । कारागृहांतून होईल मुक्तता ।
हे श्रीशिवराय पुण्यकथा । कल्याणदायक जनांसीं ॥१९६॥
श्रीशिवविजयग्रंथ । शिवावतार चरित्र अद्भुत ।
वर्णन करी भावें अनंत । एकविंशतितमोध्याय गोड हा ॥१९७॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥



# अध्याय २२ वा.

॥ श्रीगणेशायनमः ॥

पुण्यप्रताप शिवनृपती । दिल्लीहून आलिया देशाप्रती ।
विचार करी निज चित्तीं । म्लेंच्छजन दंडावे ॥ १ ॥
किल्ले मुलुख यवनीं घेतला । तो तो पाहिजे आतां मेळविला ।
तरीच सुख स्वजनांला । नित्य होईल निश्चयें ॥ २ ॥
मोरोपंत, निळोपंत, सरदार । तानाजी, आबाजी, सैनिक शूर ।
यथां मेळवूनी नृपवर । आज्ञा करी मुखानें ॥ ३ ॥
परम नष्ट यवन जात । त्यांनीं दुर्ग केले हस्तगत ।
ते तुह्मी घेऊन त्वरित । राज्यवृद्धी करावी ॥ ४ ॥
नरपतीची आज्ञा प्रमाण । वीर निघाले करून वंदन ।
महाराष्ट्र सैन्य सज्ज करून । यवनांवरी चालिले ॥ ५ ॥
तानाजी मालुसरा रणशूर । परमप्रतापी समरधीर ।
जयाचें अंगबल अपार । गजासवें झुंजतसे ॥ ६ ॥
नृपकार्यीं एकनिष्ठ मन । अधिक न मानी स्वामिकार्याविण ।
तेणें नृपाज्ञा मानून । स्वबलासह निघाला ॥ ७ ॥
कोंडाणागड विख्यात । तेथींचा किल्लेदार रजपूत ।
सावधपणें होता वर्तत । दुर्ग रक्षण करीतसे ॥ ८ ॥
तोच दुर्ग करीन हस्तगत । ऐसा निश्चय तानाजी करित ।
निवडक मावळे पांचशत । सवें घेऊन निघाला ॥ ९ ॥
सह्याद्रीचे पूर्व प्रदेशीं । पुरंदर नामक दुर्गापाशीं ।
कोंडाणा दुर्ग उच्च देशीं । अति दुर्गम दिसतसे ॥ १० ॥

तुटक कडा अर्धकोस । भयाण पर्वत पूर्व पश्चिमेस ।
विस्तीर्ण मैदान उत्तरेस । पुणें दिसे पलीकडे ॥ ११ ॥
दुर्गावरून खालीं पाहतां । लवणांतून दिसे निरासरिता ।
आजूबाजूस इतस्ततः । डोंगर पर्वत दीसती ॥ १२ ॥
ज्याची उंची तीस हात । ऐसा काळा फत्तर एक जात ।
त्यावरी चिरेबंदी समस्त । होता तट बांधिला ॥ १३ ॥
भव्य बुरूज स्थळीं स्थळीं । त्यावरी उल्हाटयंत्रें डांभिलीं ।
शूर वीरांची टोळी ठेविली । होती दुर्ग रक्षणा ॥ १४ ॥
ऐसा दुर्ग जिंकावयाला । तानाजी ससैन्य पातला ।
वीररसें ओथंबला । तानाजी वीर तेधवां ॥ १५ ॥
तानाजी मालुसरा उद्भटवीर । दिसे जैसा अंजनीकुमर ।
शौर्य स्वामि-निष्ठा अपार । मारुतीराया सारिखी ॥ १६ ॥
रात्र होतां दीड प्रहर । जमा झाले महाराष्ट्रवीर ।
तानाजी उपसून तरवार । वीरांप्रती बोलतसे ॥ १७ ॥
पहा आजचा कार्यप्रकार । दुर्ग दिसतो भयंकर ।
पुण्यप्रतापी आपुला नृपवर । यश देईल आपणां ॥ १८ ॥
शिवरायाचे पाय चिंतून । हरहर शब्दें भुजा पिटून ।
आतां उड्या टाकूं आपण । दुर्ग घेऊं सहजची ॥ १९ ॥
आतां जिंकणें किंवा मरणें । नाहीं सर्वथा मागें फिरणें ।
ऐसा निश्चय मनीं करणें । जय लाधेल सहजची ॥ २० ॥
तानाजीच्या वाक्यावसानीं । 'बहुबरें' ऐसा उठला ध्वनी ।
महाराष्ट्रवीर बोलिले गर्जुनी । दुर्ग घेऊं क्षणांत ॥ २१ ॥
तानाजीचा सहोदर । एकनिष्ठ आणि समरधीर ।
सूर्याजी नामें रणशूर । होता समीप तेधवां ॥ २२ ॥

त्यास तानाजी बोले हटकून । मी पुढें जातों भिंत चढून ।
तुवां ससैन्य मागें येऊन । साह्य मजला करावें ॥ २३ ॥
कटीस बांधून लांब दोर । तानाजी चढे दुर्गावर ।
सहज चढती जैसे वानर । तैसा चढला क्षणांत ॥ २४ ॥
प्रचंड शिळेस दोर बांधिला । सर्व वीरांस मार्ग जाहला ।
वीरवर्ग त्वरें चढला । क्षणामाजीं दुर्गावरी ॥ २५ ॥
सूर्याजी सहित सर्व वीर । जमा झाले तटावर ।
शस्त्रें सरसावून समग्र । सिद्ध होती लढावया ॥ २६ ॥
तटावरी कांहीं गलबल । होतां रक्षकां कळे चाहुल ।
एकमेकां उतावेळ । हांका मारूं लागले ॥ २७ ॥
कार्य प्रयत्नीं दिनीं भागले । होते रात्रीं सुखरूप निजले ।
बहुत अस्ताव्यस्त पडले । सावध नाहीं कोणीही ॥ २८ ॥
'धांवा धांवा' गनीम आले । ऐसें पहारेकरी ओरडले ।
तेणें लोक जागृत झाले । दचकून उठती सर्वेही ॥ २९ ॥
किल्लेदार उदेभान । त्यासही कळलें वर्तमान ।
ढाल फिरंग करीं घेऊन । अति त्वरें निघाला ॥ ३० ॥
बाहेर पडतां सेनापती । सैनिकही त्वरें धांवती ।
तीक्ष्ण शस्त्रें घेऊन हस्तीं । युद्धास सिद्ध जाहले ॥ ३१ ॥
तानाजी खड्ग पडताळीत । चालला शत्रु सैन्य कापित ।
महाराष्ट्र वीर चालले धांवत । तानाजीच्या समागमें ॥३२॥
दोन्ही दळें एकवटलीं । खड्गयुद्धाची गर्दी उडाली ।
रक्तवृष्टि होऊं लागली । तये वेळीं धरणीवरी ॥ ३३ ॥
वीररसें भरीं भरून । खड्गप्रहार करिती दारुण ।
प्रवर्तलें रणकंदन । भयंकर तेधवां ॥ ३४ ॥

कोणां वीरांचीं शिरें उडती । कोणाचे भुज तुटून पडती ।
कोणी अत्यंत आक्रंदती । दारुण प्रहार लागतां ॥ ३५ ॥
तानाजी वीर अति उद्भट । उदेभानही महाभट ।
दोघांचीही पडून गांठ । युद्धारंभ जाहला ॥ ३६ ॥
युद्धविद्येंत दोघे प्रवीण । स्वामिनिष्ठही दोघे पूर्ण ।
करिती युद्ध संग्राम दारुण । अत्यावेशें करूनी ॥ ३७ ॥
भीमसेन आणि दुर्योधन । यांचें झालें रणकंदन ।
त्याचपरि हे दोघे जण । महायुद्धा प्रवर्तले ॥ ३८ ॥
चर्मे अरीचा घाव वारिती । खड्गें शत्रूस प्रहार करिती ।
अलात चक्रवत् फेरे घेती । कौशल्य दाविती अपार ॥३९॥
यापरी करितां रणकंदन । न चुके कोणास विधि लेखन ।
परस्परांचे प्रहार लागून । पतन पावले दोघेही ॥ ४० ॥
घटोत्कच रणीं पतन पावला । त्यापरी तानाजी वीर पडला ।
हाहाकार बहू उठला । महाराष्ट्र दळीं तेधवां ॥ ४१ ॥
सूर्यराव पुढें झाला । हांका मारी समस्तांला ।
ह्मणे सुसमय प्राप्त झाला । दुर्ग घेऊं क्षणांत ॥ ४२ ॥
मम भ्राता पडला रणीं । परी शोक न करावा ये क्षणीं ।
गडावरी झेंडा लाउनी । स्वामिकार्य करावें ॥ ४३ ॥
भीत होऊन मागें फिराल । शत्रूस पाठ दाखवाल ।
तरी तुह्मी अवघे मराल । सत्य जाणा वीरहो ॥ ४४ ॥
चढावया कामीं पडली । ती रश्मी मी कापून टाकिली ।
आतां जनहो आशा खुंटली । खालीं उतरून जाण्याची ॥४५॥
सूर्याजीचें ऐकून वचन । परतले अवघे महाराष्ट्र जन ।
शत्रूवरी गेले धांवून । सिंहनादें गर्जत ॥ ४६ ॥

सेनापती पतन पावला । दुर्ग रक्षकांचा धीर गेला ।
रक्षक वर्ग भंग पावला । मग जाहला शरणागत ॥ ४७ ॥
सूर्याजीनें दुर्ग साधिला । नृपवर्याचा झेंडा रोंविला ।
हर्ष झाला समस्तांला । राजकार्य सिद्धीनें ॥ ४८ ॥
कळावया नृपास खुण । बहुत इंधनें एकत्र करून ।
सूर्याजी चेतवी दहन । संकेतानुरूप ते क्षणीं ॥ ४९ ॥
राजगडीं एकाग्र बैसून । कोंडाण्याकडे डोळे लावून ।
पहात होता शहाजीनंदन । संकेत खूण तेधवां ॥ ५० ॥
एकाएकीं प्रकाश दिसला । राव अंतरीं आनंदला ।
ह्मणे आमुचा दुर्ग आला । स्वीयजनांच्या प्रतापें ॥ ५१ ॥
दुसरे दिनीं वार्ता आली । तानाजीनें ख्याती केली ।
परी तयाची काया पडली । अकस्मात रणांगणीं ॥ ५२ ॥
राव बहुत कष्टी झाला । ह्मणे अनर्थ पात घडला ।
गड आला परी सिंह गेला । काय लाभ यामध्यें ॥ ५३ ॥
करून सर्व बंदोबस्त । सूर्यराव आला परत ।
नृपाळातें वंदून त्वरित । शोक करी बंधूचा ॥ ५४ ॥
शिवराय सांत्वन करिती । ह्मगती कराल दुःख किती ।
बंधू पावला उत्तम गती । धारातीर्थी पडूनी ॥ ५५ ॥
न सोडितां समयीं धीर । तुह्मी ख्याती केली अपार ।
धन्य तुह्मी महाराष्ट्र वीर । व्हाल विजयी सर्वत्र ॥ ५६ ॥
कडीं कंठ्या समर्पून । राव सर्वांचा करी सन्मान ।
सूर्याजीस सुभा सांगून । नांवाजिला परोपरी ॥ ५७ ॥
गड आला सिंह गेला । ह्मणून सिंहगड ऐसें गडाला ।
नाम ठेवून ख्यात केला । त्याच मानें दुर्ग तो ॥ ५८ ॥

मोरोपंतादि अन्य वीर । त्यांनीं ऐसेच प्रताप अपार ।
करून रायाचें दुर्ग समग्र । यवनांपासून घेतले ॥ ५९ ॥
राज्यवृद्धी बहुत झाली । अपार कीर्ती जगीं गाजली ।
पुढें कैशी कथा वर्तली । श्रोतीं सादर परिसिजे ॥ ६० ॥
ऐकदिनीं राजसभेंत । बहिरजी जासूद आला अवचित ।
ह्मणे पाहून आलों शहर सुरत । अति धनाढ्य समृद्ध ॥ ६१ ॥
कोट्याधीश सावकार । सुरत शहरीं असती अपार ।
निघतो कांचनाचा धूर । सदासर्वदा त्यास्थळीं ॥ ६२ ॥
गुप्तपणें ससैन्य जाल । सुरतेवरी स्वारी कराल ।
तरी अपार लक्ष्मी लाधेल । तुह्मांप्रती निश्चयें ॥ ६३ ॥
ऐशापरी ऐकून मात । नृपाल सिद्धता करी त्वरित ।
सर्व अश्वसेना घेऊन बहुत । एकाएकीं निघाला ॥ ६४ ॥
प्रतापराव सरनोबत । प्रतापशाली मोरोपंत ।
इत्याद्यनेक वीर बहुत । रायें सर्व घेतले ॥ ६५ ॥
ससैन्य शिरून कोळवणांत । पुढें चालिला शहाजीसुत ।
सुरते समीप अकस्मात । शिवराय प्रगटला ॥ ६६ ॥
लक्ष्मीवान पौरजन । होते कार्यामाजीं निमग्न ।
तयांप्रती भय कारण । ज्ञात नव्हतें मुळींच ॥ ६७ ॥
नाना वस्तूंचे हाट भरले । ठायीं ठायीं जन मिळाले ।
अनेक व्यवहार होते चालले । सुरत शहरीं तेघवां ॥ ६८ ॥
रौप्यमुद्रांच्या राशी घालून । बैसले होते सराफजन ।
हिरे माणकें मोत्यें मांडून । जवाहिरे बैसले ॥ ६९ ॥
किनखाप शाली पैठण्या भरजरी । अमोल वसनें नानापरी ।
यांच्या सुंदर सुरम्य हारी । विक्रयार्थ होत्या मांडिल्या ॥ ७० ॥

ऐशा सुसंपन्न शहरांत । राव शिरला सैन्यासहित ।
जनांस वाटला कल्पांत । महाअनर्थ ओढवला ॥ ७१ ॥
ग्रामरक्षक वीर यवन । रायावरी गेले धांवून ।
रायें न लावितां एकक्षण । पराभविले सर्वही ॥ ७२ ॥
मग तो नरवीर पंचानन । निवडक योद्धे सर्व घेऊन ।
जय लक्ष्मी वरण्याकारण । हाटामाजीं प्रवेशला ॥ ७३ ॥
सुरत शहरींची लक्ष्मी भली । यवन सहवासा कंटाळली ।
होती शृंगारथाट करून बैसली । वाट पहात नृपाची ॥७४॥
लक्ष्मी अत्यंत स्वभावचंचल । झाली होती उतावीळ ।
रायास देखून कंठीं माळ । तिनें प्रेमें घातली ॥ ७५ ॥
जाणो ते कन्या उपवर । पाहत होती योग्य वर ।
मनाजोगा तिला भ्रतार । शिवराय मिळाला ॥ ७६ ॥
सन्मान्य सत्पात्र शहाजीनंदन । त्यावरी लक्ष्मीचें बैसलें मन ।
तिनें दिधलें आलिंगन । सर्वां देखत नृपाळा ॥ ७७ ॥
चैद्य मागधांच्या मेळ्यामधून । कृष्णें केलें रुक्मिणीहरण ।
त्याचपरी शहाजीनंदन । येथें हरी लक्ष्मीतें ॥ ७८ ॥
अश्व होते सज्ज केले । त्यावरी लक्ष्मीस आरूढविलें ।
विघ्नकर्ते पराभविले । पराक्रमें रायानें ॥ ७९ ॥
सुवर्ण मौक्तिकें रत्नें अपार । वैडूर्य पुष्कराज नील सुंदर ।
कडीं कंठ्यादि अलंकार । प्राप्त झाले नृपातें ॥ ८० ॥
अहोरात्र दोनदिन । लक्ष्मी संपादिली बळें करून ।
उत्तम अश्व हिरावून । रायें तेथील घेतले ॥ ८१ ॥
अपार संपदेचा भार जाहला । अनेक अश्वावरी लाधला ।
मग राव तेथून मुरडला । यावयास स्वस्थानीं ॥ ८२ ॥

गतश्रीक करून नगर । राव पडिला पुराबाहेर ।
स्वस्थानाचा मार्ग सत्वर । ससैन्य आक्रमूं लागला ॥ ८३ ॥
सुरतेमधील रक्षक यवन । अति त्वरें गेले धांवून ।
स्वीय वरिष्ठ सरदार गांठून । वृत्त तयांस कळविती ॥८४॥
शिवाजीनें शहर लुटिलें । परिसतां ते बहु कोपले ।
चळ्याघोड्यानिशीं निघाले । नृपवर्यास गांठावया ॥ ८५ ॥
मोहबतखान दाऊदखान ॥ दोघे बलिष्ठ सरदार यवन ।
द्वादश सहस्र सेना घेऊन । त्वरें गांठिती नृपातें ॥ ८६ ॥
यवन सैन्याची दौड आली । ही नृपालास वार्ता कळली ।
मग रायें सिद्धता केली । संग्रामाची त्वरेनें ॥ ८७ ॥
प्रतापरावास हांक मारून । राव आज्ञापी तया कारण ।
जित लक्ष्मी तुवां घेऊन । त्वरें जावें स्वस्थळा ॥ ८८ ॥
कांहीं सैन्य सवें घेऊन । लक्ष्मीस न्यावें संभाळून ।
आह्मी करूं रणकंदन । पराभवूं शत्रूंतें ॥ ८९ ॥
नृपाज्ञा मानून प्रमाण । प्रतापराव गेला लक्ष्मी घेऊन ।
इकडे राव सज्ज होऊन । वाट पाहत बैसला ॥ ९० ॥
पट्टे चढवून दोन्ही हातीं । सावधपणें राहिला भूपती ।
तंव यवन सेना त्वरित गती । समीप येऊन ठेपली ॥९१॥
उभय दळें एकवटलीं । घोर युद्धाची गर्दी उडाली ।
रक्तवृष्टी होऊं लागली । घरेवरी तेधवां ॥ ९२ ॥
परस्परें करिती प्रहार । गर्जना करिती भयंकर ।
वीररसें उभय वीर । अत्यावेशें झगडती ॥ ९३ ॥
उभय पक्षींचे शूर वीर । परम शौर्यें करिती समर ।
कोण्या पक्षास येईल हार । न कळे तदां कोणांतें ॥ ९४॥

मग तो नृसिंह शहाजीनंदन । हस्तींचे पट्टे पडताळून ।
हरहर शब्दाचा घोष करून । शत्रु सैन्यीं प्रवेशला ॥९५॥
अरिसैन्यीं निःशंक शिरून । परवीरांचे घेई प्राण ।
आकांत प्रवर्तला दारुण । यवन सैन्यीं तेधवां ॥ ९६ ॥
मोरोपंतादि वीर समस्त । परदळीं प्रवेशले त्वरित ।
शत्रुसैन्याचा क्षय करीत । धैर्यें पुढें चालिले ॥ ९७ ॥
शिवरायाचा प्रताप अपार । थोर मांडिला शत्रुसंहार ।
यवन वीरांस न पुरे धीर । पुढें युद्ध करावया ॥ ९८ ॥
मोहबतखान दाऊतखान । रायावरी आले धांवून ।
अनेक वीर उठले पठाण । नृपाळास जिंकावया ॥ ९९ ॥
रणवाद्यें वाजूं लागलीं । झाली एकच रणधुमाळी ।
कल्पांत वेळ आतांच पातली । ऐसें दिसों लागलें ॥१००॥
उद्भट योद्धे महाराष्ट्रवीर । त्यांनीं मांडिला अत्यंत निकर ।
यवन वीरांचीं शिरें अपार । धरेवरी पाडिलीं ॥ १०१ ॥
चार सहस्र योद्धे यवन । रणांगणीं पावले पतन ।
अनर्थ ओढवला दारुण । यवनसैन्यीं तेधवां ॥ १०२ ॥
तये अवसरीं शिवनृपाळ । यवनास वाटला मूर्त काळ ।
भय पावले यवन सकळ । शिवरायास पाहुनी ॥ १०३ ॥
दुःशासनाच्या रुधिरप्राशनीं । भीमसेन दिसला भारत रणीं ।
त्याचपरी समरांगणीं । शिवराय शोभला ॥ १०४ ॥
यापरी होऊन समर अद्भुत । यवन झाले पराभूत ।
मग पाठ देऊन त्वरित । पळ काढिती तेथुनी ॥ १०५ ॥
भंग पावून यवनदळ । पळून गेलें त्वरें सकळ ।
विजयश्रीनें शोभे नृपाळ । भीमसेनासारिखा ॥ १०६ ॥

ऐशापरी प्रताप दावून । मग महाराष्ट्रवीर एकत्र करून ।
परतला तेथून शहाजीनंदन । स्वस्थळाप्रती यावया ॥१०७॥
नृपास लक्ष्मीनें माळ घातली । ह्मणून जयश्री धांवून आली ।
तिनेंही शिवमूर्ती वरिली । अति प्रेमें करूनी ॥ १०८ ॥
यापरी जयलक्ष्मी मेळवून । राव स्वभुवनीं आला परतून ।
निजवीरांतें गौरवून । हर्ष दिधला समस्तां ॥ १०९ ॥
भिंवडी हुबळी नगरादिक । निजशत्रूंचीं शहरें अनेक ।
अन्य प्रसंगीं रायें निःशंक । याचपरी घेतलीं ॥ ११० ॥
उदंड संपदा मेळविली । म्लेंच्छांप्रती शिक्षा लाविली ।
विक्रमें स्वराज्यवृद्धी केली । धन्य महात्मा शिवाजी ॥१११॥
श्रीशिवविजयग्रंथ । शिवावतार चरित्र अद्भुत ।
वर्णन करी भावें अनंत । द्वाविंशतितमोध्याय गोड हा ॥११२॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

# अध्याय २३ वा.

॥ श्रीगणेशायनमः ॥

जय नाम संवत्सरीं । एके दिनीं सप्तर्षि नगरीं ।
शिवराय होते निज मंदिरीं । राजकार्यें करीत ॥ १ ॥
तदा सच्छिष्य सवें घेऊन । समर्थ निघाले माहुलीहून ।
कंजें गांवीं भिक्षा मागून । सातान्यांत प्रवेशले ॥ २ ॥
मुखें बोलून 'जय रघुवीर' । भिक्षा मागती घरोघर ।
रायें परिसिला मधुर स्वर । सद्गुरूचा मंदिरीं ॥ ३ ॥
देखून गुरूचें भिक्षाटण । नृपतीचें गंहिवरलें मन ।
ह्मणे हें स्वरूप गुणनिधान । दारोदार हिंडतसे ॥ ४ ॥
सद्गुरूराज श्रम पावले । व्यर्थ आमुचें जीवित्व झालें ।
राज्यदान पाहिजे केलें । गुरुरायास ये समयीं ॥ ५ ॥
नृपवर्यें ऐसें बोलून । बाळाजी चिटणिसास आज्ञापून ।
राज्यार्पण पत्रिका लिहून । सिद्ध ठेविली स्वहस्तीं ॥ ६ ॥
निज सौधांत आहे नृपती । हें सद्गुरू समर्थ नेणती ।
भ्रमत भ्रमत स्वच्छंदवृत्ती । सौधानिकट पातले ॥ ७ ॥
राजद्वारासन्मुख येऊन । क्रमानुरूप उभे राहून ।
'जय रघुवीर' ऐसें गर्जून । क्षणेक स्तब्ध राहिले ॥ ८ ॥
अष्टभावें सद्गदित । होऊन नृप आला धांवत ।
सद्गुरू रायाच्या झोळींत । राज्यार्पण पत्र टाकिलें ॥ ९ ।
चकित होऊन गुरू बोलती । आह्मांस काय अर्पिलें नृपती ।
धान्यविरहित आह्मांप्रती । कांहीं अवश्य असेना ॥ १० ॥

शिवराया सूज्ञ नृपाळा । काशास्तव कागद अर्पिला ।
मग ह्मणती स्वशिष्याला । 'काय कागद वांचिजे' ॥११॥
कल्याण पाहे पत्र वांचून । ह्मणे केलें राज्य संमर्पण ।
शिवराय सत्‌शिष्य-गुणनिधान । राज्य तुह्मांस अर्पिलें ॥१२॥
सद्‌गुरू करून मंदस्मित । ह्मणती वाटे आश्चर्य बहुत ।
आह्मां राज्य अर्पून समस्त । काय करणार नृपाळा ॥१३॥
अत्यंत कष्टें मेळविलें । तें आह्मांस अर्पण केलें ।
आतां पुढें काय योजिलें । चित्तामाजीं नृपाळा ॥ १४ ॥
कर जोडून बोले नृपती । गुरूजी योजिलें असें चित्तीं ।
सदैव राहून युष्मत्संगतीं । गुरुसेवा करावी ॥ १५ ॥
राज्य वैभवा कंटाळलों । चिरसहवासकामुक झालों ।
सद्‌गुरूराया शरण आलों । पदीं राज्य समर्पुनी ॥ १६ ॥
'बरें' ऐसें बोलून समर्थ । झोळी देती नृप करांत ।
तया घेऊन शिष्यासहित । भिक्षा मागती गृहीं गृहीं ॥१७॥
भिक्षा कार्य संपवूनी । दूर गेले ग्राम सोडुनी ।
श्रीवेण्येचे तीरीं जाउनी । स्नानें करिती सर्वत्र ॥ १८ ॥
सामग्री आणिली मेळवून । पाकनिष्पत्ति करी कल्याण ।
शिवरायासह समर्थ भोजन । प्रेमें करिती त्या स्थळीं ॥१९॥
मग बैसून शिळातळीं । शिवरायास हांक मारिली ।
राव होऊन बद्धांजली । पुढें उभा राहिला ॥ २० ॥
शिवरायास संबोधून । समर्थ करिती गंभीर भाषण ।
राया तुवां काय कारण । राज्य आह्मां अर्पिलें ॥ २१ ॥
कोण करील धर्मरक्षण । कैसें होईल दुष्ट शासन ।
दीन जनांचें परित्राण । तुजवीण कैसें होईल ॥ २२ ॥

तुच्छ लेखून शरीर सुख । जगत्कल्याणीं मानून हरिख ।
तुवां मन करून निःशंक । राज्य केलें पाहिजे ॥ २३ ॥
राव बोले नम्र होऊन । राज्य वैभवीं जडवीन मन ।
परी मग परलोकसाधन । कोण्यापरी करावें ॥ २४ ॥
तुवां मजवरी कृपा करावी । राज्य लक्ष्मी अन्यास द्यावी ।
मजकडून सेवा घ्यावी । उद्धार माझा करावा ॥ २५ ॥
दास बोलती मधुरोत्तर । कैसें भ्रमलें तुझें अंतर ।
तूं पुण्यवंत नृपवर । विमळ कीर्ती मेळविली ॥ २६ ॥
तुझ्यासारिखे धन्य नृपती । इह पर लोक दोन्ही साधिती ।
महाभागा त्वदीय मती । भ्रष्ट नाहीं जाहली ॥ २७ ॥
दशरथ राजा पुण्यश्लोक । तैसा विदेही नृपाळ जनक ।
ऐशा नृपांनीं राज्यसुख । भोगून स्वर्ग साधिला ॥ २८ ॥
यथाशास्त्र राज्य करितां । तेणें सुख होतें समस्तां ।
मग सहज येते धन्यता । नृपवर्यास जगांत ॥ २९ ॥
निष्काम बुद्धी सदैव ठेवितां । राहते अंतःकरण शुद्धता ।
देह सार्थकतेची पात्रता । तेणें सहज येतसे ॥ ३० ॥
यास्तव सोडून अविचार । शिरीं धरावा राज्यभार ।
भगवच्चरणीं ठेवून अंतर । उभयलोक साधावे ॥ ३१ ॥
आह्मांस तुवां राज्य अर्पिलें । तें आह्मी ग्रहण केलें ।
प्रसादार्थ तुजला दिधलें । तेंच राज्य नृपाळा ॥ ३२ ॥
आतां आमुची आज्ञा मानून । करावें राष्ट्र संरक्षण ।
राज्यार्पणाची एक खूण । तुवां नित्य रक्षावी ॥ ३३ ॥
आमुचें असतें काषाय वसन । तोच रंग ध्वजेस देऊन ।
काषायवर्ण ध्वजारक्षण । नित्य तुवां करावें ॥ ३४ ॥

भगवा झेंडा उभारून । तुवां करावें धर्मरक्षण ।
प्रसादाची हीच खूण । नृपा रक्षण करावी ॥ ३५ ॥
त्वद्भक्तीनें संतोषलों । नृपते समाधान पावलों ।
शिवराया प्रसन्न झालों । तुजवरी प्रस्तुत ॥ ३६ ॥
भगवा झेंडा विजयी होईल । अल्पकाळें दिग्विजय करील ।
अपार यश तुज लाधेल । मम वरदानें नृपाळा ॥ ३७ ॥
शिवराय सद्गदित होऊन । गुरुपदीं घाली लोटांगण ।
ह्मणे तुमची आज्ञा प्रमाण । सदैव आह्मां गुरुराया ॥३८॥
गुरुप्रसाद शिरीं वंदून । तवाज्ञेनें राज्य करीन ।
परी एकहेतू परिपूर्ण । सद्गुरूनें करावा ॥ ३९ ॥
आतां न करावें भिक्षाटण । तेणें श्रमतें माझें मन ।
साशिष्य ममसदनीं राहून । काळक्रमणा करावी ॥ ४० ॥
गुरू बोलती स्मितपूर्वक । आह्मांस भिक्षाटणीं नाहीं दुःख ।
एतद्विषयीं कांहींएक । शंका तुवां न धरावी ॥ ४१ ॥
" ब्राह्मणांची मुख्य दीक्षा । मागीतली पाहिजे भिक्षा ।
' ओंभवति ' यापक्षा । रक्षिलें पाहिजे ॥ ४२ ॥
भिक्षा मागोन जो जेविला । तो निराहारी बोलिला ।
प्रतिग्रहा वेगळा झाला । भिक्षा मागतां ॥ ४३ ॥
दत्त गोरक्ष आदि करूनी । सिद्ध भिक्षा मागती जनीं ।
निस्पृहता भिक्षेपासुनी । प्रगट होय ॥ ४४ ॥
वार लावून बैसला । तरी तो पराधीन झाला ।
तसीच नित्यावळीला । स्वतंत्रता कैंची ॥ ४५ ॥
आठांदिवसां धान्य मेळविलें । तरी तें कंटाळवाणें झालें ।
प्राणी एकाएकीं चेवलें । नित्य नूतनते पासुनी ॥ ४६ ॥

नित्य नूतन हिंडावें । उदंड देशाटण करावें ।
तरीच भिक्षा मागतां बरवें । श्लाघ्यवाणें ॥ ४७ ॥
अखंड भिक्षेचा अभ्यास । तयास वाटेना परदेश ।
जिकडे तिकडे स्वदेश । लोकत्रयीं ॥ ४८ ॥
भिक्षा मागतां किरकों नये । भिक्षा मागतां लाजों नये ।
भिक्षा मागतां भागों नये । परिभ्रमणें ॥ ४९ ॥
भिक्षा ह्मणिजे कामधेनू । सदाफळ नव्हे सामान्यू ।
भिक्षेस करी जो अमान्यू । तो करंटा योगी ॥ ५० ॥
भिक्षेनें वोळखी होती । भिक्षेनें श्रम चुकती ।
सामान्य भिक्षा मान्य करिती । सकळ प्राणी ॥ ५१ ॥
भिक्षा ह्मणजे निर्भयस्थिती । भिक्षेनें प्रगटे महंती ।
स्वतंत्रता ईश्वरप्राप्ती । भिक्षागुणें ॥ ५२ ॥
भिक्षेस नाहीं अडथळा । भिक्षाहारी तो मोकळा ।
भिक्षेकरितां सार्थकवेळा । काळ जातो ॥ ५३ ॥
पृथ्वीमध्यें देश नाना । फिरतां उपवासी मरेना ।
कोणें एकेठायीं जनां । जड नव्हे ॥ ५४ ॥
कांहीं भिक्षा आहे ह्मणावें । अल्प संतोषी असावें ।
बहुत आणितां घ्यावें । मुष्टीएक ॥ ५५ ॥
सुखरूप भिक्षा मागणें । ऐसी निस्पृहतेचीं लक्षणें ।
मृदु वाग्विलास करणें । परम सौख्यकारी ॥ ५६ ॥
ऐसी भिक्षेची स्थिती । अल्प बोलिलों यथामती ।
भिक्षा वांचवी विपत्ती । होणार काळीं ॥ ५७ ॥
आमुचा स्वधर्म भिक्षाटण । चालवूं आह्मी सुखेंकरून ।
योग्य आल्यास कांहीं दिन । राहूं तुझ्या संन्निध ॥ ५८ ॥

आतां तुवां गृहीं जावें । दक्षपणें राज्य करावें ।
अपार यश मेळवावें । प्रजाजन पाळुनी ॥ ५९ ॥
शिवराय बोले मधुर वचन । सद्‌गुरू तुमचें मधुर भाषण ।
अत्यंत गोड सुधेहून । सबाह्याभ्यंतर निवालें ॥ ६० ॥
प्रपंच आणि राज्य पद्धती । कांहीं कथाव्या मजप्रती ।
तेणें सौख्य उपजेल चित्तीं । सद्‌गुरूराया समर्था ॥ ६१ ॥
सद्‌गुरू बोलती फार उत्तम । कांहीं सांगतों न्याय धर्म ।
अंतःकरण करून निर्भ्रम । नृपवर्या परिसिजे ॥ ६२ ॥
" बहुतां जन्माचा शेवट । नरदेह सांपडे अचाट ।
तेथें वर्तावें चोखट । नीती न्यायें ॥ ६३ ॥
प्रपंच करावा नेमक । पहावा परमार्थ विवेक ।
जेणें करितां उभय लोक । संतुष्ट होती ॥ ६४ ॥
राजिक दैविक उद्वेग चिंता । अन्न वस्त्र देह ममता ।
नाना प्रसंगें अवचिता । जन्म गेला ॥ ६५ ॥
लोक मरमरों जाती । वडिलें गेलीं हे प्रचीती ।
जाणत जाणत निश्चितीं । काय मानिलें ॥ ६६ ॥
पुण्यमार्ग अवघा बुडाला । पापसंग्रह उदंड झाला ।
यमयातनेचा झोला । कठिण आहे ॥ ६७ ॥
तरी आतां ऐसें न करावें । बहुत विवेकें वर्तावें ।
इहलोक परत्र साधावें । दोहींकडे ॥ ६८ ॥
आळसाचें फळ रोकडें । जांभया देऊन निद्रा पडे ।
सुख ह्मणून आवडे । आळशी लोकां ॥ ६९ ॥
साक्षेप करितां कष्टती । परंतु पुढें सुखाडती ।
खाती जेविती सुखी होती । यत्नें करूनी ॥ ७० ॥

आळस उदास नागवणा । आळस प्रयत्न बुडवणा ।
आळसें करंटपणाच्या खुणा । प्रगट होती ॥ ७१ ॥
ह्मणोन आळस नसावा । तरी पावावें वैभवा ।
अत्रीं परत्रीं जीवा । समाधान ॥ ७२ ॥
प्रयत्न करावा तो कोण । हेंचि ऐका निरूपण ।
सावध करून अंतःकरण । निमिष एक ॥ ७३ ॥
प्रातःकाळीं उठावें । कांहीं पाठांतर करावें ।
यथानुशक्ती आठवावें । सर्वोत्तमा ॥ ७४ ॥
मग दिशेकडे जावें । जें कोणासीच नव्हे ठावें ।
शौच आचमन करावें । निर्मळ जळें ॥ ७५ ॥
मुखमार्जन प्रातःस्नान । संध्यातर्पण देवतार्चन ।
पुढें वैभव देव उपासन । यथासांग ॥ ७६ ॥
कांहीं फळाहार घ्यावा । मग संसार धंदा करावा ।
सुशब्दें राजी राखावा । सकळ लोक ॥ ७७ ॥
ज्याचा जो व्यापार । तेथें असावें खबरदार ।
दुश्चितपणें तरी पोर । ओढा लावी ॥ ७८ ॥
चुके ठके विसरी सांडी । आठवण झालिया चरफडी ।
दुश्चित आळसाची रोकडी । प्रचीत पाहे ॥ ७९ ॥
याकारणें सावधान । एकाग्र असावें मन ।
तरी मग जेवितां भोजन । गोड वाटे ॥ ८० ॥
पुढें भोजन झालियावरी । कांहीं देवाची चर्चा करी ।
एकांतीं जाऊन विचारी । नानाग्रंथ ॥ ८१ ॥
तरीच प्राणी शहाणा होतो । नाहींतरी मूर्खचि राहतो ।
लोकखाती आपण पाहतो । दैन्यवाणा ॥ ८२ ॥

ऐका सदैवपणाचें लक्षण । रिकामा जाऊंनेदीं क्षण ।
प्रपंच व्यवसायाचें ज्ञान । बरेंपाहे ॥ ८३ ॥
कांहीं मेळवी मग जेवी । गुंतल्या लोकांस उगवी ।
शरीर कारणीं लावी । कांहीं तरी ॥ ८४ ॥
ऐसा जो सर्व सावध । त्यास कैंचा असेल खेद ।
विवेकें तुटला संबंध । देहबुद्धीचा ॥ ८५ ॥
आहे तितुकें देवाचें । ऐसें वर्तणें निश्चयाचें ।
मूळ तुटलें उद्वेगाचें । येणेंरीती ॥ ८६ ॥
प्रपंचीं पाहिजे सुवर्ण । परमार्थीं पंचीकरण ।
महा वाक्याचें विवरण । करितां सुटे ॥ ८७ ॥
कर्म उपासना आणि ज्ञान । येणें राहे समाधान ।
परमार्थाचें साधन । ऐकतचि जावें ॥ ८८ ॥
ऐसे कथिले सामान्य गुण । आतां सांगेन राजकारण ।
पूर्ण ठेवून अवधान । तुवां श्रवण करावें ॥ ८९ ॥
लहान थोर काम कांहीं । केल्यावीण होत नाहीं ।
यास्तव सावधताही । सदैव असावी ॥ ९० ॥
अंतरीं नाहीं सावधता । यत्न ठाकेना पुरता ।
सुखसंतोषाची वार्ता । तेथें कैंची ॥ ९१ ॥
ह्मणोन आळस मोडावा । यत्न साक्षेपें सोडावा ।
दुश्चितपणाचा मोडावा । थारा बळें ॥ ९२ ॥
सावधानता असावी । नीतिमर्यादा राखावी ।
जनांस मानें ऐशी करावी । क्रियाशुद्ध ॥ ९३ ॥
बहुतांचें समाधान राखावें । बहुतांस मानेल तें करावें ।
विलग पडोंचि न द्यावें । कार्यामध्यें ॥ ९४ ॥

जैसें बोलणें बोलावें । तैसेंचि चालणें चालावें ।
मग महत्व लीला स्वभावें । अंगीं बाणे ॥ ९५ ॥
युक्तीवीण साजिरा योग । तो दुराशेचा रोग ।
संगतीच्या लोकांचा भोग । उभा ठेला ॥ ९६ ॥
ऐसें न करावें सर्वथा । जनांस पाववूं नये व्यथा ।
हृदयीं चिंतावें समर्था । रघुनाथजीसी ॥ ९७ ॥
अक्कलबंद नाहीं जेथें । अवघेंचि विस्कळित तेथें ।
एके आकलेवीण तें । काय आहे ॥ ९८ ॥
एक हरिकथा निरूपण । दुसरें तें राजकारण ।
तिसरें तें सावधपण । सावधविषयीं ॥ ९९ ॥
चौथा अत्यंत साक्षेप । फेडावे नाना आक्षेप ।
अन्याय थोर अथवा अल्प । क्षमा करीत जावे ॥ १०० ॥
जाणावें पराचें अंतर । उदासीनता निरंतर ।
नीति न्यायास अंतर । पडोंच न द्यावें ॥ १०१ ॥
संकेतें लोक वेधावा । एकें अनेक बोधावा ।
प्रपंचही सांवरावा । यथानुशक्त्या ॥ १०२ ॥
समय प्रसंग ओळखावा । धीर बहुत असावा ।
संबंध पडों न द्यावा । अति परिचयाचा ॥ १०३ ॥
दोष देखून झांकावे । अवगुण अखंड न बोलावे ।
दुर्जन सांपडोन सोडावे । परोपकार करूनी ॥ १०४ ॥
तऱ्हें भरोंच नये । सुचावे नाना उपाय ।
नव्हे तोंचि करावें कार्य । दीर्घ प्रयत्नें ॥ १०५ ॥
फड नासोंच न द्यावा । पडिला प्रसंग सांवरावा ।
अति वाद न करावा । कोणि एकाशीं ॥ १०६ ॥

दुसऱ्याचें आभीष्ठ जाणावें । बहुतांचें बहुत सोसावें ।
न सोसे तरी जावें । दीगंतरासी ॥ १०७ ॥
दुःख दुसऱ्याचें जाणावें । ऐकून तरी वांटोन घ्यावें ।
बरें वाईट सोसावें । समुदायाचें ॥ १०८ ॥
अपार असावें पाठांतर । संनिध असावा विचार ।
सदा सर्वदा तत्पर । परोपकारासी ॥ १०९ ॥
शांती करून करवावी । तऱ्हे सांडून सांडवावी ।
क्रिया करून करवावी । बहुतां करवीं ॥ ११० ॥
करणें असला अपाय । तरी बोलोन दाखवूं नय ।
परस्परेंचि प्रत्यय । प्रचीतीस आणावा ॥ १११ ॥
जो बहुतांचें सोशीना । त्यास बहुत लोक मिळेना ।
बहुत सोसितां उरेना । महत्व आपुलें ॥ ११२ ॥
राजकारण बहुत करावें । परंतु कळोंच न द्यावें ।
परपीडेवरी नसावें । अंतःकरण ॥ ११३ ॥
लोक पारखून सोडावे । राज्यकारणें अभिमान झाडावे ।
पुनः मेळवून घ्यावे । दुरिल्या दोरें ॥ ११४ ॥
हिरवटासि दूरी धरावें । कचरटासि न बोलावें ।
संबंध पडतां सांडून जावें । एकीकडे ॥ ११५ ॥
ऐसें असे राजकारण । सांगतां तें असाधारण ।
सुचित असतां अंतःकरण । राजकारण जाणिजे ॥ ११६ ॥
वृक्षारूढास उचलावें । युद्ध करत्यास ढकलून द्यावें ।
कारभाराचें सांगावें । अंग कैसें ह्मणोनी ॥ ११७ ॥
एकाची पाठी राखणें । एकास देखों न शकणें ।
ऐशीं नव्हेत कीं लक्षणें । चातुर्याचीं ॥ ११८ ॥

न्यायें बोलतांचि मानेना । हित तेंचि न ये मना ।
येथें कांहींच चालेना । त्यागाविण ॥ ११९ ॥
जेणें जें जें मनीं धरिलें । तें तें आधींच समजलें ।
कृत्रिम अवघेंचि खुंटलें । सहजची येणें. ॥ १२० ॥
अखंड राहतां सलगी होते । अति परिचयें अवज्ञा घडते ।
या कारणें विश्रांतीतें । घेतां नये. ॥ १२१ ॥
आळसें आळस केला । तरी मग कार्यभागचि बुडाला ।
अंतर हेत चुकत गेला । समुदायाचा ॥ १२२ ॥
उदंड उपासनेचीं कामें । लावीत जावीं नित्यनेमें ।
अवकाश कैंचा कृत्रिमें । करावयासी ॥ १२३ ॥
चोर भांडारी करावा । घसरतांच सांभाळावा ।
गोवा मूर्खपणाचा काढावा । हळुहळू ॥ १२४ ॥
ह्या अवघ्या पाहिल्याच गोष्टी । प्राणी कोणी नव्हता कष्टी ।
राजकारणें मंगल वेष्टी । चहूंकडे ॥ १२५ ॥
नष्टासि नष्ट योजावे । वाचाळासि वाचाळ आणावे ।
आपणांवरी विकल्पाचें गोवें । पडोंचि नेदी ॥ १२६ ॥
कांटीनें कांटी झाडावी । झाडावी परी ते कळों न द्यावी ।
कळकटपणाची पदवी । असों न द्यावी ॥ १२७ ॥
न कळतां करीं कार्य जें तें । तें काम तात्काळचि होतें ।
गिचड्यांत पडतां तें । चमत्कार नव्हे ॥ १२८ ॥
ऐकोन आवडी लागावी । देखोन बळकटचि व्हावी ।
सलगीनें आपली पदवी । सेवकामध्यें ॥ १२९ ॥
कोणी एककाम करितां होतें । न करितां मागें पडतें ।
या कारणें ढिलेपणतें । असोंचि नये ॥ १३० ॥

जो दुसऱ्यावरी विश्वासिला । त्याचा कार्यभाग बुडाला ।
जो आपणचि कष्टत गेला । तोचि भला ॥ १३१ ॥
अवध्यांस अवघेंच कळलें । तेव्हां तें रितें पडलें ।
याकारणें ऐसें घडलें । न पाहिजे कीं ॥ १३२ ॥
मुख्य सूत्र हातीं घ्यावें । करणें तें लोकांकरवीं करवावें ।
कित्येक खल्लक उगवावे । राजकारणामध्यें ॥ १३३ ॥
बोलके पहिलवान कळकटे । तयांसीच घ्यावें झटे ।
दुर्जन राजकारणें दाट । ऐसें न करावें ॥ १३४ ॥
ग्रामण्यवर्मीं सांपडावें । रगडून पीठचि करावें ।
करून मागुती सांवरावें । बुडवूं नये ॥ १३५ ॥
खळ दुर्जनासि भ्याले । राजकारण नाहीं राखिलें ।
तेणें अवघें प्रगट झालें । बरेंवाईट ॥ १३६ ॥
समुदाय पाहिजे मोठा । तरी तणावा असावा बळकटा ।
मठ करून ताठा । धरूं नये ॥ १३७ ॥
दुर्जनप्राणी समजवावे । परी ते प्रगट न करावे ।
सज्जनापरी आळवावे । महत्व देउनी ॥ १३८ ॥
जनामध्यें दुर्जन प्रगट । तरी मग अखंड खटखट ।
याकारणें ते वाट । बुझूनि टाकावी ॥ १३९ ॥
गलिमांच्या देखतां फौजा । रणशूरांच्या फुर्फुरती भुजा ।
ऐसा पाहिजे कीं राजा । कैंपक्षी परमार्थी ॥ १४० ॥
तयांस देखतां दुर्जन धाके । बैसावे प्रचीतीचे तडाखे ।
बंड पाषांडाचे वाखे । सहजचि होती ॥ १४१ ॥
हीं धूर्तपणाचीं कामें । राजकारण करावें नेमें ।
ढिलेपणाच्या संभ्रमें । जाऊं नये ॥ १४२ ॥

कोठेंच पडेना दृष्टी । ठायीं ठायीं त्याच्या गोष्टी ।
वाग्विलासें सकल सृष्टी । वेधिली तेणें ॥ १४३ ॥
हुंब्यासि हुंबा लाऊन द्यावा । टोणप्यास टोणपा आणावा ।
लौंदा पुढें करावा । दुसरा लौंद ॥ १४४ ॥
घट्टास आणवा घट्ट । उद्धटास पाहिजे उद्धट ।
खटनटास खटनट । अगत्य करी ॥ १४५ ॥
जैसा तैसा जेव्हां भेटे । तेव्हां मजालसी थाटे ।
इतुकें होतें परी धनी खोटे । दृष्टीस न पडे ॥ १४६ ॥
मुख्य असावा विवेक । तोच इहपरत्रीं तारक ।
विवेकावीण कांहींएक । करूंचि नये ॥ १४७ ॥
यापरी उपदेशामृत प्राशून । राव झाला संतुष्ट मन ।
सप्रेम गुरूस करूनि नमन । जाता झाला स्वस्थानीं ॥१४८॥
भगवद्गीतेच्या परिश्रवणें । अज्ञानत्व टाकिलें अर्जुनें ।
तेवीं सद्गुरूच्या मधुरभाषणें । राव निर्मोह जाहला ॥१४९॥
श्रीशिवविजयग्रंथ । शिवावतार चारित्र अद्भुत ।
वर्णन करी भावें अनंत । त्रयोविंशतितमोध्याय गोड हा ॥१५०॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

# अध्याय २४ वा.

॥ श्रीगणेशायनमः ॥

दिल्लीहून देशीं येऊन । रायें पराभविले अरिगण ।
केलें गुरूस राज्यार्पण । झालें वर्णन तयाचें ॥ १ ॥
आतां दिल्लीपुरीं जाऊन । पाहूं तिकडील वर्तमान ।
काय करीत आहे यवन । शोध काढूं तयाचा ॥ २ ॥
ससुत नृपाळ देशीं पावला । प्रांत मुलुख पुन्हा साधिला ।
हें वृत्त बादशहाला । दिल्लीमाजीं समजलें ॥ ३ ॥
शहा अत्यंत दुःख करी । ह्मणे गेला हातींचा वैरी ।
आतां सूड घेईल परोपरी । दुखविल्या सर्पासारिखा ॥ ४ ॥
शहाआलम वडील सुत । तयाप्रती शहा बोलत ।
तुह्मी जावें दक्षिणेंत । राज्य रक्षणाकारणें ॥ ५ ॥
शिवाजी आहे शूर चतुर । त्याशीं न दावावें उघड वैर ।
युक्तीनें योजून साम प्रकार । वश त्यातें करावें ॥ ६ ॥
राज्य प्रांताचा लोभ दाऊन । अनुकूल करावा शहाजीनंदन ।
आपुला ताबेदार होऊन । राहील ऐसें करावें ॥ ७ ॥
शिवाजी होईल आपुला दास । तरी लाधेल महद्यश ।
तुह्मी करून बहु आयास । एवढें कार्य करावें ॥ ८ ॥
बुद्धिवाद सांगून यापरी । अपार सेना देऊन बरोबरी ।
बादशहा शीघ्र रवाना करी । दक्षिणेंत निज सुता ॥ ९ ॥
अवरंगाबादेस येऊन । तेथें राहिला ससैन्य यवन ।
रायाकडे दूत धाडून । निज मित्रत्व कळविलें ॥ १० ॥

वैरभाव अवघा टाकून । आपण राहूं स्नेहें करून ।
करूं देश संरक्षण । तुह्मी आह्मी उभयतां ॥ ११ ॥
यापरी तयाचा संदेश । दूत कळविती शिवनृपास ।
रायास वाटला परम हर्ष । ह्मणे बरें जाहलें ॥ १२ ॥
पराक्रमें धाक पडला । यंवनीं वैरभाव सोडिला ।
आतां सामोपाय योजिला । मित्रत्व करिती आह्मांशीं ॥१३॥
मग बोधून रघुनाथपंत । तयाकडे प्रेषी शंहाजीसुत ।
येरू अवरंगाबादेस जाऊन त्वरित । तयालागीं भेटला ॥१४॥
तेणें अत्यंत सत्कारिला । मधुर बोलून गौरविला ।
परस्परांस हर्ष जाहला । मधुर वाक्यें दोघांच्या ॥ १५ ॥
रघुनाथपंत सनम्र बोले । रायें तुह्मांस बहु विनविलें ।
मित्रत्व पाहिजें संरक्षिलें । कृपा करून आह्मावरी ॥ १६ ॥
दीनावरी दया करावी । आह्मांपासून सेवा घ्यावी ।
राज्यवृद्धी बहु करावी । साह्य आमुचें घेउनी ॥ १७ ॥
ऐकून नृपतीचा संदेश । यवन पावला बहु हर्ष ।
ह्मणे कळवा शिवाजीस । आह्मी मित्र तूमचे ॥ १८ ॥
तुह्मी आह्मी एकविचारें । करूं आतां कार्य सारें ।
आह्मांपासून कार्यप्रकारें । भय किमपी न माना ॥ १९ ॥
सहस्रएक सेना निवडून । त्यावरी योजा मुख्य ब्राह्मण ।
तें सैन्य आह्मांकडे धाडून । आमुचे सेवेस ठेविजे ॥ २० ॥
सेनेपासून घेऊं चाकरी । तुह्मांकडे चालवूं जाहगीरी ।
शंका न धरावी अंतरीं । आह्मांविषयीं कधींही ॥ २१ ॥
जो जो प्रांत तुह्मीं घेतला । तो तो बक्षीस तुह्मां दिधला ।
मित्रभाव पाहिजे राखिला । तुह्मी आतां निश्चयें ॥ २२ ॥

संभाजीराव त्वदीय कुमर । त्यास करूं आह्मी सरदार ।
त्याचे नांवें ही जहागीर । करून सदैव चालवूं ॥ २३ ॥
यापरी संदेश परिसून । रघुनाथपंत निघाला तेथून ।
नृपासन्निध शीघ्र येऊन । वृत्त समस्त कळविलें ॥ २४ ॥
मग रायें केला विचार । आपणांस शत्रू असती फार ।
बहुतांशीं चालवितां वैर । कष्ट पडती अत्यंत ॥ २५ ॥
हें स्वराज्य आहे नूतन । झालें पाहिजे संरक्षण ।
यास्तव ही संधी साधून । साम बरा करावा ॥ २६ ॥
मग सैन्य सज्ज केलें । त्यावरी निराजीस नेमिलें ।
प्रतापरावासही योजिलें । सैन्यासवें जावया ॥ २७ ॥
निराजी आणि प्रतापशूर । सेना घेऊन बरोबर ।
अवरंगाबादेस सत्वर । यवनाजवळी पातले ॥ २८ ॥
तेणें अत्यंत सन्मानिलें । मित्रभावें निकट ठेविलें ।
उभयपक्षीं सख्य जडलें । ऐशापरी तेधवां ॥ २९ ॥
यवनें दिल्लीपतीस लिहिलें । शिवाजीतें अनुकूल केलें ।
त्याचें सैन्य असे घेतलें । सेवा आपुली करावया ॥ ३० ॥
अवरंगजेब आनंदला । ह्मणे बरा साम झाला ।
शिवाजीचा वेध सुटला । आतां स्वस्थता राहील ॥ ३१ ॥
शहालम आणि शिवनृपती । एक विचारें दोघे वर्तती ।
प्रांतांत स्वस्थता संप्रती । झाली होती सहजची ॥ ३२ ॥
उभयतांची मैत्री चालली । यापरी दोन वर्षें लोटलीं ।
मग दिल्लीपतीस शंका आली । कपटबुद्धीनें तेधवां ॥ ३३ ॥
शिवाजीसी सख्य जडलें । तेणें सुताचें बळ वाढलें ।
काय प्रसंग येईल न कळे । उभयतांच्या मित्रत्वें ॥ ३४ ॥

राज्यलोभ मनीं धरून । अवरंगजेबें कृत्रिम करून ।
आपुला पिता शहाजहान । होता कैद करविला ॥ ३५ ॥
तैसेंच करील माझा सुत । ऐसें आलें तन्मनांत ।
आपुल्यासारिखेंच जनसमस्त । ऐसें सर्वा वाटतें ॥ ३६ ॥
वारंवार विचार करून । स्वसुतास लिही लेखन ।
कपटी असती महाराष्ट्रजन । विश्वास त्यांचा न धरावा ॥३७॥
नम्रता मैत्री दावून बहुत । ते केव्हांच करितील घात ।
यास्तव तयांचा निःपात । केला पाहिजे आपण ॥ ३८ ॥
निराजी आणि प्रतापराव । तैसेंच महाराष्ट्र सैन्य सर्व ।
पूर्वीं न दावून वैरभाव । एकदांच कैद करावें ॥ ३९ ॥
आमुची आज्ञा प्रमाण मानुनी । कार्य करावें पत्रदर्शनीं ।
शिवाजीतें पराभवुनी । अपार यश मिळवावें ॥ ४० ॥
शहालमाचे प्रीतिपात्र । दिल्लीपुरीं होते मित्र ।
त्यांस कळलें आज्ञापत्र । दक्षिणेंत जातसे ॥ ४१ ॥
त्यांनीं त्वरा करून बहुत । शहालमातें कळविली मात ।
येरू चित्तीं झाला विस्मित । पितृसंशय परिसुनी ॥ ४२ ॥
निराजीस पाचारून । यवन एकांतीं करी भाषण ।
आज्ञा येणार दिल्लीहून । तुह्मांस कैद करावया ॥ ४३ ॥
आज्ञापत्र हातीं येतां । आह्मां मानणें पडेल तत्वतां ।
यास्तव तुह्मी सर्व आतां । शीघ्र जावें येथुनी ॥ ४४ ॥
निष्कपट यवनाचें अंतर । निराजी ह्मणे योग्य फार ।
मग सेनेसहित सत्वर । सरदार गेले तेथुनी ॥ ४५ ॥
महाराष्ट्रसैन्य निघून गेलें । मग शहाचें पत्र आलें ।
उघडपणें यवन बोले । काय आतां करावें ॥ ४६ ॥

सैन्य गेलें येथून निघून । आज्ञापत्र आलें मागून ।
पूर्वीं येतें तरी आपण । कैद करितों समस्तां ॥ ४७ ॥
बादशहास कळवी सत्वर । मराठे गेले अगोदर ।
मग हे तुमचे किंकर । पत्र घेऊन पातले ॥ ४८ ॥
आज्ञापत्र पूर्वींच येतें । तरी मराठे सर्व मिळते ।
त्यांस कैद केलें असतें । आज्ञेनुरूप तूमच्या ॥ ४९ ॥
स्वसुतांचें पत्र पाहून । बादशहा जहाला अत्यंत खिन्न ।
ह्मणे लबाड महाराष्ट्रजन । गेले ठकवून ममसुता ॥ ५० ॥
निराजीपंत सैन्यासहित । पातला रायाजवळी त्वरित ।
विनयें कळवी सर्व वृत्त । शिवरायातें तेधवां ॥ ५१ ॥
रायें सैन्य सिद्ध करून । मोंगलावरी गेला चालून ।
प्रतापें शत्रू पराभवून । महद्यश साधिलें ॥ ५२ ॥
यवन होऊन पराभूत । मग निघाला सैन्यासहित ।
दिल्लीपुराचा धरून पंथ । आल्यामार्गें परतला ॥ ५३ ॥
उत्तम संधी रायें साधिली । राज्यवृद्धी बहुत केली ।
प्रजा संतुष्ट राखिली । यथाशास्त्र पाळुनी ॥ ५४ ॥
मग शिवराय विचार करी । पराभविले बहुत अरी ।
परी आपुला एक वैरी । राहिलासे निकटची ॥ ५५ ॥
राजपुरींचा सिद्धीनामक । आहे यवन त्रासदायक ।
जैसा गृहीं शिरतो मूषक । उपद्रविक त्यापरी ॥ ५६ ॥
जलदुर्गीं निर्धास्त राहून । आमुचे पीडितो प्रजाजन ।
तरी तया शिक्षा लावून । प्रजारक्षण करावें ॥ ५७ ॥
स्वयें जावें सैन्यासहित । ऐसा राव करी बेत ।
तयासमयीं रघुनाथपंत । काय बोलता ज़ाहला ॥ ५८ ॥

सिद्धी काय दुर्बल यवन । मी तयास पराभवीन ।
मज पाठवा आज्ञा देऊन । जिंकीन शत्रू निजबळें ॥ ५९ ॥
तुमचा प्रतापमहिमा आगळा । शत्रू जाईल त्वरें लयाला ।
राया आज्ञा द्यावी मजला । कृपा करून येसमयीं ॥ ६० ॥
पंतवचनें राव तोषला । 'बहुतबरें' ऐसें बोलिला ।
मग रघुनाथपंत निघाला । सैन्य अपार घेउनी ॥ ६१ ॥
तवकें जाऊन शत्रूवरी । अरीबळ पराभूत करी ।
बळें वेढिली राजपुरी । सिद्धी कोंडिला तेधवां ॥ ६२ ॥
पंतें केला अतिनिकर । चालविलें घोरसंगर ।
सिद्धीस तदा न पुरे धीर । सैन्यभंग पावलें ॥ ६३ ॥
मग अत्यंत नम्रपणें । सिद्धी तहाचें करी बोलणें ।
रघुनाथपंतें शहाणपणें । मान्य केलें तेधवां ॥ ६४ ॥
न देईन देशास उपद्रव । नित्य राखीन स्नेहभाव ।
ऐशापरी तो गतगर्व । सिद्धी देई लिहून ॥ ६५ ॥
उभयतांचें सख्य जाहलें । मग पंतास यवनें सत्कारिलें ।
सन्मानें स्वगृहीं नेलें । गौरव केला तयाचा ॥ ६६ ॥
मधुर बोलून गोडी केली । वस्त्राभरणें समर्पिलीं ।
मग पंतांची स्वारी परतली । ऐसा विजय मिळवुनी ॥६७॥
शिवनृपाचें घेऊन दर्शन । पंतें कथिलें वर्तमान ।
रायें बहुत संतोषून । गौरव केला तयाचा ॥ ६८ ॥
रघुनाथपंतें विक्रम दाविला । सिद्धीस त्याचा धाक राहिला ।
उपद्रव न देई देशाला । पूर्वीप्रमाणें यवन तो ॥ ६९ ॥
ऐसा लोटतां कांहीं काळ । मागुती सिद्धी करी उचल ।
सज्ज करून आपुलें बळ । करी उपद्रव पुनरपी ॥ ७० ॥

नृपवर्यास कळली मात । सिद्धी उपद्रव करितो बहुत ।
मग व्यंकाजीदत्तोस सेनेसहित । राव प्रेषी तयावरी ॥७१॥
तेणें अत्यंत निकर केला । विक्रमें शत्रू पराभविला ।
मग नम्रत्वें शरण आला । गर्व अवघा टाकुनी ॥ ७२ ॥
शूर व्यंकाजी परत आला । शिवरायाप्रती भेटला ।
नृपें अत्यंत गौरविला । नांवाजिला परोपरी ॥ ७३ ॥
मग नृपाळ करी विचार । सागरांत असती रिपू फार ।
आमुचें सैन्य करितें समर । भूमीवरी सर्वदा ॥ ७४ ॥
हपशी, चांचे इत्यादिक । समुद्रांत असती अनेक ।
त्यांस लावावया धाक । आरमार आपुलें असावें ॥ ७५ ॥
मग तो सभाग्य नृपवर । जमवी उत्तम शिल्पकार ।
मोठें बलिष्ठ आरमार । सज्ज करी झडकरी ॥ ७६ ॥
जाहजें, गलबतें, पगार । गुराबा, तिर्कटें, नौका, सुंदर ।
शिबडें, तरांडीं नानाप्रकार । सिद्ध करी भूपती ॥ ७७ ॥
दर्यासागरनामें यवन । होता दर्यावर्दी निपुण ।
रायें तयास सन्मानून । नौकाधीश नेमिलें ॥ ७८ ॥
सेना ठेवून जहाजावरी । जहाजें ठेविलीं बंदरोबंदरीं ।
दक्षतेनें फिरती सागरीं । पराभविती शत्रूतें ॥ ७९ ॥
हपशी चांचे वलंदेज । मोंगल तुर्की फिरंगी इंग्रज ।
यांचे जहाजांस धाक सहज । नृपवर्याचा लागला ॥ ८० ॥
शिवनृपाळ पुण्यवंत । ईशकृपेनें सत्ता वाढत ।
सागरींही अव्याहत । चालू झाली यापरी ॥ ८१ ॥
आतां पुढतीं काय वर्तलें । तें श्रोतीं पाहिजे परिसिलें ।
प्रपंच दुःख पाहिजे भोगिलें । सर्वांसही या लोकीं ॥ ८२ ॥

सईबाई नृपाळकामिनी । शरीररोगें कष्ट पावुनी ।
गेली हा मर्त्यलोक सोडुनी । अक्षय लोक साधावया ॥८३॥
प्रियभार्येचा होतां अंत । शिवराय झाला अति दुःखित ।
जिजाईसह जन समस्त । दुःखार्णवीं पडियेले ॥ ८४ ॥
होणार तें होऊन गेलें । आप्त सुहृदीं सांत्वन केलें ।
अंत्य संस्कार नृपें करविले । यथाशास्त्र तेधवां ॥ ८५ ॥
पतिव्रता चतुर शहाणी । ऐशी पत्नी गेली टाकुनी ।
राव विवेकी परी मनीं । होता विव्हल अतिशयें ॥ ८६ ॥
ऐसा कांहीं काळ लोटला । सहज दुःखाचा विसर पडला ।
राजकार्यें करूं लागला । पूर्ववत नृपाळ ॥ ८७ ॥
हा चमत्कारिक मृत्युलोक । सुखामागें येई दुःख ।
दुःखामागें येतें सुख । हाच निश्चय या लोकीं ॥ ८८ ॥
सोयराबाई नृपकामिनी । यथाकाळीं होती गर्भिणी ।
तिचे नवमास पूर्ण भरूनी । आसन्न प्रसवा जाहली ॥८९॥
तेज धारणें कांति वाढली । गर्भभारें काया कष्टली ।
प्रसन्नता मुखास आली । राजपत्नीच्या तेधवां ॥ ९० ॥
थोडेच घाली अलंकार । परिधान करी साधें अंबर ।
मूर्ती दिसे सुमनोहर । गर्भधारणें तियेची ॥ ९१ ॥
वसंत ऋतु चैत्र मास । रामनवमी शुभ तिथीस ।
राजभार्या सुपुत्रास । उत्तम समयीं प्रसवली ॥ ९२ ॥
बालक उपडें उपजलें । सर्व जनांस नवल वाटलें ।
शिवरायास वृत्त कळलें । पुत्रजन्मानंदाचें ॥ ९३ ॥
सुखसमुद्रा भरतें आलें । रायें जातकर्म संपादिलें ।
याचकजन तुष्ट केले । अपार द्रव्य देउनि ॥ ९४ ॥

पत्नीप्रेम, उदारता । पुत्रलाभ लक्ष्मीची विपुलता ।
यांस अनुरूप ऐसा तत्वतां । उत्साह करी भूपती ॥ ९५ ॥
राम नवमीस बाल जन्मलें । यास्तव राजाराम नाम ठेविलें ।
उपाध्यायें कथन केलें । नव बालाचें जातक ॥ ९६ ॥
ह्मणे हा शूर निपजेल । रणांगणीं ख्याती करील ।
राज्ययश आपुलें राखील । स्वपराक्रमें करूनी ॥ ९७ ॥
उपडें जन्मलें असे बाळ । पातशाही उपडी घालील ।
शत्रुवर्ग पराभवील । अपार शौर्य दावुनी ॥ ९८ ॥
उत्तम सैनिक सवें घेऊन । शत्रूसवें करील रणकंदन ।
पराभवील दुष्ट यवन । होईल यशस्वी अपार ॥ ९९ ॥
ऐसें जातकर्म परिसिलें । समाधान रायास वाटलें ।
यापरी सत्पुत्ररत्न लाधलें । पुण्यप्रतापी नृपातें ॥ १०० ॥
प्रियपत्नीचा झाला वियोग । पुढें आला पुत्रलाभयोग ।
पुन्हां कांहीं दुःखप्रसंग । घडणार आतां नृपातें ॥ १०१ ॥
नृशरीर जरी धरिलें । सुखदुःख पाहिजे भोगिलें ।
प्रसंग पाहिजेत साहिले । यथाकाळीं यालोकीं ॥ १०२ ॥
श्रीशिवविजयग्रंथ । शिवावतार चरित्र अद्भुत ।
वर्णन करी भावें अनंत । चतुर्विंशतितमोध्याय गोड हा ॥ १०३ ॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

# अध्याय २५ वा.

॥ श्रीगणेशायनमः ॥

मृत्युलोक हा क्षणभंगुर । येथील सुख सर्व असार ।
धन धान्य आप्त परिवार । अशाश्वत सर्वही ॥ १ ॥
स्फुरण होतें विद्युल्लतेस । तैसा येथें सुखाभास ।
सुखामागें दुःखप्रवेश । होत असे या लोकीं ॥ २ ॥
पहा महात्मा शिवनृपती । भूमंडळीं ज्याची ख्याती ।
तयास महद्दुःख संप्रती । भेटणार आतां निश्चयें ॥ ३ ।
प्रतापगडीं नृपवर । एकदां असतां सपरिवार ।
तेथें कांहीं दुश्चिन्ह प्रकार । जाणवूं लागले तयातें ॥ ४ ॥
सौधावरी उलूक ओरडे । द्वारीं येऊन श्वान रडे ।
रायालागीं स्वप्न पडे । बहु अनर्थ सूचक ॥ ५ ॥
मातेलाही स्वप्न पडलें । मंगलसूत्र कोणी तोडिलें ।
तिचें काळीज तदा चरकलें । ऐशा अशुभदर्शनें ॥ ६ ॥
मग जिजाऊ साश्रु होऊन । रायाप्रती सांगे स्वप्न ।
दुःस्वप्नश्रवणें अंतःकरण । तयाचेंही दचकलें ॥ ७ ॥
नृपालचित्त खिन्न जाहलें । जग उदास दिसों लागलें ।
नेत्रीं सहज अश्रू आले । नृपवर्याच्या तेधवां ॥ ८ ॥
विशेष नसतां भयकारण । कासया भीती पावतें मन ।
हें नुमजे रायाकारण । त्याचें त्यास तेधवां ॥ ९ ॥
नित्य कृत्य रायें सारिलें । उदास चित्तें भोजन केलें ।
मग विवंचना करीत बैसले । शिवराय सभेंत ॥ १० ॥

नाना विकल्प येती मनांत । त्यांचा विचार राव करीत ।
तों एक मनुष्य अकस्मात । तयास्थानीं पातला ॥ ११ ॥
तो हिरोजीनामें अनुचर । होता नृपपित्याबरोबर ।
दृष्टि टाकितां तयावर । रायें तत्काळ ओळखिला ॥ १२ ॥
मग तो सेवक म्लानवदन । शिवरायापुढें येऊन ।
नृपालाचे धरून चरण । रुदन करूं लागला ॥ १३ ॥
दचकलें तदा नृपालमन । ह्मणे कां रे करिशी रुदन ।
माझा तात तुझा यजमान । बरा कुशल असे कीं ॥ १४ ॥
हिरोजी वदे रडत रडत । आतां कोठचा तुमचा तात ।
आह्मी परम अभागी समस्त । मुकलों तुमच्या पित्यातें ॥ १५ ॥
घाबरून बोले नृपाळ । अरे काय हे वदसी बोल ।
काय असेल तें सकल । शीघ्र आह्मां सांगिजे ॥ १६ ॥
नेत्र पुसून हिरू बोले । माझ्या कपाळीं सांगणें आलें ।
तुह्मी पाहिजे परिसिलें । घट्ट मन करूनी ॥ १७ ॥
धनी होते बेंगरूळ नगरीं । तेथून जावया विजापुरीं ।
निघाले बैसून अश्वावरी । मीही होतों संगती ॥ १८ ॥
आह्मी मार्ग आक्रमित । सुखरूप आलों चित्रदुर्गांत ।
तेथें बागेदरीनामें प्रख्यात । गांव आहे नृपाला ॥ १९ ॥
त्या गांवांतून असतां चालत । ओढवला महा अनर्थ ।
तव पित्याचा अश्व अकस्मात । ठेंचाळला नृपवर्या ॥ २० ॥
माझे धनी पतन पावले । शीर फत्तरावरी आपटलें ।
ऋणानुबंध सरला ते वेळे । गेले स्वर्गीं क्षणांत ॥ २१ ॥
यापरी हिरोजी बोलिला । हाहाकाराचा ध्वनी उठला ।
शिवराय आक्रंदूं लागला । ताता ताता ह्मणोनी ॥ २२ ॥

अंतःपुरीं कळली मात । जिजाऊमाता आली धांवत ।
शोकभरें मूर्छागत । जिजाबाई पडियेली ॥ २३ ॥
तदा नृपप्रासादांत । वर्तला एकच आकांत ।
ढळढळां रडती समस्त । दुःख कोणां नावरे ॥ २४ ॥
मोरोपंतादि मंत्रीजन । वृत्त कळतां आले धांवून ।
दुःखाश्रूनीं भरले नयन । न बोलवे कोणातें ॥ २५ ॥
रायाचा दुःखाग्नी भडकला । शोकरूपें बाहेर पडला ।
तेणें आकांत बहु मांडिला । धीर अवघा टाकुनी ॥ २६ ॥
मोरोपंत रघुनाथपंडित । रायाजवळी गेले धांवत ।
परोपरी करिती समजुत । नृपवर्याची तेधवां ॥ २७ ॥
रायां तुह्मी विचारवंत । काय करितां ऐसा आकांत ।
होणारा पुढें नाहीं चालत । कांहीं उपाय कवणाचा ॥२८॥
धडधडीत हा मृत्युलोक । तुह्मी केला पाहिजे विवेक ।
व्यर्थ काय करून शोक । पिता नये माघारा ॥ २९ ॥
नृप बोले काय बोलतां । गेला माझा वत्सल पिता ।
कोण करील कौतुक आतां । माझ्या पराक्रमाचें ॥ ३० ॥
मी अफ्जुलखान मारिला । षास्तेखान पराभविला ।
बादशहा ठकविला । दिल्लीपुरीं जाउनी ॥ ३१ ॥
जेव्हां ऐशीं कृत्यें घडलीं । तेव्हां पित्यास श्रुत केलीं ।
मत्पित्याची मूर्ती हर्षली । माझा विक्रम ऐकुनी ॥ ३२ ॥
पुत्रवत्सल माझा जनक । करी माझें फार कौतुक ।
आतां तयाची मूर्ति सुरेख । कोठें पाहूं मंत्रीहो ॥ ३३ ॥
शिरावरचें छत्र गेलें । तातें मजला अनाथ केलें ।
काय हें संकट उदेलें । माझ्यावरी प्रस्तुत ॥ ३४ ॥

हा ताता गुणनिधाना । हा ताता पुण्यपावना ।
हा ताता संतापशमना । कोठें पाहूं तुज आतां ॥ ३५ ॥
मी परम अभागी पामर । ह्मणूनियां राहिलों दूर ।
मत्पित्याचें कलेवर । परदेशीं पडियेलें ॥ ३६ ॥
कांहो मजवरी तात रुसलां । मज टाकून कैसे गेलां ।
अंतकाळीं नाहीं दिधला । दर्शनलाभ मजप्रती ॥ ३७ ॥
मी तेथें जवळ असतों । तरी कांहीं सेवा करितों ।
अंतकाळीं शब्द परिसतों । कांहीं तुमच्या मुखींचे ॥ ३८ ॥
गहिंवरला तो शिवनृपवर । विलापाला आला भर ।
मग मोरोपंत मंत्री चतुर । नम्रपणें बोलत ॥ ३९ ॥
राया विवेकें आवरीं मन । काय शोक हा स्त्रियांसमान ।
तूं विचारी धैर्यवान । पुरे करीं शोक हा ॥ ४० ॥
पहा ही तुझी माउली । शोकभरें मूर्च्छित पडली ।
ती पाहिजे तुवां सांत्विली । सुविचार सांगुनी ॥ ४१ ॥
नृप परिसतांच ऐसे बोल । शोक सांवरून उठला तात्काळ ।
गेला आपुल्या मातेजवळ । तिचें सांत्वन करावया ॥ ४२ ॥
जिजाऊमाता मूर्च्छागत । यथोपचारें झाली जागृत ।
मग शोकें आक्रंदत । हायहाय ह्मणूनी ॥ ४३ ॥
अहा माझ्या प्राणनाथा । कोठें तुह्मां पाहूं आतां ।
काय तुमची उदारता । काय सद्गुण तुमचे ॥ ४४ ॥
मज अबलेस अनाथ करून । कैसें तुह्मी केलेंत गमन ।
रुष्ट झालें तुमचें मन । काय कारणें मजविषयीं ॥ ४५ ॥
नृपाल वदे पुढें होऊन । माते पुरे हा शोक दारुण ।
होणार तें आलें घडून । दुर्दैवानें आपुल्या ॥ ४६ ॥

माता वदे मी पापीण । मागें राहूं काय कारण ।
अग्निप्रवेश सुखें करीन । प्राणनाथास आठवुनी ॥ ४७ ॥
झाला माझा हाच बेत । आतां सिद्धता करा त्वरित ।
तुह्मी सर्व मंत्री समस्त । माझ्या बाळा संरक्षा ॥ ४८ ॥
राव वदे मम जननी । पिता गेला मज सोडुनी ।
आतां प्रतिपाळ तुजवांचुनी । कोण मांझा करील ॥ ४९ ॥
माता वदे ममसुता । तूं पृथ्वीचा पालनकर्ता ।
तुझी रक्षणकर्त्री देवता । भवानी कुलस्वामिणी ॥ ५० ॥
नको भ्रमवूं माझें मन । मी पतीच्या निकट जाईन ।
व्यर्थ जिणें त्यांचेवीण । इहलोकीं आमुचें ॥ ५१ ॥
विलंब नको हो एक क्षण । मत्पिता अग्निनारायण ।
मज करा त्याचे स्वाधीन । पोंचवी तो मजप्रती ॥ ५२ ॥
विनयें वदे रघुनाथपंत । माते आवरी स्वीय चित्त ।
होणारापुढें नाहीं चालत । उपाय कांहीं कोणाचा ॥ ५३ ॥
विवेकाचा धरून आधार । चित्त करावें तुवां स्थीर ।
नको नको हा शोकभर । एवढी विज्ञप्ती परिसावी ॥ ५४ ॥
पुत्र स्नुषा कुटुंब किंकर । यांस आतां तुझा आधार ।
कृपा करून सर्वांवर । नको करूं दुःख हें ॥ ५५ ॥
माता वदे गहिंवरून । नकाहो नका मोहवूं मन ।
तुह्मी अवघे कृपा करून । मज शीघ्र जाऊंद्या ॥ ५६ ॥
स्वमातेचा देखून निश्चय । अतिशय दुःख पावला राय ।
ह्मणे माते मी तुझे पाय । न सोडीन सर्वथा ॥ ५७ ॥
जिजाईचा निश्चय टळेना । शिवराय पाय सोडीना ।
दुःख झालें समस्त जनां । घोर संकट पडियेलें ॥ ५८ ॥

मोरोपंतादि मंत्रीजन । हे परोपरी बोल बोलून ।
करिती दोघांचेंही सांत्वन । परी नायकती दोघेंही ॥ ५९ ॥
शोकसमुद्रा भरतें आलें । सर्व सदन नादावलें ।
दुःखार्णवीं मग्न झाले । सर्वही जन तेधवां ॥ ६० ॥
संकटीं पडले मंत्रीजन । ह्मणती ओढावलें विघ्न दारुण ।
मातापुत्रांचें समाधान । होणार कैसें कळेना ॥ ६१ ॥
यापरी कांहीं काळ लोटला । तों रघुवीर शब्द उठला ।
सद्गुरू समर्थ पातला । एकाएकीं त्या स्थळीं ॥ ६२ ॥
नृपें सद्गुरू अवलोकिला । शोकाश्रूंचा पूर लोटला ।
अंतरीं अत्यंत गहिंवर आला । नृपाळाच्या तेधवां ॥ ६३ ॥
सद्गुरूस नयनीं पाहतां । हंबरडा फोडी जिजाऊमाता ।
ह्मणे सद्गुरूराया समर्था । आज्ञा देई मजप्रती ॥ ६४ ॥
मग तो सद्गुरू कृपाघन । शोकमग्न सर्वां देखून ।
गंभीर शब्दें करी भाषण । शिवरायास संबोधूनी ॥ ६५ ॥
शिवराया तूं विचारवंत । प्रज्ञायुक्त तुझें चित्त ।
ज्ञात्यासारिखा वर्तसी नित्य । मग कां मोह पावसी ॥६६॥
भाग्यकाळीं औद्धत्य टाकिलें । आत्मज्ञान वृत्तींत दाविलें ।
योग्यासमान वर्तन ठेविलें । तुवां प्रपंचीं राहुनी ॥ ६७ ॥
प्रस्तुत घडलें शोककारण । आतांच दाविलें पाहिजे ज्ञान ।
चित्त निर्विकार ठेवून । जनां धीरता दावावी ॥ ६८ ॥
जो जो प्राणी जन्म पावला । त्याचे कपाळीं मृत्यु लागला ।
मृत्यु न सोडी कवणाला । कांहीं केल्या ॥ ६९ ॥
“ मृत्यु न ह्मणे हा क्रूर । मृत्यु न ह्मणे हा झुंजार ।
मृत्यु न ह्मणे हा संग्रामशूर । समरंगणीं ॥ ७० ॥

मृत्यु न ह्मणे कीं हा बलाढ्य । मृत्यु न ह्मणे हा धनाढ्य ।
मृत्यु न ह्मणे हा आढ्य । सर्व गुणें ॥ ७१ ॥
मृत्यु न ह्मणे हा विख्यात । मृत्यु न ह्मणे हा श्रीमंत ।
मृत्यु न ह्मणे हा अद्भुत । पराक्रमी ॥ ७२ ॥
मृत्यु न ह्मणे हा भूपती । मृत्यु न ह्मणे हा चक्रवर्ती ।
मृत्यु न ह्मणे हा करामती । कैवाड जाणे ॥ ७३ ॥
मृत्यु न ह्मणे हा हयपती । मृत्यु न ह्मणे हा गजपती ।
मृत्यु न ह्मणे हा भूपती । विख्यात राजा ॥ ७४ ॥
मृत्यु न ह्मणे हा वरिष्ठ जनीं । मृत्यु न ह्मणे हा राजकारणीं ।
मृत्यु न ह्मणे हा वेतनी । वेतनकर्ता ॥ ७५ ॥
मृत्यु न ह्मणे कार्याकारण । मृत्यु न ह्मणे वर्णावर्ण ।
मृत्यु न ह्मणे हा ब्राह्मण । कर्मनिष्ठ ॥ ७६ ॥
मृत्यु न ह्मणे हा शास्त्रज्ञ । मृत्यु न ह्मणे हा वेदज्ञ ।
मृत्यु न ह्मणे हा सर्वज्ञ । सर्वजाणे ॥ ७७ ॥
मृत्यु न ह्मणे ब्रह्महत्या । मृत्यु न ह्मणे गोहत्या ।
मृत्यु न ह्मणे नानाहत्या । स्त्रीबाळादिक ॥ ७८ ॥
मृत्यु न ह्मणे स्वाधीन । मृत्यु न ह्मणे पराधीन ।
सकळ जीवांसी प्राशन । मृत्युच करी ॥ ७९ ॥
मृत्यु न सुटे कवणास । मृत्यु शाक नव्हे ज्ञान्यास ।
मृत्यु नेतसे आत्म्यास । स्थलांतरातें ॥ ८० ॥
दृश्य जडमर्त्य शरीर । नाश पावतें तेंच मात्र ।
आत्मा अविनाशी निर्विकर । नाश नसे तयाला ॥ ८१ ॥
दुर्विधीनें प्रसंग आला । तो त्वां पाहिजे साहिला ।
सुविवेक पाहिजे केला । शिवराया सुजाणा ॥ ८२ ॥

यापरी रायास बोधून । मग जिजाईस संबोधून ।
सद्गुरू समर्थ करिती भाषण । उपदेशयुक्त तेधवां ॥८३॥
माते तुवां वडिलपणें । आतां सर्वांस सांभाळणें ।
अविवेकें साहस करणें । तुजला योग्य नव्हेची ॥ ८४ ॥
दग्ध व्हावें पतीसहित । शास्त्रीं आहे एक पंथ ।
परी ऐसें करणें उचित । सर्वांसची असेना ॥ ८५ ॥
पंडुनृपाची भार्या कुंती । पतीमागें राहिली होती ।
दशरथपत्नी कौसल्या सती । नाहीं गेली पतीसह ॥ ८६ ॥
महावीरांस जयसाधन । निजमातेचें आशिर्वचन ।
यास्तव वीरां मातृदर्शन । वेळोवेळीं पाहिजे ॥ ८७ ॥
नित्य स्वधर्म रक्षणार्थ । उद्युक्त असतो तुझा सुत ।
यास्तव संकटें येती अनंत । पुन्हा पुन्हा त्यावरी ॥ ८८ ॥
व्हावया संकट निरसन । तुझें पाहिजे आशिर्वचन ।
यास्तव सुतीं दृष्टी देऊन । तुवां रहावें या लोकीं ॥ ८९ ॥
दान धर्म पुण्यकर्मैं । माते करावीं नित्यनेमें ।
वर्ततां सदां स्वधर्मैं । उद्धार तुझा होईल ॥ ९० ॥
घडावया धर्माचरण । ज्यांप्रती नाहीं साधन ।
त्यांनींच घ्यावी काया जाळून । तुजला योग्य नव्हे हें ॥९१॥
प्रार्थिला न पाहिजे काळ । तो केव्हां तरी खचित नेईल ।
मरणावधी सत्कृत्यें घडतील । ऐसा यत्न करावा ॥ ९२ ॥
शोक आवरावा सुविचारें । दुःख गिळावें परमधीरें ।
माते बोलिलों कार्यप्रकारें । क्षमा केली पाहिजे ॥ ९३ ॥
सद्गुरूनें उपदेश केला । मातासुतांनीं भावें ऐकिला ।
दोघांच्याही अंतरीं ठसला । उपजला विवेक सहजची ॥९४॥

शोकसमुद्र आटून गेला । स्वस्थता वाटली समस्तांला ।
मग सद्गुरू स्वस्थळीं गेला । निरोप घेउनी नृपाचा ॥ ९५ ॥
पितृभक्त शिवनृपती । बोलावून उपाध्यायांप्रती ।
उत्तरकार्य यथापद्धती । निजपित्याचें संपादीं ॥ ९६ ॥
दानधर्म बहुत केला । अपार द्रव्य दिलें द्विजांला ।
याचकवर्ग तृप्त केला । नानादानें देउनी ॥ ९७ ॥
भूमी गज अश्वदान । शिबिका रौप्य ताम्र सुवर्ण ।
गोदानादि दानें देऊन । राव मुक्त जाहला ॥ ९८ ॥
सावधपणें कारभार । पुढें चालवी तो नृपवर ।
कीर्ति वाढली उत्तरोत्तर । महात्म्याची भूमंडळीं ॥ ९९ ॥
श्रीशिवविजयग्रंथ । शिवावतार चरित्र अद्भुत ।
वर्णन करी भावें अनंत । पंचविंशतितमोध्याय गोड हा ॥ १०० ॥
॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

# अध्याय २६ वा.

॥ श्रीगणेशायनमः ॥

पूर्वाध्यायीं कथन केलें । शहाजीरावं मृत्यु पावले ।
आतां पुढें कैसें वर्तलें । श्रोतीं श्रवण करावें ॥ १ ॥
दिल्लीपती विचार करी । प्रबल जाहला अत्यंत वैरी ।
तया जिंकावें कोणेपरी । कैसें राज्य रक्षावें ॥ २ ॥
ससैन्य योद्धे पाठविले । ते सर्व पराभव पावले ।
थोर अपयश आह्मां आलें । गेलें राज्य दक्षिणेचें ॥ ३ ।
स्वयें जावें दक्षिणेंत । तरी भय पावतें चित्त ।
शिवाजी करील केव्हांच घात । षास्तखानासारिखा ॥ ४ ॥
आतां योद्धे मिळवून बहुत । पाठवावे सैन्यासहित ।
प्रयत्न करून पहावा सतत । शत्रुनाश व्हावया ॥ ५ ॥
विचार करून यापरी । शहा सेनेची सिद्धता करी ।
उत्तम सैनिक पाचारी । निजमंत्र कथावया ॥ ६ ॥
मोहबतखान, इखलासखान । तैसाच रणशूर दिलेलखान ।
आणिकही योद्धे यवन । बादशहानें पाचारिले ॥ ७ ॥
समस्तांस संबोधून । शहा करी आज्ञापन ।
तुह्मी दक्षिणदेशीं जाऊन । शिवाजीस जिंकावें ॥ ८ ॥
शौर्य दावून अपार । शत्रू करावा जर्जर ।
यश मेळवून अपार । राज्य रक्षण करावें ॥ ९ ॥
बादशहाची आज्ञा मानून । ससैन्य निघाले शूर यवन ।
त्वरें दक्षिणदेशीं येऊन । स्थळीं स्थळीं राहिले ॥ १० ।
अर्ध पृतनासवें घेऊन । चाकणास गेला दिलेलखान ।
अर्ध सेनेसह मोहबतखान । सालेरीस पातला ॥ ११ ॥

शूर योद्धे सरदार बहुत । होते मोहबतखानासमवेत ।
घोर युद्धाची धरून हिंमत । सालेरीस वेढिती ॥ १२ ॥
यवन यौद्ध युद्धास आले । शिवरायातें वृत्त कळलें ।
मग तेणें आज्ञापिलें । स्वसैनिकांस तेधवां ॥ १३ ॥
प्रतापराव सरनोबत । शूर वीर मोरोपंत ।
उभयतांस सैन्यासहित । राव प्रेषी रिपूवरी ॥ १४ ॥
आनंदराव विक्रमी थोर । व्यंकाजी रुपाजी रणशूर ।
सूर्याजी शिदोजी निंबाळकर । तिघे जगताप प्रतापी ॥१५॥
इत्याद्यनेक वीरांसहित । दोघे सरदार प्रतापवंत ।
त्वरें शत्रू पराभवार्थ । वीरोत्साहें निघाले ॥ १६ ॥
घेऊन सेनेचा अर्धभाग । प्रतापराव निघे सवेग ।
मूषकांवरी धांवे उरग । तैशापरी चालिला ॥ १७ ॥
अन्य मार्गे मोरोपंत । चालिला अर्धसेनेसहित ।
यापरी उभयवीर त्वरित । सालेरीनिकट पातले ॥ १८ ॥
अपार यवन सेनेवरी । प्रतापराव निकर करी ।
युद्ध चाललें परोपरी । उभयदळांचें तेधवां ॥ १९ ॥
साल्हेरदुर्गाचा होता आश्रय । तेणें यवनवीर होते दुर्जय ।
यास्तव प्रताप योजी उपाय । चतुरपणें वेगळा ॥ २० ॥
आपण झालों पराभूत । ऐसें बाह्यतः यवनां दावित ।
मग ससैन्य मागें फिरत । प्रतापराव तेधवां ॥ २१ ॥
विजयभासें बहु हर्षले । मदें कार्याकार्य विसरले ।
यवनवीर पाठीस लागले । प्रतापाच्या अविचारें ॥ २२ ॥
सोडूनियां दुर्गस्थान । अस्ताव्यस्त धांवती यवन ।
तंव एकाएकीं उलटून । प्रतापराव धांवला ॥ २३ ॥

हरहर शब्दाचा करून गजर । म्लेंच्छांवरी करी निकर ।
चालू झालें घोर संगर । उभयदळांचें तेधवां ॥ २४ ॥
ससैन्य शूर मोरोपंत । इतुक्यामाजीं पातला तेथ ।
वीरमदें गर्जना करित । शत्रु सैन्यीं प्रवेशला ॥ २५ ॥
उद्भट योद्धे महाराष्ट्रवीर । यवनवीर बलसागर ।
अत्यावेशें करिती समर । क्रुद्ध अत्यंत होऊनी ॥ २६ ॥
गर्जना करिती उभयवीर । वीररसास आला भर ।
युद्ध चाललें भयंकर । न भूतो, न भविष्यती ॥ २७ ॥
दोन्ही दळें एकवटलीं । परस्परांशीं झगडूं लागलीं ।
रक्तनदी निर्माण झाली । युद्धस्थानीं तेधवां ॥ २८ ॥
धुळीनें व्यापिलें अंबर । धुंद झाल्या दिशा समग्र ।
शस्त्रसंघात वन्ही भयंकर । दोन्हीं दळीं धडकला ॥ २९ ॥
अग्न्यस्त्रांचे धडाड होती । विद्युल्लतेसम खड्गें चमकती ।
वीर पडती धारातीर्थीं । क्षणक्षणां तेस्थळीं ॥ ३० ॥
रुधिरमांसाचा पडला कर्दम । धैर्यें झगडती वीरोत्तम ।
परस्परांचें लक्षून वर्म । तीक्ष्णशस्त्रें मारिती ॥ ३१ ॥
सूर्यराव महाराष्ट्रवीर । पडताळून स्वीय तरवार ।
गर्जना करून भयंकर । एकाएकीं उसळला ॥ ३२ ॥
करून तीक्ष्ण शस्त्रघात । यवनवीरांचीं शिरें तोडित ।
निःशंक फिरे अरिसेनेंत । भीमसेनासारिखा ॥ ३३ ॥
भासे कृतांत खवळला । मानवरूपें प्रकट झाला ।
यवनदळीं आकांत वर्तला । कंप सुटला समस्तां ॥ ३४ ॥
गतधैर्य सेना देखून । धांवत आला मोहबतखान ।
सूर्याजीचा कंठ लक्षून । सोडि अग्न्यस्त्र त्वरेनें ॥ ३५ ॥

सूं सूं करीत गोळी चालली । कंठनाळ भेदून गेली ।
सूर्याजीची काया पडली । रणांगणीं तेधवां ॥ ३६ ॥
प्रवर्ततांच ऐशी मात । महाराष्ट्रवीर झाले कुपित ।
अत्यावेशें परदलांत । थोर अनर्थ मांडिती ॥ ३७ ॥
यवनवीर धांवून येती । त्यांचीं शिरकमळें उडविती ।
हस्तपाद बळें छेदिती । गर्जना करिती परोपरी ॥ ३८ ॥
यवनवीरांचे देहावर । होती आघात भयंकर ।
प्रहाराविण तिळभर । जागा नुरे शरीरीं ॥ ३९ ॥
अपार सैन्य पतन पावलें । बहुत वीर घायाळ झाले ।
यवन योद्धे मनीं दचकले । धीर सुटला सर्वांचा ॥ ४० ॥
बावीस सरदार शूर यवन । रणांगणीं पावले पतन ।
आकांत वर्तला दारुण । यवनदळीं तेधवां ॥ ४१ ॥
महाराष्ट्रवीरीं तयाकाळीं । मर्दुमकीची शर्थ केली ।
जयश्रीनें माळ घातली । त्यांच्या गळां प्रीतीनें ॥ ४२ ॥
यवनदळ भंग पावलें । महाराष्ट्रवीर विजयी झाले ।
अश्व गज उष्ट्र हातीं आले । मराठ्यांच्या बहुतची ॥ ४३ ॥
घायाळ झाले हस्तगत । संपदाही मिळे बहुत ।
शिवनृपाळ पुण्यवंत । अपार यश लाधलें ॥ ४४ ॥
अपयशें होऊन खिन्न । तेथून निघे मोहब्बतखान ।
औरंगाबादेचा मार्ग लक्षून । गेला पळून तेधवां ॥ ४५ ॥
जयवाद्यें वाजवीत । महाराष्ट्रवीर आले परत ।
शिवरायास भेटून त्वरित । युद्धवार्ता सांगती ॥ ४६ ॥
परिसून वीरांचा पराक्रम । हर्षित झाला नृपोत्तम ।
ह्मणे माझा विजयकाम । पूर्ण केलात वीरहो ॥ ४७ ॥

आजवर झालीं युद्धें बहुत । शौर्यही गाजलें असे जगांत ।
परी मर्दुमकीची ऐशी शर्त । झाली नाहीं कधींही ॥ ४८ ॥
विजयास मुख्य कारण । प्रतापराव गुणनिधान ।
तैसेच मोरापंत सगुण । रायें फार गौरविले ॥ ४९ ॥
वरकड योद्धे शूर बहुत । त्यांसही राव सत्कारित ।
वस्त्रं भूषणें समर्पित । सर्वांसही भूपती ॥ ५० ॥
यवन सरदार पाडाव झाले । त्यांसही रायें सत्कारिलें ।
औषधोपचार स्वयें केले । घायाळांस नृपानें ॥ ५१ ॥
पुण्यप्रतापी शिवनृपाळ । निष्पाप आणि दीनदयाळ ।
सर्वत्रांस सुखचि केवळ । मायबापासारिखा ॥ ५२ ॥
आतां इकडील प्रसंग सोडून । विजापुरीं जाऊं आपण ।
तिकडे काय करिती यवन । पाहून येऊं सहजची ॥ ५३ ॥
षोडशाध्यायीं कथा वर्णिली । विजापुरकरांशीं मैत्री जडली ।
आजवरी होती चालली । तीच रीती दोघांची ॥ ५४ ॥
पूर्वकाल निघून गेला । बादशहा मृत्यू पावला ।
तदा सिंहासनीं आरूढला । बालपुत्र तयाचा ॥ ५५ ॥
खवासखान नामें वजीर । होता चालवीत कारभार ।
शिवरायाचा प्रताप अपार । ज्ञात नव्हता तयातें ॥ ५६ ॥
नृपास करून पराभूत । हस्तगत करावा आपुला प्रांत ।
ऐसा मनीं धरून हेत । करी सिद्धता यवन तो ॥ ५७ ॥
अबदुल करीम नामें शूर । होता एक बलिष्ठ सरदार ।
तयासवें सेना देऊन अपार । वजीर प्रेषी तयातें ॥ ५८ ॥
अत्यावेशें यवन चालिला । शौर्यबळें घेई पन्हाळा ।
प्रांतीं उपद्रव बहु दिधला । यवन सैन्यानें तेधवां ॥ ५९ ॥

दूतमुखें कळतां वृत्त । प्रतापरावास राव प्रेषित ।
येरू जाऊन सैन्यासहित । बळें शत्रू पराभवी ॥ ६० ॥
पराभूत यवन होउनी । प्रतापाची करी विनवणी ।
ह्मणे तुह्मी सकृप होउनी । जाऊं द्यावें विजापुरीं ॥ ६१ ॥
पुन्हा उपद्रव न देईन । ऐसें घेऊन शपथ वचन ।
प्रतापराव दयावन । जाऊं देई तयातें ॥ ६२ ॥
संकटांतून यवन सुटला । मागुती उपद्रव देऊं लागला ।
हें वृत्त कळतां नृपाला । क्रोधें संतप्त जाहला ॥ ६३ ॥
यवन सैन्य हातीं लागलें । तें प्रतापरावें व्यर्थ सोडिलें ।
ह्मणून रायें निर्भात्सिलें । प्रतापरावातें अत्यंत ॥ ६४ ॥
कर्तव्य कर्मीं केलीस चूक । आतां पराभवीं यवन सैनिक ।
ना तरी मी तुझें मुख । पाहणार नाहीं कधींही ॥ ६५ ॥
तेजोजननार्थ ऐसे परी । नृप प्रतापास वाग्बाण मारी ।
तेणें विव्हळ झाला अंतरीं । प्रतापराव तेधवां ॥ ६६ ॥
अंतरीं झाला अत्यंत खिन्न । ह्मणे फजितीहून बरें मरण ।
हें आतां कृष्णवदन । कैसें जगीं दाखवूं ॥ ६७ ॥
धारातीर्थीं देह ठेवून । आतां साधावें स्वभुवन ।
ऐसा निश्चय मनीं करून । प्रतापराव निघाला ॥ ६८ ॥
अबदुल करीम सेनेसहित । होता पन्हाळ्यासमीप येत ।
त्यावरी जाऊन अकस्मात । प्रतापराव पडियेला ॥ ६९ ॥
शत्रुसेना सागरांत । प्रतापराव उडी टाकित ।
स्वर्ग लोकाचा धरी पंथ । नश्वर देहा त्यागुनी ॥ ७० ॥
पतन पावतां सेनापती । महाराष्ट्र वीर पावले भीती ।
वीरमदें यवन गर्जती । अत्यंत हर्ष पावुनी ॥ ७१ ॥

महाराष्ट्र सैन्य भंग पावलें । धीर सोडून पळों लागलें ।
तों एक अद्भुत वर्तलें । पुण्यप्रतापें नृपाच्या ॥ ७२ ॥
शूर वीर हंसाजी मोहिता । ससैन्य मार्गे जात होता ।
तेणें देखिली ऐशी अवस्था । महाराष्ट्रीय सेनेची ॥ ७३ ॥
मग तयास देऊन धीर । मोहिता फिरवी सैन्य समग्र ।
एकाएकीं शत्रूवर । निकर केला तयानें ॥ ७४ ॥
अजासमूहीं पंचानन । कीं मूषकसदनीं पंचानन ।
तैसेंच कर्म करी दारुण । यवन सैन्यीं मोहिता ॥ ७५ ॥
यवन पृतना भंग पावली । धैर्य सोडून पळून गेली ।
महाराष्ट्र सेना जय पावली । मोहित्याच्या प्रतापें ॥ ७६ ॥
ऐसा पराभव पूर्ण पावून । यवन झाला लज्जायमान ।
अंतरीं अत्यंत होऊन खिन्न । गेला निघून विजापुरीं ॥७७॥
प्रतापराव रणीं पडला । मोहित्यानें जय साधिला ।
ही वार्ता शिवनृपाला । श्रुत जाहली झडकरी ॥ ७८ ॥
तयास अत्यंत दुःख झालें । ह्मणे वीरशिरोरत्न गेलें ।
हाय काय कर्म केलें । प्रतापरावें अविचारें ॥ ७९ ॥
तेजोजननार्थ बोल बोलिलों । परी मृत्यूस कारण झालों ।
शूर सेनानीस मुकलों । मीच अविचारी निश्चयें ॥ ८० ॥
नाना प्रकारें ऐसें बोलुनी । राव आपणास घेई निंदुनी ।
प्रतापाचे गुण आठवूनी । अश्रु गाळी भूपतीं ॥ ८१ ॥
प्रतापाचे उपकार फार । झाले असती आपणावर ।
ह्मणून विचार करी नृपवर । उत्तीर्ण व्हावें कैसे परी ॥८२॥
मग तयाची सुता सुंदरी । करावी स्वपुत्रास नोवरी ।
ऐशी योजना नृपाल करी । स्वजन संमत घेउनी ॥ ८३ ॥

प्रतापाचें कुटुंब थोर । उपकारमतीनें पोषी नृपवर ।
धनधान्यादि पुरवून समग्र । उणें पडों नेदीच ॥ ८४ ॥
राजाराम नृप कुमर । प्रतापाची कन्या सुंदर ।
या दोघांचा विवाहप्रकार । यथाकालीं जाहला ॥ ८५ ॥
हंसाजीनें यश साधिलें । त्यावरी नृप चित्त प्रसन्न झालें ।
सेनापतित्व मानें दिधलें । शिवरायें तयाप्रती ॥ ८६ ॥
हंबीरराव ऐसें नूतन । दिलें तयातें नृपें अभिधान ।
वस्त्रें भूषणें समर्पून । गौरव केला तयाचा ॥ ८७ ॥
मुंबईत आणि इत्रर प्रांतीं । इंग्रेजांचीं ठाणीं होतीं ।
व्यापारमिषें तेथें राहती । अधिकारी इंग्रेज ॥ ८८ ॥
पूर्वीं नृपानें देश लुटिला । तदा उपसर्ग तयां पोंचला ।
शिवरायाचा धाक वाटला । तयांप्रती सहजची ॥ ८९ ॥
न व्हावा आपणास उपद्रव । नित्य असावा स्नेहभाव ।
या कारणास्तव शिवराव । इंग्रजांनीं प्रार्थिला ॥ ९० ॥
रायाकडे धाडून वकील । सामोपचारें बोलती बोल ।
आह्मी लोक व्यापारी केवळ । उपद्रव आह्मां नसावा ॥ ९१ ॥
लुटून नेलें आमुचें धन । तें आह्मांस द्यावें परतून ।
आमुचा व्यापार प्रांतामधून । अप्रतिबंध चालावा ॥ ९२ ॥
बोलणें केलें ऐशापरी । परी तो शिवराय मान्य न करी ।
साम प्रकार तया उपरी । नाहीं घडला पूर्णत्वें ॥ ९३ ॥
वैरी झाले पराभूत । महाराष्ट्र राज्य झालें विस्तृत ।
शिव नृपाळ पुण्यवंत । थोर यशस्वी जाहला ॥ ९४ ॥
दादोजीनें बीज पेरिलें । समर्थ गुरूनें जल सिंचिलें ।
तें बीज फलद्रुप झालें । या सुसमयीं महाराष्ट्रीं ॥ ९५ ॥

स्वराज्यवृक्ष डहुरला । आश्रितांस सुखवूं लागला ।
परवशतेचा ताप सरला । पसरला आनंद चहूंकडे ॥ ९६ ॥
शिवरायें स्वराज्य स्थापिलें । यथाशास्त्र चालविलें ।
धर्मानुसार वर्तन केलें । पुत्रवत् प्रजा पाळिली ॥ ९७ ॥
धर्मशास्त्रास अनुसरून । राव योजी अष्ट प्रधान ।
यथायोग्य कार्यें सांगून । प्रजापालन करीतसे ॥ ९८ ॥
राजदरबारीं व्यवहारांत । यवनी शब्द होते मिश्रित ।
ते शब्द त्यजावे समस्त । ऐसें राया वाटलें ॥ ९९ ॥
आज्ञापून पंडितांस । करवी राज्यव्यवहार कोश ।
संस्कृत शब्द यवनी शब्दांस। त्यांत निवडून घातले॥१००॥
दुष्ट यवन पराभविले । यथाशास्त्र राज्य स्थापिलें ।
अवतार कारण सिद्धीस नेलें । शिवरायें यापरी ॥ १०१ ॥
देशास आले उत्तम दिवस । वैभवाचा झाला कळस ।
पार नाहीं आनंदास । महाराष्ट्रीं या काळीं ॥ १०२ ॥
परवशतेची शृंखळा तुटली । सद्गुणांची वृद्धि झाली ।
यश संपदा नांदूं लागली । महाराष्ट्रीं या काळीं ॥ १०३ ॥
पर्जन्य पडे यथाकाळीं । उत्तम पिके धरामाउली ।
दुःख दरिद्र विघ्नें पळालीं । महाराष्ट्रांतून ये काळीं॥१०४॥
धन्य धन्य महाराष्ट्र देश । भाग्यें दैव आलें उदयास ।
अपर्णापती येऊन जन्मास । उद्धार करिता जाहला॥१०५॥
आतां पुढें कथा रसिक । रायास होईल राज्याभिषेक ।
प्रमुदित होतील सकळ लोक। उत्साह थोर देखुनी॥१०६॥
श्रीशिवविजयग्रंथ । शिवावतार चरित्र अद्भुत ।
वर्णन करी भावें अनंत। षड्विंशतितमोध्याय गोड हा॥१०७॥

# अध्याय २७ वा.

॥ श्रीगणेशायनमः ॥

रायगडीं एके दिनीं । मंत्री सैनिक मेळवूनी ।
तो शिवराय उच्चासनीं । होता सुखें बैसला ॥ १ ॥
कारभाराच्या मसलती । चालल्या होत्या नाना रीती ।
इतुक्यांत सर्व परिसिती । 'जय रघुवीर' शब्द हा ॥ २ ॥
सद्‌गुरू मूर्ती पातली । सकळ मंडळी आनंदली ।
उच्चस्थानीं जागा दिधली । गुरुरायास नृपानें ॥ ३ ॥
रायें करून साष्टांग नमन । भावें केलें गुरुपूजन ।
उभा राहिला हस्त जोडून । गुरुसंनिध नृपाल ॥ ४ ॥
सद्‌गुरू समर्थ रामदास । वाक्य जयाचें सुधारस ।
निकट बैसवूनि रायास । कुशल प्रश्न विचारिती ॥ ५ ॥
गुरुशिष्य परस्परें । करिती नाना मधुरोत्तरें ।
समाधान पावलीं अंतरें । दोघांचीही तेधवां ॥ ६ ॥
समर्थ बोलती शिव नृपाळा । तुवां यवनवर्ग अवघा शासिला ।
अपार सुख दिधलें प्रजेला । महाराष्ट्र राज्य स्थापुनी ॥७॥
स्वधर्माचें समुद्धरण । तुवां केलें यत्नेंकरून ।
कष्ट करून रात्रंदिन । अपार यश मेळविलें ॥ ८ ॥
तुज जयश्रीनें माळ घातली । राज्य लक्ष्मी बहुत लाधली ।
तव कीर्ती दिगंतीं गेली । शिवराया सुजाणा ॥ ९ ॥
अनेक अश्व द्वारीं नाचती । सुंदर सुंदर हत्ती झुलती ।
मंत्री सैनिक सभोंवती । तुझ्या शोभती सदैव ॥ १० ॥

आतां एक दिसतें न्यून । नाहीं शास्त्रोक्त सिंहासन ।
सशास्त्र राज्याभिषेकावीण । पूर्ण वैभव दिसेना ॥ ११ ॥
तुह्मी क्षत्रकुलावतंस । प्रसिद्ध तुमचा ' शिसोदे ' वंश ।
मंत्रपूत सिंहासनास । तुह्मी योग्य निश्चयें ॥ १२ ॥
बळें करितां राज्यस्थापन । कांहीं चुकतें न्यायधोरण ।
ज्ञाताज्ञात पाप कारण । नृपास सहजीं घडतसे ॥ १३ ॥
अखिल पापक्षयकारक । झाला पाहिजे राज्याभिषेक ।
तेणें इहपरत्रीं सुख । नृपवर्या होतसे ॥ १४ ॥
संप्राप्त-साधन समृद्धी-योग । राया त्वदीय सुदैव रंग ।
राज्याभिषेक यथासांग । घडवील ऐसें वाटतें ॥ १५ ॥
अपरसूर्य विप्र विद्वान । यांचें घडेल पदवंदन ।
वेदोक्त मंत्रगजर परिसोन । निष्पाप काया होईल ॥ १६ ॥
समस्त वैभव एकवटेल । दानधर्म बहुत घडेल ।
महद्यश चिरकाल राहील । राज्याभिषेक कारणें ॥ १७ ॥
मम चित्तीं विचार सुचला । तो सर्व राया कथन केला ।
आतां योग्य वाटेल तुजला । तैसा बेत करावा ॥ १८ ॥
संतोषून बोले नृपवर । आह्मी सर्व युष्मत्किंकर ।
वर्तों नित्य आज्ञानुसार । सद्गुरूराया समर्था ॥ १९ ॥
जो जो मनीं हेतू धराल । तो तो सामर्थ्यें सिद्धीस न्याल ।
आह्मांस जैशी आज्ञा कराल । तैसें करूं वर्तन ॥ २० ॥
राज्य वैभव सत्ताबल । हें सर्व युष्मत्कृपाफल ।
आह्मी नामधारी केवळ । तुमचे भक्त समर्था ॥ २१ ॥
राज्याभिषेक विधी करावा । ऐसा हेतू असेल देवा ।
तरी मजकरवीं सिद्धीस न्यावा । परम कृपाळू होउनी ॥२२॥

काय विधी काय साधन । काय सामग्री कोण दिन ।
आह्मी येविषयीं पूर्ण अज्ञान । ह्मणून सर्व सांगिजे ॥२३॥
सद्‌गुरू ह्मणे मी अपंडित । मज न ठावे शास्त्रार्थ समस्त ।
असेल विचार तुह्मांस संमत । तरी ऐसें करावें ॥ २४ ॥
ब्राह्मण पंडित मेळवावे । कार्यार्थ त्यांचे विचार घ्यावे ।
त्यांच्या अनुमतें चालावें । ह्मणजे सिद्धी येईल ॥ २५ ॥
वाराणसी क्षेत्र पावन । तेथें आहे एक ब्राह्मण ।
जो केवळ सूर्यनारायण । विद्यातेजेंकरूनी ॥ २६ ॥
गागाभट्ट त्याचें अभिधान । त्यास करावें पाचारण ।
त्याचे अनुमतें सर्व कारण । यथासांग घडेल ॥ २७ ॥
आप्त सोयरे मित्र जन । यांतें करा निमंत्रण ।
पाचारिल्यास मीही येईन । कार्य चमत्कार पहावया ॥२८॥
सद्‌गुरूचा भाषणौघ संपला । राव तेधवां सद्गदित झाला ।
साष्टांग प्रणिपात घातला । गुरुवर्यास नृपानें ॥ २९ ॥
परम समर्थ सद्‌गुरू सकृप । यापरी बोधुनी शिव नृप ।
मग गेले घेऊनि निरोप । इच्छिल्या ठायीं क्षणांत ॥ ३० ॥
सद्‌गुरूनें कार्य कथिलें । तें रायास कर्तव्य वाटलें ।
मग रायें स्वजन प्रेषिले । वाराणसी क्षेत्रास ॥ ३१ ॥
परम भक्तीनें लीन होउनी । गागाभट्टास बहु प्रार्थुनी ।
बैसवूनि शिबिका यानीं । तया रायगडीं आणिलें ॥ ३२ ॥
सकल शास्त्रार्थ पूर्ण जाणता । विद्यातेजें अपरसविता ।
ऐसा भट्ट स्वगृहीं येतां । रायें बहुत सन्मानिला ॥ ३३ ॥
मग घेऊन त्याचा विचार । राज्याभिषेक साहित्य समग्र ।
सिद्ध करूं लागला नृपवर । अत्यानंदेंकरूनी ॥ ३४ ॥

कुंडली रायाची पाहून । भट्ट करी दिन शोधन ।
ग्रह नक्षत्रादि अवलोकुन । उत्तम मुहूर्त नेमिला ॥ ३५ ॥
आनंदनाम संवत्सरांत । जेष्ठ शुद्ध त्रयोदशी तीथ ।
तो मुहूर्त केला निश्चित । राज्याभिषेकाकारणें ॥ ३६ ॥
प्रांतोप्रांतींचे सैनिकगण । आप्तसोयरे मंत्री स्वजन ।
यांतें केलें पाचारण । समारंभा कारणें ॥ ३७ ॥
शास्त्री पंडित विद्वज्जन । यांशी केलें निमंत्रण ।
गीत नृत्य कला प्रवीण । पाचारिले सर्वही ॥ ३८ ॥
सद्गुरूंप्रती धाडिलें लिखित । राज्याभिषेक समारंभार्थ ।
येऊन शिष्यवर्गासहित । कार्यसिद्धी करावी ॥ ३९ ॥
चौघडे सनया मृदंगादिक । यांचे उत्तम उत्तम वादक ।
त्यांसही तो नरनायक । निमंत्रण करी तेधवां ॥ ४० ॥
रायगडींचा विस्तीर्ण प्रदेश । नीट नेटका करवी नरेश ।
अभिमंत्रितांस रहावयास । सुंदर मंडप उभारिले ॥ ४१ ॥
कुशल स्वर्णकार पाचारून । घडविलें सुवर्ण सिंहासन ।
नाना रत्नें तया जोडून । सशास्त्र सिद्ध करविलें ॥ ४२ ॥
गंगा गंडकी कृष्णापूत । इत्यादि सरिता अष्टोत्तरशत ।
तीर्थ राजसागरासहित । यांचीं उदकें आणविलीं ॥ ४३ ॥
पवित्र वृक्षांचे नवपल्लव ॥ वृक्ष शाखा आणिल्या अभिनव ।
शास्त्रोक्त मृत्तिका आणिल्या सर्व । अष्ट घट आणिले ॥४४॥
पुण्य प्रतापी शहाजी सुत । सर्व सिद्धता झाली त्वरित ।
ज्येष्ठ मास झाला प्राप्त । मुहूर्त समीप पातला ॥ ४५ ॥
विस्तीर्ण मंडप सज्ज झाले । नानापरी ते शृंगारिले ।
थोर पाहुणे येऊं लागले । रायगडीं तेधवां ॥ ४६ ॥

करावया अभ्यागत सन्मान । राव योजी कुशल स्वजन ।
सर्व सामुग्री सज्ज ठेऊन । कार्यें वांटून दीधलीं ॥४७॥
राजवाड्याचे द्वारासमोर । होता विस्तीर्ण मंडप सुंदर ।
तया माजीं सर्व सरदार । होते राहिले तेधवां ॥ ४८ ॥
शंकराच्या मंदिरा समीप । होता उभारिला भव्य मंडप ।
सशिष्य रामदास सज्जनाधिप । तये स्थानीं उतरले ॥४९॥
ब्राह्मण पंडित विद्वज्जन । अन्य मंडप तयांकारण ।
गीत नृत्य वाद्य प्रवीण । यांस मंडप वेगळा ॥ ५० ॥
राज्याभिषेकार्थ मंडप थोर । उभारिला भव्य मनोहर ।
अष्टपैलु स्तंभ सुंदर । तया माजीं उभारिले ॥ ५१ ॥
अमोल वस्त्रें वेष्टित केला । झालरी लावून शृंगारिला ।
पताकांनीं शोभविला । मुख्य मंडप कुशलत्वें ॥ ५२ ॥
ज्येष्ठ मासास आरंभ झाला । नाना जनांचा पूर लोटला ।
सकल रायगड फुलून गेला । बहुत जनांच्या आगमें ॥५३॥
देशोदेशींचे विद्वज्जन । महा तपस्वी योगी ब्राह्मण ।
शिवरायाची कीर्ती ऐकून । उत्साह पाहूं पातले ॥ ५४ ॥
अनेक लोक एकवटले । ते सर्व रायें सन्मानिले ।
योग्यतेनुरूप पुरविलें । सर्व साहित्य तयांस ॥ ५५ ॥
पंडितांची सभा भरून । करिती शास्त्रोक्त विधि विवेचन ।
राज्याभिषेक विधी संपूर्ण । कैशापरी आचरावा ॥ ५६ ॥
एक बोले निःस्पृह पंडित । करावया आभिषेक मंत्रपूत ।
अनधिकारी शहाजीसुत । आहे ऐसें वाटतें ॥ ५७ ॥
संस्कारयुक्त नरावीण । इतरांस कैचें वेदोक्तविधान ।
व्रतबंधरहित शहाजीनंदन । कर्म कैसें होईल ॥ ५८ ॥

विचार सर्वांस मानवला । मग ग्रंथीं शोध केला ।
व्रतबंधाचा काळ पाहिला । क्षत्रियांस कोण तो ॥ ५९ ॥
पडलें सर्वांचें अनुमत । आधीं व्रतबंध करणें उचित ।
मग राज्याभिषेक विधियुक्त । वेदोक्त मंत्रें करावा ॥ ६० ॥
जेष्ठ शुद्ध षष्ठी तिथीला । व्रतबंधाचा मुहूर्त धरिला ।
पंडितांनीं घडवून आणिला । त्या दिनीं व्रतबंध ॥ ६१ ॥
अत्युत्साहें व्रतबंध झाला । बहुत दानधर्म रायें केला ।
हर्ष वाटला समस्तांला । समारंभ पाहुनी ॥ ६२ ॥
रायें करून सुवर्ण तुला । तें हेम वांटिलें द्विजवरांला ।
अन्नसंतर्पणें समस्तांला । तृप्त केलें नृपानें ॥ ६३ ॥
शास्त्रविधीनें सप्तमीला । नृपाळशिरीं किरीट घातला ।
अग्निनारायण तृप्त केला । विध्युक्त हवनें करूनी ॥ ६४ ॥
षष्ठीपासून त्रयोदशीपर्यंत । चालला महोत्साह अत्यंत ।
खाद्य पेय नृत्य गीत । यांची गर्दी चालली ॥ ६५ ॥
मंगल कार्यास योग्य मुहूर्त । ऐशी पातली त्रयोदशी तीथ ।
अभिषेक समारंभ नेमस्त । केला होता त्या दिनीं ॥ ६६ ॥
पंच पंच उषःकालीं । त्या दिनीं उठली सर्व मंडळी ।
समस्तांची गर्दी उडाली । कार्य सिद्धता करावया ॥ ६७ ॥
मंगल वाद्यांचा मधुर गजर । होऊं लागला गडावर ।
दिव्य निशाणें पताका सुंदर । ठायीं ठायीं उभविलीं ॥६८॥
मार्गामाजीं स्थळीं स्थळीं । उभ्या केल्या रम्य कदली ।
त्यांची शोभा दिसों लागली । मनोहर सर्वत्र ॥ ६९ ॥
केशर कस्तुरी उदकीं घालून । त्यांनीं केलें मार्गसिंचन ।
पुष्पगुच्छ विराजमान । ठायीं ठायीं ठेविले ॥ ७० ॥

नगरवासी समस्त जन । त्यांनीं गुड्या तोरणें उभारून ।
रंगवल्ली चित्रें काढून । मार्ग केले शोभित ॥ ७१ ॥
नृपवर्याचे अष्टप्रधान । सज्ज झाले स्नानें करून ।
अमोल वस्त्रें भूषणें लेऊन । राजद्वारीं पातले ॥ ७२ ॥
सवें घेऊन मुख्य पंडित । गागाभट्ट पातले त्वरित ।
साहित्यसिद्धता करूनि समस्त । नृपास हांक मारिती ॥७३॥
नृपवर्यास उभें करून । प्रथम घालिती मृत्तिकास्नान ।
दुजें गोमयस्नान पावन । गागाभट्ट घालिती ॥ ७४ ॥
मधु शर्करा दुग्ध घृत । चार द्रव्यें करून मिश्रित ।
त्यांनीं तृतीय स्नानपूत । राया लागीं घातलें ॥ ७५ ॥
पवित्र तीर्थोदक आणून । तेणें घातलें चतुर्थस्नान ।
यापरी स्नानविधी संपूर्ण । रायाकडून करविला ॥ ७६ ॥
शुभ्र वसनें परिधान । भट्टें करविलीं रायाकडून ।
सिंहासनानिकट पाट मांडून । त्यावरी नृपास बैसविलें ॥७७॥
सोयराबाई राजकांता । परम सद्गुणी पतिव्रता ।
तिजला विध्युक्त तत्वता । अभ्यंग स्नान घातलें ॥ ७८ ॥
बहुमोल वस्त्रें लेवविलीं । अमोल अलंकारें भूषित केली ।
राजपत्नी तदा शोभली । रतिदेवीसारखी ॥ ७९ ॥
सज्ज होतां सर्व थाट । विप्रवर्यें नृपानिकट ।
खदिर काष्ठाचा मांडून पाट । त्यावरी राणी बैसविली ॥८०॥
राव संभाजी नृपनंदन । अलंकार वस्त्रें भूषित करून ।
तृतीय पाट निकट मांडून । त्यावरी तयास बैसविलें ॥८१॥
अभिषेकवेळा जवळ पातली । सकळ मंडळी जमा झाली ।
सुस्वर वाद्यें वाजूं लागलीं । राजद्वारीं तेधवां ॥ ८२ ॥

नृपवर्यांचे अष्टप्रधान । शुभ्रवस्त्रें परिधान करून ।
शास्त्रोक्त पात्रें करीं घेऊन । रायानिकट पातले ॥ ८३ ॥
मुख्य प्रधान मोरोपंत । पिंगळे कुळीं परम विख्यात ।
स्वर्णपात्र घेऊन सघृत । पूर्वेस उभे राहिले ॥ ८४ ॥
हंसाजीराव सेनाधीश । रौप्यपात्रीं घेऊन गोरस ।
उभे राहिले दक्षिणेस । नृपवर्याच्या समीप ॥ ८५ ॥
रामचंद्रपंत मुजुमदार । कांस्यपात्रीं मधू मधुर ।
घेऊन पश्चिमेस सत्वर । विनयें उभे राहिले ॥ ८६ ॥
रघुनाथपंडित न्यायाधीश । गंगोदकयुक्त सुवर्णकलश ।
करीं घेऊन दक्षिणेस । प्रेमें उभे राहिले ॥ ८७ ॥
राजानिष्ठ बाळाजीपंडित । भगवद्गीता घेऊन करांत ।
नृपाल मुखचंद्र विलोकित । समीप उभे राहिले ॥ ८८ ॥
अन्य मंत्री सैनिक शूर । उभे राहिले नृपासमोर ।
शास्त्री पंडितादि विप्रवर । निकट भागीं बैसले ॥ ८९ ॥
दर्शनें जगास करिती पूत । ते रामदास सद्गुरू समर्थ ।
कल्याणादि शिष्यांसहित । उच्चासनीं बैसले ॥ ९० ॥
नानारंगी पीळदार । पागोटीं ठेवून शिरावर ।
ठायीं ठायीं मावळे वीर । उभे राहिले आनंदें ॥ ९१ ॥
कोणी मंदील बांधिला । कोणी जंबिया लटकाविला ।
कोणी शेला परिधान केला । अत्यानंदें करूनी ॥ ९२ ॥
एकनिष्ठ मावळे वीर । स्वामिकार्यार्थ सदा तत्पर ।
स्वयें कष्ट करून अपार । उणें पडों न देती ॥ ९३ ॥
नृपाळाचे स्थानासमोर । अमोल पडदे लावून सुंदर ।
पहावया उत्साह चमत्कार । स्त्रियांस तेथें बैसविलें ॥९४॥

रूपें जयांचीं मनोहर । तारुण्याचा अत्यंत भर ।
ऐशा नवयुवती सुंदर । उत्साह पाहों पातल्या ॥ ९५ ॥
वेदघोषाचा महागजर । चालू करिती विप्रवर ।
नाना रंगीं अक्षता सुंदर । रायावरी टाकिती ॥ ९६ ॥
आम्रपल्लव रम्यकोमल । त्यांनीं घेऊन शीत जल ।
उभे राहून विप्र सकल । अभिषेक करिती रायावरी ॥९७॥
पात्रें होतीं प्रधान हस्तीं । सहस्त्र धारा तया असती ।
सर्व सज्ज होऊन पाहती । मुहूर्त घटिका आनंदें ॥ ९८ ॥
नेमस्तघटिका पूर्ण झाली । मंगल वाद्यें गर्जू लागलीं ।
अष्टप्रधानांहीं धरिलीं । अभिषेकपात्रें रायावरी ॥ ९९ ॥
सहस्त्रधारांच्या भाजनांनीं । अभिषेक केला अष्टप्रधानीं ।
विद्वद्वर्य ब्राह्मणांनीं । वेदघोष चालविला ॥ १०० ॥
चौघडे कर्णे सनया वाजती । उल्हाट यंत्रांचे धडाड होती ।
मधुर आलाप गवई काढिती । सारंगराग आळउनी ॥१०१॥
वारांगना सुंदर तरुण । बहुमोल अलंकार वस्त्रें लेउन ।
अभिनव करिती नृत्य गान । हाव भाव दाउनी ॥ १०२ ॥
विध्युक्त अभिषेक संपवून । गागाभट्टाचे आज्ञेवरून ।
आदर्शामाजी स्ववदन । शिवरायें देखिलें ॥ १०३ ॥
गागाभट्ट शास्त्रनिपुण । पुढें करी घृत भाजन ।
घृतामाजीं रायाकडून । तन्मुख कमल पाहविलें ॥ १०४ ॥
राजभार्येच्या पल्लवास । ग्रंथी देई द्विजवरेश ।
पूर्ण केलें पटबंधविधीस । विध्युक्त विधानें करूनी ॥१०५॥
शास्त्रसिद्ध सिंहासनावर । आतां नृपाळ बैसणार ।
सकल जनांस आनंद थोर । तो उत्साह पहावया ॥१०६॥

गागाभट्ट ह्मणती नृपवरा । आधीं कुलदेवीचें स्मरण करा ।
मग पूज्यांस नमस्कारा । विहित मार्ग असे हा ॥ १०७ ॥
तो महाभाग शहाजी सुत । प्रथम गेला देवगृहांत ।
अंतरीं होऊन भक्तियुक्त । साष्टांग नमन घातलें ॥१०८॥
मग बोले कर जोडुनी । जगदंबे तूं कुलस्वामिणी ।
तव कृपेच्या आश्रयें करुनी । आजचा सुदिन पाहिला॥१०९॥
पुन्हा वंदून राव निघाला । मातोश्रीच्यासमीप आला ।
प्रेमाश्रूंचा पूर लोटला । जिजाऊ मातेस तेधवां ॥ ११० ॥
धन्य धन्य ते जिजाऊमाउली । अहा ऐसा सुपुत्र प्रसवली ।
नकळे काय पुण्यें केलीं । पूर्व जन्मीं तियेनें ॥ १११ ॥
मातेनें पुत्रमुख पाहिलें । आनंदाचें भरतें आलें ।
रायें लोटांगण घातलें । मातोश्रीच्या पदकमलीं ॥ ११२ ॥
माता बोले धन्य बाळा । तुवां भूषविलें आपुल्या कुळा ।
भोसलेवंश तुवां उद्धरिला । ख्याती केली जगांत ॥ ११३ ॥
राव बोले नम्र होऊन । माते तुमच्या कृपेंकरून ।
प्राप्त झाला आजचा सुदिन । सर्व पुण्याई तूमची ॥११४॥
कृपा करून मजवरी । वरदहस्त ठेवून शिरीं ।
बैसावया सिंहासनावरी । आज्ञा माते देईजे ॥ ११५ ॥
शिवराय ऐसें बोलिला । मातोश्रीला हुंदका आला ।
ह्मणे हें सौख्य पहावयाला । धनी राहिले नाहींत ॥११६॥
माता पुत्रांस तये वेळे । शहाजीचें स्मरण जाहलें ।
अंतरीं वाईट वाटलें । दोघांनांही तेधवां ॥ ११७ ॥
आनंदाचा समय जाणून । सुविचारें आवरून मन ।
माता बोले मधुर वचन । ऊठ बाळा लौकरी ॥ ११८ ॥

सकल सुखास साधनीभूत । ऐसे तुझे सद्गुरू समर्थ ।
त्यांतें वंदन करून त्वरित । आशिर्वाद साधिजे ॥ ११९ ॥
शिवराय तेथून उठला । सद्गुरूच्या समीप आला ।
साष्टांग नमस्कार घातला । परम प्रेमें नृपानें ॥ १२० ॥
हर्षभरित होऊन चित्तीं । समर्थ रायास स्वयें उठविती ।
ह्मणती धन्य धन्य तूं भूपती । ख्याती केली अपूर्व ॥१२१॥
नम्र पणें राव बोले । तुमचे आशिर्वाद फळा आले ।
इच्छा मात्रें घडून आलें । तुमच्याच सर्वेही ॥ १२२ ॥
समर्थ बोलती मधुरोत्तर । तूं महाभाग नृपवर ।
शास्त्रसिद्ध सिंहासनावर । इंद्रासमान आरूढें ॥ १२३ ॥
मग वडील आप्त द्विजजन । यांतें प्रेमें करून वंदन ।
मग पुन्हां शुद्धोदक स्नान । रायें केलें यथाविधी ॥१२४॥
सुवर्णघटित सिंहासन । नाना रत्नं तया जडवून ।
त्यावरी घातलें दुकूलवसन । सुशोभित उत्तम ॥ १२५ ॥
सिंह व्याघ्रादि नानापरी । चित्रें रेखिलीं बाजूस चारी ।
मग सिंहासनावरी । मृग चर्म पसरिलें ॥ १२६ ॥
शिवरायाचें नाम घालुनी । तदां पाडिलीं नवीं नाणीं ।
त्यांतील रौप्यमुद्रा आणुनी । मृगचर्मावरी पसरिल्या ॥१२७॥
त्यावरी पसरिलें व्याघ्रांबर । त्याहीवरी मनोहर ।
काश्मिरी शाली अति सुंदर । गागाभट्टें घालविल्या ॥१२८॥
सिंहासनाची प्रभावळ । सुवर्णाची घडवून सोज्वळ ।
रत्नजडित सुंदर कमळ । तियेमाजीं रेखिलें ॥ १२९ ॥
मौक्तिकांचे घोंस सुंदर । मुक्ताफळांच्या माळा थोर ।
टांगिल्या होत्या मनोहर । प्रभावळीचे बाजूसीं ॥ १३० ॥

काश्मिरी शालींचें छत्र सुंदर । उभविलें सिंहासनावर ।
चामर मोर चेलादि समग्र । राजचिन्हें उभारिलीं ॥१३१॥
सदाशिव अपर्णापती । आणि लक्ष्मीनायक जगत्पती ।
यांच्या मनोहर स्वर्णमूर्ती । आसनासमोर ठेविल्या ॥१३२॥
यापरी शास्त्रोक्त विधी पूर्ण । सिद्ध होतें सिंहासन ।
त्यावरी महाभाग शहाजीनंदन । शिवराय आरूढला ॥१३३॥
जयजयकाराचा ध्वनी उठला । शत तोफांचा धडाड झाला ।
मधुर गजर होऊं लागला । मंगल सुस्वर वाद्यांचा ॥१३४॥
सुवर्णाचीं फुलें अभिनव । करीं घेऊन लोक सर्व ।
त्यांचा नृपावरी वर्षाव । प्रेमें करूं लागले ॥ १३५ ॥
रत्नदीप घेऊन करीं । अष्टदश विप्रांगना सुंदरी ।
रायास ओंवाळिती झडकरी । पंचारती तेधवां ॥ १३६ ॥
शिवराय प्रसन्नवदन । द्विजपत्न्यांचें करी पूजन ।
वस्त्रें भूषणें समर्पून । गौरविल्या सुंदरी ॥ १३७ ॥
मग तेथून स्वारी निघाली । गजरें देवालया चालली ।
मार्गामाजीं गर्दी झाली । सकल जनांची तेधवां ॥ १३८ ॥
शृंगारयुक्त गज चालती । थै थै नाचत अश्व जाती ।
मंगल वाद्यांचे गजर होती । नाद अंबरीं न समाये ॥१३९॥
ताफे बांधून अश्वावरी । उभ्या राहून तयांउपरी ।
वारांगनांच्या तरुण कुमरी । नृत्य करिती कुशलत्वें ॥१४०॥
देवदर्शना उद्युक्त झाला । शिवनृपाल त्वरें निघाला ।
तदा शिवमुखकमलाला । जन आनंदें पाहती ॥ १४१ ॥
चकोरचंद्र न्यायेंकरून । लोक पाहती नृपालवदन ।
समस्तांचे धाले नयन । शिवमुखांबुज पाहुनी ॥ १४२ ॥

स्त्रिया नागरीक लहान थोर । बैसून आपुल्या माडीवर ।
शिवरायाचें वदन सुंदर । खिडक्यांतुन पाहती ॥ १४३ ॥
सुवर्ण पुष्पें कोणी उडविती । सुगंध कुसुमें कोणी वर्षती ।
कोणी प्रेमें लाह्या फेंकिती । रायावरी तेधवां ॥ १४४ ॥
देवालयीं प्रवेशून । राव करी भावें पूजन ।
स्तौत्यपूर्वक करूनि वंदन । सौधामाजीं प्रवेशला ॥ १४५ ॥
जे दिनीं राज्याभिषेक झाला । ते दिनीं नृपालशक निघाला ।
राज्याभिषेकशक तयाला । लोकांमाजीं बोलती ॥ १४६ ॥
'स्वस्तीश्रीशिवछत्रपती' । ऐसें नाम गर्जलें दिगंतीं ।
अतुल अमल झाली कीर्ती । धन्यतम नृपाची ॥ १४७ ॥
मग द्विजांस दक्षिणा अपार । अर्पण करी तो नृपवर ।
वस्त्रें भूषणें अलंकार । विप्रांलागीं देतसे ॥ १४८ ॥
जैशी ज्याची होती योग्यता । तैशीं दानें दिधलीं समस्तां ।
मग नृपें करवून सिद्धता । भोजन दिधलें सर्वांसीं ॥१४९॥
सुंदर मिष्टान्नें परोपरी । सर्वांस अर्पून दिवस चारी ।
राव सर्वांस तुष्ट करी । अन्नदानें अत्यंत ॥ १५० ॥
नट नर्तकादि गुणी जन । रायें गौरविले देऊन धन ।
भणंग भिकार गरीब दीन । यांसही द्रव्य दीधलें ॥१५१॥
अन्नशांती द्रव्यदान । योग्य सन्मान मधुर भाषण ।
चार प्रकारें अभ्यागत जन । संतुष्ट अत्यंत जाहले ॥१५२॥
सकल विधीचा सूत्रधार । तो गागाभट्ट द्विजवर ।
रायें गौरवून अपार । पूजा केली तयाची ॥ १५३ ॥
एकलक्ष सुवर्ण होन । रायें भट्टास केलें अर्पण ।
दश सुवर्ण कलश आणून । नृपवर्यें अर्पिले ॥ १५४ ॥

सुंदर गज तीन अर्पिले । दश अश्व समर्पिले ।
शिबिकायान प्रेमें दिधलें । गागाभट्टास नृपानें ॥ १५५ ॥
कंठ्या चौकडे तुरे हार । सुवर्ण रौप्य भाजनें अपार ।
इत्याद्यनेक वस्तु नृपवर । अर्पण करी भक्तीनें ॥ १५६ ॥
गागाभट्टास दानें दिधलीं । नानापरींचीं असतीं वर्णिलीं ।
त्यांतील कांहीं येथें लिहिलीं । विस्तरभयें संक्षिप्त ॥१५७॥
राज्याभिषेक पूर्ण जाहला । यथासांग सिद्धीस गेला ।
पुण्यप्रताप महिमा वाढला । शिवरायाचा अपार ॥१५८॥
राज्याभिषेक कथा मधुर । पूर्वस्थितीची स्मारक सुंदर ।
आमुचे महाराष्ट्र बंधु समग्र । भक्तिपूर्वक वाचोत ॥१५९॥
धन्य धन्य शिवभूपती । स्वप्रतापें केली ख्याती ।
स्वराष्ट्रास दिधली उन्नती । चित्र चरित्र दावुनी ॥ १६० ॥
श्रीशिवविजयग्रंथ । शिवावतारचरित्र अद्भुत ।
वर्णन करी भावें अनंत । सप्तविंशतितमोध्याय गोड हा ॥१६१॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

# अध्याय २८ वा.

॥ श्रीगणेशायनमः ॥

राज्याभिषेक झालियावरी । तो प्रतापशाली यवनारी ।
सिंहासनीं बैसून राज्य करी । अष्टप्रधानांसमवेत ॥ १ ॥
ऐसा कांहीं काळ लोटला । पुढें चमत्कार एक घडला ।
तो पाहिजे श्रवण केला । श्रोतीं चित्त देउनी ॥ २ ॥
विचित्र जगाची असे रहाटी । चमत्कारिक घडती गोष्टी ।
भिन्नभिन्न कोट्यानुकोटी । कृत्यें घडती जगांत ॥ ३ ॥
एक सत्कृत्यें करूं लागतो । दुसरा अकर्मीं रत होतो ।
कार्याकार्याचा योग घडतो । जगामध्यें सर्वदां ॥ ४ ॥
शिवराजा पुण्य पावन । नित्य करी सत्कर्माचरण ।
सत्कार्याची केवळ खाण । ऐशी कीर्ती जयाची॥ ॥ ५ ॥
संभाजीराव त्याचा सुत । पापकर्मीं ठेवी चित्त ।
किती भिन्नत्व पितापुत्रांत । काय आश्चर्य याहुनी ॥ ६ ।
तयाचें एक दुराचरण । या अध्यायीं करूं कथन ।
ओघास आलें ह्मणुनी श्रवण । श्रोतीं केलें पाहिजे ॥ ७ ॥
संभाजीराव मित्रांसहित । होता पन्हाळ्यावरी राहत ।
शिवनृपाळ नव्हते तेथ । गेले होते करवीरा ॥ ८ ॥
संभाजीचे मित्र तरुण । होते दुराचारी पूर्ण ।
त्यांचे संगें याचें मन । होतें दूषित जाहलें ॥ ९ ॥
स्वच्छंदपणें करी भ्रमण । गुप्त करी सुरापान ।
परस्त्रीवरी ठेवी मन । व्यभिचार कर्मे करीतसे ॥ १० ।

एके दिवशीं सायंकाळीं । सर्व घेऊन मित्रमंडळी ।
संभाजीची स्वारी निघाली । स्वछंद भ्रमण करावया ॥ ११ ॥
हास्य विनोदादि चेष्टा करीत । नाना स्थळीं भ्रमत भ्रमत ।
तो दुर्वृत्त शिवसुत । देवालयीं पातला ॥ १२ ॥
अंबिकेचें रम्य मंदिर । होतें रायें बांधिलें सुंदर ।
तेथें येऊन तो शिवकुमर । वंदन करी देवीतें ॥ १३ ॥
कांहीं वेळ फिरून मंदिरीं । मित्रांसह आला बाहेरी ।
मग चढून गोपुराउपरी । शोभा पाहत बैसला ॥ १४ ॥
देवीदर्शनाकारण । राउळीं येती नागारिक जन ।
त्यांकडे पाहत शिवनंदन । कांहीं काळ बैसला ॥ १५ ॥
नारी नर वृद्ध तरुण । सर्व येती वंदनाकारण ।
अंबिकेचें घेऊन दर्शन । क्षिप्र जाती स्वकार्या ॥ १६ ॥
इतुकिया अवसरीं । आली एक विप्रकुमरी ।
ती लावण्यलतिका सुंदरी । संभाजीनें देखिली ॥ १७ ॥
ती बाला विप्रांगना । सुमनोहर नवयौवना ।
लावण्यलतिका प्रियदर्शना । परम सुंदरा दिसतसे ॥ १८ ॥
बुट्टीदार शालू नेसली । भर्जरी कंचुकी परिधान केली ।
बकुल कुसुमें होतीं घातलीं । वेणीमाजीं तियेनें ॥ १९ ॥
प्रफुल्ल दिसे मुखकमल । हरिणीसारिखे नेत्र चंचल ।
चांफेकळीसारिखें सरळ । नासिक शोभे तियेचें ॥ २० ॥
मनोहर विशाळभाळीं । कुंकुमाची चीर रेखिली ।
गौरवर्णें काया शोभली । द्विजांगनेची अतिशयें ॥ २१ ॥
आधींच मूर्ति परम सुंदर । त्यांत यौवनाचा आला भर ।
मनोहरत्व अतितर । सहज होतें पातलें ॥ २२ ॥

ती बाळा लज्जावती । रजतपात्र घेऊन हातीं ।
अधोमुख मंदगती । येत होती देवालयीं ॥ २३ ॥
सुंदरमूर्ति दृष्टीं देखून । मोहित झाला शिवनंदन ।
हृदयीं चेतला काम दारुण । योग्यायोग्य विसरला ॥ २४ ॥
नव्हता इंद्रियदमनाभ्यास । मन होतें विकारवश ।
थारा नव्हता विवेकास । ह्मणून मदन चेतला ॥ २५ ॥
सुंदरीकडे डोळे लागले । अनंगसंचारें अंग तापलें ।
क्षणेक देहभान गेलें । शिवसुताचें तेधवां ॥ २६ ॥
ती सुंदरी विप्रकांता । इतस्ततः कांहीं न पाहतां ।
जाऊन देवालयीं तत्वतां । वंदी भावें देवीतें ॥ २७ ॥
घालून कांहीं प्रदक्षिणा । मग सुकुमार सुलोचना ।
बाहेर आली चंद्रानना । हंसगतीनें चालत ॥ २८ ॥
रम्य चत्वरीं प्राप्त झाली । क्षणेक तेथें उभी राहिली ।
सलज्ज दृष्टीनें पाहूं लागली । सभोंवार एकदां ॥ २९ ॥
तारुण्याच्या ऐन भरांत । कुतूहल असतें जागृत ।
सृष्टचमत्कार शोभिवंत । वाटती पहावे पुनःपुनः ॥ ३० ॥
कुतूहलें प्रेरणा केली । ह्मणून सुंदरी पाहूं लागली ।
सहज गोपुरीं दृष्टी गेली । लावण्यकलिकेची तेधवां ॥ ३१ ॥
तिचेकडे डोळे लावून । पाहत होता शिवनंदन ।
ह्मणून दृष्टीचें संमीलन । दोघांच्याही जाहलें ॥ ३२ ॥
अन्योन्य दृष्टी एक झाली । द्विजस्त्री चित्तीं लाजली ।
तिनें मान खालीं घातली । चालू झाली त्वरेनें ॥ ३३ ॥
न पाहतां इतस्ततः । मार्गे गेली विप्रकांता ।
येरीकडे शिवसुता । अनंग वीरें ग्रासिलें ॥ ३४ ॥

सुंदरीनें कटाक्ष फेंकिला । तो बाणासम हृदयीं लागला ।
शिवकुमार विव्हळ झाला । मदनभरें तेधवां ॥ ३५ ॥
सुंदरीकडे डोळे लावून । एकाग्र पाहे शिवनंदन ।
दृष्टीआड होतां श्वास सोडून । कांहीं खिन्न जाहला ॥३६॥
मग बोले मित्रांप्रती । अहा ही कोण रम्य युवती ।
चारुगात्री लावण्यवती । मम मन आकर्षिते ॥ ३७ ॥
हांसून एक मित्र बोले । तुज काय बा वेड लागलें ।
अगम्य स्त्रीकडे डोळे । काय म्हणून लाविशी ॥ ३८ ॥
ती ब्राह्मणी पतिव्रता । दुर्गाधीशाची प्रिय कांता ।
तुजला अयोग्य सर्वथा । तिजकडे पाहणें ॥ ३९ ॥
परम कुलीन तिचा भ्रतार । तव पित्याचा शूर सरदार ।
प्रस्तुत रायाबरोबर । स्वारीस गेला असे तो ॥ ४० ॥
अप्राप्य स्त्रीकाम धरशील । तरी व्यर्थ संताप होईल ।
आशाभंगें झुरणी लागेल । तुजप्रती निश्चयें ॥ ४१ ॥
ऐकून ऐसें मित्रवचन । क्रोधावला तो शिवनंदन ।
म्हणे मुर्खासारिखें भाषण । काय म्हणून करितोस ॥ ४२ ॥
मी शूर वीर नृपकुमर । माझी सत्ता अवघ्यांवर ।
हें स्त्रीरत्न सुमनोहर । योग्य आहे मजप्रती ॥ ४३ ॥
तिनें नेत्रकटाक्ष फेंकिले । मज आपुलें प्रेम दर्शविलें ।
माझेंही असे प्रेम जडलें । तिजवरती सर्वथा ॥ ४४ ॥
अन्योन्य प्रेम एक होतां । येते सहज एकत्व पात्रता ।
जात गोत वय तत्वतां । पाहणें नको कांहींही ॥ ४५ ॥
दुजा मित्र बोले हांसून । तूं होशी अविचारभाजन ।
तिणें तुझें मुखावलोकन । केलें नाहीं जाणिजे ॥ ४६ ॥

हरिणाक्षीचे चंचल नयन । सहज गेले तुझ्यावरून ।
तूं ह्मणशी प्रेमदर्शन । तिणें केलें मजप्रती ॥ ४७ ॥
ती निष्पाप निर्दोष । न होईल उपायशतें वश ।
सोडून देई तिची आस । तरीच सौख्य होईल ॥ ४८ ॥
मग बोले शिवनंदन । कां हो करितां प्रतिकूल भाषण ।
ती सुंदरी बळें भोगीन । सुखें वश न होतां ॥ ४९ ॥
उदयीक येऊन या स्थानीं । हरण करूं ती रम्य कामिनी ।
तुह्मी माझे मित्र ह्मणुनी । साह्य मजला करावें ॥ ५० ॥
मग तयांचा संकेत ठरला । निघून गेले स्वस्थळाला ।
संभाजीतें वेध लागला । सुंदरीचा अतिशयें ॥ ५१ ॥
न रुचे सुग्रास भोजन । निद्रा न ये करितां शयन ।
पीडा करी फार मदन । चैन न पडे सर्वथा ॥ ५२ ॥
जिवास तळमळ लागली । युगाएवढी रात्र झाली ।
संभाजीची काया तापली । नेत्रां आली रक्तिमा ॥ ५३ ॥
उठोनियां प्रातःकालीं । जमवी आपुली मित्रमंडळी ।
कार्यसिद्धीची युक्ति योजिली । चांडाळचौकडीनें तेधवां ॥ ५४ ॥
कामांध निर्लज्ज परम नष्ट । साहसीं उद्युक्त झाले पापिष्ठ ।
सायंकाळाची पाहती वाट । दुष्ट कृत्य साधावया ॥ ५५ ॥
संकेतवेळ जवळ आली । चांडाळांची टोळी निघाली ।
देवालयीं शीघ्र आली । दीन धेनू गांजावया ॥ ५६ ॥
नित्यक्रमास अनुसरून । ती ब्राह्मणी सुंदरी दीन ।
आली घ्यावया देवीदर्शन । न जाणे घात कांहींही ॥ ५७ ॥
एकली चरण चाली चालत । भावें शिरली देवालयांत ।
देवीसमोर जाऊन त्वरित । वंदन करी भक्तीनें ॥ ५८ ॥

प्रदक्षिणेचा हेतू धरूनी । शीघ्र उठली विप्रकामिनी ।
एक प्रदक्षिणा घालूनी । दुजी पुनः आरंभी ॥ ५९
आतां येणार कठिण वेळा । कांहींच नेणे विप्रबाळा ।
दुर्दैव काळ येऊन ठपला । अबलेचा तेधवां ॥ ६० ॥
आरंभून दुज्या प्रदक्षिणेस । अबला गेली मागील बाजूस ।
तों धर्षणकामुक केवळ राक्षस । जवळ तीच्या पातले ॥६१॥
कामांधांनीं लगट केली । ह्मणून अबळा ओरडली ।
कर्मनष्टांनीं उचलून नेली । गुप्त मार्गें झडकरी ॥ ६२ ॥
विप्रभार्या आक्रंदत । परी कोणी न ये साह्यार्थ ।
संकेत सदनीं नेऊन त्वरित । तिज ठेविती तत्क्षणीं ॥६३॥
सुंदर खोली शृंगारिली । तींत बळें तिजला कोंडिली ।
ढळढळा रडे विप्रबाळी । दया कोणास उपजेना ॥ ६४ ॥
दशाननें सीता हरिली । अशोकवनीं नेऊन ठेविली ।
तैशीच येथें स्थिती जाहली । परम दीन अबलेची ॥ ६५ ॥
दुःखें रडे विप्रकामिनी । विनवण्या करी हात जोडुनी ।
परी ते मदांध दुष्ट दुर्गुणी । दया न करिती तिजवरी ॥६६॥
रात्र होतां एक प्रहर । नीट नेटका करून शृंगार ।
तो कामांध शिवकुमर । तिचेसमीप पातला ॥ ६७ ॥
अबला सलज्ज उठली । मुख फिरवून उभी राहिली ।
स्फुंदस्फुंदोन रडूं लागली । संभाजीतें पाहुनी ॥ ६८ ॥
मग तो निर्लज्ज सकामपुरुष । ह्मणे कासया दुःख करितेस ।
सुकुमार मूर्ती श्रमवितेस । व्यर्थ कां बरें सुंदरी ॥ ६९ ॥
मी श्रीमंत नृपकुमार । तुझें रूप पाहून मनोहर
भाळलों सुंदरी तव किंकर । झालों निःशंक प्रियतमे ॥७०॥

लाडक्ये काय हा तनुकंप । टाकीं प्रिये आतां कोप ।
मजवरी होऊन सकृप । पाहीं प्रेमकटाक्षें ॥ ७१ ॥
परिसतां ऐसें निर्लज्ज भाषण । अबला झाली कोपायमान ।
नेत्र झाले आरक्त वर्ण । रोमांच उभे राहिले ॥ ७२ ॥
ह्मणे निर्लज्जा काय वदसी । कोणावरी दृष्टी ठेविशी ।
कुलशीलाचा विचार टाकिशी । अंध होऊन दुरात्म्या ॥ ७३ ॥
तुजशीं बोलावयाकारण । इच्छित नाहीं माझें मन ।
दुष्टा काळें तोंड करून । जाई येथून झडकरी ॥ ७४ ॥
दुष्ट बोले कोमलांगी । कशास हा कोप वरपंगी ।
येऊन झडकरी मज आलिंगीं । प्रियतमे सुंदरी ॥ ७५ ॥
माझ्यासारिखा मोहरा सुंदर । कोणास नाहीं आवडणार ।
तुझें रूप सुमनोहर । मज योग्य अंगने ॥ ७६ ॥
काय हा तुमचा स्त्रीस्वभाव । अंतरीं असतां प्रेमभाव ।
बाह्यात्कारें प्रेमाभाव । उगाच नरां दावावा ॥ ७७ ॥
पुनः पुनः झिडकारून । नको नको असकृत् ह्मणून ।
लुब्ध करावें आमुचें मन । यांत काय वाटतें ॥ ७८ ॥
तव कटाक्षें विद्ध जाहलों । मदनतापें फार पोळलों ।
ह्मणून सुंदरी शरण आलों । कृपा करीं मजवरी ॥ ७९ ॥
शरीर निववील आलिंगन । तुष्टी देईल मधुर वचन ।
तरी आतां कृपा करून । विलंब न करीं सुंदरी ॥ ८० ॥
अबला बोले क्रोधसंतप्त । किडे पडोत तुझ्या मुखांत ।
त्वदुक्ति नाहीं ऐकवत । मजप्रती मदांधा ॥ ८१ ॥
धन्य महात्मा शिवनृपती । निष्पाप असें जया वर्णिती ।
त्याचे पोटीं मंदमती । निपजलासि कैसा पामरा ॥ ८२ ॥

मी शुद्ध ब्राह्मण कामिनी । तूं जातीचा शूद्र असुनी ।
अविचारें मूर्ख होउनी । काय बरळसी मदांधा ॥ ८३ ॥
अगम्य स्त्रीची धरून आस । मोठमोठे पावले नास ।
तेथें तुझ्या पतनास । वेळ काय मदांधा ॥ ८४ ॥
जगीं मान्य तुझें कुळ । तुझा पिता शुद्ध केवळ ।
कृत्य करून अमंगळ । व्यर्थ डाग लाविसी ॥ ८५ ॥
तुझ्यासंगे बोलणें फार । मला नावडे खरोखर ।
यास्तव सांगत्यें एक निर्धार । तुजप्रती मदांधा ॥ ८६ ॥
सूर्य उगवेल पश्चिमेस । कडू लागेल सुधारस ।
ध्रुव सोडील आपुल्या पदास । चंद्र तप्त होईल ॥ ८७ ॥
परी निर्मळ माझें मानस । कधीं न करील अकार्यास ।
हाच माझा निश्चय खास । परम दुष्टा जाणिजे ॥ ८८ ॥
कांहीं करिशील बलात्कार । तरी आपटीन मम शीर ।
खंडविखंड करून शरीर । प्राण येथें देईन ॥ ८९ ॥
निश्चयवचन ऐसें ऐकून । क्रोधावला तो शिवनंदन ।
ह्मणे मूर्खे तूं सुखेंकरून । नाहीं ऐकत मद्वच ॥ ९० ॥
कामांध चित्तीं क्रोधावला । क्षणएक स्तब्ध राहिला ।
धाय मोकलून ते अबला । रुदन करी उच्च स्वरें ॥ ९१ ॥
पांडवभार्या कृष्णा सुंदरी । सांपडली त्या कीचकमंदिरीं ।
विप्रअबला तीचे परी । त्याच संकटीं पडियेली ॥ ९२ ॥
कीचकासमान नीच पामर । जवळ उभा तो शिवकुमर ।
गडबडलें तिचें अंतर । धांवा करी देवीचा ॥ ९३ ॥
देवी अंबिके दीनवत्सले । मी तुजप्रती शरण आल्यें ।
लाज माझी राखी दयाळे । कठिण प्रसंग पातला ॥ ९४ ॥

क्षणेक करून विचार । बोलता झाला शिवकुमर ।
मूर्खे तूं कष्टविलेंस फार । मजप्रती प्रस्तुत ॥ ९५ ॥
तुझा देह माझे स्वाधीन । पहा बळें मी उपभोगीन ।
पाहूं कैसा देतेस प्राण । व्यर्थ बडबड चालविशी ॥ ९६ ॥
मुखें ऐसें अवाच्य बोलत । पुढें सरसावला शिवसुत ।
दीन अबलेचा धरी हस्त । महा चांडाळ दुरात्मा ॥ ९७ ॥
हस्त धरितां किंकाळली । धरित्रीवरी काया टाकिली ।
गडबडां लोळों लागली । विप्रभार्या तेधवां ॥ ९८ ॥
मदांधाचा हस्त सुटला । कांहीं दूर झाली अबला ।
सर्वांगास कंप सुटला । द्विजभार्येच्या तेधवां ॥ ९९ ॥
क्रोधें संतप्त झालें शरीर । दिसों लागली भयंकर ।
पाय आपटोन भूमीवर । अबला करी भाषण ॥ १०० ॥
अरे चांडाळा खळा मलिना । काय धरितोस दुष्ट वासना ।
ही पवित्र विप्रांगना । हस्तस्पर्शें विटाळिशी ॥ १०१ ॥
ज्या नयनीं मज पाहतोस । ते शत्रू फोडील खास ।
ज्या जिव्हेनें कुशब्द वदतोस । कापील शत्रू तीच रे ॥ १०२ ॥
केलास माझा अत्यंत छल । शत्रू तुझे करील हाल ।
दुष्टा तुझी मान कापील । शत्रू सत्य जाणिजे ॥ १०३ ॥
सांपडून शत्रूचे हातीं । तुझा वध होईल निश्चिती ।
ही माझी शापउक्ती । भवानी सत्य करील ॥ १०४ ॥
ऐकतां ऐसें तीक्ष्ण वचन । मदांध क्रोधावला दारुण ।
ह्मणे आतां घेतों प्राण । तुझाच पहा ये समयीं ॥ १०५ ॥
अविचारें भरीं भरून । गेला तिजजवळी धांवून ।
तिजला धरी कवटाळून । काय नीचता वर्णावी ॥ १०६ ॥

येतां ऐसा प्रसंग दारुण । सुटलें साध्वीचें देहभान ।
एकदांच किंकाळी फोडून । बळें आक्रंदूं लागली ॥१०७॥
एकवटून सर्व बळ । उच्च शब्दें रडे वेल्हाळ ।
सदन दणाणलें सकळ । रुदनशब्दें सतीच्या ॥ १०८ ॥
इतुकियांत सदनांगणीं । गलबल्याचा उठला ध्वनी ।
'कोण रुदन करितें सदनीं' । ऐसा शब्द ऊठला ॥१०९॥
सदनाच्या द्वारावर । होऊं लागले तदा प्रहार ।
ते ऐकून तो शिवकुमार । मनामाजीं खोंचला ॥ ११० ॥
द्विजांगनेस त्वरें सोडून । बाहेर पाहे डोकावून ।
तंव तो शिवराय गुणनिधान । दृष्टीस पडला तयाच्या ॥१११॥
पराभवून वैरी समस्त । येत होता सैन्यासहित ।
रुदनस्वर ऐकून तेथ । होता उभा राहिला ॥ ११२ ॥
नृपतीस अद्भुत वाटलें । ह्मणून तयें द्वार फोडिलें ।
मग शिवराय प्रवेशले । सदनामाजी सशस्त्र ॥ ११३ ॥
नीट पाहती न्याहाळून । तंव ब्राह्मणी करिते दीर्घ रुदन ।
जवळ उभा आपुला नंदन । ऐसें दृष्टीं देखिलें ॥ ११४ ॥
चित्तीं खोंचला नृपवर । मग जोडून उभय कर ।
द्विजस्त्रीशीं बोले मधुर । शिवनृपाळ महात्मा ॥ ११५ ॥
मुली रडतेस काय कारण । गांजीतसे तुजप्रती कोण ।
वद साध्वी कृपा करून । निर्भय चित्तीं होउनी ॥ ११६ ॥
शिवमूर्ति प्राप्त झाली । तेणें साध्वी संतोषली ।
ह्मणे भवानी मज पावली । तिनेंच राया धाडिलें ॥ ११७॥
मग बोले अश्रु पुसून । तूं माझा पिता सुजाण ।
करी माझें आतां रक्षण । या नीचाचे हातुनी ॥ ११८ ॥

हा नीच अधम नर । करूं पाहे बलात्कार ।
तूं आलास परमेश्वर । सोडींव मजला येथुनी ॥ ११९ ॥
सुंदरीचें ऐकून भाषण । स्वपुत्राची कृती पाहून ।
प्रथम अंतरीं खिन्न होऊन । मग राव क्रोधावला ॥१२०॥
सुताकडे क्रोधें पाहून । शिवनृपाळ करी भाषण ॥
हा हा नीचा दुष्कृत्य करून। डाग लाविलास मजप्रती॥१२१॥
मुर्खा कशास जन्मलास । कलंक स्वकुळा लाविलास ।
दीन अबला गांजिलीस । कैसा झालास मदांध ॥ १२२ ॥
निज मातेच्या उदरांतून । कां न पडलास मूर्खा गळून ।
काय केलेंस जन्मा येऊन । दुष्टा मलिना पातक्या ॥१२३॥
नानापरी तो राव सगुण । करी पुत्राचें निर्भर्त्सन ।
येरू खालीं मान घालून । मौनें उभा राहिला ॥ १२४ ॥
मग सेवकांस आज्ञापून । राव स्वसुतास करी बंधन ।
भृत्यांस ह्मणे यथाकारण । कारागृहीं ठेविजे ॥ १२५ ॥
नृपालाज्ञा त्यांस प्रमाण । भृत्य गेले तया घेऊन ।
मग तो शिवराय गुणनिधान। काय करिता जाहला॥१२६॥
म्लानवदनें पुढें होऊन । ब्राह्मणीचें करी समाधान ।
ह्मणे आतां गृहीं जाऊन । स्वस्थ राहे कन्यके ॥ १२७ ॥
हा हा बहुत कष्टलीस । दुष्टाकरवीं गांजलीस ।
अत्यंत ताप पावलीस । आतां शांत होइजे ॥ १२८ ॥
देखून नृपाचें शुद्ध चित्त । द्विजांगना झाली हर्षित ।
ह्मणे तूं महात्मा समर्थ । तात माझा शिवराया ॥ १२९ ॥
आयुष्य असो तुज उदंड । वाढो तुझें भाग्य अखंड ।
त्वत्कीर्तीनें भरो ब्रह्मांड । नरनायका सभाग्य ॥ १३० ॥

मग तियेचें शहाजीनंदन । परोपरी करून सांत्वन ।
तिच्या सदनीं तिला नेऊन । स्वयें पोचवी भूपती ॥ १३१ ॥
स्वसुतास कारागृहांत । बंदोबस्तें भूप ठेवित ।
दुर्वर्तनें दुःख पावत । स्वपुत्राच्या शिवराय ॥ १३२ ॥
ऐसा कांहीं काळ लोटला । शिवनृपाळ स्वारीस गेला ।
कारागृहीं होता राहिला । राव संभाजी तेधवा ॥ १३३ ॥
शिवराय नाहीं गडावर । ऐसा पाहूनियां अवसर ।
तो पापिष्ठ शिवकुमर । काय करिता जाहला ॥ १३४ ॥
बहुत धनाची दावून आस । कांहीं रक्षकांस करी वश ।
मग तत्साह्यें रात्रीस । पळून गेला तेथुनी ॥ १३५ ॥
स्वराज्यीं न मिळेल आधार । ह्मणून मुर्ख गेला दूर ।
दिलेलखान यवन सरदार । त्यास जाऊन भेटला ॥ १३६ ॥
शिवनृपाचा पुत्र आला । ह्मणून यवनें सन्मान केला ।
गौरवून जवळ ठेविला । राजकारण साधावया ॥ १३७ ॥
यापरी नृपपुत्र मूर्ख निघाला । मदें परस्त्रीकामुक झाला ।
ह्मणून घोर शाप पावला । साध्वी पासून दूरात्मा ॥ १३८ ॥
पतिव्रतेचा शाप वठेल । विधीसही न टाळेल ।
साध्वी स्त्रीयेचा करितां छल । नाश होईल निश्चयें ॥ १३९ ॥
यापरि दुःखद कथा वर्तली । पितापुत्रांत फूट पडली ।
पुढें कैशी स्थिती जाहली । श्रोतीं सादर परिसावें ॥ १४० ॥
इति श्रीशिवविजय ग्रंथ । शिवावतार चरित्र अद्भुत
वर्णन करि भावें अनंत । अष्टाविंशतितमोध्याय गोड हा ॥ १४१ ॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

# अध्याय २९ वा.

॥ श्रीगणेशायनमः ॥

पूर्वाध्यायीं झालें कथन । संभाजीराव गेला पळून ।
आतां पुढील कथा वर्णन । श्रोतीं सादर परिसावें ॥ १ ॥
नृपपुत्र हातीं आला । दिलेलखानास हर्ष वाटला ।
ह्मणे हा थोर लाभ झाला । आपणाप्रती निश्चयें ॥ २ ॥
दिल्लीपतीतें पत्र लिहित । हस्तगत झाला शिवसुत ।
याचे योगें आपुला अर्थ । बहुत बरा साधेल ॥ ३ ॥
सत्कार करून परोपरी । यातें अर्पाव्या जहागिरी ।
प्राप्त झाली संधी बरी । आपुला विजय साधावया ॥ ४ ॥
आपण चढवितां वैभवास । बहुत मराठे मिळतील यास ।
मग न पडतां फार आयास । शिवाजीतें पराभवूं ॥ ५ ॥
अविचारी दिलेलखान । यापरी दिल्लीस पत्र लिहून ।
संभाजीचा बहुत सन्मान । बाह्यात्कारें ठेवीतसे ॥ ६ ॥
दिल्लीपतीस पत्र पावलें । तेणें सर्व वृत्त श्रुत झालें ।
दिलेलखानाचें कृत्य वाटलें । फार अयोग्य तयाप्रती ॥ ७ ॥
संशयग्रस्त दिल्लीश्वर । क्रोधावला दिलेलावर ।
ह्मणे येणें न करितां विचार । शत्रू घरांत घेतला ॥ ८ ॥
शिवपुत्र पळून आला । हें मिथ्या वाटतें मनाला ।
बहुधा शिवाजीनें पाठविला । असेल छद्में तयातें ॥ ९ ॥
मराठे आपुल्या कापट्यबळें । काय बहाणे करितील न कळे ।
आंतून एक असून सगळे । दाविती द्वैत उगाची ॥ १० ॥

यांचा इतबार न धरावा । यांशीं संबंध नसावा ।
कठिण मराठी असे कावा । आहे अनुभव नेहमींचा ॥ ११ ॥
अनुभवाविरुद्ध दिलेलखानें । अविचारें अत्यंत मूर्खपणें ।
हानी परिणामीं होईल जेणें । केलें कर्म ऐशापरी ॥ १२ ॥
दिलेलावरी करून क्रोध । मग काय करी दुष्ट अविंध ।
खानजहान नामें प्रसिद्ध । सरदारातें आज्ञापी ॥ १३ ॥
तुवां जाऊन दक्षिणेंत । कैद करावा शिवसुत ।
तया घेऊन येथें त्वरित । आह्मापुढें आणावा ॥ १४ ॥
ऐशी शहाची आज्ञा परिसून । अवश्य ह्मणे खानजहान ।
मग कांहीं सैन्य घेऊन । दिल्लीहून निघाला ॥ १५ ॥
दिलेलाचा एक वकील । होता पातशहाजवळ ।
तयाप्रती वृत्त सकळ । राजदरबारीं समजलें ॥ १६ ॥
तेणें त्वरा करून बहुत । पाठविला दूत दक्षिणेंत ।
दिलेलातें केलें श्रुत । वर्तमान दिल्लीचें ॥ १७ ॥
वृत्त परिसतां घाबरे खान । मग संभाजीस पाचारून ।
ह्मणे तुह्मीं जावें निघून । आह्मापाशीं न रहावें ॥ १८ ॥
दूतमुखें वार्ता आली । बादशहाची आज्ञा झाली ।
दिल्लीहून सेना निघाली । तुह्मांस कैद करावया ॥ १९ ॥
आश्रय दिधला तुह्माप्रती । तेणें क्रोधावला दिल्लीपती ।
आह्मांसही कांहीं संप्रती । दंडील ऐसें वाटतें ॥ २० ॥
आतां आपला विचार पहावा । निज सदनाचा मार्ग धरावा ।
क्षणमात्र विलंब न करावा । तरीच प्राण राहील ॥ २१ ॥
आह्मावरी विश्वासून । राहिलेत येथें येऊन ।
याकारणें केलें कथन । गुप्त वृत्त तुह्मांतें ॥ २२ ॥

ऐकून ऐसें अप्रिय वृत्त । घाबरा झाला तो शिवसुत ।
ह्मणे हा हा गुदरला अनर्थ । यासमयीं मजवरी ॥ २३ ॥
कोण देईल मजला थारा । कैसा परतून जाऊं घरा ।
मजसारिख्या चांडाळ नरा । आश्रय कोणी न देईल ॥२४॥
विप्रस्त्रीचें केलें छळण । थोर पित्याचें केलें वंचन ।
आतां आपलें कृष्णवदन । कैसें दाखवूं तयाला ॥ २५ ॥
पापीं मन आवरून धरितों । तरी स्वगृहीं सुखी असतों ।
कशास ऐसें दुःख पावतों । परसदनीं येउनी ॥ २६ ॥
पश्चात्तापें बहु पोळला । संभाजीराव रडूं लागला ।
ह्मणे माझा घात झाला । मरण बरें मज आतां ॥ २७ ॥
दिलेलखान करी उत्तर । तव पिता आहे परमोदार ।
जा तयाचे चरण धर । कृपा करील तुजवरी ॥ २८ ॥
ह्मणे संभाजी सत्य वचन । मी पित्यास शरण जाईन ।
शिक्षा करितां सुखें भोगीन । मीच पातकी दुरात्मा ॥२९॥
मग मनीं होऊन खिन्न । तेथून निघे शिवनंदन ।
नृपतीचे समीप जाऊन । चरण धरी तयाचे ॥ ३० ॥
अश्रुधारा नयनीं वाहती । शरीरीं रोमांच उभे राहती ।
कंप सुटला देहाप्रती । संभाजीच्या तेधवां ॥ ३१ ॥
होऊनियां सद्गदित । मग जोडून उभय हस्त ।
बोलता झाला भीत भीत । अत्यंत नम्रत्व दाउनी ॥ ३२ ॥
अविचारमोहें भरीं भरलों । नाना पापकर्में आचरलों ।
आतां पश्चात्ताप पावलों । तरी क्षमा करावी ॥ ३३ ॥
आतां न करीन दुराचरण । आज्ञेनुरूप करीन वर्तन ।
वत्सलत्वें क्षमा करून । अंगिकार माझा करावा ॥ ३४ ॥

गंभीरपणें वदे नृपती । तूं दुष्ट पातकी मूढमती ।
आह्मी सज्जनाचे पक्षपाती । दया न करूं तुजवरी ॥ ३५ ॥
दुष्कृत्यमळें झालास मलिन । ह्मणून ठेविला कैद करून ।
तेथून करूनि पलायन । मूढा गेलास वैऱ्याकडे ॥ ३६ ॥
जन्मवैरी आमुचे यवन । तयांप्रती गेलास शरण ।
त्यांनीं हांकलितां आलास फिरून । मूर्खा निर्लज्जा पातक्या ॥
ह्मणसी पश्चात्ताप असे जाहला । तरी अनुभव पाहिजे पाहिला ।
असेल चित्तास पालट पडला । तरी क्षमा करीन ॥ ३८ ॥
पन्हाळ्यावरी रहावें जाऊन । तेथें करावें सत्कर्माचरण ।
दृष्टीस येती जैसे गुण । तैसें पुढें घडेल ॥ ३९ ॥
मग सेवकांस आज्ञापून । स्वसुतास काढी तेथून ।
पन्हाळ्यावरी ठेवी नेऊन । शिवराय तयातें ॥ ४० ॥
संभाजीस शिक्षा लागली । तेणें वृत्ती कांहीं पालटली ।
सत्कर्माचरणीं बुद्धी ठेविली । तयींपासून तयानें ॥ ४१ ॥
दुष्टत्वाग्नी होता पेटला । भीति—भस्माच्छादित राहिला ।
सर्वत्रांस वाटे विझाला । परी होता गुप्त तो ॥ ४२ ॥
संभाजीचें दुष्कर्मवृत्त । येथें संप्रती झालें समाप्त ।
आतां चित्त करून स्वस्थ । पुढें कथा चालवूं ॥ ४३ ॥
दिल्लीहून सरदार आले । होते स्थळीं स्थळीं राहिले ।
ते सर्व रायें पराभविले । अपार शौर्य दाउनी ॥ ४४ ॥
हतवीर्य झाले सर्व यवन । यशस्वी झाला शहाजीनंदन ।
महाराष्ट्रराज्यसंस्थापन । भरतखंडीं जाहलें ॥ ४५ ॥
सज्जनांचा ताप सरला । धर्म पूर्ववत् चालूं लागला ।
कीर्ती गेली दिगंतराला । पुण्यप्रतापी नृपाची ॥ ४६ ॥

दिल्लीपतीस वृत्त कळलें । आपुले सरदार भंग पावले ।
तया अत्यंत दुःख झालें । पूर्ण निराशा वाटली ॥ ४७ ॥
ह्मणे खुदा कोपावला । मराठ्यांस प्रसन्न झाला ।
पातशाही शिवाजीला । प्रस्तुत काळीं अर्पिली ॥ ४८ ॥
जोंवरी शिवाजी आहे जिवंत । तोंवरी आमुचे प्रयत्न व्यर्थ ।
होणार ऐसें दिसतें खचित । यांत संशय असेना ॥ ४९ ॥
ऐसा विचार मनीं करून । निरुत्साह जाहला तदा यवन ।
सर्व उपाय तयींपासून । सोडून दिधले तयानें ॥ ५० ॥
मग शिवराय करी विचार । पराभूत केले यवन वीर ।
आतां आणखी देश समग्र । मेळवावे बळानें ॥ ५१ ॥
अपार सेना सवें घेऊन । त्वरें निघे शहाजीनंदन ।
भागानगराचा मार्ग लक्षून । थोर गजरें चालले ॥ ५२ ॥
भागानगरीं कळे वृत्त । शिवाजी येतो सेनेसहित ।
बादशहा झाला भयाभीत । ऐशी वार्ता परिसुनी ॥ ५३ ॥
आकंणा मादंणा नामें करून । तेथें होते मुख्य प्रधान ।
पातशहा कथी तयां कारण । सख्य करावें शिवाजीसी ॥ ५४ ॥
तयापाशीं नम्र व्हावें । मागेल तें समर्पावें ।
संतुष्ट चित्त त्याचें करावें । भेट मात्र न होवो ॥ ५५ ॥
प्रत्यक्ष घडतां त्याचें दर्शन । न कळे काय होईल विघ्न ।
शिवाजी तो प्रत्यक्ष सैतान । ऐसें कर्णीं ऐकतों ॥ ५६ ॥
मग प्रधान पुढें निघाले । शिवरायातें विनयें भेटले ।
परस्परें सख्य केलें । बहुत गोड बोलुनी ॥ ५७ ॥
देखून नृपाची प्रसन्नता । तुष्ट झाले मंत्री उभयतां ।
मग नृपास ह्मणती तत्वतां । आमुच्या नगरीं चलावें ॥ ५८ ॥

शिवरायें मान्य केलें । त्यावरी प्रधान नगरीं गेले ।
बादशहातें श्रुत केलें । शिवराय येतसे ॥ ५९ ॥
शिवराय सज्जन उदार । प्रसन्न आहे तुह्मावर ।
होणार नाहीं अपकार । तयापासून तुह्मांतें ॥ ६० ॥
शिवनृपाची येणार स्वारी । ह्मणून शहा नगर शृंगारी ।
ध्वज पताका सुंदर उभारी । राजमार्गीं स्थळीं स्थळीं ॥ ६१ ॥
केशर कुंकुम मिश्र करून । त्यांनीं केलें मार्ग सिंचन ।
राजसभा शोभायमान । अति सुंदर शृंगारिली ॥ ६२ ॥
शिवनृपाची स्वारी निघाली । राजमार्गीं मंद चालली ।
नागरिकांची दाटी झाली । शिववदन पहावया ॥ ६३ ॥
रम्यवेषा नगरयुवती । खिडक्यामाजीं उभ्या राहती ।
नेत्र कमळें प्रफुल्ल होती । शिवमूर्ती पहावया ॥ ६४ ॥
मोदप्रद नृपालवदन । पाहून धाले त्यांचे नयन ।
करीं सुवर्ण कुसुमें घेऊन । तयावरी उधळिती ॥ ६५ ॥
ऐशापरी मार्ग क्रमुनी । नृपाळ पातला राजभुवनीं ।
बादशहा सामोरा होउनी । आंत नेई तयातें ॥ ६६ ॥
प्रेमयुक्त आलिंगन । देऊन करिती मधुर भाषण ।
सुखासनीं रायाकारण । पातशहानें बैसविलें ॥ ६७ ॥
प्रधान मुत्सदी थोर भले । सभास्थानीं होते बैसले ।
त्यांत शिवराय बहु शोभले । निज तेजें तेधवां ॥ ६८ ॥
शिवरायाची सुंदर मूर्ती । गवाक्षमार्गें यवनी पाहती ।
प्रेमयुक्त अंतरें होती । शिवदर्शनें तयांचीं ॥ ६९ ॥
बादशहाही तुष्ट होऊन । करी बहुमोल वस्तू अर्पण ।
अश्व गज रत्नें देऊन । शिवराया गौरवी ॥ ७० ॥

मधुर बोलून मित्रत्व दाविलें । शिवराय हीं आनंदले ।
अपार द्रव्य राया दिधलें । बादशहानें तेधवां ॥ ७१ ॥
मग शहाचा घेऊन निरोप । तेथून निघाला शिवभूप ।
जनां दावीत निज प्रताप । राव गजरें चालला ॥ ७२ ॥
पंथ क्रमितां सैन्यासहित । लागला 'श्रीशैल' परमपूत ।
सुक्षेत्र पुण्यकारक बहुत । देखून राव तोषला ॥ ७३ ॥
पुण्य क्षेत्रीं वास करून । करावा आपुला देह पावन ।
ऐसें रायें मनीं योजून । वसती केली त्या स्थळीं ॥ ७४ ॥
स्नान करून नीलगंगेंत । तीर्थविधी केला यथा पद्धत ।
अंतरीं होऊन भक्तियुक्त । श्रीचें दर्शन घेतलें ॥ ७५ ॥
परम रमणीय स्थानें देखिलें । प्रति कैलास राया भासलें ।
सबाह्याभ्यंतर निवालें । नृपाळाचें तेधवां ॥ ७६ ॥
मग रायें मनीं योजिलें । जन्मसाफल्य येथें जाहलें ।
तरी शिरकमळ पाहिजे वाहिलें । श्रीचरणावरी ये समयीं ॥७७॥
करावया शिरकमलार्पण । राव सरसावी आपुला कृपाण ।
इतुक्यांत भवानी प्रसन्न होऊन । नृपशरीरीं संचरली ॥७८॥
संचरून बोले देवी भवानी । राया मी तुझी कुलस्वामिनी ।
अघोर मार्गीं प्रवृत्त होउनी । काय कर्म आरंभिलें ॥७९॥
आत्महत्त्या येणें घडेल । महत्पाप पदरीं येईल ।
इच्छित मोक्ष दुरावेल । यास्तव हात आटोपीं ॥ ८० ॥
सद्धर्म जगीं तुवां स्थापिला । अवघा देश सुखी केला ।
आतां पाळून स्वीय प्रजेला । राज्यसुख भोगिजे ॥ ८१ ॥
नृपमुखें ऐसें वदून । देवी पावली अंतर्धान ।
राव क्षणेक मोह पावून । मूर्च्छागत जाहला ॥ ८२ ॥

यथोपचारें होतां जागृत । देवीवचन जाहलें श्रुत ।
मग जोडून उभय हस्त । केलें स्तवन देवीचें ॥ ८३ ॥
तदुपरी तेथून निघाला । सैन्यासहित राव चालिला ।
स्थळीं स्थळीं दुष्ट यवनांला । पराभवी भूपती ॥ ८४ ॥
शिवरायाचा बंधु सापत्न । जया व्यंकाजी ऐसें अभिधान ।
तो पित्याची जहागीर घेऊन । होता चालवीत बळानें ॥ ८५ ॥
यवनाशीं उजू राहून । करी प्रांत दुर्ग संपादन ।
चंदी चंदावरीं दोन प्रांत सघन । होते तेणें मेळविले ॥ ८६ ॥
शिवराय सेनेसहित । तयाप्रांतीं पातला त्वरित ।
निज बंधूप्रती भेटत । अत्यानंदें करूनी ॥ ८७ ॥
मग रायें लाविलें बोलणें । पितृधनाचे भाग करणें ।
आमुचा भाग आह्मांस देणें । सामोपचारें करूनी ॥ ८८ ॥
पित्याची समस्त जहागीर । कोण तुह्मींच उपभोगणार ।
आमुचा भाग आह्मांस सत्वर । आतां अर्पण करावा ॥ ८९ ॥
राज्यधन स्वसंपादित । आह्मापाशीं आहे बहुत ।
परी जहागीर वडिलार्जित । न सोडवे आह्मांतें ॥ ९० ॥
शिवराय ऐसें बोलला । व्यंकाजीस विषाद वाटला ।
मनीं बहुत खिन्न जाहला । व्यंकाजीराव तेधवां ॥ ९१ ॥
कांहींच न देतां प्रत्युत्तर । व्यंकाजी तेथून उठला सत्वर ।
मग गुप्तपणें करी विचार । आपुले मंत्री मेळवुनी ॥ ९२ ॥
तदा सांगती चतुर प्रधान । जरी कराल विरुद्ध वर्तन ।
तरी शिवराय कैद करून । ठेवील आतांच तुह्मांतें ॥ ९३ ॥
पाहून नृपाच्या अतुल बळा । व्यंकाजी मनीं भय पावला ।
मग रातोरात पळून गेला । शिवराया सोडुनी ॥ ९४ ॥

व्यंकाजी परम भाग्यहीन । मूर्खत्वें गेला नृपास टाकून ।
अहा कल्पद्रुमावरी रुसून । होणार लाभ कायसा ॥ ९५ ॥
नम्रपणें बोल बोलता । तरी शिवराय प्रसन्न होता ।
धन वैभव समर्पिता । प्रेमभावें बंधूतें ॥ ९६ ॥
रायाप्रती वृत्त कळलें । व्यंकाजीराव पळून गेले ।
नृपास परमाश्चर्य वाटलें । ह्मणे अज्ञान काय हें ॥ ९७ ॥
ईशकृपेनें धन दौलत । आह्मापाशीं आहे बहुत ।
परी कांहीं वाडिलार्जित । असावी ऐसें वाटलें ॥ ९८ ॥
भाग देते सामें करून । तरी स्वसंपादित देतों द्विगुण ।
काय मेळविलें आतां पळून । बंधुराजांनीं आमच्या ॥९९॥
शहाजीचा दासीकुमर । संताजीराव नामें शूर ।
होता तया प्रांतीं सरदार । तो भेटला नृपातें ॥ १०० ॥
रायें करून बहु सन्मान । त्यास दिधली जहागीर करून ।
साह्यार्थ सेना तया देऊन । वस्त्रें भूषणें अर्पिलीं ॥ १०१ ॥
व्यंकाजीतें पत्र लिहिलें । ' तुह्मीं अनुचित कृत्य केलें ।
वडिलांचें नांव मळविलें । पलायन करूनी ॥ १०२ ॥
पुढें ऐसें न करावें । स्वकुलाचें यश राखावें ।
आपुलें वैभव वाढवावें । कीर्ती बहुत मेळवावी ॥ १०३ ॥
तुमचा उत्कर्ष जईं ऐकेन । तईं तृप्त होतील माझे कान ।
भीरुत्व औदासिन्य टाकून । प्रताप आपुला दाविजे ॥१०४॥
तेथील करून बंदोबस्त । नृप निघाला सैन्यासहित ।
यवन दंडून दिग्विजय करीत । आपुल्या देशीं पातला ॥१०५॥
श्रीशिवविजय ग्रंथ । शिवावतार चरित्र अद्भुत ।
वर्णन करी प्रेमें अनंत । नवविंशतितमोध्याय गोड हा ॥१०६॥

# अध्याय ३० वा.

॥ श्रीगणेशाय नमः ॥

भरतखंड पुण्य प्रदेश । पूर्वापार सुखी विशेष ।
सद्धर्माचा जेथें निवास । अनादिकालापासुनी ॥ १ ॥
कांहीं काळ दुर्दैव ओढवलें । दुष्ट म्लेंच्छ प्रबळ झाले ।
त्यांनीं पापकर्म अत्यंत केलें । आर्यावर्तामाझारीं ॥ २ ॥
प्रजा अत्यंत दुःख पावली । सद्धर्मास ग्लानी आली ।
धरित्रीमाता बहु कष्टली । पापभारें करूनी ॥ ३ ॥
धरा ताप निवारणार्थ । पार्वतीरमण कैलासनाथ ।
भोंसल्यांचे पवित्र कुलांत । शिव रूपें अवतरला ॥ ४ ॥
मावळ्यांचा जमवून मेळा । स्वराज्याचा पाया घातला ।
रात्रंदिन झिजवून देहाला । म्लेंच्छ जन पराभविले ॥ ५ ॥
स्वधर्माचें समुद्धरण । स्वदेशीं केलें यत्नेंकरून ।
दीन प्रजेस सुखवून । ताप हरिला सज्जनांचा ॥ ६ ॥
संपूर्ण महाराष्ट्र देश आपुला । यवनापासून सोडविला ।
एक छत्री स्वतंत्र केला । विजयध्वज उभारुनी ॥ ७ ॥
प्रताप रायगडासमान । अनेक दुर्ग बांधिले नवीन ।
आरमारें सज्ज करून । बंदोबस्त राखिला ॥ ८ ॥
युद्धामाजीं अत्यंत कुशल । ऐसें केलें आपुलें बळ ।
शरीरसौख्य तुच्छ केवळ । रात्रंदिन मानिलें ॥ ९ ॥
प्रजारंजनी धरून आवडी । दीन प्रजेचीं वारी सांकडीं ।
नीति न्यायीं धरून गोडी । राज्यपद्धती चालविली ॥ १० ॥

महाभागें शिवनृपाळे । यापरी अघटित कृत्य केलें ।
त्याचे सुपरिणाम फार झाले । देशस्थितिवरी तेधवां ॥११॥
पोटभर न्हवतें जया अन्न । ते करूं लागले सुग्रास भोजन ।
दुःख दुर्भिक्ष अवर्षण । देशांतून पळालें ॥ १२ ॥
सुव्यवस्थेनें चोरभय । पराक्रमानें परचक्रभय ।
यांचें निर्मूलन होऊन अभय । प्रजेप्रती लाधलें ॥ १३ ॥
निर्भय होतां कृषीवल । धरित्री सेविती सर्व काळ ।
धरणीमाता द्विगुणित फळ । देऊं लागली सहजची ॥१४॥
गुराढोरांची संख्या वाढली । दूधदुभत्याची वृद्धी झाली ।
मग पुष्टता सहज आली । प्रजाजनाच्या देहाप्रती ॥ १५ ॥
धड वस्त्र कधीं न भेटे । तेथें आले शेले दुपेटे ।
उदासीनतेचा आश्रय तुटे । महाराष्ट्रीं तेधवां ॥ १६ ॥
शिवरायाच्या छत्राखालीं । एकत्र जाहली महाराष्ट्रमंडळी ।
परवशता शृंखळा तुटली । ताप पूर्ण निवाला ॥ १७ ॥
वीरश्रीला आला भर । निपजले योद्धे समरधीर ।
महत्वेच्छा बळावली थोर । महाराष्ट्र देशीं तेधवां ॥ १८ ॥
सद्गुणांस आलें पीक । विद्यार्जनास लागले लोक ।
कवि साधु पंडितादिक । वसूं लागले महाराष्ट्रीं ॥ १९ ॥
पवित्र स्थानीं वारंवार । होऊं लागले उत्साह थोर ।
पुण्यकारक कृत्यें अपार । घडूं लागलीं या देशीं ॥ २० ॥
नृपवर्याच्या प्रतापगडीं । गुरुरायाच्या सज्जनगडीं ।
उत्साहसमारंभ कडोविकडीं । थोर होऊं लागले ॥ २१ ॥
महाराष्ट्राची दैना फिटली । लक्ष्मी पाणी भरूं लागली ।
विजयश्रीनें वसती केली । महाराष्ट्र देशीं तेधवां ॥ २२ ॥

देवपूजा हरिकीर्तनें । वेदघोषाचीं पारायणें ।
पवित्र गायत्रीपुरश्चरणें । निर्भय होऊं लागलीं ॥ २३ ॥
नृपसत्ता अव्याहत । होती देशमाजीं चालत ।
स्वस्वकर्मीं जन रत । होते नित्य सर्वत्र ॥ २४ ॥
बहुत पुण्य जन आचरले । तेच तदा जन्मास आले ।
आह्मी सर्व दुर्दैव बळें । आतां जन्म पावलों ॥ २५ ॥
सद्‌गुणांस होतें उत्तेजन । दुर्गुणांचें नव्हतें दर्शन ।
अहा शिवनृपाळ आनंदसदन । रंजवीत होता प्रजेतें ॥२६॥
शिवनृपाळ छत्रपती । कीर्तिध्वज फडकला दिगंतीं ।
हतवीर्य झाल्या शत्रुपंक्ती । अकंटक राज्य जाहलें ॥२७॥
शिवमूर्ती यशस्वी झाली । इंद्रासम संपत्ती लाधली ।
वैभव लक्ष्मी चालून आली । शिवरायाच्या सदनांत ॥२८॥
सुंदर गज द्वारीं झुलती । सहस्त्रावधी अश्व हिंसती ।
मंगल वाद्यें सदा वाजती । नृपप्रासादीं तेधवां ॥ २९ ॥
गजशाळेंत नाग बहुत । अश्वालयीं हय अनंत ।
शस्त्रसदनीं शस्त्रें अगणित । स्थित होतीं नृपाच्या ॥ ३० ॥
कोशागारीं अमूप धन । कोण करील त्याचें वर्णन ।
वाटे कुबेराचें भांडार येऊन । या सुस्थळीं राहिलें ॥ ३१ ॥
पाच वैडूर्य इंद्रनील । गोमेद पुष्कराज माणिकें तेजाळ ।
अमोलिक मौक्तिकें सुढाळ । कोशागारीं शोभती ॥ ३२ ॥
मोहरा पुतळ्या सतळ्या होन । या धनाचें न होय गणन ।
सुवर्ण रौप्याच्या कांबी करून । होत्या कोशीं ठेविल्या ॥३३॥
रत्नखचित अलंकार । मुक्ताफळांच्या माळा सुंदर ।
सुवर्णाचे नग अपार । कोशागारीं शोभती ॥ ३४ ॥

सुवर्ण पात्रें रौप्य भाजनें । यांनीं भरलीं कोशसदनें ।
बहुमोल भर्जरी वसनें । गणती नसे तयांची ॥ ३५ ॥
शालू दुपेटे पितांबर । पाटावे शेले अमोल सुंदर ।
ऐशीं दुकूल वसनें अपार । होतीं संग्रहित जाहलीं ॥३६॥
महाभाग शिवनृपवर । अविश्रांत करी कारभार ।
धर्मराजासम सुख अपार । प्रजेप्रती देतसे ॥ ३७ ॥
संभाजीराव जेष्ठ कुमर । करी मूर्खत्व अनाचार ।
ह्मणून प्रीती तयावर । नव्हती मुळींच नृपाची ॥ ३८ ॥
कनिष्ठ सुत राजाराम । सुंदर सुलक्षणी गुणधाम ।
तयावरी नृपाल प्रेम । बसलें होतें सहजची ॥ ३९ ॥
राजाराम माझा बालक । होईल प्रतापी राज्यरक्षक ।
दुष्ट अविंधांस लावील धाक । ऐसें नृपाळ वदतसे ॥ ४० ॥
पुण्यश्लोक शिवनृपती । सद्गुरूपद धरून चित्तीं ।
राज्य चालवी उत्तम रीती । शास्त्रप्रणित पथानें ॥ ४१ ॥
ऐसा कांहीं काळ लोटतां । देशांत आली सहज शांतता ।
मग तो महाभाग तत्वतां । धर्मवृद्धी आचरी ॥ ४२ ॥
समर्थगुरूचें साह्य घेऊन । धर्ममार्गीं लावी स्वजन ।
रामोपासना पंथ पावन । वृद्धिंगत करीतसे ॥ ४३ ॥
सज्जनगडावरी जाऊन । साधुसंतांस पाचारून ।
तेथें स्वयें करी कीर्तन । भक्तिभाव धरूनी ॥ ४४ ॥
रामोपासना बळावली । देशामाजीं प्रसृत झाली ।
भजनरंगीं बहु रंगली । महाराष्ट्रमंडळी तेधवां ॥ ४५ ॥
भगवा झेंडा फडकला । प्रत्येक दुर्गीं बहु शोभला ।
यशोदुंदुभीचा शब्द गेला । द्वीपांतरीं तेधवां ॥ ४६ ॥

रायें म्लेंच्छवर्ग पराभविला । सद्धर्म जागृतीस आणिला ।
तेणें सद्‌गुरूच्या आनंदाला । भरतें आलें सहजची ॥४७॥
सद्‌गुरूचा सच्छिष्य मेळा । तेव्हां ठायीं ठायीं पसरला ।
रामनामाचा गजर चालिला । महाराष्ट्र देशीं प्रेमानें ॥४८॥
दृढोपासना चालू झाली । भूदेव संतांस शांती लाधली ।
सत्कर्म योगाची वृद्धी जाहली । राष्ट्रीं मंगल जाहलें ॥४९॥
ज्याकारणें अवतार झाला । तो कार्यभाग सिद्धीस गेला ।
सुख शांतता आर्यभूमीला । शिवप्रतापें लाधली ॥ ५० ॥
मग तो महाभाग नृपवर । मंत्रीवर्ग घेऊन बरोबर ।
आपुले मुख्य मुख्य दुर्ग समग्र । जाऊन पाहे एकदां ॥५१॥
दुर्गप्रदेशीं भ्रमत भ्रमत । साधु संतांचीं दर्शनें घेत ।
दानधर्म बहुत करीत । प्रतापगडीं पातला ॥ ५२ ॥
मंत्री आप्त सरदार जन । त्यांस तेथें प्रेमें भेटून ।
भवानीची पूजा करून । कांहीं दिवस घालवी ॥ ५३ ॥
राजाराम कनिष्ठ कुमर । त्यास शिकवी विद्या समग्र ।
अश्वारोहण शस्त्रविद्या प्रकार । स्वयें कथी तयातें ॥ ५४ ॥
राजनीती राजधर्म । मानवांचें कर्तव्यकर्म ।
नाना परी नृप गुणधाम । निज सुतातें शिकवीतसे ॥५५॥
एकनिष्ठ सरदार पाचारून । देई निज सुताचे मित्र करून ।
ऐशापरी बहुत दिन । रायें तेथें काढिले ॥ ५६ ॥
मग रायें एके दिनीं । मुख्य मंत्र्यांस पाचारुनी ।
सभा केली राजभुवनीं । कांहीं मंत्र कथावया ॥ ५७ ॥
गंभीरपणें नृपाळ बोले । मंत्रीहो आजवर कष्ट केले ।
आपुलें राज्य देशीं स्थापिलें । दुष्ट म्लेंच्छ शासिले ॥५८॥

संभाजी आमुचा वडील सुत । निघाला मूर्ख आणि दुर्वृत्त ।
नाहीं घडणार आतां पुरुषार्थ । तयापासून या जगीं ॥५९॥
राजाराम कनिष्ठ नंदन । आहे सद्‌गुणें सुसंपन्न ।
हाच करील यशवर्धन । ध्यानीं धरा गोष्ट ही ॥ ६० ॥
कालवशें प्रसंग येईल । तेव्हां स्मरा माझे बोल ।
हें राजाराम मम बाल । रक्षण करा विक्रमें ॥ ६१ ॥
'बहु बरें' मंत्री बोलले । राजारामाचे गुण वर्णिले ।
मग सर्व स्वस्थळीं गेले । निरोप घेऊन नृपाचा ॥ ६२ ॥
स्वस्ति श्री शिवछत्रपती । धर्मराजासमान ख्याती ।
यशोदुंदुभी नित्य गाजती । दूर देशीं जयाच्या ॥ ६३ ॥
तो महाभाग शिवनृपाळ । प्रतापगडीं काढून कांहीं काळ ।
मग सर्व घेऊन अल्प बळ । रायगडीं पातला ॥ ६४ ॥
शांतपणें कांहीं दिन । धर्ममार्गी लक्ष ठेवून ।
राज्य करी शहाजीनंदन । रायगडीं राहुनी ॥ ६५ ॥
म्लेंच्छवर्ग पराभविला । स्वधर्म जागृतीस आणिला ।
स्वराज्यवृक्ष देशीं लाविला । स्वजनां सौख्य दीधलें ॥६६॥
केलें साधूंचें परित्राण । दुर्जनांचें केलें हनन ।
सद्धर्माचें केलें स्थापन । जगीं अवतार घेउनी ॥ ६७ ॥
अवतार कृत्य समाप्त झालें । मग रायें मनीं आणिलें ।
आतां कर्तव्य नसे राहिलें । या भूलोकीं आपुलें ॥ ६८ ॥
शिवावतार शिवनृपाळ । विक्रमें गाजवून भूमंडळ ।
धवल यश ठेवून सोज्वळ । अवतार आपुला संपवी ॥६९॥
यापुढें निधन-कथानक । कासया वर्णावें शोककारक ।
शिवचरित्र मंगलदायक । येथेंच आतां संपवूं ॥ ७० ॥

शिवरायाचे सुगुण गण । प्रेमभरें ध्यानीं आणून ।
मग शेवट गोड करून । संपवूं आपुला ग्रंथ हा ॥ ७१ ॥
मुख्य ग्रंथ समाप्त जाहला । आतां उपसंहार मात्र राहिला ।
तो कथन करूं श्रोतयांला । पुढिल अध्यायीं निश्चयें॥७२॥
जय शिवराया पुण्यश्लोका । जय म्लेंच्छघ्ना क्लेशहारका ।
जय सद्धर्मसंरक्षका । नमस्कारितों तुजप्रती ॥ ७३ ॥
आमुच्या देशीं अवतरून । केलेंस आमुचें समुद्धरण ।
तव चरित्र पुण्यपावन । प्रमोद देतें सकळांतें ॥ ७४ ॥
श्रीशिवविजयग्रंथ । शिवावतार चरित्र अद्भुत ।
वर्णन करी भावें अनंत । त्रिंशतितमोध्याय गोड हा ॥७५॥

# अध्याय ३१ वा.

॥ श्रीगणेशायनमः ॥

अवतीर्ण होऊन पृथ्वीवरती । शिवरायें केली ख्याती ।
तें चरित्र यथामती । येथवरी वर्णिलें ॥ १ ॥
या चित्रचरित्रापासुन । काय बोध घ्यावा आपण ।
तें उपसंहार निरूपण । करूं आतां विवेकें ॥ २ ॥
असंख्य मानव जन्मा येती । अशाश्वत इंद्रियसुखें भोगिती ।
नाना यत्नें उदर भरिती । शेवटीं पावती पंचत्व ॥ ३ ॥
मात्रुदरांतुन जन्म झाला । अल्पकाळें खेळूं लागला ।
अनेक करून बाळलीला । शैशवावस्था घालविती ॥ ४ ॥
प्राप्त होतां पुढें यौवन । अनंगरंगीं रंगे मन ।
चैन न पडे कामिनिर्विण । सदा सर्वदा या वयीं ॥ ५ ॥
तरुण स्त्रियांचीं सहज चालणीं । वेध लाविती याचे मनीं ।
सुंदर कांता दिसतां नयनीं । चित्त चंचळ होतसे ॥ ६ ॥
पुरुषही असो स्त्रीवेषधारी । तरी विकार उपजे अंतरीं ।
कामचेष्टा नाना परी । पुरुष करी उल्हासें ॥ ७ ॥
आवडे शृंगार गायन । गीत नृत्यीं रमे मन ।
स्त्रियांचा ध्यास रात्रंदिन । दुजें कांहीं नावडे ॥ ८ ॥
ऐसें कांहीं लोटतां वय । मग आवडे द्रव्यसंचय ।
अपत्य सुखाशा उत्पन्न होय । मध्यम वयीं मानवा ॥ ९ ॥
प्रपंच रहाटीच्या गुंतागुंती । मानव मना बद्ध करिती ।
मोहसमुद्रीं बुडून जाती । अज्ञ मानव सहजची ॥ १० ॥

संसार करितां कष्ट करूनी । धक्के बसती क्षणक्षणीं ।
सुख दुःखाचें भाग दोन्ही । कर्मानुसार आढळतां ॥ ११ ॥
तरुणावस्था नकळत संपली । पुढें वृद्धदशा प्राप्त झाली ।
मग चिंतेनें माळ घातली । मानवाप्रती सहजची ॥ १२ ॥
शरीरसेवा कोण करील । प्रपंचाचें कैसें होईल ।
मत्पुत्र कैसा द्रव्य मिळवील । हाच ध्यास सर्वदा ॥ १३ ॥
ऋणानुबंध पुढें सुटला । नको नको ह्मणतां प्राण गेला ।
देह चितेवरी भस्मला । गेलें बुडालें सर्वही ॥ १४ ॥
ऐसे मानव किऱ्येक जन्मले । हा! हा! कित्येक मरून गेले।
परी शिवराया ऐसे धन्य झाले । कोण हो या धरेवरी॥१५॥
प्रपंच साधून परमार्थाचा । जेणें लाभ केला साचा ।
मूर्त पुतळा सद्यशाचा । ऐसा कोण दूसरा ॥ १६ ॥
सज्जनांचा पूर्णाभिमान । स्वधर्मावरी निष्ठा पूर्ण ।
दृढ निश्चय मेरूसमान । अद्वितीय शूरत्व ॥ १७ ॥
दीन दयाळ स्थिर चित्त । नेम निष्ठा बुद्धी शाश्वत ।
मनोनिग्रह धैर्यपर्वत । ऐसा कोण दूसरा ॥ १८ ॥
बालपणींचे खेळ सरतां । करूं लागला राष्ट्रचिंता ।
दीन दुबळ्यां विपत्तिग्रस्तां । पाहून कळवळे अंतरीं ॥ १९॥
शौर्य चातुर्य यवनांस दाविता । तरी बादशहा प्रसन्न होता।
जहागिरी सरदारी समर्पिता । अत्यंत तुष्ट होउनी ॥२०॥
राज्यसुखाची धरून आस । परप्रभूचा होऊन दास ।
पीडा द्यावी स्वीयजनांस । हें न मानलें रायातें ॥ २१ ॥
देशशत्रू यवन सकल । स्वजन पीडिती होऊन प्रबल ।
त्यांचा नाश करावा समूळ । ऐशी इच्छा धरियेली ॥२२॥

प्रयत्नांतीं परमेश्वर । ऐसा केला पूर्ण निर्धार ।
प्रबल यवनांशीं मांडिलें वैर । जीवित्व तुच्छ मानुनी ॥२३॥
व्याघ्रासमान होते यवन । मावळे मराठे त्यांपुढें दीन ।
तयांस देऊन प्रोत्साहन । रायें सद्यश संपादिलें ॥ २४ ॥
अहा केवढी कर्तृत्व शक्ती । काय निःसीम स्वदेशभक्ती ।
मावळ्यांकरवीं दिल्लीपती । पराभविला ज्यानें ॥ २५ ॥
सुरूप यवनी हातीं लागली । पापदृष्टीनें नाहीं पाहिली ।
पुण्यमार्गप्रवृत्ती दाविली । स्वीय जनां नृपानें ॥ २६ ॥
अफजुलखानासमान वीर । आला घेऊन सेनासागर ।
अहा केवढा प्रसंग दुर्धर । आला होता तयावरी ॥ २७ ॥
अपूर्णधैर्य कोणी असता । तरी गडबडून प्राण त्यागिता ।
शिवरायाची अतुल धीरता । नाहीं ढळली अल्पही ॥२८॥
शरीरपतनें स्वर्ग मिळेल । सिद्धी जाहल्या राज्य लाभेल ।
ऐसें निश्चयाचें धरून बळ । रायें अफजुल मारिला ॥२९॥
कांहीं अधैर्य राव दाविता । राज्यशकट तरी मोडता ।
धैर्य शौर्य रायें तत्वतां । प्रकट केलें अपार ॥ ३० ॥
यवनसेना ठकवून सारी । पास्तेखानाच्या शिरे मंदिरीं ।
धाक उपजवी यवन अंतरीं । काय धीरता रायाची ॥ ३१ ॥
अंगीं होतें शौर्य बळ । परी जाणे काळ वेळ ।
जयसिंगासी युद्ध केवळ । असाध्य ऐसें जाणिलें ॥ ३२ ॥
साम केला बोलून मधुर । जयसिंगाचें तुष्टविलें अंतर ।
दिल्लीपतीचा सरदार थोर । मित्र करून ठेविला ॥ ३३ ॥
पुढें दिल्लीस जाणें आलें । बादशहानें कपट केलें ।
कारागृहीं राया ठेविलें । कोण अनर्थ ओढवला ॥ ३४ ॥

कैशी अजब युक्ती राचिली । महत्धैर्ये सिद्धीस नेली ।
कालदंष्ट्रेंतून निसटली । शिवमूर्ती तेधवां ॥ ३५ ॥
अवरंगजेबासमान वैरी । ससैन्य असतां छातीवरी ।
तो महाभाग यवनारी । गेला ठकवून तयातें ॥ ३६ ॥
प्राण घाताचे प्रसंग पडले । तरी धैर्य नाहीं खचलें ।
चित्त नाहीं चळों दिलें । निश्चयापासून कधींही ॥ ३७ ॥
नाना संकटीं नाना युक्ती । रचून केली जगीं ख्याती ।
कष्ट केली धर्मोन्नती । स्वजनां सौख्य दीधलें ॥ ३८ ॥
शौर्यें राज्य मेळविलें । त्याकडे नाहीं दुर्लक्ष केलें ।
प्रजापालनीं चित्त ठेविलें । दक्ष सदैव रायांनं ॥ ३९ ॥
दीन प्रजा सुखी असावी । धरित्रीची सेवा घडावी ।
सुख समृद्धी बहुत व्हावी । ऐसे नियम ठराविले ॥ ४० ।
जुलूम जबरी कदा न व्हावी । प्रजा आपुली सुखी रहावी ।
ऐशी व्यवस्था बरवी । राव यत्नें ठेवीतसे ॥ ४१ ॥
विद्येस दिधलें उत्तेजन । स्वभाषेचें केलें शोधन ।
यवनी शब्द भाषेंतून । कोशशास्त्रें घालविले ॥ ४२ ॥
कार्यबाहुल्य होतें सतत । नाना संकटें होतीं धांवत ।
तितुक्यांतही स्वीय चित्त । होतें प्रभुपदीं ठेविलें ॥ ४३
मोहमय सर्व संसार । क्षणभंगुर आणि असार ।
ऐसा भाव धरून साचार । वर्तत होता भूपती ॥ ४४ ॥
स्वीयजनांची वारी सांकडीं । कथा कीर्तनीं घाली उडी ।
भगवद्भजनीं धरी आवडी । सत्य प्रेमें करूनी ॥ ४५ ॥
संतसज्जनांचा दास होऊन । प्रेमें करी स्वयें भजन ।
भक्तिरंगें सबाह्य रंगून । भजनीं नाचे निजांगें ॥ ४६ ॥

शक्रतुल्य वैभव लाधला । परी ईश्वरास नाहीं विसरला ।
विरागभाव चित्तीं बाणला । होता नित्य नृपाच्या ॥४७॥
राज्यलोभ आहे कितपत । याची सद्गुरू पाहे प्रचीत ।
राज्यभिक्षा घालून त्वरित । नृप विरागी जाहला ॥ ४८ ॥
पूर्ण वैराग्ययुक्त चित्त । श्रम पसारा लोकहितार्थ ।
ऐसी बुद्धी नृपें सतत । स्वाचरणानें दाविली ॥ ४९ ॥
वयास लागलें वर्ष षोडश । तेथून राबे रात्रंदिवस ।
देशहिताची धरून आस । आमरण काया कष्टविली ॥५०॥
नाणिली चित्तीं भूक तहान । पाहिलें नाहीं देश, वन ।
चित्त ठेवून साभिमान । कार्यसिद्धी संपादिली ॥ ५१ ॥
किती सेना मिळविली । कैशी सुस्थिति तिची राखिली ।
कैशीं चित्तें आकर्षिलीं । निजजनांचीं प्रेमानें ॥ ५२ ॥
निजजनांचा भावभक्ती । तदनुरूप दावून त्यांना प्रचीती ।
आकर्षिल्या मनोवृत्ती । चतुरपणें तयांच्या ॥ ५३ ॥
किती प्रांत हस्तगत केले । किती दुर्ग नवे बांधिले ।
जाणों आकाश कंवटाळिले । महात्म्यानें निजांगें ॥ ५४ ॥
काम क्रोधादि षड्रिपूंस । निश्चयबळें केले दास ।
चित्र चरित्र दाविलें जगास । महाभागें शिवनृपें ॥ ५५ ॥
मनुष्याची कर्तृत्व शक्ती । खरोखर आहे प्रतापी किती ।
आणून दिधली याची प्रचीती । लोकांमाजी नृपानें ॥५६॥
नृपकृत्यें नव्हेत अमानुष । यास्तव अनुकरणीय सर्वांस ।
दृढ निश्चयें करितां अभ्यास । शक्य ऐसें दिसेल ॥ ५७ ॥
प्रत्येक काजीं सिद्धी लाधली । नृपाळकृती सुफळें फळली ।
सहज जनांची भक्ती बसली । भूपावरी निःसीम ॥ ५८ ॥

म्लेंच्छ प्रबल दैत्यांसमान । त्यांचें केलें जेणें शासन ।
वेदोक्त धर्माचें समुद्धरण । जेणें केलें प्रतापें ॥ ५९ ॥
ऐशा महाभाग शिवनृपाला । आर्यी शिवावतार मानिला ।
हें आर्यविचारसरणीला । अनुरूप ऐसें दिसतसे ॥ ६० ॥
कराया साधूंचें रक्षण । दुर्जनांचें करावया शासन ।
कराया धर्मसंस्थापन । मीं युगीं युगीं अवतरतों ॥ ६१ ॥
ही भगवदुक्ती सुमनोहर । नित्य ध्याती आर्यकुमर ।
इजशीं अनुरूप शिवनृपवर । कृत्यें करिता जाहला ॥ ६२ ॥
परम भाविक आर्यपुत्र । पाहून नृपाचें चित्र चरित्र ।
मानिला शिवावतार पवित्र । काय नवल या मार्गी ॥ ६३ ॥
सुफलित कृत्यें सर्वथैव । त्यांतील असाधारणत्वास्तव ।
जनीं मानिला अवतारभाव । काय नवल यामार्गी ॥ ६४ ॥
परमेश्वराच्या पवित्र विभूती । ऐशापरी अवतीर्ण होती ।
जगीं राखिती सुस्थिती । ऐसें प्राचीन मत असे ॥ ६५ ॥
तदनुरूप शिवावतार झाला । आपुला प्रताप गाजविला ।
आर्यधर्म समुद्धरिला । उदंड यश मेळविलें ॥ ६६ ॥
कांहीं अज्ञान लोक परस्थ । ह्मणती कुटिल शहाजीसुत ।
अन्याय कृत्यें करून बहुत । तेणें राज्य मिळविलें ॥ ६७ ॥
स्वामिद्रोह प्रथम केला । अफजुलखान कपटें मारिला ।
षास्तेखानास दगा दिधला । दिल्लीपतीतें फसविलें ॥ ६८ ॥
ही नव्हे न्यायनीती । ही सर्व अमार्गप्रवृत्ती ।
धर्मयुद्धीं करून ख्याती । नाहीं राज्य मेळविलें ॥ ६९ ॥
अधर्ममार्गें नित्य चालून । अकर्में द्रव्य मेळवून ।
जेणें केलें राज्यसाधन । काय वर्णावें तयाला ॥ ७० ॥

परस्थांच्या ऐशा उक्ती । कित्येक स्वजन सत्य मानिती ।
धर्माधर्म विवेक विसरती । काय आश्चर्य दूसरें ॥ ७१ ॥
धर्म आणि नीति ज्ञान । यांचीं तत्वें असती गहन ।
निर्विकारपणें पहावीं शोधून । तरीच आढळून येतील ॥७२॥
एका दीन द्विजाचे सदनीं । तस्कर शिरले शस्त्रें घेउनी ।
विप्रकुटुंब अत्यंत छळुनी । गृह वेढिलें तयांनीं ॥ ७३ ॥
ब्राह्मणाप्रती करून दास । बळें भोगिती तत्संपदेस ।
अत्यंत दुःखें रात्रंदिवस । तळमळ करी विप्र तो ॥ ७४ ॥
तदुदरीं सुपुत्र जन्मला । युक्तीनें तस्करावरी उठला ।
हा काय स्वामिद्रोह झाला । पहा मनीं विचारुनी ॥७५॥
चोरट्यांस छद्में ठकविलें । कोण म्हणेल पातक केलें ।
सारासार विचारें पाहिलें । पाहिजे सदन नीतीचें ॥ ७६ ॥
सोडवावया मातापिता । चोरट्यांप्रती वधूं जातां ।
विसरून आपुली कर्तव्यता । बंधू आडवे येतील ॥ ७७ ॥
तरी त्यांतें शिक्षा करावी । स्वमार्गाचीं विघ्नें वारावीं ।
हीच न्याय रीती बरवी । कोण नाहीं म्हणेल ॥ ७८ ॥
सर्व बंधूंचें कार्य एक । असतां नुमजतील जे कटक ।
ते उपटावे निःशंक । काय अन्याय यामध्यें ॥ ७९ ॥
उगीच स्थल आडवून बसला । नाहीं उपयोग देशहिताला ।
तो देशहितार्थ ठकविला । काय अन्याय या मध्यें ॥८०॥
हीं न्यायतत्वें साधारण । मान्य करितील ज्ञाते सज्जन ।
मग पहा विचारून । काय केलें शिवरायें ॥ ८१ ॥
स्वदेश आपुला मातापिता । दुष्ट यवनीं व्यापिला असतां ।
तया युक्तीनें सोडवूं जातां । अधर्म होतो कायसा ॥ ८२ ॥

देशशत्रू म्लेंच्छ जन । तयांपाशीं सलगी राखून ।
आड येती कार्याकारण । चंद्रराव मोऱ्यादिक ॥ ८३ ॥
ते देशकंटक उपटून टाकिले । सत्कार्य मार्ग निर्विघ्न केले ।
यांत काय वावगें झालें । शिवरायाच्या हातुनी ॥ ८४ ॥
मदमत्त अफ्जुलखान । कराया आला प्राणहरण ।
त्यास दाखविलें यमसदन । काय अधर्म यामाजीं ॥ ८५ ॥
नृपाल नाश संकल्पिला । सैन्यसंभार घेऊन आला ।
कासया रात्रीं स्वस्थ निजला । षास्तेखान अविंध ॥ ८६ ॥
ज्याचा नाश आदरिला । त्यानें येऊन दगा केला ।
यांत अन्याय काय झाला । पहा बरें विचारुनी ॥ ८७ ॥
अवमानून बंदींत घातलें । तेथें युक्तीनें शत्रूस ठकविलें ।
यांत काय पातक केलें । विचार याचा करावा ॥ ८८ ॥
तुळशीपत्रें कर्णीं घालून । नाहीं होत राज्यसाधन ।
काल, देश, वर्तमान । पाहून वर्तणें लागतें ॥ ८९ ॥
सत्कार्याचा धरून निश्चय । सद्धेतूचा करून आश्रय ।
राजनीतीनें करितां कार्य । यांत पातक असेना ॥ ९० ॥
ऐशी धरून विचारसरणी । मग शिवनृपाची पहा करणी ।
सर्वथा योग्य वाटेल मनीं । नीतिद्रष्ट्या सज्जनां ॥ ९१ ॥
या पृथ्वीचे पाठीवरी । प्रख्यात राजकुलामाझारीं ।
आळशी अविवेकी दुराचारी । राजे असती कित्येक ॥९२॥
नवीन राज्य तो साधेना । आहे तेंही राखवेना ।
सौख्य न देतां स्वीयजनां । आपण विलास भोगिती ॥९३॥
सारासारविचारशून्य । नित्य करिती परावलंबन ।
टाकून क्षत्रधर्माभिमान । अजागलस्तनवत् राहती ॥९४॥
भारभूत ऐशा नृपानीं । शिवचरित्रीं आदर धरूनी ।
प्रेमयुक्त अंतःकरणीं । चित्र चरित्र वाचावें ॥ ९५ ॥

याचें करितां नित्य मनन । कर्तव्याची बाणेल खूण ।
स्वीय न्यूनता चित्तीं येऊन । लाज मना वाटेल ॥ ९६ ॥
शिवचरित्रापासून अगाध । नृपांस मिळेल उत्तम बोध ।
सन्मार्गाचा लागेल शोध । या चरित्रीं सहजची ॥ ९७ ॥
पृथ्वीवरील सामान्य जन । यांसही कर्तव्यविचारसाधन ।
शिव चरित्र पुण्य पावन । बोधप्रद होईल ॥ ९८ ॥
आम्ही शूरत्वाचे पुतळे केवळ । आमुचें धैर्य अचळ ।
परी काळ नाहीं अनुकूळ । म्हणून स्वस्थ बैसलों ॥ ९९ ॥
अंगीं नसतां कर्तृत्वगुण । ऐसें फोल उगाच बोलून ।
लोकीं कित्येक दांभिक जन । आपुली प्रौढी मिरविती ॥ १००
अंगीं असेल कर्तृत्वशक्ती । तरी कांहीं येईल प्रचीती ।
काळ वेळ देश स्थिती । होईल अनुकूळ सहजची ॥ १०१ ॥
म्लेंच्छ प्रबळ राक्षसांसमान । त्यांचे अंकित सर्व जन ।
प्रजा सारी अत्यंत दीन । तेज नाहीं कोणामध्यें ॥ १०२ ॥
ऐसा असतां कठिण काळ । शिवरायास झाला सानुकूळ ।
हें सर्व कर्तृत्वशक्तीचें बळ । घ्यावा बोध जनांनीं ॥ १०३ ॥
कर्तृत्व दावावयाकारणें । भिन्न काळीं भिन्न साधनें ।
काळानुरूप कर्तृत्व गुणें । सिद्धी खचित मिळेल ॥ १०४ ॥
काळप्रतिकूलता सांगणें । म्हणजे अकर्तृत्व दावणें ।
ऐसें शिवचरित्रापासून जाणणें । सारतत्व समस्तीं ॥ १०५ ॥
या चित्र चरित्रापासून । दुसरी जाणावी एक खूण ।
उत्कर्षापकर्ष देशाकारण । चक्रन्यायें येताती ॥ १०६ ॥
कितीही असो प्राप्त विपत्ती । ती कालांतरें जाईल निश्चिती ।
म्हणून उदासीनता चित्तीं । कदा कोणी धरूं नये ॥ १०७ ॥
आम्हीं सर्वस्वीं नाडलों । वैभवापासून आंचवलों ।
विपन्नावस्थेनें पूर्ण ग्रासलों । आतां सुटका असेना ॥ १०८ ॥

ऐसे निराशायुक्त विचार । नित्य करणें हा अविचार ।
प्रयत्नीं सिद्धिदाता ईश्वर । ऐसें सत्य समजावें ॥ १०९ ॥
सत्यसंकल्प चित्तीं असेल । तरी परमेश यश देईल ।
यास्तव निश्चयाचें बळ । सिद्धी देतें सर्वदा ॥ ११० ॥
दैव होईल सानुकूल । दूर जाईल विपत्काल ।
गतवैभव पुन्हां येईल । ईश कृपा झालिया ॥ १११ ॥
मृत्युलोक आहे क्षणभंगुर । येथील सुखें सर्व असार ।
यास्तव मनोनिग्रह करून थोर । नित्य वर्तलें पाहिजे ॥ ११२ ॥
प्रपंचीं करावा परोपकार । नित्य करावा परमार्थविचार ।
दोन्ही साधून भवसागर । तरून धन्यत्व मिळवावें ॥ ११३ ॥
शिवचरित्राचें माहात्म्य थोर । त्यांत शोधून सारासार ।
कथन केला हा उपसंहार । प्रेमळ श्रोतयांकारणें ॥ ११४ ॥
सुरस चरित्र उपसंहार वर्णन । याचें येथवरी झालें कथन ।
आतां कथानुक्रम सांगून । ग्रंथ आपुला संपवूं ॥ ११५ ॥
परब्रह्मास करून नमन । वंदनीयांप्रती वंदून ।
मग ग्रंथ प्रस्ताव करून । प्रथमाध्याय संपविला ॥ ११६ ॥
प्राचीन इतिहास दिग्दर्शन । करून यवनांचें केलें वर्णन ।
मग देशस्थिति कथन । द्वितीयाध्यायीं केलें असे ॥ ११७ ॥
कुलवृत्त शिवजनन । तृतीयाध्यायीं केलें कथन ।
बाल्यवृत्त दादोजीचें निधन । चवथ्यामाजीं सांगितलें ॥ ११८
पुरंदरादिक दुर्ग घेतले । तें पंचमाध्यायीं वर्णिलें ।
शहाजीस यवनें कैद केलें । सहाव्यामाजीं ही कथा ॥ ११९ ॥
सातव्यांत झालें गुरुदर्शन । अष्टमाध्यायीं उपदेशवर्णन ।
विजापुराहून निघे अफजुलखान । तें वर्णिलें नवव्यांत ॥ १२० ॥
दत्ताजीपंत अनुकूल झाला । तो भाग दशमीं वर्णिला ।
अफजुलखान जावलीस आला । एकादशाध्यायीं सांगितलें । १२१

बाराव्यांत अफजुलखानहनन । त्रयोदशीं विजयोत्साहवर्णन ।
चतुर्दशाध्यायीं देवी स्थापन । आणिक युद्ध वर्णिलें ॥ १२२ ॥
गृहस्थिति शृंगार गुरुदर्शन । यांचें पंधराव्यांत केलें कथन ।
घोरखड्याचा घतला प्राण । षोडशाध्यायीं नृपानें ॥ १२३ ॥
षास्तेखानास दगा केला । तो भाग सप्तदशाध्यायीं वर्णिला ।
कांहीं गुरूपदेश कथन केला । अष्टदशाध्यायामाझारीं ॥ १२४ ॥
जयसिंगाचें झालें आगमन । तें एकोणिसाव्यांत केलें कथन ।
पुरंदरचें युद्ध दारुण । विसाव्यामाजीं वर्णिलें ॥ १२५ ॥
शिवनृपाळ गेला दिल्लीस । तो एकविसाव्यांत इतिहास ।
सिंहगड युद्ध कथा सुरस । बाविसाव्यांत सांगितली ॥ १२६ ॥
गुरूस केलें राज्यार्पण । तें तेविसाव्यांत केलें कथन ।
युद्धकथा नृपस्त्रीनिधन । चोविसाव्यांत वर्णिलें ॥ १२७ ॥
शहाजीराव मृत्यु पावले । तें पंचविसाव्यांत वर्णन झालें ।
अनेक युद्धप्रसंग पडले । सव्विसावे अध्यायीं ॥ १२८ ॥
राज्याभिषेकाचें सुरस वर्णन । सत्ताविसाव्यांत केलें कथन ।
संभाजीचें दुर्वर्तन । अठ्ठाविसाव्यांत सांगितलें ॥ १२९ ॥
श्रीशैलाचें पवित्र दर्शन । व्यंकोजीचें अयोग्य वर्तन ।
या कथेचें झालें वर्णन । एकुणतिसाव्या अध्यायीं ॥ १३० ॥
प्रभुरायाचें निजधामगमन । तिसाव्यांत केलें कथन ।
एकतिसाव्यांत उपसंहार वर्णून । श्रीशिवविजय संपविला ॥
विख्यात रायगडानजीक । ग्राम असे 'महाड' नामक ।
हा शिवविजय पुण्यकारक । तयाग्रामीं रचिला असे ॥ १३२ ॥
शके अठराशें बारा माझारीं । विकृतीनाम संवत्सरीं ।
श्रावण शुद्ध एकादशी इंदुवासरीं । ग्रंथ समाप्त जाहला ॥ १३३ ॥
हा ग्रंथ प्रेमें वाचितां । यश संपदा लाधेल तत्वतां ।
दारिद्य दुःखापासुन मुक्तता । सत्य त्वरें होईल ॥ १३४ ॥

एकदां करितां आवर्तन । प्राप्त होतील उत्तम गुण ।
त्रिवार वाचितां प्रेमेंकरून । अभीष्टार्थप्राप्ति होईल ॥ १३५ ॥
याचें करितां नित्य पठण । नाश पावतील शत्रूगण ।
कैलासनाथ होऊन प्रसन्न । कृपा बहुत करील ॥ १३६ ॥
हा शिवविजय वरद ग्रंथ । ज्यागृहीं असेल संगृहित ।
भाग्यलक्ष्मी वसेल तेथ । शिववरदानेंकरूनी ॥ १३७ ॥
जय अखिल ब्रह्मांडनायका । जय परमात्म्या विश्वपालका ।
जय ईश्वरा विश्वव्यापका । नमन करितों तुजप्रती ॥ १३८ ॥
मी अज्ञान अल्पमती । मज नसे ग्रंथकर्तृत्वशक्ती ।
तूं लिहविलास मम हस्तीं । कृपा करून ग्रंथ हा ॥ १३९ ॥
पर्जन्य पडो यथाकाळीं । उत्तम पिको धरा माउली ।
दुःख दारिद्य नसो मुळीं । आमुच्या राष्ट्रीं ईश्वरा ॥ १४० ॥
धर्ममार्गें चालोत जन । कधीं न पडो अवर्षण ।
विद्या, संपदा, वैभव वाढून । आमुचा देश सुखी असो ॥
राज्यकर्ते द्वैत टाकून । करोत आमुचें प्रतिपालन ।
सत्ताधीश नरांकडून । छलना न हो आमुची ॥ १४२ ॥
त्यांचा आमुचा एक विचार । होऊन चालो कारभार ।
राज्यदरबारीं योग्य अधिकार । प्राप्त होवोत आम्हांतें ॥ १४३ ॥
वैमनस्य लया जाऊन । सौख्य भोगोत सर्व जन ।
हें मागतों कर जोडून । सच्चिदानंदा परमेश्वरा ॥ १४४ ॥
जय भक्तकाम कल्पद्रुमा । जय विश्वेशा सद्गुणधामा ।
जय जय निर्गुणा निरुपमा । ग्रंथ अर्पण तुज असो ॥ १४५ ॥
इति श्रीशिवविजय ग्रंथ । शिवावतार चरित्र अद्भुत ।
वर्णन करी भावें अनंत । एकत्रिंशतितमोऽध्याय गोड हा ॥ १४६ ॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

REFBK-0000546

REFBK-0000546